मार्च -एप्रिल २०१४/पाने ६८/किंमत ₹ १०

# लोकराज्य

## १०,१७ आणि २४ एप्रिल
## महाराष्ट्र मतदानासाठी सज्ज



**निवडणूक विशेष**


लोकशाहीची उज्ज्वल परंपरा जपत
जाती धर्माच्या चौकटीत न अडकता
कोणत्याही मोहाला बळी न पडता
आम्ही
निर्भय मतदान
करणार आहोत आणि
नवा भारत
घडवणार आहोत

वर्ष ६५ वे | अंक १२ | मार्च २०१४

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## संपादन

- मुख्य संपादक — प्रल्हाद जाधव
- संपादक — सुरेश वांदिले
- सहसंपादक — किरण केंद्रे
- विशेष सहकार्य — शिरीष मोहोड (राज्य स्वीप नोडल अधिकारी)

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके
- साहाय्य — विद्या कदम

## सजावट

- मुखपृष्ठ संकल्पना — प्रा. गजानन शेपाळ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — संदीप पवार
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६
**email :** lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
वितरण - ०२२-२२६१६९७६
**email :** lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग




## क्रांतिज्योती

स्थानिक स्वराज्य संस्थांतील महिला सदस्यांचे सक्षमीकरण करून आदर्श व्यक्तिमत्त्व घडवणे आणि निवडणुकांतील महिला उमेदवारांमध्ये आत्मविश्वासाचे प्रेरणास्रोत निर्माण करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगामार्फत 'क्रांतिज्योती' प्रकल्प राबवण्यात आला. या प्रकल्पाला उत्तम प्रतिसाद मिळाला. या प्रकल्पाची दखल केंद्र शासनानेही घेतली. ६

## नवी दृष्टी, नव्या सुधारणा

श्रीमती नीला सत्यनारायण या राज्याच्या पहिल्या महिला निवडणूक आयुक्त. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत अनेक सुधारणा करून आयोगाच्या कामकाजाला नवी दृष्टी दिली. ७

## लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी... (स्वीप)

मतदारनोंदणी आणि प्रत्यक्ष लोकसंख्या यातील तफावत दूर करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. ज्या मतदारांची नोंदणी झाली असूनसुद्धा जे मतदान प्रक्रियेपासून दूर राहतात किंवा ठेवले जातात त्यांना निवडणूक प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्यासाठी या मोहिमेंतर्गत प्रयत्न करण्यात येत आहेत. १०

## खर्च करा, पण नियमाला धरून



सार्वत्रिक निवडणुकीमध्ये उमेदवारास व राजकीय पक्षांना विविध बाबींवर खर्च करावा लागतो. मात्र हा खर्च आयोगाने ठरवून दिलेल्या मर्यादेत व नियमानुसार करणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवारांवर कारवाई होऊ शकते. १७

## लोकसभा निवडणूक : एक दृष्टिक्षेप

तत्काळ संदर्भासाठी उपयुक्त आकडेवारी ३४

## मागे वळून पाहताना...




महाराष्ट्रातल्या निवडणुकांचा रंजक इतिहास ४६

पार्श्वचित्र

अशी झाली पहिली निवडणूक... ४९
मतदानाच्या विविध तऱ्हा(जागतिक निवडणुका)...५३

## आता जबाबदारी आपली


महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकांकरिता संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर सुरक्षेच्या दृष्टीने विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. मतदारांना मतदान केंद्रांचे स्थान शोधणे सोयीस्कर व्हावे या दृष्टीने जीआयएस मॅपिंगद्वारे मतदान केंद्रांची माहिती गुगल मॅपवर उपलब्ध करण्यात आली आहे. निवडणुका निर्भय व नि:पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी सुरक्षेची पूर्ण व्यवस्था करण्यात येईल. मोठ्या संख्येने मतदानासाठी येणे ही आता आपली जबाबदारी ठरणार आहे. ९




आदर्श आचारसंहिता स्वयंस्पष्ट अशी आहे. निवडणूक प्रक्रियेच्या कालावधीत काय करू नये आणि काय करावे, याविषयी या आचारसंहितेत विविध मुद्दे समाविष्ट करण्यात आले आहेत. २७

## स्थानिक निवडणुकांचा सजग प्रहरी राज्य निवडणूक आयोग ६१

## नकाराचा अधिकार




नवा प्रभावी पर्याय ६४

# स.न.वि.वि.




### ज्ञान आणि प्रबोधन

शासकीय योजनांची आणि महत्त्वपूर्ण उपक्रमांची सखोल आणि अभ्यासपूर्ण माहिती जनमानसाला देणारे लोकराज्य हे एक परिपूर्ण मासिक आहे याची प्रचिती आजवरच्या प्रत्येक अंकाने दिलेली आहे आणि म्हणूनच हा अंक सर्वसामान्य जनतेच्या वाचनात यावयास हवा. आनंदवन वाचनालयात आम्ही हे अंक ठेवले असून इथे येणाऱ्या पर्यटक/अभ्यासकांना ते वाचनासाठी उपलब्ध करून दिले जात आहेत.


**– डॉ. विकास आमटे,**
**डॉ. सौ. भारती आमटे,**
आनंदवन, वरोरा

### नवी उमेद बांधणारा अंक

मराठी भाषा विशेषांक फारच सुरेख आणि संग्राह्य झाला आहे. यातील सर्वच लेख केवळ वाचनीय नाहीत तर नवी माहिती देणारे व नवे काय काय घडते आहे, ते सांगणारे आहेत. मला गणेश देवी, रामदास भटकळ, अरुण साधू, प्रमोद मुनघाटे, नागनाथ कोत्तापल्ले यांचे लेख विशेष आवडले. हा अंक खरोखर राज्यात मराठी शिकवणाऱ्या प्रत्येक अध्यापकाने–शिक्षकाने तसेच मराठी लिहिणाऱ्या प्रत्येक पत्रकाराने आमूलाग्र वाचून त्यातून अनेक धडे घ्यावते, असा झाला आहे. साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेला प्रत्येक ग्रंथ ईबुक स्वरूपात सर्वांना मिळणे, ही खूप मोठी पर्वणी आहे. ती जगभरातील प्रत्येक मराठी वाचकाने साधायला हवी.. विश्वकोश तर तसा आधीच आला आहे. मळभ झटकून नवी उमेद बांधणारा हा अंक प्रकाशित केल्याबद्दल सर्वांचे पुन्हा एकदा अभिनंदन...




**– सारंग दर्शने** (ज्येष्ठ पत्रकार, महाराष्ट्र टाईम्स)




### उत्कृष्ट

फेब्रुवारी २०१४ चा मराठी भाषा विशेषांक अतिशक उत्कृष्ट आणि सुंदर निघाला आहे. आपले कौतुक करावे तितके कमी आहे.

**– डॉ. विजया वाड,** अध्यक्ष,
विश्वकोश निर्मिती मंडळ


---

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त लोकराज्यचा अंक उत्कृष्ट आहे. या अंकात अनेक मान्यवरांनी मराठी भाषेच्या अनुषंगाने लिहिलेले लेख निश्चितच उल्लेखनीय आहेत.

**– डॉ. जगदीश पाटील,**
व्यवस्थापकीय संचालक,
(पर्यटन विकास महामंडळ)

### ई –गव्हर्नन्सची परिपूर्ण माहिती

जानेवारी २०१४ च्या लोकराज्य अंकामध्ये आपण वाचकांसमोर ई–गव्हर्नन्स आणि त्याच्या विविध योजनांची सखोल माहिती दिली आहे. मी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उटाडेवाडी, ता. सिल्लोड या शाळेत शिक्षक आहे. माझी शाळा लोकराज्य मासिकाची वार्षिक वर्गणीदार आहे. या मासिकामुळे आमच्या खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांना, नागरिकांना, ई–प्रशासन, ई–स्कॉलरशिप, ई–बँकिंग, महा–ई–सेवा केंद्र इत्यादी शासनाच्या योजनांची परिपूर्ण माहिती होण्यास निश्चितच मदत झाली.




**– अतुल मारकंडे,** जि. प. प्रा. शाळा उटाडेवाडी,
ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद

### सूचना

अंक तपशिलाच्या दृष्टीने निर्दोष व्हावा यासाठी काटेकोर प्रयत्न करण्यात आले आहेत. तथापि जिज्ञासूंनी मूळ स्रोतांशी पडताळणी करणे योग्य.

हा निवडणूक विशेषांक मार्च–एप्रिल असा जोड अंक म्हणून प्रसिद्ध करण्यात येत आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

**वार्षिक वर्गणी – वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/–)**

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी
http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन आणि संपादक सहमत असेलच असे नाही.

# आपले मत आपले भवितव्य



ज. स. सहारिया, मुख्य सचिव

सोळाव्या लोकसभेसाठी निवडणूक तारखांची नुकतीच घोषणा झाली आहे. राज्यातील ४८जागांसाठी दि. १०, १७ व २४ एप्रिल रोजी तीन टप्प्यांत मतदान होत आहे. राज्यात एकूण ७.८९ कोटी मतदार असून लोकसभा निवडणुकीकरिता ५५हजार ९०७ ठिकाणी ८९ हजार ४७९ मतदानकेंद्रे स्थापन करण्यात येत आहेत.

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यावर शासनाने भर दिला असून कोणताही अनुचित प्रकार होऊ नये या दृष्टीने पावले उचलण्यात आली आहेत. मतदान- प्रक्रिया निर्भय आणि नि:पक्ष वातावरणात पार पडण्यासाठी केंद्रीय राखीव दल, सशस्त्र पोलीस दल, राज्य पोलीस दल आणि गृहरक्षक दलाच्या मदतीने सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे.




प्रत्येक नागरिकाला आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी नोंदणीपासून मतदानापर्यंत सर्वच टप्प्यावरील कार्यवाही नियोजनबद्धरीतीने करण्यात येत आहे. त्याचबरोबर संपूर्ण राज्यभर आदर्श आचारसंहितेचे योग्यरीतीने पालन होईल यासाठीही आवश्यक ती संपूर्ण खबरदारी घेण्यात येत आहे. या संपूर्ण प्रक्रियेत महाराष्ट्रातील तमाम नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मी करीत आहे.

मतदानाबद्दल लोकांमध्ये जागृती निर्माण करून मतदानाचे प्रमाण वाढावे याकरिता भारत निवडणूक आयोगाच्या SVEEP कार्यक्रमांतर्गत विविध माध्यमातून सातत्याने जनजागृती करण्यात येत आहे. देशाच्या विकासाला दिशा देणाऱ्या सरकारची निर्मिती आपल्या मताने होते, हे प्रत्येक मतदाराने लक्षात घेऊन जाणीवपूर्वक मतदान केले पाहिजे.

मतदारांना मतदान केंद्राचे स्थान आणि अन्य तत्सम माहिती मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महाराष्ट्राची आजवरची उज्ज्वल परंपरा लक्षात घेता महाराष्ट्रातील निवडणुका निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पडतील याविषयी मला खात्री आहे. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशातील या निवडणूक प्रक्रियेत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन, मतदानाद्वारे आपला हक्क आणि कर्तव्य बजावून आपली लोकशाही अधिक समृद्ध करण्याचे काम करावे अशी सर्व मतदारांना माझी विनंती.

स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला सदस्यांचे सक्षमीकरण

# क्रांतिज्योती

पंचायतराज व्यवस्थेमध्ये महिलांना ५०% आरक्षण देऊन भारत सरकारने महिला सक्षमीकरणाचे पहिले पाऊल उचलले आहे. महाराष्ट्रातील २७८९६ ग्रामपंचायतीत जवळजवळ ९८६६९ महिला प्रतिनिधी कार्यरत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्याची संविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे.या निवडणुकांमध्ये बहुतांश महिला उमेदवार स्वत:हून स्वतंत्रपणे पुढे सरसावल्याचे दिसून येत नाही.




**स्थानिक स्वराज्य संस्थांतील महिला सदस्यांचे सक्षमीकरण करून आदर्श व्यक्तिमत्त्व घडवणे आणि निवडणुकांतील महिला उमेदवारांमध्ये आत्मविश्वासाचे प्रेरणास्रोत निर्माण करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगामार्फत 'क्रांतिज्योती' प्रकल्प राबवण्यात आला. या प्रकल्पाला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. या प्रकल्पाची दखल केंद्र शासनानेही घेतली.**

निवडून आल्यानंतरही अनेकदा सामाजिक व कौटुंबिक बंधनामुळे महिलांऐवजी दुसरी व्यक्ती कारभार हाताळतांना दिसून येते. यामुळे निवडणुका मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्याचे संविधानिक उद्दिष्ट निष्फळ होत आहे.

**महिलांमधील निर्णयक्षमता परिपक्व करण्यासाठी**

राज्य निवडणूक आयोगाने या वास्तवतेची दखल घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांमधील निर्णयक्षमता परिपक्व व्हावी, त्यांनी सामाजिक व राजकीयदृष्ट्या सक्षम व्हावे या दृष्टीने आयोगाने एका नावीन्यपूर्ण प्रकल्पाचा प्रारंभ केला आहे. या प्रकल्पामुळे सक्षम झालेल्या महिला सदस्य या आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून पुढे याव्यात व आगामी निवडणुकांमधील संभाव्य महिला उमेदवारांकरिता आत्मविश्वासाचे प्रेरणास्रोत बनाव्यात ही अपेक्षा आहे.

**क्रांतिज्योती प्रकल्प**

महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध समाजसुधारक, आद्यप्रवर्तक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिला शिक्षण व सक्षमीकरण क्षेत्रात केलेल्या पथदर्शी कार्याचा व योगदानाचा आदर करून त्यांच्या उल्लेखनीय कार्यास आदरांजली म्हणून या प्रकल्पाचे क्रांतिज्योती असे नामकरण केले आहे. आम्ही साऱ्याजणी या घोषणेतून प्रेरित होऊन या प्रकल्पाची सुरुवात झाली.

**पथदर्शी प्रकल्प (२०१०)** : सर्वप्रथम सिंबॉयोसिस संस्था, पुणे यांच्या साहाय्याने पहिले पथदर्शी प्रशिक्षण सेलु तालुका (वर्धा) आणि जव्हार, मोखाडा, तालुका (ठाणे) या ठिकाणी आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणात२६६ प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होत्या. या प्रशिक्षणासाठी रायन इंटरनॅशनल एज्युकेशन संस्था मुंबई. यांनी अर्थसाहाय्य केले.

**नीला सत्यनारायण**
(आयुक्त, राज्य निवडणूक आयोग)

राज्य निवडणूक आयुक्त, यांच्या संकल्पनेतून आलेली प्रशिक्षण प्रारूप रचना खालीलप्रमाणे आहे. – तीन दिवसांची अनिवासी कार्यशाळा., – पुस्तकी माहितीपेक्षा खेळ, गाणी, प्रात्यक्षिके इत्यादी माध्यमांचा वापर, – राज्यस्तरापासून ग्रामीणस्तरापर्यंत प्रशिक्षकांची सक्षम फळी – अनौपचारिक वातावरणात प्रशिक्षण – ग्रामपंचायतीचा प्रत्यक्ष कारभार, ज्वलंत सामाजिक समस्या व व्यक्तिमत्त्व विकासावर भर – सामाजिक बंधनांची जाणीव ठेवून प्रकल्पाचे नियोजन व प्रशिक्षणाची आखणी. – स्थानिक यशस्वी महिलांच्या यशोगाथा – दुर्गम भागांसाठी स्थानिक भाषांमध्ये प्रशिक्षण साहित्य – प्रशिक्षणाअंती नियमित पाठपुरावा कार्यक्रम.

राज्य निवडणूक आयोगाकडून मुख्य प्रशिक्षकांची प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रकल्पाच्या अंमलबजावणीत रिसोर्स ॲण्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट यांनी प्रशिक्षण साहित्य निर्मितीची कामगिरी बजावली. तसेच समाजकार्य महाविद्यालय, निर्मला निकेतन यांनी प्रकल्प समन्वयकांमार्फत कार्यशाळेचे समन्वयन केले. प्रशिक्षणाचे संपूर्ण संच छपाई करून पथदर्शी १० जिल्हयांमध्ये प्रशिक्षण साहित्य उपलब्ध करून देण्यात युनिसेफने सहकार्य केले.

**प्रशिक्षणात अंतर्भूत विषय** : १) पंचायत राज कार्यपद्धती २) ग्रामपंचायत अर्थव्यवस्थापन अंदाजपत्रक ३) व्यक्तिमत्त्व विकास व सामाजिक भ्रम ४) अंधश्रद्धा व सामाजिक समस्या व त्यावरील उपाययोजना ५) महिलांच्या यशोगाथा ६) स्थानिक समस्यांवर चर्चा व उपाययोजना ७) स्त्री–पुरुष समानता.

**जिल्हा समन्वयक व मुख्य प्रशिक्षकांची कार्ये :** ■ जिल्हा स्तरावरील प्रशिक्षकांच्या प्रशिक्षण कार्यशाळेचे नियोजन करणे व प्रशिक्षण देणे, ■ जिल्हापातळीवर प्रकल्पासाठी निधीच्या उपलब्धतेबाबत नियोजन करणे, ■ प्रशिक्षण संचात ■ मुख्य प्रशिक्षक मार्गदर्शिका, पंचायत राज कारभार, गीतमाला, अध्यादेश, पोस्टर, पोस्टर ( माझा कारभार मीच तपासणार), प्रमाणपत्र, माहिती पत्रक,

स्टेशनरी, कापडी बॅग यांचा समावेश आहे.

प्रशिक्षणाचा माहितीपट खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे. www.krantijyotimaharashtra.blogspot.in
किंवा at http://www.youtube.com/watch?v=YLNY9_YrMn0

**प्रकल्पाची यशस्विता :** सुरुवातीच्या टप्प्यात कोल्हापूर, वर्धा, पुणे, सोलापूर, सातारा, सिंधुदुर्ग, नाशिक, ठाणे, अमरावती,नांदेड या १० जिल्ह्यांमध्ये महिला लोकप्रतिनिधी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवण्यात आला आहे. जिल्हा परिषद आणि जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आतापर्यंत एकूण ११७४२ महिला प्रतिनिधींचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे.या प्रशिक्षणातून महिलांचा आत्मविश्वास, कार्यक्षमता वाढली आहे.

**क्रांतिज्योती सिंहावलोकन :** ■ जानेवारी, २०१० मध्ये सिंबॉयसीसमार्फत ठाणे जिल्हयातील महिला लोकप्रतिनीधींचे प्रशिक्षण. ■ सिंबायोसीसमार्फत वर्धा जिल्हा, सेलू तालुक्यातील महिला लोकप्रतिनीधींचे प्रशिक्षण एप्रिल २०१० ■ रायन इंटरनॅशनल कडून प्रकल्पासाठी अर्थसाहाय्य ■ राज्यस्तरीय मुख्य प्रशिक्षक प्रशिक्षण आयोजन डिसेंबर २०१०. ■ ३ जानेवारी, २०११ ■ १० जिल्ह्यांत सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रकल्पाचा शुभारंभ – एप्रिल २०१२ ■ वर्धा व कोल्हापूर जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधी प्रशिक्षण.

केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयाने महिला लोकप्रतिनिधींच्या या नावीन्यपूर्ण क्रांतिज्योती प्रशिक्षणाची दखल घेऊन राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानांतर्गत क्रांतिज्योती प्रशिक्षण संपूर्ण देशात राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

संपर्क: (०२२) २२०२३४३७, (०२२) २२०२६३२९
stateelectioncommission@gmail.com
व nsneelie@gmail.com

# नवी दृष्टी, नव्या सुधारणा

निवडणुकांमुळेच सर्वसामान्यांना विकेंद्रित सत्ता व्यवस्थेत हक्काचा वाटा मिळतो. लोकशाहीतील विकेंद्रित सत्ता व्यवस्था स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून राबवली जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि राजकीय व्यवस्थेतून कार्यकर्ते आणि नेते घडत जातात. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका होय. हा संसंदीय लोकशाहीचा पाया आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा डोलारा सांभाळण्याची संविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे. राज्य निवडणूक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली आयोगाचा करभार चालतो. सध्या श्रीमती नीला सत्यनारायण राज्य निवडणूक आयुक्तपदी आहेत.

### क्रांतिकारक पाऊल

महाराष्ट्राने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षणाची तरतूद करून क्रांतिकारक पाऊल उचलले. या निर्णयाने अधिकाधिक महिलांना सार्वजनिक जीवनात कर्तृत्व दाखवण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली. त्याचा प्रत्यक्षात कितपत उपयोग महिलांना होत आहे, हे श्रीमती सत्यनारायण यांनी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. नाव बायकांचे असले तरी कारभार मात्र पुरुषच करतात. अगदी सह्याही तेच करतात. कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवरची महिलांची घुसमट इथे असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यासंदर्भात एका संस्थेच्या मदतीने रीतसर पाहणी केली. त्याचे निष्कर्ष धक्कादायक होते. महिलांना ५० टक्के आरक्षण मिळाले, पण बळ, प्रतिष्ठा, समानता नाही मिळाली. ही घुसमट थांबवण्यासाठी श्रीमती सत्यनारायण यांच्या संकल्पनेतून क्रांतिज्योती महिला सक्षमीकरण प्रकल्प साकारला गेला. या प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामपंचायत महिला सदस्यांना ग्रामपचंयातीचे कायदे, कारभार, योजना, अंदाजपत्रक याबाबत प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली. हा प्रशिक्षण प्रकल्प संपूर्ण देशासाठी पथदर्शी ठरला असून तो देशपातळीवर राबवण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. 'यू एन वूमेन' या आंतरराष्ट्रीय पातळीवरील संघटनेनेही त्याची दखल घेतली आहे.



**६ जुलै २००९ रोजी श्रीमती सत्यनारायण यांची राज्य निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती झाली. त्या राज्याच्या पहिल्या महिला निवडणूक आयुक्त आहेत. निवडणुकांच्या निमित्ताने दौऱ्यांवर असताना त्यांनी उमेदवार, मतदार आणि विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांशी संवाद साधायला सुरुवात केली. त्यातून निवडणूक प्रक्रियेतील अडचणी आणि महिला सदस्यांचे प्रश्न त्यांना प्रकर्षाने जाणवले. निवडणूक चिन्हांचा प्रकार विचार करण्यासारखा होता. केळं, गाजर, खाट, कूकरसारख्या चिन्हांमुळे अपमानित व्हावे लागत होते. या चिन्हांचा वेगळा अर्थ काढला जातो, अशी बहुतांश महिला उमेदवारांची तक्रार होती. महिलांच्या या प्रश्नांची दखल घेऊन श्रीमती सत्यनारायण यांनी एकूण नऊ चिन्हे वगळून टाकली. त्याऐवजी संगणक, दूरचित्रवाणी संचासारख्या आधुनिकतेच्या प्रतीकांचा निवडणूक चिन्हांमध्ये समावेश केला.**

### विविध सुधारणा

श्रीमती सत्यनारायण यांनी प्रारंभापासूनच सुधारणांच्या दिशेने पावले टाकली होती; पण त्यांची खरी कसोटी डिसेंबर २०११ ते २०१२ या कालावधीत मोठ्या संख्येने होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या वेळी लागली. त्यांनी निवडणुका पार पाडण्यासोबत त्यात आमूलाग्र सुधारणा घडवून आणल्या.

### मतदानाचे प्रमाण वाढविण्यावर भर

मतदारांची गैरसोय टाळणे आणि मतदानाचे प्रमाण वाढविण्यावरही श्रीमती सत्यनाराण यांनी भर दिला. त्यासाठी अपंग, ज्येष्ठ नागरिक, गरोदर माता यांना मतदानाच्या रांगेत तिष्ठत उभे राहू लागू नये म्हणून त्यांना प्राधान्य देण्यास सुरुवात झाली आहे. मतदारांच्या लांब रांगा टाळण्यासाठी मतदान केंद्रांची संख्या वाढवण्यात आली आहे. मतदान केंद्र शक्यतोवर तळमजल्यावरच असते. अपंगांसाठी रॅम्पची व्यवस्था केली जाते. मतदान केंद्रावर स्वच्छतागृह, पाणी आणि सावलीची व्यवस्था केली जाते.

वाढती महागाई लक्षात घेऊन उमेदवारांच्या निवडणूक खर्चात वाढ केली आहे. बोटावर निशाणी करण्यासाठी शाईऐवजी मार्कर पेनचा वापर केला जात आहे. मतदारांच्या ओळखीसाठी आधारकार्ड पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यास मान्यता दिली आहे. निवडणूक प्रचारात प्राण्यांच्या क्रूरपणे वापरावर निर्बंध घातला आहे. मतदानयंत्रांमध्ये अद्ययावत पद्धतीने सुधारणा केल्या आहेत. मतदानयंत्रांवर सांकेतिक भाषेऐवजी स्पष्टपणे माहिती दर्शविण्याची व्यवस्था केली आहे. यंत्राच्या संवेदनशील भागावर नॉन क्लोनेबल टॅग लावला आहे. यंत्रात फेरफार करता येत नाही. तसा प्रयत्न केल्यास ते बंद होते. त्यामुळे ते अधिक सुरक्षित झाले आहे.

### निवडणुकांतील पेचप्रसंग

निवडणुकांतील पेचप्रसंगांबाबत अनुभव कथन करताना श्रीमती सत्यनारायण म्हणाल्या, 'राज्य निवडणूक आयुक्त हे घटनात्मक पद आहे. निवडणुकांच्या काळात आयुक्तांचे अधिकार सार्वभौम असतात. राजकीय पक्ष, नेते, उमेदवार आणि मतदारांची त्यांच्या बारीकसारीक निर्णयांवर बारकाईने नजर असते. त्या दबावातून मार्ग काढत पेचप्रसंगांसंदर्भात अचूक निर्णय घ्यावे लागतात. आचारसंहितेचा भंग, हा अत्यंत नाजूक प्रसंग असतो. आचारसंहितेचा भंग सत्ताधाऱ्यांकडून आणि विरोधकांकडूनही होऊ शकतो. त्यावर समतोल निर्णय घ्यावा लागतो. डिसेंबर २०११ ते फेब्रुवारी २०१२ या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रचंड संख्येने निवडणुका पार पडल्या. आयुक्त म्हणून केवळ भावनिक विचार करून चालत नाही. आपल्या निर्णयांचे समर्थन भविष्यातही करता आले पाहिजे, म्हणून मी प्रत्येक निर्णय तावूनसुलाखून घेते. निर्णय प्रक्रियेत निवडणूक आयोगातील सहकाऱ्यांकडून भरपूर नैतिक बळही मिळते. पण निर्णय मात्र शेवटी आयुक्तांनाच घ्यावा लागतो. प्रसंगी कठोरही व्हावे लागते. तरच पारदर्शक निवडणुका होऊ शकतात आणि संविधानिक पदाचा मान राखला जाऊ शकतो. निवडणुकांच्या काळात काही वर्तमानपत्रांमधून माझ्याविषयी नकारात्मक लिहिले गेले; पण ते फारच थोडे होते. सकारात्मकतेचे पारडे जड होते. माध्यमांतील हीच सकारात्मकता मला बळ देत होती. एकाच वेळी मोठ्या प्रमाणात झालेल्या वेगवेगळ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका शांत व संयमी पद्धतीने हाताळल्या गेल्याची बाब प्रसारमाध्यमांनी सातत्याने अधोरेखित केली. जनमानसांत माझी प्रतिमाही उंचावत होती. महिलांमध्ये माझ्याविषयीचा कौतुकाचा आणि आदराचा भाव पाहायला मिळत होता. काही तरुण-तरुणींनी तुम्ही आमच्या आयकॉन असल्याचे सांगून वेगळाच आनंद दिला. आनंदाबरोबर जबाबदारीचीही जाणीव होत होती. बऱ्यावाईट अनुभवांतून सर्व घटनांकडे, व्यक्तींकडे समानतेने पाहायला आणि सर्वांचे शांतपणे ऐकून घ्यायलाही मी शिकले. वाईटातून चांगले आणि नकारात्मकतेतून सकारात्मकता शोधायला शिकले. निवडणुकांची ही संधी मला केवढे मोठे दान देऊन गेली, या विचाराने मी प्रत्येक वेळा भारावते. याबाबत स्वत:ला व्यक्त करण्यासाठी आणि निवडणुकांच्या अनुभावाची शिदोरी कायम सोबत राहावी म्हणून मी 'टाकीचे घाव' हे पुस्तक मतदारांच्या बोटावरची शाही सुकण्यापूर्वीच कागदावर उतरवून काढले.'

आचारसंहितेचा भंग आणि काही राजकीय नेत्यांच्या विधानांमुळे निर्माण झालेल्या पेचप्रसंगालाही नीला सत्यनारायण यांना सामोरे जावे लागले. त्यावर त्यांनी मात केली. त्यांच्या नेतृत्वाखालील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत झालेल्या सुधारणा मात्र कायमस्वरूपी स्मरणात राहतील.

- जगदीश मोरे

❖ ❖

**राज्य निवडणूक आयोग**
**महाराष्ट्र**
पहिला मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई - ४०००३२.
(०२२)-२२८४६७२०, २२०५१०७५ (०२२)-२२८४६७१९, २२०४६९०९, २२८४६७२१ @ stateelectioncommission@gmail.com

**राज्य निवडणूक आयोगाच्या** www.mahasec.com **या संकेतस्थळावर महानगरपालिका आणि नगर परिषदांच्या निवडणूक प्रभागांच्या इलेक्ट्रॉनिक नकाशांची सुविधा आहे. महानगरपालिकेच्या एकत्रित नकाशावरून आपल्या प्रभागाचा नकाशा शोधता येतो. त्यात प्रभागातील निवडणूक अधिकाऱ्यांचे नाव, पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक उपलब्ध होतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मतदारांची संख्या, प्रभागातील मतदार यादी आणि त्यातील आपले मतदान केंद्रही घरबसल्या शोधता येते. विविध निवडणुकांचे निकालही या संकेतस्थळावर पाहता येतात. आयोगाचे आदेश, सूचना आणि परिपत्रेकही त्यावर उपलब्ध असतात. या संकेतस्थळास राज्य मराठी विकास संस्था आणि सीडॅकच्या वतीने पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. तसेच माहिती तंत्रज्ञानाच्या (आयटी) अधिकाधिक वापरासाठीचा एज २०१२ (एन्टरप्रायजेस ड्रायव्हिंग ग्रोथ अँड एक्सलन्स थ्रू आयटी) हा पुरस्कारही मिळाला आहे. पहिल्यांदाच एवढ्या मोठ्याप्रमाणात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत माहिती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आला आहे.**

(श्री. मधुकर गायकवाड, सचिव राज्य निवडणूक आयोग - (०२२) २२८४५११४, (०२२) २२८४५९००
stateelectioncommission@gmail.com व mbgaikwad1@yahoo.com)

# आता जबाबदारी आपली

स्वातंत्र्यापासूनच भारताने लोकशाही पद्धतीचा अंगीकार केला आहे. लोकशाही हे लोकांनी लोकांचे लोकांकरिता चालवावयाचे राज्य असल्यामुळे निवडणूक प्रक्रियेला लोकशाहीमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. ही निवडणूक प्रक्रिया अधिक सशक्त व पारदर्शक असली पाहिजे यासाठी २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. देशाचे पहिले मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून श्री. सुकुमार सेन यांनी २१ मार्च १९५० रोजी कार्यभार स्वीकारला. सध्या मा. श्री. व्ही. एस. संपत हे देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त असून, मा. श्री. एच. एस. ब्रह्मा व मा. डॉ. नसीम झैदी हे निवडणूक आयुक्त आहेत. प्रत्येक राज्यामध्ये व केंद्रशासित प्रदेशामध्ये नियुक्त करण्यात आलेल्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत भारत निवडणूक आयोगाच्या देखरेखीखाली देशातील राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद या निवडणुकांचे कामकाज केले जाते. मतदारयाद्या तयार करणे, नवीन मतदारांची नावे समाविष्ट करणे, दुबार मतदारांची नावे वगळणे, मतदारांना छायाचित्र ओळखपत्रांचे वाटप करणे व मतदारयादीमधील नावाबाबत आक्षेप दाखल करण्यात आल्यास त्याबाबतची शहानिशा करून निर्णय देणे ही सर्व कामे भारत निवडणूक आयोगाच्या अखत्यारीत येतात.



**नितीन गद्रे**
(प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी)

प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे त्या जिल्ह्याचे पदसिद्ध जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहतात. राज्यामध्ये एकूण ४८ लोकसभा व २८८ विधानसभा मतदारसंघ असून प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय मतदारांची यादी बनवण्यात येते. प्रत्येक विधानसभा मतदारसंघाकरिता एक मतदार नोंदणी अधिकारी असून त्या मतदारसंघाची मतदारयादी बनवण्याची जबाबदारी कायद्यान्वये त्यांचेकडे सोपविली आहे.

### राज्यात ७.८९ कोटी मतदारसंख्या

३१ जानेवारी २०१४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम मतदार यादीनुसार महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण ७.८९ कोटी इतकी मतदारसंख्या आहे. त्यामध्ये ४.१८ कोटी पुरुष मतदार तर ३.७१ कोटी इतकी स्त्री मतदारांची संख्या आहे. एकापेक्षा अधिक ठिकाणी मतदार याद्यांमध्ये नाव समाविष्ट असू नये अशा प्रकारची लोकप्रतिनिधी अधिनियम १९५० च्या कलम १७ व १८ मध्ये तरतूद आहे, या बाबीची बऱ्याच नागरिकांना कल्पना नसते. त्यामुळे नागरिक ज्या ज्या ठिकाणी वास्तव्यास जातात त्या प्रत्येक ठिकाणी पुन्हा नव्याने मतदार नोंदणी करून मतदार ओळखपत्र प्राप्त करून घेतात. त्यामुळे काही मतदारांची दुबार, तिबार नांवे मतदारयादीमध्ये समाविष्ट असल्याचे आढळले. त्यावर उपाय म्हणून संगणक प्रणालीच्या साहाय्याने अशा मतदारांची यादी तयार करून त्या संबंधित ठिकाणी केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन हे मतदार त्या ठिकाणी राहत नसल्याची खातरजमा झाल्यानंतर त्या मतदारांची नावे यादीमधून वगळण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. दुबार/स्थलांतरित मतदारांची नावे वगळताना निवडणूक आयोगाने विहित केलेल्या पद्धतीचा काटेकोरपणाने अवलंब करण्याची खबरदारी घेण्यात आली आहे. तरी अद्यापही ज्या मतदारांची नांवे एकापेक्षा अधिक मतदारयाद्यांमध्ये समाविष्ट असतील त्यांनी संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या कार्यालयामध्ये फार्म नं. ७ भरून द्यावा अथवा ज्या नागरिकांचे नांव मतदार यादीमध्ये समाविष्ट झाले नाही अशा नागरिकांनी फॉर्म नं. ६ भरुन संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे दाखल करावा. राज्यातील विशेषत: शहरी भागातील मतदानाचे प्रमाण वाढावे, मतदानामधील महिलांचा सहभाग वाढावा यासाठी 'स्वीप' कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबवण्यात येत असून, त्याद्वारे मतदानाबद्दल लोकांमध्ये जागृती निर्माण करणे व आपली लोकशाही अधिक मजबूत करणे हा यामागचा उद्देश आहे.

**महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुका २०१४ करिता एकूण ५५,९०७ ठिकाणी ८९,४७९ मतदान केंद्रे स्थापन करण्यात येत आहेत. निवडणुका निर्भय व नि:पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी केंद्रीय राखीव दल, सशस्त्र पोलीस दल, राज्य पोलीस दल व होमगार्डस यांच्या मदतीने पुरेशा पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात येत आहे. राज्यातील संवेदनशील, अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर सुरक्षेच्या दृष्टीने विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. याव्यतिरिक्त मतदारांना मतदान केंद्रांचे स्थान शोधणे सोयीस्कर व्हावे या दृष्टीने जीआयएस मॅपिंगद्वारे मतदान केंद्रांची माहिती गुगल मॅपवर उपलब्ध करण्यात आली आहे.**

मतदारांना मतदान करणे सुलभ व्हावे यासाठी आयोगाने शक्य त्या सर्व उपाययोजना केल्या आहेत. तरी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या प्रत्येक नागरिकाने आपले नाव मतदारयादीत समाविष्ट असल्याची खात्री करावी व घटनेने आपल्याला बहाल केलेल्या मुलभूत अधिकाराचा जागरूकतेने वापर करावा, असे आवाहन यानिमित्ताने सर्व मतदारांना करण्यात येत आहे.

**संपर्क :** (०२२) २२०२९९६५
**संकेतस्थळ :** ceo.maharashtra.gov.in
**ईमेल :** ceo_maharashtra@eci.gov.in

❖❖

मतदारयादीमध्ये आपल्या नावाची खात्री करणे, निवडणूकविषयक माहिती पाहण्यासाठी तसेच फॉर्म नं. ६, फॉर्म नं. ७, फॉर्म नं. ८ ऑनलाइन भरण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या http://eci.nic.in किंवा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या www.ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळांचा वापर करावा.

## मतदार शिक्षण आणि जाणीवजागृती

# लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी




**शिरीष मोहोड**
(उपमुख्य निवडणूक अधिकारी व राज्य स्वीप नोडल अधिकारी)

जगाच्या पाठीवर लोकशाही जोपासणारे जे मोजके देश आहेत त्यात भारताचा क्रमांक खूप वरचा आहे. असे असले तरी अजूनही बरेच भारतीय नागरिक या लोकशाही प्रक्रियेत म्हणजेच निवडणूक प्रक्रियेत आपला सक्रिय सहभाग नोंदवीत नाहीत किंवा त्यांना या प्रक्रियेत सहभागी होण्यापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले जाते.

निवडणूक प्रक्रियेतील मतदारांचा सक्रिय सहभाग, यशस्वी व सुदृढ लोकशाहीसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याने भारत निवडणूक आयोगाने २०१० हे वर्ष ‘समर्थ लोकशाहीसाठी सर्वांचाच सहभाग’ हे ब्रीदवाक्य घेऊन आपल्या स्थापनेचे ‘हीरक महोत्सवी वर्ष’ राबवण्याचे ठरवले. त्याला अनुसरून मतदारनोंदणी आणि प्रत्यक्ष लोकसंख्या यातील तफावत दूर करण्यावर भर देण्यात आला. ज्या मतदारांची नोंदणी झालेली असूनसुद्धा जे मतदान प्रक्रियेपासून दूर राहतात किंवा ठेवले जातात त्यांना निवडणूक प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्यात आले. २०१० पासून या मोहिमेला S.V.E.E.P. म्हणजेच SYSTEMATIC VOTERS EDUCATION AND ELECTORAL PARTICIPATION असे नाव दिले गेले. या मोहिमेचे हे तिसरे वर्ष असून मतदारांचे शिक्षण आणि त्यांचा निवडणूक प्रक्रियेतील सक्रिय सहभाग या मोहिमेद्वारे अधोरेखित करण्यात आला आहे.

गेले तीन वर्ष ही मोहीम निवडणूक विभागाचे अधिकारी म्हणजेच राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यापासून तर गावपातळीवरील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यापर्यंत सर्वचजण राबवत आहेत. सध्या या मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू आहे. २०१३ ते २०१८ असा या दुसऱ्या टप्प्याचा कालावधी असून १ एप्रिल २०१३ पासून या टप्प्याची सुरुवात झाली आहे.

**या कार्यक्रमाचा उद्देश पुढीलप्रमाणे आहे** :-

**लोकसंख्या –** मतदारांचे प्रमाण (Electoral - Population Ratio) (EP Ratio) लोकसंख्येचा विचार केल्यास २०११ च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या १२१.०२ कोटी इतकी आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या ११.२४ कोटी इतकी आहे. याचा अर्थ भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ९.३०% इतकी लोकसंख्या महाराष्ट्राची आहे. लोकसंख्येच्या निकषानुसार उत्तर प्रदेश नंतर महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या ४५.२०% इतकी लोकसंख्या शहरी क्षेत्रातील आहे. ५४.८०% इतकी लोकसंख्या ग्रामीण क्षेत्रातील आहे.

२०१४ च्या प्रक्षेपित लोकसंख्येनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ११.७३ कोटी इतकी आहे. महाराष्ट्रातील १८ व त्याहून अधिक वयाची लोकसंख्या ८.०२९ कोटी इतकी आहे. त्या तुलनेत एकूण मतदारांची संख्या ७.९० कोटी इतकी आहे. म्हणजेच मतदारांचे ९८.३४ टक्के इतके आहे. याचाच दुसरा अर्थ असा की, जे नागरिक वयाची १८ वर्षे पूर्ण केल्यामुळे मतदार होण्यास पात्र ठरतात अशा लोकसंख्येपैकी जवळजवळ १०० टक्के लोकांची मतदार म्हणून नोंदणी झाली आहे. असे असले तरी एकही पात्र नागरिक नोंदणीशिवाय राहु नये म्हणजेच हे प्रमाण १०० टक्के इतके व्हावे असा उद्देश स्वीप या कार्यक्रमामागे आहे.

**मतदारांचे शिक्षण आणि त्यांचा निवडणूक प्रक्रियेतील सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी २०१० पासून** S.V.E.E.P. **म्हणजेच** SYSTEMATIC VOTERS EDUCATION AND ELECTORAL PARTICIPATION **हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. ज्या मतदारांची नोंदणी झाली असूनसुद्धा जे मतदान प्रक्रियेपासून दूर राहतात किंवा ठेवले जातात त्यांना निवडणूक प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्यासाठी या मोहिमेंतर्गत प्रयत्न करण्यात येत आहेत. या मोहिमेचे यंदाचे तिसरे वर्ष आहे. सध्या या मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू आहे. २०१३ ते २०१८ असा या दुसऱ्या टप्प्याचा कालावधी असून १ एप्रिल २०१३ पासून या टप्प्याची सुरुवात झाली आहे.**

## १६ व्या लोकसभा निवडणुकांचे कर्णधार



मा. श्री. व्ही. एस. संपत
मुख्य निवडणूक आयुक्त
(०११) २३७१६५५२, २३७१३६८९
vs.sampath@eci.gov.in



मा. श्री. एच. एस. ब्रह्मा
निवडणूक आयुक्त
(०११) २३७१७०२७, २३७२००१२
hs.brahma@eci.gov.in



मा. डॉ. नसीम झैदी
निवडणूक आयुक्त
(०११) २३७२००१३, २३७१७०३५
nasimzaidi@eci.gov.in

**मतदानाचे प्रमाण :** २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील ७ व त्याहून अधिक वयाच्या लोकसंख्येपैकी ७६.९०% इतके साक्षरतेचे प्रमाण होते. २०११ मध्ये ते ८२.९०% इतके वाढले. राष्ट्रीय स्तरावर हेच प्रमाण अनुक्रमे ६४.८०% व ७४% इतके आहे. हे पाहता साक्षरतेच्या बाबतीत महाराष्ट्राने चांगली प्रगती केली आहे असे दिसून येते. असे असले तरी २००९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यात सरासरी ५० टक्के इतकेच मतदान झाले होते.

साक्षरतेच्या निकषावर विचार केल्यास मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये ९०.९०% इतकी लोकसंख्या साक्षर आहे. परंतु मुंबई महानगर प्रदेशामध्ये गेल्या लोकसभा निवडणुकीत सरासरी ४१.६३ इतकेच मतदान झाले होते. हे लक्षात घेतल्यास महाराष्ट्र हा शैक्षणिकदृष्ट्या जरी साक्षर असला तरी मतदानामध्ये मात्र साक्षरता दिसून येत नाही. त्यामुळे नागरिकांना मतदार म्हणून साक्षर करण्याचा व त्यायोगे मतदानाचे प्रमाण वाढवण्याचा उद्देश SVEEP मागे आहे.

**पुरुष - महिलांचे प्रमाण** (Gender Ratio) :

२०११ च्या जनगणनेनुसार गेल्या दशकातील दर हजार पुरुषांच्या संख्येमागे महिलांचे प्रमाण ९२५ इतके होते. त्यामध्ये वाढ होऊन ते प्रमाण २०१४ च्या प्रक्षेपित लोकसंख्येनुसार ९३२ इतके झाले आहे. राष्ट्रीय स्तरावर ही वाढ ९३३ वरून ९४० इतकी झाली आहे. महिला-पुरुषांच्या प्रमाणाचा विचार केल्यास महाराष्ट्राचा क्रमांक भारतामध्ये २२ वा लागतो. २०१४ च्या अंदाजित लोकसंख्येनुसार दर हजार पुरुषांच्या संख्येमागे ज्या ९३२ महिला आहेत त्यापैकी महिला मतदारांची संख्या केवळ ८८७ इतकीच आहे. म्हणजे दर हजार पुरुषांमागे महिलांचे प्रमाण मुळात कमी असताना मतदार म्हणून महिलांची नोंदणी आणखी कमी होणे ही बाब महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी योग्य नाही. त्यामुळे महिला मतदारांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणाइतकी असावी हे उद्दिष्ट SVEEP या कार्यक्रमामध्ये ठेवण्यात आले आहे.

**युवक मतदारांचे प्रमाण :** १८ ते १९ या वयोगटातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत २७.६१% युवकांची मतदार म्हणून नोंदणी झाली आहे असे दिसून येते. ही नोंदणी १००% होणे अपेक्षित आहे.

**वंचित समाज/समूह** : महाराष्ट्र हे जरी पुरोगामी राज्य असले तरी आज रोजी महाराष्ट्रामध्ये असे काही समाज आणि समूह अस्तित्वात आहेत की, त्या समाज वा समूहांचे मतदार याद्यांमधील प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी आहे. अशा समाजाच्या/ समूहाच्या लोकांची मतदार म्हणून संख्या वाढावी हे SVEEP चे उद्दिष्ट आहे. बीड जिल्ह्यातील ऊसतोडणी कामगार, सोलापूर जिल्ह्यातील बिडी कामगार, गडचिरोली जिल्ह्यातील बडामाडिया हा आदिवासी समाज, ठाणे जिल्ह्यातील तृतीयपंथी आणि नाशिक जिल्ह्यामधील सैन्यदलातील






अधिकारी/कर्मचारी असे पाच समाज/ समूह यांच्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे उद्दिष्ट SVEEP मध्ये ठेवण्यात आले आहे.

**छायाचित्र मतदार ओळखपत्र/छायाचित्र मतदार यादी** - भारत निवडणूक आयोगाने मतदानाची प्रक्रिया अधिक स्वच्छ व पारदर्शक व्हावी या उद्देशाने प्रत्येक मतदाराला छायाचित्र मतदार ओळखपत्र देण्याची योजना राबवली आहे. यापूर्वी मतदारांना केवळ हे ओळखपत्र दिले जात होते. परंतु मतदार यादीमध्ये त्यांचे छायाचित्र छापण्यात येत नव्हते. त्यामुळे प्रत्यक्ष मतदानाचे वेळी मतदारांची पडताळणी करणे सुलभ होत नव्हते. ही बाब विचारात घेऊन निवडणूक आयोगाने आता मतदार यादीमध्ये देखील मतदारांचे छायाचित्र असावे असा कार्यक्रम हाती घेतला आहे. प्रत्येकाला छायाचित्र मतदार ओळखपत्र आणि मतदार यादीतील प्रत्येक मतदारासमोर त्याचे छायाचित्र असावे म्हणजेच या दोघांचे प्रमाण १०० टक्के असावे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**शहरी उदासीनता:** गेल्या निवडणुकांतील आकडेवारीचा अभ्यास केल्यास ग्रामीण भागापेक्षा शहरी भागांमध्ये मतदारांचे व मतदानाचे असे दोन्ही प्रमाण कमी असल्याचे आढळून आले आहे. तेव्हा शहरी भागातील ही उदासीनता दूर करण्याचे उद्दिष्टदेखील SVEEP कार्यक्रमामध्ये आहे.

**उद्दिष्ट साध्य करण्याचे नियोजन:**

SVEEP हा कार्यक्रम संपूर्ण राज्यभर व प्रत्येक मतदारसंघ निहाय राबवणे अपेक्षित आहे. याशिवाय हा कार्यक्रम युवक, महिला, वंचित समाज व समूह, दुर्गम प्रदेश, अशिक्षित इत्यादी सर्वव्यापी घटकांकरिता राबवावयाचा आहे. सद्य:स्थितीत शासनाच्या अनेक विभागांकडून प्रत्येक घटकांसाठी लोककल्याणाच्या अनेक योजना राबवण्यात येत असतात. त्यामुळे ग्रामपातळीपर्यंत शासन यंत्रणा अस्तित्वात आहे. तेव्हा SVEEP कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्रपणे वेगळी यंत्रणा अस्तित्वात आणण्याची आवश्यकता नसल्याने राज्य, जिल्हा व इतर शासकीय/ अशासकीय यंत्रणांना या कार्यक्रमामध्ये भागीदार करून घेण्यात आले आहे.

**जिल्हास्तरीय समिती :** प्रत्येक जिल्हास्तरावर ग्राम विकास, नगर विकास, सामाजिक न्याय, आदिवासी, महिला व बाल कल्याण,

उद्योग व कामगार, सहकार, माहिती व जनसंपर्क, महामंडळे इ. विभागांच्या जिल्हा प्रमुखांचा समावेश असणारी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बँका, पोस्ट ऑफिस, औद्योगिक संस्था, राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना तसेच इतर अशासकीय संस्था इ. चादेखील समावेश करण्यात आला आहे. या सर्वांमार्फत मतदारांना साक्षर आणि प्रोत्साहित करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.  विविध यंत्रणांनी जिल्हा स्तरावर कोणकोणते कार्यक्रम व उपक्रम हाती घ्यावेत याचा आराखडा व अंमलबजावणी या जिल्हास्तरीय समितीने करावयाची आहे.

**राज्यस्तरीय समिती :** उपरोक्त जिल्हास्तरीय समितीने केलेल्या कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी तसेच त्या समितीला मार्गदर्शन करणे व त्या समितीवर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली एक राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये वर नमूद विविध विभागांच्या मंत्रालयीन विभाग प्रमुखांना सदस्य म्हणून घेण्यात आले आहे.





**शैक्षणिक संस्था व कॅम्पस अँबेसेडर :** महाराष्ट्रामध्ये अनेक शैक्षणिक संस्था, महामंडळे, विद्यापीठे अस्तित्वात आहेत. त्यांच्या माध्यमातून युवकांचा सहभाग वाढवण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. राज्यामध्ये १८ ते १९ या वयोगटातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत मतदारांची संख्या कमी असल्याचे दिसून येते.  हे प्रमाण वाढवण्याच्या दृष्टीने प्रत्येक विद्यापीठाच्या प्रबंधकाला (Registrar) कॅम्पस अँबेसेडर म्हणून नेमण्यात आले आहे. तर प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांना Nodal Officer म्हणून नेमण्यात आले आहे. याशिवाय प्रत्येक प्राचार्याने त्यांच्या महाविद्यालयातील गुणवंत व इच्छुक विद्यार्थी निवडून त्यांचीदेखील संबंधित महाविद्यालयासाठी कॅम्पस अँबेसेडर म्हणून नेमणूक करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. १८ ते १९ आणि १९ ते २२ या वयोगटातील युवकांची, म्हणजेच नव्यानेच मतदार म्हणून पात्र होणाऱ्या युवकांची जास्तीत जास्त नोंदणी व्हावी, यासाठी महाविद्यालयातील १८ ते २२ या वयोगटातील प्रत्येक विद्यार्थ्याची मतदार म्हणून नोंदणी करण्याचे उद्दिष्ट त्यांना देण्यात आले आहे.

## SVEEP मुळे अशी झाली तरुण आणि इतर मतदारांमध्ये वाढ

**आम्ही मतदार झालो**

| विश्लेषण | | | १८ ते १९ वर्षे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | लोकसंख्या | एकूण मतदार | वर्ष | १८ ते १९ वयोगटातील लोकसंख्या | टक्केवारी | १८ ते १९ वर्षे मतदार | टक्केवारी |
| २०१३ | ११५९६७५४३ | ७९९१९२७४ | २०१३ | ३५५३२८५ | ३.०६ | १७६३५९२ | १.५२ |
| २०१४ | ११७२९१५७७ | ७८९६६६४२ | २०१४ | ३५८३४१८ | ३.९६ | १०७५३७६ | १.३५ |

### वयोगट

**राज्याची लोकसंख्या (सन २०१४– प्रक्षेपित)**
**राज्याची १८ वर्षांवरील लोकसंख्या (आताच्या पुनरीक्षणाप्रमाणे)**

| वयोगट | या वयोगटातील प्रक्षेपित लोकसंख्या | एकूण लोकसंख्येच्या तुलनेत प्रमाण (%) | अंतिम मतदार यादीतील मतदारांची संख्या | एकूण लोकसंखेशी टक्केवारी | १८ वर्षांवरील लोकसंख्येशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १८–१९ | ३८९४५८९ | ३.३१ | १०७५३७६ | ०.९१ | २७.६१ |
| २०–२९ | १६८२९०१३ | १४.३० | १५०५५१८० | १२.७९ | ८९.४६ |
| ३०–३९ | १८०७३८७२ | १५.३६ | १९२२०५०१ | १६.३३ | १०६.३४ |
| ४०–४९ | १७२९९१२५ | १४.७० | १८१९०२०९ | १५.४६ | १०५.१५ |
| ५०–५९ | ११५१६९०५ | ९.७९ | ११९८४००२ | १०.१८ | १०४.०६ |
| ६०–६९ | ६८८९५९८ | ५.८६ | ७२५०४२४ | ६.१६ | १०५.२४ |
| ७०–७९ | ३८२८११० | ३.२५ | ४०५२१८१ | ३.४४ | १०५.८५ |
| ८०+ | १९६७१९० | १.६७ | २१३८७६९ | १.८२ | १०८.७२ |
| एकूण | ८०२९८४०२ | ६८.२४ | ७८९६६६४२ | ६७.११ | ९८.३४ |



**औद्योगिक संस्था :** उद्योगातील संघटित तसेच असंघटित कर्मचाऱ्यांची मतदार म्हणून नोंदणी व्हावी आणि त्यांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे या उद्देशाने, विविध औद्योगिक संस्थांचे तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सहकार्य घेण्यात येत आहे. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी प्रत्येक कर्मचाऱ्याला (संघटित/असंघटित/छोट्या व मोठ्या उद्योगातील कामगार) भरपगारी रजा दिलीच पाहिजे असे निर्देश सर्व औद्योगिक आस्थापनांना देण्यात आले आहेत.

**बँका:** महाराष्ट्रामध्ये प्रत्येक गावामध्येच नव्हे तर दुर्गम प्रदेशामध्ये देखील बँकांचे अस्तित्व आहे. या बँकांनी आपल्या शाखांमार्फत प्रचार व प्रसिद्धी साहित्य याचा वापर करून मतदारांमध्ये जागृती करावी असे आवाहन सर्व बँकांना करण्यात आले आहे.

**पोस्ट ऑफिस :** पोस्ट ऑफिसच्या शाखादेखील सर्वदूर क्षेत्रामध्ये अस्तित्वात आहेत. मतदारांमध्ये लोकशाहीबाबतची जागरूकता निर्माण करण्यासाठी पोस्टाची यंत्रणादेखील मोठे योगदान देऊ शकते. पोस्टातर्फे विकण्यात येणाऱ्या सर्व टपाल साहित्याच्या माध्यमातून लोकांपर्यंत संदेश पोहोचवण्यात येत आहे.

**अशासकीय संस्था :** राज्यातील सुमारे १०० अशासकीय संस्थांना या कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेण्यात आले आहे. शासनाकडून कोणताही आर्थिक मोबदला न घेता नागरिकांमध्ये लोकशाही प्रक्रियेचे महत्त्व पटवून देण्यासाठी अशासकीय संस्थांकडून केले जाणारे कार्य कौतुकास्पद आहे.

**माध्यमे :** जनजागृतीसाठी मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा अधिकाधिक वापर करण्यात येत आहे. याशिवाय सिनेमा, केबल टी. व्ही, मॉल, मल्टिप्लेक्स, एस.टी. बसेस, रेल्वे स्टेशन, बस डेपो, होर्डिंग्ज, मोबाइल व्हॅन इत्यादी अनेक माध्यमांचा या जनजागृतीसाठी मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येत आहे.

**सन्माननीय व्यक्ती :** नागरिकांना मतदार नोंदणीसाठी उद्युक्त करणे, लोकशाही व स्वत:च्या मतदानाच्या अधिकाराचे महत्त्व याची जाणीव करून देऊन निवडणूक प्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग वाढावा यासाठी; महाराष्ट्रातील सन्माननीय व्यक्तींकडून, सर्व मतदारांना आवाहन करण्यात येत आहे. डॉ. श्री. अनिल काकोडकर, मंदाकिनी व प्रकाश आमटे, मधु मंगेश कर्णिक, मृणाल कुळकर्णी, पंढरीनाथ कांबळे उर्फ पॅडी, राही सरनोबत, वीरधवल खाडे आणि डॉ. तात्याराव लहाने, अझीझ खान यांसारख्या विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींद्वारे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

**विशिष्ट नियोजन**

**महिला मतदार :** एकूण मतदारांमध्ये महिला मतदारांचे प्रमाण कमी असल्याची बाब विचारात घेऊन महिलांच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या अनेक संस्थांचे सहकार्य घेण्यात येत आहे. समाजातील काही अनिष्ट प्रथा, पुरुषप्रधान संस्कृतीचे अस्तित्व, महिलांमधील साक्षरतेचा अभाव इ. कारणांमुळे हे प्रमाण काही ठिकाणी कमी आहे. त्यामुळे ती कारणे दूर करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

**स्वयंसहायता बचत गट :** महाराष्ट्रामध्ये महिला बचतगटाचे ग्रामपातळीपर्यंत मोठ्या प्रमाणात अस्तित्व आहे. या बचतगटांच्या माध्यमातून महिलांशी संवाद साधून त्यांना लोकशाहीचे महत्त्व पटवून देण्यात येत आहे.

**अंगणवाडी :** या माध्यमातून महिलांना मतदार होण्यासाठी आणि मतदान करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

**इतर कार्यक्रम :** याव्यतिरिक्त प्रदर्शने, रांगोळी, पाककला स्पर्धा इ. कार्यक्रमांतून महिलांचे निवडणुकीतील प्रमाण वाढवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहेत.

**शहरी उदासीनता :** शहरामध्ये राहत असलेला बहुसंख्य समाज हा आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सुस्थापित असतो. त्यामुळे कोणतेही शासन आले तरी आपल्यावर त्याचा काहीही परिणाम होणार नाही अशी सुरक्षित भावना त्यांच्यामध्ये असते. मतदानाच्या दिवशी मिळालेल्या सुट्टीचा लाभ घेऊन मतदानाऐवजी पर्यटनाला जाणे इ. कारणांमुळे शहरी भागात मतदारांचे व मतदानाचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले आहे.

**विशिष्ट ठिकाणी जाहिरात फलक लावणे :** वाहतुकीच्या रस्त्यावर विशिष्ट ठिकाणी तसेच चौकांमध्ये, मतदार व मतदान याचे महत्त्व पटवून देणारी, मोठे फलक (होर्डिंग्ज) लावण्यात येत आहेत.

**ग्रामीण मतदार :** लोकशाही प्रक्रियेबद्दल असलेले अज्ञान, निरक्षरतेचे प्रमाण, अत्यंत हलाखीची परिस्थिती, दळणवळणाच्या साधनांअभावी ग्रामीण भागात मतदारांचे व मतदानाचे प्रमाण कमी आहे असे दिसून आले आहे. त्यांच्यामध्ये जाणीवजागृती करण्यासाठी पारंपरिक भारूड, भजन, कीर्तन अशा लोककलांच्या माध्यमातून ग्रामीण भागात प्रबोधन करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून लोकशाहीचे महत्त्व पटवून देण्यात येत आहे. सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागात जनजागृती करण्यात येत आहे.

**राष्ट्रीय सेवा योजनांचा सहभाग**

विविध शिक्षण संस्था, महाविद्यालये यामध्ये व्यक्तिश: भेट देऊन मतदारनोंदणी करणे कठीण आहे. परंतु संबंधित महाविद्यालयात कार्यरत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनांच्या माध्यमातून मतदार जाणीवजागृतीचा संदेश पोचवणे शक्य झाले. यासाठी ५०० हून अधिक राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी व इतर अशासकीय संस्था यांच्या सहकार्याने प्रत्येक महाविद्यालयात मतदार नोंदणी मोहीम

## युवक मतदार




युवकांमध्ये लोकशाहीबद्दलची असलेली अनास्था, मतदार होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कार्यवाहीची माहिती नसणे, शिक्षण व नोकरीकडे अधिक प्राधान्य देण्याकडे निर्माण झालेला कल, आपल्या मताचे महत्त्व माहीत नसणे इ. कारणांमुळे युवकांचा लोकशाहीमध्ये सहभाग कमी होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे युवकांचे योग्य प्रबोधन होणे गरजेचे झाले आहे. त्यासाठी बैठका, चर्चासत्रे विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या स्तरावर विशेष चर्चा व परिसंवादांचे आयोजन करून युवकांचे प्रबोधन करण्यात येत आहे. वक्तृत्वस्पर्धा, प्रश्नमंजुषा, निबंधस्पर्धा इ. स्पर्धांचे आयोजन केले जात आहे. याशिवाय विविध क्रीडा, स्पर्धा, रॅली इ.च्या माध्यमातून युवक मतदारांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

राबवण्यात आली. या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षक तयार झाले. हे प्रशिक्षक इतर स्वयंसेवकांना प्रशिक्षण देत आहेत.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या मोहिमेविषयी व्यापक जनजागृती करण्यात आली. त्या अनुषंगाने मतदारनोंदणी प्रक्रिया सुलभ होण्यासाठी मतदान मदतकक्ष व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली. त्याची माहिती संबंधितांच्या भ्रमणध्वनीसह (मोबाईल नं.) जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. त्यामुळे अधिकाधिक लोकांना त्याचा फायदा झाला.

पुण्यातील गणेशउत्सवामध्ये गणपती विसर्जनादिवशी अशासकीय संघटना यांच्या सहकार्याने मतदार जागृती फेरी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये पुणे विभागाचे विभागीय आयुक्त व पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सहभागी झाले होते. त्यांनी स्वत: नागरिकांना माहितीपत्रकांचे वाटप केले.

राष्ट्रीय छात्रसेना योजनेच्या स्वयंसेवकांनी पथनाट्यांचे सादरीकरण विविध ठिकाणी केले. आकाशवाणीवरील बहुचर्चित आणि लोकप्रिय एफएम रेडिओ मिर्चीवर मुलाखती व आवाहने प्रसिद्ध करण्यात आली . जिल्ह्यातील केबल व्यवसायिकांद्वारे मोहिमेबाबतची माहिती केबल नेटवर्कद्वारे प्रत्येक घरात पोहोचवण्यास मदत झाली. विविध घोषवाक्ये, कार्टून्स हे चित्रपटगृहामध्ये प्रदर्शित करण्यात आली. ही मोहीम यशस्वी होण्यासाठी अशा उपक्रमांचा अवलंब केल्यामुळे या प्रकल्पास तरुण मतदारांकडून फार मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला.

**फलनिष्पत्ती :** २०१३ पासून राबवण्यात आलेल्या या कार्यक्रमांची पुढील फलनिष्पत्ती दिसून आली.

**१८+ EP Ratio –** १ जानेवारी २०१३ च्या मतदार यादीनुसार १८ व त्याहून अधिक वयाच्या लोकसंख्येच्या तुलनेत मतदारांचे प्रमाण हे प्रमाण ९६.६१% इतके होते तर आता हे प्रमाण ९८.३३% इतके झाले आहे.

**मतदानाचे प्रमाण :** २००९ मध्ये राज्यात सरासरीने एकूण ५०.७१ % इतके मतदान झाले होते. त्यानंतर मतदार यादीचे पुर्ननिरिक्षण करून मोठ्या प्रमाणात दुबार व बोगस मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. SVEEP या कार्यक्रमांतर्गत मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणात जागृतीचे काम करण्यात आल्याने याचाच एकत्रित परिणाम होऊन यंदाच्या निवडणुकीत मतदारांचे प्रमाण वाढेल अशी अपेक्षा आहे.

**युवक मतदार :** १ जानेवारी २०१३ रोजी १८ ते १९ या वयोगटातील युवक मतदारांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ०.७५% होते. २०१३-२०१४ या एक वर्षाच्या कालावधीमध्ये १८ ते १९ या वयोगटातील एकूण सुमारे ८.२५ लाख इतक्या युवकांची मतदार म्हणून विक्रमी नोंदणी करण्यात आली आहे. त्यामुळे १ जानेवारी २०१४ रोजी हे प्रमाण १.३५% इतके झाले आहे. असे असले तरी अपेक्षित उद्दिष्ट अजून साध्य झालेले नाही. त्यामुळे भविष्यात आणखी जोमाने प्रयत्न करण्यात येतील.

**छायाचित्र मतदार ओळखपत्र** (Election Photo Identity Card - EPIC) **आणि छायाचित्र मतदार यादी** (Photo Electoral Roll- PER) **चे प्रमाण –** १ जानेवारी २०१३ रोजी EPIC चे प्रमाण ८५.६२% इतके आहे. तर PER चे प्रमाण ८१.५९% इतके होते. त्यामध्ये १ जानेवारी २०१४ रोजी अनुक्रमे ९१.४२% व ९०.३२% या प्रमाणात सुधारणा झाली आहे.

या कार्यक्रमाची अंमलबजावणी ही जरी राज्य शासनामार्फत केली जात असली तरी, प्रत्येक नागरिकाकडून त्यास सकारात्मक प्रतिसाद अपेक्षित आहे. तसे झाले तरच जगातील सर्वात मोठी असलेली भारतातील लोकशाही अधिक बळकट आणि सक्षम होईल.

❖ ❖

# प्रभाव जाहिरातींचा

निःपक्ष निवडणूक प्रक्रिया मजबूत लोकशाहीला पूरक असते. ही प्रक्रिया कार्यक्षमतेने पार पाडण्याची जबाबदारी भारत निवडणूक आयोग, राज्य निवडणूक आयोग पार पाडीत असतात. सहकारी संस्थांच्या निवडणुका स्थानिक पातळीवर याच आधारावर घेतल्या जातात. राज्यात अनेक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा व लोकसभेच्या निवडणुका यशस्वीपणे पार पाडल्या गेल्या आहेत.

मागील काळात राज्यात एकाही ठिकाणी किंवा एकाही मतदान केंद्रावर पुनर्मतदान घेण्याची वेळ आली नाही. याचे कारण पुरोगामी विचार, आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी, उत्तम कायदा व सुव्यवस्था, मतदान केंद्रावरील कर्मचाऱ्यांपासून ते राज्य निवडणूक अधिकाऱ्यांपर्यंत असलेला उत्तम समन्वय, सुयोग्य पूर्वतयारी, रंगीत तालीम हे होय.

सरकारी पातळीवरच नव्हे तर पक्ष पातळीवर, सामाजिक संस्था




या सर्वच माध्यमातून मतदारनोंदणी जनजागृती अभियान राबवून १८ वर्षावरील सर्व मतदारांची नोंद होईल याची दक्षता घेण्यात येते.

**विशेष अभियान**

सरकारी यंत्रणा प्रत्येक मतदारापर्यंत प्रत्यक्षात पाहोचणे कठीण आहे. परंतु गेल्या १०-१५ वर्षांत प्रत्येक मतदार पुनरीक्षणाच्या (revision) वेळी विशेष अभियान/मोहीम राबवून जास्तीत जास्त नोंदणी करावयाचा प्रयत्न करण्यात येतो. लोकसंख्या, भौगोलिक

विस्तार, इतर प्रशासकीय कामे सांभाळून सरकारी यंत्रणांना हे काम करावे लागते. परिणामी, काही मतदार ज्यांचा नेहमी प्रशासनाशी सबंध येत नाही अथवा असे मतदार एकाच ठिकाणी कायमपणे वास्तव्यास नसतात किंवा समाजाच्या मुख्य प्रवाहात सर्वसाधारणपणे ज्यांचे अस्तित्व दिसून येत नाही किंवा अशा वाड्या, तांडे, पाडे, वस्ती ज्यांना रस्ते नाहीत, उंच उंच डोंगर उतारावरील पायवाटेनीसुद्धा जाणे अवघड असते अशा वस्त्या यांचा समावेश यात नसतो. अशा क्षेत्रातील एकवेळ पुरुषांची नोंद होऊ शकते पण पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांची नोंद करायची तसदी कुटुंबीय घेत नाहीत किंवा महिलांनाही त्याचे काही वाटत नाही. कारण निवडणूक, लोकप्रतिनिधी, सरकार यांच्याशी त्यांचे नित्याशी काही देणेघेणे नसते किंवा माझ्या एकट्यामुळे काय फरक पडणार आहे असा त्यांच्या मनात परंपरागत विचार खोलवर रुजलेला असतो. अशा अनेक कारणांनी मतदार नोंदणीपासून हा समाज किंवा समाजातील काही मंडळी विशेषत: महिला वंचित राहातात. परिणामी, त्यांचे लोकप्रतिनिधी कसे निवडतात अथवा निवडून आलेले लोकप्रतिनिधी काय काम करतात याबद्दल हा वर्ग अनभिज्ञ असतो.

**उच्चशिक्षित, श्रीमंतवर्ग मतदारांची अनास्था**

दुसरा एक वर्ग म्हणजे शहरात राहणारा विशेषत: महानगरातील मध्यभागात वास्तव्य करणारा, मध्यमवर्गीय, उच्चमध्यमवर्गीय अथवा उच्चभ्रू म्हणून ओळखला जातो. उदाहरणार्थ मुंबई, पुणे, नागपूर शहरातील उच्चशिक्षित, श्रीमंतवर्ग मतदार म्हणून नोंदणी करण्यास अथवा केली असल्यास मतदानाच्या दिवशी मतदान करण्यास पुढे येत नसल्याचे दिसून येतो. एवढी अनास्था या वर्गामध्ये का आली असावी, याचा विचार नेहमीच प्रशासकीय पातळीवर होत होता. या वर्गातील लोकांचा संविधान, लोकशाही, लोकप्रतिनिधी यांचा अभ्यास असूनही, या प्रक्रियेत सहभागी न होण्याचा त्यांचा स्थायिभाव बनल्याचे दिसून येते.

तिसरा वर्ग म्हणजे शासकीय कर्मचाऱ्यांचा. निवडणुकीच्या दिवशी सुट्टी असते म्हणून पर्यटनाचे नियोजन करणारा हा वर्ग आहे. बाहेरील राज्यातून स्थलांतरित होणारा कामगार वर्ग हासुद्धा त्यातलाच एक म्हणून ओळखला जातो.

महत्त्वाचे म्हणजे १८ वर्षावरील तरुणवर्ग नेहमीच अनुत्सुक दिसून येतो. माझा या व्यवस्थेशी काहीही संबंध नाही, असे या वर्गाला वाटते.

**तरुण वर्गातील अधिकाधिक मतदारांची नोंदणी कशी करायची**

प्रशासनासमोरील मुख्य समस्या होती की, या तरुण वर्गातील अधिकाधिक मतदारांची नोंदणी कशी करायची व नोंदणी केली असल्यास, मतदानादिवशी मतदानासाठी येण्यास त्यांना कसे प्रवृत्त करायचे. या समस्येवर मात करण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या. यामध्ये उत्तम दर्जाच्या प्रभावी जाहिरातीचा वापर, आधुनिक तंत्रज्ञानाचा जाहिरातीत वापर, साध्यासोप्या भाषेतील जाहिरातींद्वारे या वर्गांला आकर्षित करणे, प्रसारमाध्यमांद्वारे मतदार नोंदणीसाठी प्रयत्न करणे, सर्वसाधारण सर्वेक्षण करून वंचित वर्गांना भौगोलिकदृष्ट्या शोधून काढणे.

ग्रामीण भागात नेहमी स्थलांतर करणाऱ्या गरीब, निरक्षर, भटक्या जमातीसाठी वेगळी पद्धत व शहरातील उच्चशिक्षित, तरुण, श्रीमंत




वर्गासाठी वेगळी पद्धत अवलंबवण्यात आली.

**ग्रामीण मतदार :**

लोकगीते, भारूडे, उखाणे, भजन, सोंगीभजन, एकपात्री नाटके, एकांकिका, निबंध स्पर्धा

साध्यासोप्या भाषेतील संदेश, चित्र, परिणामकारक जाहिरातींचे फलक

निरक्षर मतदारांना आकर्षित करण्यासाठी एफएम रेडिओ, बसस्थानकावरील जिंगल्स, रेडिओ जिंगल्स, चित्रपटगृहातील जाहिराती, स्थानिक केबलवर चलचित्र जाहिरात

ग्रामीण भागातील बोली भाषेतील संदेश महिला वर्गांना प्रवृत्त करण्यास लाभदायक ठरला. उत्तम दर्जाचे डिजिटल फलक कमीत कमी खर्चात तयार करून अशा भागात प्रदर्शित केल्याने मतदार नोंदणी वाढली.

**आधुनिक माध्यमे**

शहरी भागातील मतदारांना अशासकीय संस्थांमार्फत एसएमएस करून फेसबुक, ब्लॉग, ट्विटर या माध्यमांतून अशासकीय संस्था व वेगवेगळ्या क्षेत्रातील यशस्वी व्यक्तींद्वारे आवाहन केल्याने या वर्गाने नोंदणीसाठी प्रतिसाद दिला. मराठीतील घोषवाक्ये, पत्रके, घडीपुस्तिका यांचा वाटा अत्यंत उपयुक्त ठरला.

राष्ट्रीय सणांच्या दिवशी प्रभातफेरीसाठी फलक तयार करण्यात येऊन निवडक विद्यार्थ्यांच्या हातात हे फलक दिल्याने विद्यार्थी, नागरिकांपर्यंत मतदार नोंदणीचा संदेश प्रभावीपणे पोहोचवता आला.

महिला बचतगटांमध्ये स्थानिक भाषेत लिहिलेल्या भित्तीपत्रिका किंवा गटचर्चेद्वारे उखाणे, म्हणी, वाक्प्रचारांचा वापर करण्यात आला. याद्वारे मतदान नोंदणीसाठी त्यांना प्रवृत्त करण्यात आले.

मतदार नोंदणी अभियान जाहिरातीचा प्रभावी वापर केल्याने मोठ्या प्रमाणात नोंदणी होत असल्याचे दिसून येते. मतदार साक्षर असो किंवा निरक्षर, ग्रामीण असो अथवा शहरी, एके ठिकाणी राहणारा असो किंवा भटका, आजकालच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा, स्थानिक भाषेचा प्रभावी माध्यमातून सुयोग्य नियोजनाचा समन्वय घडवून आणल्यास; जाहिराती, घोषवाक्ये यांचा नागरिकांवर प्रभाव पडतो. त्यामुळे ते मतदार नोंदणीसाठी प्रवृत्त होतात हे सिद्ध झाले.

**नावीन्यपूर्ण कल्पना**

कोणत्याही स्वरूपाच्या जाहिरातींमध्ये कल्पकता नसेल तर त्याचा इष्ट परिणाम होत नाही. म्हणून कल्पक जाहिराती तयार करण्यात आल्या. त्यासाठी सर्व संबंधितांशी **(पान ६० वर)**

# प्रबोधनाचे नवे रूप

**मतदान प्रक्रियेत विविध स्तरावरील सहभाग वाढवण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने अंमलबजावणी केली जात आहे. या संपूर्ण प्रक्रियेत तरुणांचा स्वयंस्फूर्त सहभाग वाढण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. महाविद्यालयांचे प्राचार्य अथवा या विषयांमध्ये आवड असणाऱ्या प्राध्यापकांची त्यांच्या महाविद्यालयांसाठी नोडल ऑफिसर म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. महाविद्यालयांतील कर्मचारी व विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. महाविद्यालयीन स्तरावर होणाऱ्या सर्व कार्यक्रमांद्वारे शुद्ध मतदानाच्या अनुषंगाने जनजागृतीचे कार्य केले जात आहे. यामध्ये मोठा उत्साह दिसून येतो. प्रत्येक महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा केला जातो. त्याचाही चांगला परिणाम दिसून आला आहे.**

आज महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतातील निवडणूक कालावधीतील मतदान प्रक्रियेत विविध आमिषे दाखवून मतदारांवर प्रभाव पाडला जातो. त्याचप्रमाणे पारंपरिक जाती व्यवस्था आणि सामाजिक जडणघडणीचा मतदानावर व मतदारांच्या मनावर फार मोठा प्रभाव असतो. या बाबी मतदाराला शुद्ध मतदानापासून परावृत्त करीत असतात. त्यामुळे यात आमूलाग्र बदल होणे गरजेचे आहे. असा बदल झाल्यास, सर्व मतदारांमध्ये शुद्ध मतदानाची जाण निर्माण होईल. त्यामुळे कोणत्याही प्रलोभनास ते बळी पडणार नाहीत. निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारातून सुयोग्य, लायक आणि समाजाभिमुख, शुद्ध चारित्र्याच्या लोकप्रतिनिधींची ते निवड करतील.

सर्व पात्र मतदारांची १००% नोंदणी करणे आवश्यक आहे. या सर्वांनी कोणत्याही आमिषाला/प्रलोभनाला न बळी पडता आपल्या सद्सद्विवेक बुद्धीने मतदान करणे गरजेचे आहे.

**सहभाग वाढला पाहिजे**

मतदान प्रक्रियेत महिला व तरुणवर्ग, सुशिक्षित वर्ग तसेच विविध शासकीय कर्मचारी आणि शहरी भागातील विविध प्रकारचे व्यापारी शिवाय खाजगी आस्थापना/कंपन्यांमधील नोकर वर्ग सहभागी झाला पाहिजे. या सर्वांनी सजगपणे भारतीय घटनेने दिलेला मतदानांचा पवित्र व अमूल्य हक्क बजावल्यास सार्वत्रिक निवडणुकीतून प्रस्थापित होणारे सरकार हे सर्व स्तरातील नागरिकांच्या किमान मूलभूत गरजा भागवणारे राहील.

राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था, केंद्र व राज्य शासनाची शासकीय/निमशासकीय कार्यालये विविध क्षेत्रांमध्ये नि:स्वार्थपणे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, सर्वस्तरीय वर्तमानपत्रे, सोशल मीडिया, दूरचित्रवाहिन्या आणि केबल नेटवर्क याद्वारे सर्वांना Ethical Voting (शुद्ध मतदान) चे महत्त्व पटवून देण्यात आले आहे. त्यामुळे आगामी लोकसभा/विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी निश्चित वाढलेली दिसेल.

सरकारी/निमसरकारी आस्थापनांमध्ये मोठ्या प्रमाणात सुशिक्षित व्यक्ती काम करतात. त्या सर्वांना निवडणुकीचे काम करावे लागते. यासाठी त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात मतदार म्हणून नोंदणी करणे व त्यानंतर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी कार्यालयीन स्तरावर प्रबोधनाचे कार्य मोठ्या प्रमाणात सुरू केले आहे.

महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा मोठी आहे. संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सण, उत्सव साजरे केले जातात. यात्रा, जत्रा भरतात. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराष्ट्रावरच नव्हे तर महाराष्ट्रातील सर्व जनतेवर या संतांचा मोठा प्रभाव आहे. इ. स.१२०० शतकापासून आजपर्यंत हा पगडा या जनमानसावर झालेला आहे. परिणामी या सर्व माध्यमांद्वारे मतदार जागृती अभियान राबवण्यात आले आहे.

लोकमान्य टिळकांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये जनजागृतीसाठी सार्वजनिक गणेशउत्सव सुरू केला होता. आज त्यास फार मोठे स्वरूप प्राप्त झाले आहे. संपूर्ण राज्यभर हजारो गणेशमंडळे आहेत. त्या सर्वांमार्फत मतदार जागृतीचे अभियान सुरू करण्यात आले आहे. यामध्ये मतदार नोंदणी आणि शुद्ध मतदानाबाबत मतदारांना आवाहन करण्यात येत आहे.

मुंबई, पुणे या महानगरपालिका असलेल्या शहरांपाठोपाठ नवरात्रीचा उत्सव आता संपूर्ण महाराष्ट्राचा **(पान ५२ वर)**

## महिलांचा सहभाग

महिला मतदार लोकसंख्येने ५०% व मतदारांमध्ये ४८% असलेल्या महिला मात्र मतदान प्रक्रियेमध्ये निरुत्साही असल्याचे दिसून येते. विविध महाविद्यालयांत कार्यक्रम घेत असताना मतदान नोंदणीच्या प्रमाणाबाबत उत्साह दिसून आला नाही. ग्रामीण भागामध्ये महिला मतदारांना गृहीत धरले जाते. अशा महिला मतदारांची जनजागृती करण्याचे काम वेगवेगळ्या माध्यमांद्वारे सुरू करण्यात आले आहे.



# खर्च करा, पण नियमाला धरून

उमेदवाराने/राजकीय पक्षाने निवडणुकीसंदर्भात करावयाच्या खर्चासंदर्भात संनियंत्रणाच्या अनेक बाबी भारत निवडणूक आयोगाने स्पष्ट केल्या आहेत. त्या भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

✱ लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ७७ (१) नुसार नामनिर्देशनापासून ते निवडणूक निकाल जाहीर होईपर्यंतच्या कालावधीसाठी प्रत्येक उमेदवाराने निवडणूक खर्चविषयक स्वतंत्र व योग्य लेखे ठेवणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे लेखे न ठेवल्यास तो भारतीय दंड संहिता कलम १७१ खप्रमाणे मतदानविषयक गुन्हा ठरतो.

✱ निवडणूक नियमावली (Conduct of Election Rules) १९६१ च्या नियम ९० प्रमाणे महाराष्ट्रामध्ये विधानसभेसाठी निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा रुपये २८ लक्ष व तर लोकसभेच्या साठी निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा रुपये ७० लक्ष इतकी आहे.

✱ लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ७८ अन्वये निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत उमेदवाराने निवडणूक खर्चविषयक लेखे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे.

**निवडणूक खर्चाचे प्रकार**

✱ कमाल मर्यादेमध्ये अनुज्ञेय असलेला खर्च, यामध्ये सार्वजनिक सभा/प्रचार आणि पोस्टर्स, बॅनर्स यावरील खर्चाचा समावेश होतो. ✱ निवडणुकींबाबतचा अनुज्ञेय नसलेला खर्च म्हणजे पैसे वाटप, दारू वाटप तसेच मतदार प्रभावित होतील अशा बाबींसाठींचा खर्च, जो अनुज्ञेय नाही व बेकायदेशीर आहे, याचा समावेश होतो. त्याचप्रमाणे पेड न्यूज/सरोगेट ॲडव्हर्टाईज या बाबींवर होणारा खर्च हा अयोग्य व बेकायदेशीर आहे.

त्यामुळे पहिल्या प्रकारचा खर्च हा अनुज्ञेय बाबींवर योग्य पद्धतीने खर्च होतो किंवा नाही याची नोंद घेणे व दुसऱ्या प्रकारचा खर्च जो कोठेही नोंदवला जात नाही, त्यावर नियंत्रण ठेवणे असे दुहेरी काम निवडणूक यंत्रणेचे आहे.

**निवडणूक खर्च संनियंत्रण यंत्रणा**

निवडणूक खर्चविषयक दैनंदिन लेखे प्रत्येक उमेदवाराने ठेवणे हे अनिवार्य आहे. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी निवडणूक प्रचारादरम्यान त्यासंदर्भातील योग्य पुरावे संकलित करणे गरजेचे आहे. त्यासाठी खालील यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे.

✱ खर्च निरीक्षक (Expenditure Observer) भारत निवडणूक आयोगातर्फे प्रत्येक मतदारसंघासाठी भारतीय महसूल सेवेतील अधिकाऱ्यांमधून एका खर्च निरीक्षकाची नियुक्ती होते .

**सार्वत्रिक निवडणुकीमध्ये उमेदवारास व राजकीय पक्षांना विविध बाबींवर खर्च करावा लागतो. मात्र हा खर्च आयोगाने ठरवून दिलेल्या मर्यादेत व नियमानुसार करणे आवश्यक आहे. निवडणुकीदरम्यान केलेल्या प्रत्येक खर्चाची व्यवस्थित व सुयोग्य नोंद ठेवणे गरजेचे आहे. या खर्चाच्या अनुषंगाने संनियंत्रणाच्या विविध बाबी निवडणूक आयोगाने स्पष्ट केलेल्या आहेत. नामनिर्देशनापासून ते निवडणूक निकाल जाहीर होईपर्यंतच्या कालावधीसाठी प्रत्येक उमेदवाराने निवडणूक खर्चविषयक स्वतंत्र व योग्य लेखे ठेवणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे लेखे न ठेवल्यास उमेदवारांवर कारवाई होऊ शकते.**

**नीलेश गटणे,**
(उपसचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी)

✱ सहायक खर्च निरीक्षक (Assistant Expenditure Observer) – जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने प्रत्येक मतदार संघासाठी निवडणुकीच्या अधिसूचनेच्या दिवशी केंद्र सरकारच्या गट ब मधील अधिकाऱ्यांमधून सहायक खर्च निरीक्षकाची नियुक्ती करावयाची आहे. मात्र असा अधिकारी उपलब्ध नसल्यास राज्य शासनाच्या वित्त विभागातील अधिकाऱ्यांमधून, ज्यांचे घर व कामाचे ठिकाण त्या विधानसभा क्षेत्रात येणार नाही अशा क्षेत्रासाठी नियुक्ती करावी. त्यांना एक वाहन, वैयक्तिक सुरक्षा व्यवस्था, स्थानिक सीमकार्ड व कार्यालयीन जागा उपलब्ध करावयाची आहे.

✱ **व्हिडीओ सर्वेक्षण पथके (Video Surveillance Team) (VST)** – एक अधिकारी व व्हिडीओग्राफर यांचा समावेश असलेली फिरती पथके नेमावयाची आहेत. याबाबतीत खर्च निरीक्षकांनी सुचविल्यास त्यांच्या संख्येत वाढ करणे अपेक्षित आहे. सहायक खर्च निरीक्षक यांनी संवेदनशील घटनांचे व मोठ्या सभांचे चित्रीकरण होत असल्याची खात्री करायची आहे.

✱ **व्हिडीओ पाहणी पथक (Video Viewing Team)** – एक अधिकारी व २ लिपिक याप्रमाणे प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी एक पथक नेमणे आवश्यक आहे. त्यांनी प्रत्येक महत्त्वाच्या घटनांचा तपशील पाहून आपली निरीक्षणे नोंदवावयाची आहेत.

✱ **लेखा पथक (Accounting Team)** – प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी एक अधिकारी व एक लिपिक यांचा समावेश असलेले लेखा



पथक नेमणे आवश्यक आहे.

✷ **तक्रार निवारणासंदर्भात नियंत्रण कक्ष तसेच कॉल सेंटर** – निवडणुकीच्या तारखा घोषित झाल्याच्या दिनांकापासून जिल्हास्तरावर एक २४ तास सुरू असणारे कॉलसेंटर स्थापन करण्यात येईल. तेथे ३ ते ४ Hunting Lines यांचा समावेश असलेला दूरध्वनी क्रमांक ठेवण्यात येईल. त्याची प्रसिद्धि जनतेमध्ये करण्यात येईल. या नियंत्रण कक्षाचा प्रमुख म्हणून एका अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी. त्याने संबंधित अधिकाऱ्यांकडे किंवा फिरत्या पथकांकडे या प्रकरणी प्राप्त होणाऱ्या तक्रारी तातडीने पाठवाव्यात, असे अपेक्षित आहे.

**फिरती पथके (Flying Squads)** – प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी ३ किंवा जास्त फिरती पथके ही बेकायदेशीर रक्कम वाटप, दारू वाटप या बाबींची पडताळणी करण्यासाठी नेमण्यात येतील. पथकांचे प्रमुख म्हणून वरिष्ठ कार्यकारी दंडाधिकारी असतील. त्यामध्ये पोलीस स्थानकातील वरिष्ठ पोलीस अधिकारी, एक व्हिडिओग्राफर व ३ ते ४ शस्त्रधारी पोलीस यांचा समावेश असेल. त्यांना स्वतंत्र वाहन, मोबाइल, व्हिडीओ कॅमेरा तसेच रक्कम/ वस्तू जप्त करताना आवश्यक असलेला पंचनामा नमुना देण्यात येईल.

**स्थिर सर्वेक्षण पथक – Static Surveillance Team :–** प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी एक दंडाधिकारी व ३ ते ४ पोलिस कर्मचारी यांचा समावेश असलेल्या ३ ते ४ पथकांची नियुक्ती करण्यात येईल. या पथकामार्फत रोख रक्कम, बेकायदेशीर दारू, संशयित वस्तू किंवा शस्त्रास्त्रे यांची वाहतूक या बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी चेक पोस्टची निर्मिती करण्यात येईल.

**खर्च संनियंत्रण कक्ष :** वरील सर्व पथकांचा समावेश असलेला कक्ष जिल्हा स्तरावर स्थापन करण्यात येऊन त्यावर एका उप विभागीय दंडाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येईल.

### खर्च संनियंत्रण संदर्भात सहायक खर्च निरीक्षक व फिरत्या पथकांची कर्तव्ये

✷ **खर्चाच्या दृष्टीने संवेदनशील मतदार संघ (Sensetive Constituency)** – जिल्हा निवडणूक अधिकारी मतदार संघाचा आढावा घेऊन पोलीस अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करून जास्तीत जास्त खर्च करणाऱ्या व नियमभंग करण्याच्या प्रवृत्ती असणाऱ्या क्षेत्राची निश्चिती करतील. अशा संवेदनशील ठिकाणी दोन सहायक खर्च निरीक्षक, दोन फिरती पथके तसेच अतिरिक्त Static Surveillance Team व Video Surveillance Team इ. नेमतील.

✷ खर्च विषयक संवेदनशील क्षेत्र (Expenditure Surveillance Pocket) – खर्च निरीक्षकाशी सल्लामसलत करुन मागील निवडणुकीचा अनुभव विचारात घेता अशा संवेदनशील क्षेत्राची निश्चिती करण्यात येईल. त्या ठिकाणी निवडणुकीच्या तीन दिवस अगोदर प्रकर्षाने लक्ष ठेवण्यात येईल.

✷ **निवडणूक खर्चविषयक निरीक्षक** – निवडणुकीची अधिसूचना घोषित होताच निवडणूक खर्चविषयक निरीक्षक तीन दिवसांसाठी मतदारसंघात पोहोचतील. खर्चविषयक निरीक्षकांनी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांसोबत पोलीस विभाग, आयकर



✷ **माध्यमे प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती** Media Certification & Monitoring Committee (MCMC) :– आयोगाच्या १५ एप्रिल, २००४ च्या व २७ ऑगस्ट, २०१२ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार ईलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरात प्रमाणीकरणासाठी खालील समित्या नियुक्त करण्यात येतील :–

**जिल्हास्तरीय समिती** – ✷ जिल्हा निवडणूक अधिकारी /निवडणूक निर्णय अधिकारी, लोकसभा क्षेत्र ✷ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी (उप विभागीय दंडाधिकारी अधिकाऱ्यांपेक्षा खालच्या दर्जाचा नको) ✷ केंद्र सरकारच्या, माहिती व नभोवाणी खात्यातील अधिकारी ✷ प्रेस क्लब ऑफ इंडियाने शिफारस केलेले पत्रकार/नागरिक ✷ जिल्हा माहिती अधिकारी समकक्ष अधिकारी–सदस्य सचिव.

उपरोक्त समितीतील जिल्हा निवडणूक अधिकारी /निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या उपस्थितीत प्रमाणीकरणाचे काम पार पडेल, तर पेड न्यूजबाबत निर्णय घेण्यासाठी सर्व समिती सदस्यांची उपस्थिती आवश्यक असेल.

**राज्यस्तरीय प्रमाणीकरण समितीमध्ये खालील अधिकारी असतील**

✷ सह मुख्य निवडणूक अधिकारी ✷ केंद्र शासनाच्या माहिती व नभोवाणी विभागातील अधिकारी ✷ अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा निवडणूक निर्णय अधिकारी, ३० मुंबई दक्षिण लोकसभा मतदारसंघ.

उपरोक्त समिती राज्यामध्ये नोंदणीकृत असलेले पक्ष/संस्था यांच्या संदर्भातील निवडणूक जाहिरातींचे प्रमाणीकरण करील. मात्र या समितीला पेड न्यूज संदर्भातील निर्णय घेण्याचा अधिकार नसेल.

**वरील दोन्ही समित्यांच्या निर्णयाविरुद्ध अपिलांसाठी पुढील राज्यस्तरीय समिती अस्तित्वात असेल** – ✷ मुख्य निवडणूक अधिकारी (अध्यक्ष) ✷ भारत निवडणूक आयोगाने नेमलेले निरीक्षक ✷ समितीने नियुक्त केलेले तज्ज्ञ ✷ केंद्र सरकाच्या माहिती व नभोवाणी विभागातील अखिल भारतीय सेवेतील अवर सचिव/उपसचिव दर्जाचे अधिकारी ✷ Press Club of India ने नामनिर्देशित केलेले पत्रकार / स्वतंत्र नागरिक ✷ सह मुख्य निवडणूक अधिकारी– सदस्य सचिव.

उपरोक्त समितीचे कार्यक्षेत्र प्रमाणीकरण तसेच पेडन्यूज या दोन्ही बाबींविरुद्ध निम्नस्तरीय समितीच्या निर्णयाविरुद्ध अपील असे असेल. त्याशिवाय समिती स्वाधिकारे कामकाज करू शकेल. या समित्यांची कार्यकक्षा जरी ईलेक्ट्रॉनिक माध्यमांपुरते जाहिरातीचे प्रमाणीकरण करायचे असले तरी पेडन्यूजबाबतची बाब ही इलेक्ट्रॉनिक तसेच प्रिंट मीडिया या दोन्ही बाबींसाठी पार पाडायची आहे.

विभाग, राज्य शुल्क उत्पादन विभाग व इतर अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना निवडणुकीच्या तयारी संदर्भात अवगत करणे अपेक्षित आहे.

✱ उमेदवारी मागे घ्यावयाच्या दिवसाच्या दुसऱ्या दिवशी त्यांना पुन्हा मतदारसंघात पोहोचावे लागेल व त्यांना निवडणूक झाल्यानंतर मतदारसंघ सोडता येईल.

✱ खर्च निरीक्षकांना प्रत्येक जिल्ह्यात निवडणुकीचे निकाल घोषित झाल्यानंतर ३० व्या दिवशी पोहोचावे लागेल. त्या ठिकाणी सात दिवस राहून निवडणूकविषयक खर्चासंदर्भातील लेख्याशी संबंधित कामकाज पार पाडावे लागेल. त्यांना Shadow Observation Register व Folder of Evidence ची पडताळणी करावी लागेल.

✱ खर्चविषयक निरीक्षकांना पुढील अहवाल वेळोवेळी सादर करावे लागतील. Annexure -२ मधील आगमन व प्रस्थान अहवाल, Annexure 3-a मधील अधिसूचना जारी केल्यानंतरचा अहवाल, Annexure-३ मधील उमेदवारी मागे घेतल्यानंतर सादर करावयाचा अहवाल , Annexure-४ मधील निवडणूक झाल्यानंतरचा तिसरा अहवाल, Annexure- ५ मधील चौथा व अंतिम अहवाल.

निवडणूक निरीक्षकांनी याव्यतिरिक्त त्यांच्याकडील स्वतंत्र स्रोताकडून कळलेल्या बाबी, तक्रारी तसेच पेडन्यूज संदर्भातील माहिती माध्यमे प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीला द्यावयाची आहे, तसेच Annexure-४ मध्ये भारत निवडणूक आयोगाला अशा बाबी कळवावयाच्या आहेत.



✱ **सहायक निवडणूक खर्च निरीक्षक** – प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी नियुक्त होणाऱ्या सहायक खर्च निरीक्षकांना खर्चविषयक बाबींवर प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या तक्रारी व अहवालावर कार्यवाही करावी लागेल. त्यांना Shadow Observation Register व Folder of Evidence यांचे पर्यवेक्षण करावे लागेल. निवडणूक खर्चविषयक निरीक्षकांच्या पर्यवेक्षणाखाली त्यांनी खर्चविषयक सर्व प्रकारच्या पथकांचे अहवाल एकत्रित करून त्यावर कार्यवाही करावी लागेल. Annexure-६ मध्ये दैनंदिन अहवाल सादर करावा लागेल. निवडणूक प्रचारादरम्यान किमान ३ वेळा लेख्यांची तपासणी करावी लागेल. उमेदवारांनी लेख्यांमध्ये योग्य खर्च दर्शविला असल्याची नोंद निवडणूक खर्च निरीक्षकांनी त्यांच्या स्वाक्षरीने घेतल्यानंतर अथवा त्यासंदर्भातील त्रुटी दर्शविल्यास Shadow Observation Register मध्ये नोंद घेऊन उमेदवार/निवडणूक प्रतिनिधीची त्यामध्ये स्वाक्षरी घ्यावी लागेल. निवडणूक खर्चविषयक निरीक्षक व जिल्हा निवडणूक अधिकारी या दोघांनाही त्यांच्या छाननीच्या कामामध्ये मदत करावी लागेल. तसेच माध्यमे प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीबरोबर समन्वय ठेवून या संदर्भातील कामकाज पूर्ण करावे लागेल.

✱ **Video Surveillance Team** – प्रत्येक चित्रीकरणाच्या वेळी कोणत्या घटनेचे, दिनांकाचे व ठिकाणाचे तसेच कोणत्या उमेदवाराच्या संदर्भात रेकॉर्डिंग आहे याचे ध्वनीमुद्रण करावे लागेल. त्यानंतर अशा समारंभाचे/घटनांचे चित्रीकरण करणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे वापरलेली वाहने, खुर्च्या, फर्निचर, लाऊडस्पीकर, पोस्टर्स, बॅनर्स, स्टेज आदी संदर्भातील निदर्शनास आलेला तपशिल चित्रीकरणासमयी ध्वनीमुद्रित करणे आवश्यक आहे. या पथकांनी Annexure-७मध्ये Cue Sheet ठेवणे आवश्यक आहे. चित्रीकरण केलेल्या सीडीमध्ये स्वतंत्र तपशील देऊन Cue Sheet मध्ये आढळलेला सर्व तपशील नोंदविणे अपेक्षित आहे.

✱ **Video Viewing Team** – या पथकाने व्हिडीओमध्ये आढळलेल्या खर्चविषयक बाबी व सीडीमधील तपशिल शक्यतो त्याच दिवशी लेखाविषयक पथकाकडे किंवा सहायक निवडणूक निरीक्षकाकडे सादर करणे अपेक्षित आहे.

✱ **पोलीस ऑब्झर्व्हर** – निवडणूक खर्चविषयक संवेदनशील मतदारसंघात राज्याबाहेरील पोलीस उपमहानिरीक्षक दर्जाचे अधिकारी नियुक्त केले जातात व तसेच Statistic Surveillance Team चे पर्यवेक्षण त्यांच्याकडे सोपवण्यात येते. पोलीस ऑब्झर्व्हर हे या मतदारसंघात निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकास पोहचतील व मतदार प्रक्रिया संपेपर्यंत राहतील. पोलीस ऑब्झर्व्हर हे खर्च निरीक्षकाशी खर्च विषयक बाबींवर व सामान्य निरीक्षकांशी आचार संहिता बाबींवर समन्वय साधतील व आयकर विभागाच्या अन्वेषण शाखेशी तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाशी समन्वय साधतील.

✱ **जागृतीविषयक निरीक्षक (Awareness Observer)** – माध्यमे प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीच्या कामासंदर्भात व पेडन्यूज कामासंदर्भात आढावा घेण्यासाठी असे निरीक्षक आयोगातर्फे नेमले जातात.

**अकाऊंटिंग टीम** – मार्फत Annexure-११ मधील नमुन्यामध्ये Shadow Observation Register ठेवण्यात येतील. त्यामध्ये जिल्हा स्तरावर घोषित केलेल्या वस्तू व सेवांच्या दरांप्रमाणे खर्चाची नोंद प्रत्येक उमेदवाराने केली आहे का याची खात्री करणे या पथकाकडून केली जाईल.

✱ **कॉल सेंटर** – सेंटरमध्ये Annexure -१३ मध्ये रजिस्टर ठेवण्यात येईल. त्यामध्ये दररोजचा दूरध्वनी संदर्भाचा तपशील

**हेलिकॉप्टर /खाजगी विमाने** – या संदर्भातील Standard Operating Procedure नुसार व्यापारी विमानतळावर जिल्हा निवडणूक यंत्रणेने विमाने उड्डाणे व लँडिंगच्यासंदर्भात परवानगी देणे अपेक्षित नाही. मात्र ज्या ठिकाणी दुर्गम क्षेत्रात अनियंत्रित स्वरूपात हवाईतळ व हेलीपॅड असतील अशा ठिकाणी कोणत्याही लँडिंगपूर्वी २४ तास अगोदर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे अर्ज करणे आवश्यक आहे. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना प्राधान्याने अशा प्रकारची परवानगी देण्याची कार्यवाही पार पाडावी लागेल. विमानतळांवर सेंट्रल इंडस्ट्रियल सिक्युरिटी फोर्स (केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल) किंवा पोलीस अधिकाऱ्यांना प्रवाशाकडे रुपये १० लाखांपेक्षा जास्त रोख रक्कम किंवा १ किलोहून अधिक सोन्याची वाहतूक आढळल्यास अशी प्रकरणे आयकर विभागाकडे सोपवावी लागतील.

ठेवण्यात येईल. त्यामध्ये प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा तपशील आणि खर्चविषयक बाबी या खर्च निरीक्षकांकडे तसेच आचारसंहिते बाबींसंदर्भात या सामान्य निरीक्षकांकडे अवलोकनास्तव सादर करण्यात येईल.

✷ **माध्यमे प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती** – जिल्हास्तरीय समितीला उमेदवारांच्या जाहिरातीचे प्रमाणीकरण करण्याव्यतिरिक्त पेडन्यूज संदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार असतील. या समितीला राष्ट्रीय व स्थानिक पातळीवरील वर्तमानपत्रे व दूरदर्शन संच तसेच स्वतंत्र कक्ष देण्यात येतील.

**सोशल मीडिया**

सोशल मीडियाचा वापर करणाऱ्या उमेदवारांना त्याविषयीचा तपशील उमेदवाराला नामनिर्देशनासोबत द्यावा लागेल. अशा मीडियामध्ये ✷ विकिपिडीया ✷ ब्लॉग्ज आणि मायक्रो ब्लॉग्ज (ट्विटर) ✷ यू ट्यूब ✷ फेसबूक ✷ ॲप्स तसेच अन्य प्रकारांचा समावेश होतो.

सोशल मीडियावरील जाहीरातींसाठी प्रमाणीकरण करणे व अशा खर्चाची आकडेवारी लेख्यात दर्शवणे बंधनकारक आहे.

**माध्यम प्रमाणीकरण समितीकडे अर्ज सादर करताना अर्जामध्ये** जाहिरात निर्मितीचा खर्च, दूरदर्शन/रेडियो/केबलवर करावयाच्या प्रक्षेपणासंदर्भातील तपशील या बाबींचा समावेश असावा.

✷ जाहिरात उमेदवाराच्या लाभासाठी करण्यात येत असल्यास किंवा राजकीय पक्षाच्या लाभासाठी करण्यात येत आहे याबाबतचे सत्यापन द्यावे लागेल.

✷ जर जाहिरात उमेदवाराच्या लाभासाठी करण्यात येत आहे किंवा राजकीय पक्षाच्या लाभासाठी करण्यात येत नसल्यास तशा आशयाचे प्रतिज्ञापन द्यावे लागेल.

✷ सर्व प्रदाने चेक/डीडीने दिली जातील असे सत्यापन द्यावे लागेल.

✷ समितीने परवानगी दिल्यानंतर उपरोक्त खर्चाचा तपशील, परवानगी आदेश या बाबी समितीने जिल्हा निवडणूक अधिकारी व लेखा पथकाकडे पाठवाव्या लागतील.

राजकीय पक्षांनी केलेल्या खर्चाबाबतचा तपशील आयोगास विधानसभा निवडणुकांनंतर ७५ दिवसांत तर लोकसभा निवडणुकांनंतर ९० दिवसात सादर करावा लागेल.

✷ जाहिरातीतील दावे/प्रतिदावे याबाबतची वस्तुस्थिती व खरेपणा याची संपूर्ण जबाबदारी प्रकाशक/जाहिरातदार यांची असल्याचे तसेच प्रमाणीकरण समिती ही त्यापोटीच्या कोणत्याही नुकसानी व क्षतीसाठी तसेच दिवाणी/फौजदारी दाव्यांसाठी जबाबदार असणार नाही, असे समितीला प्रमाणीकरण करताना स्पष्टपणे नमूद करावे लागेल.

✷ राज्य उत्पादन शुल्क विभाग तसेच आयकर विभागाची अन्वेषण शाखा खर्चविषयक बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी महत्त्वाची आहे. त्यांचे राज्यस्तरीय अधिकारी हे आयोगातार्फे नोडल अधिकारी म्हणून नियुक्त झाले आहेत. संबंधित विभागांच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे सहकार्य वेळोवळी घेणे आवश्यक राहील.

**खर्चावरील नियंत्रणासंदर्भातील कार्यपद्धती**

✷ Shadow Observation Register तसेच Folder of Evidence संदर्भात लेखा पथकाला Annexure-११ मधील नमुन्यांमध्ये उपरोक्त रजिस्टर ठेवावे लागेल. त्यामध्ये पथकांनी सादर केलेला अहवाल विचारात घेऊन खर्चाचा तपशील नोंदवून तर उमेदवाराने सादर केलेली आकडेवारी पडताळून पाहावी लागेल. ✷ व्हिडीओ सर्वेक्षण पथक, पाहणी पथक, माध्यमे प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती स्टॅटिक टीम आणि फिरते पथक तसेच नियंत्रण कक्षामधून प्राप्त होणारे दैनंदिन अहवाल लेखा पथकाला संकलित करावे लागेल.

✷ सहायक खर्च निरीक्षक यांनी उपरोक्त बाबींची वेळोवेळी पाहणी करून त्याविषयी खर्चविषयक निरीक्षकांना वेळोवेळी अवगत करावे लागेल.

✷ Folder of Evidence मध्ये व्हिडीओ, ऑडिओ सीडीज , पोस्टर्स, वर्तमानपत्रांतील जाहिराती, निरनिराळी देयके व वेगवेगळे अहवाल, चौकशी अहवाल, निवडणूक निर्णय अधिका-यांनी दिलेल्या नोटिसा या प्रकरणी घडलेली न्यायालयीन प्रकरणे आदी सर्व बाबी उमेदवारनिहाय संकलित करून घ्यावी लागतील.

✷ उमेदवाराने अनुज्ञेय खर्चाव्यतिरिक्त अतिरिक्त खर्च केलेल्या बाबी निदर्शनास आल्यास त्यासंदर्भात तक्रार दाखल करण्यात येईल. तो खर्च Shadow Observation Register मध्ये नोंदवण्यात येईल. निवडणूक आयोगाकडे निवडणूक खर्च निरीक्षकांना २४ तासाच्या आत याबाबतचा अहवाल सादर करावा लागेल.

✷ निवडणूक निरीक्षकांनी तपासणी केलेल्या कालावधीचे रजिस्टर हे उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी अथवा जनतेला मागणीप्रमाणे उपलब्ध करावे लागेल. जर उमेदवाराने कमी खर्च दर्शवून लेखा सादर केला असेल तर ती बाब तपासणीसमयी उमेदवाराच्या निदर्शनास आणावी लागेल. त्याची खर्च निरीक्षकांनी नोंद घेऊन रजिस्टरमध्ये स्वाक्षरी करावी लागेल. त्याचप्रमाणे Shadow Observation Register मध्ये तशी नोंद करून त्या संदर्भात उमेदवाराची/प्रतिनिधीची स्वाक्षरी घ्यावी लागेल. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला अशा प्रकरणी उमेदवाराला नोटीस द्यावी लागेल. ती नोटीस जनतेसाठी नोटीसबोर्डवर प्रसिद्ध करण्यात



✷ उमेदवाराचे स्वत:चे एक वाहन हे प्रचार वाहन म्हणून गृहीत धरावे लागेल. त्यासाठी येणारा इंधन व ड्रायव्हरचा पगार यावरील खर्च हा मानीव खर्च मानून तो उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट केला जाईल. एका वाहनाव्यतिरिक्त अन्य वाहने वापरली गेल्यास अशा वाहनांसंदर्भात भाडे करारांनी वापरलेल्या वाहनांचा दर विचारात घेऊन खर्च समाविष्ट करावा लागेल.

येईल. अशाप्रकारे देण्यात आलेली नोटीस व त्या प्रकरणी उमेदवाराचा प्राप्त झालेला खुलासा हा Folder of Evidence मध्ये ठेवण्यात येईल व तो लोकांना प्रती रुपये १/- प्रती पान याप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येईल. अशा प्रकरणी निदर्शनास आलेली बाब ही जिल्हा व्यय नियंत्रण समितीच्याही अवलोकनार्थ सादर करण्यात येईल.

✸ सभा आयोजित करण्याची परवानगी मागतेवेळी उमेदवाराकडून याबाबतीत होणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक Annexure-१६ मध्ये अर्जासोबत सादर करावे लागेल. सभासमयी ज्या खाजगी वाहनांवर उमेदवारांशी संबंधित बॅनर्स व पोस्टर्स असतील अशी वाहने उमेदवारांच्या खर्चात समाविष्ट करावी लागतील. जी वाहने व्यापारी प्रयोजनार्थ नोंदणी झालेली आहेत अशी वाहने सभा अथवा रॅलींमध्ये आढळल्यास त्याबाबतीतील खर्च हा उमेदवारांच्या खर्चात समाविष्ट करावा लागेल.

✸ झेंडे, मफलर व टोप्या या बाबींवरील खर्च अनुज्ञेय असून तो उमेदवारांच्या खर्चात समाविष्ट केला जाईल. मात्र साडी, शर्ट, धोतर, टी शर्ट अथवा अन्य बाबीं वितरीत केल्यास ती बाब अनुज्ञेय नाही व मतदारास प्रलोभन या प्रवर्गामध्ये अशा प्रकरणी कार्यवाही केली जाईल.

✸ जिल्हास्तरावरील पक्षांचे प्रमुख पदाधिकारी जे पक्षाचे स्टार प्रचारक नाहीत, त्यांना जिल्ह्यात एक वाहन घेऊन फिरण्याची मुभा आहे. तो खर्च प्रचाराच्या खर्चात समाविष्ट केला जाणार नाही. मात्र असे पदाधिकारी स्वत:च उमेदवार असल्यास त्या मतदानक्षेत्रासाठी अशा वाहनांचा खर्च अशा उमेदवाराच्या खर्चात दाखवला जाईल.

✸ उमेदवाराने कोणतेही सबळ कारण न दाखवता लेखे तपासणीसाठी उपलब्ध केले नाही तर त्याच्या कोणत्याही सभा समारंभास परवानगी देण्यात येणार नाही.

✸ मान्यताप्राप्त राजकीय पक्षासंदर्भात लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ७७ (२) अन्वये ४० व्यक्तींना स्टार प्रचारक म्हणून मानले जाऊ शकते, तर नोंदणीकृत अमान्यता प्राप्त पक्षांसंदर्भात २० पर्यंतच्या व्यक्तींना स्टार प्रचारक म्हणून मानले जाऊ शकते.त्यासाठी भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत पक्षांना अशा प्रचारकांची मुख्य निवडणूक अधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच खर्च निरीक्षक यांना सादर करावी लागेल. जर उमेदवार स्टार प्रचारकांबरोबर स्टेजवर उपस्थित राहिल्यास किंवा त्याचे छायाचित्र किंवा पोस्टर्स अशा ठिकाणी लावण्यात आल्यास स्टार प्रचारकाच्या प्रवास खर्चाव्यतिरिक्त सर्व खर्च त्या उमेदवाराच्या लेख्यांमध्ये समाविष्ट करण्यात येईल. उमेदवाराने सोबत प्रवास केल्यास प्रमाणशीर प्रवासखर्च त्यांच्या लेख्यात समाविष्ट करण्यात येईल.

✸ हेलिकॉप्टर किंवा विमानावरील खर्च :- जर स्टार प्रचारकाने उमेदवाराशिवाय विमान प्रवास अथवा हेलीकॉप्टरने प्रवास केला तर तो खर्च उमेदवाराच्या लेख्यात दाखवण्याची आवश्यकता नाही. मात्र उमेदवाराने सोबत प्रवास केल्यास अशा प्रवासावरील ५०% खर्च दाखवण्यात येईल. सद्य:स्थितीतीत या प्रकरणी असलेले हेलिकॉप्टरचे प्रती तास शुल्क पुढीलप्रमाणे - सर्व्हिस टॅक्स १२.३६% समाविष्ट करावा, Bell ४२९ रुपये १.६ लक्ष, Bell ४०७ रुपये ८५००० ते ९००००/-, AS ३५० इ-३ वरीलप्रमाणे, Bell ४१२ अँड डॉल्फीन हेलिकॉप्टर अडीच लाख, Bell २०६ रुपये ८००००/- मात्र या प्रकरणी अशा खर्चविषयक तपशिलाची शहानिशा करून दर निश्चित केला जाईल. त्यानुसार लेखे सादर होतील याची दक्षता घेतली जाईल.

✸ **स्टार प्रचारकांच्या उमेदवाराच्या निवासव्यवस्था व भोजन व्यवस्थेवरील खर्च :** स्टार प्रचारकांच्या निवासव्यवस्था व भोजन व्यवस्थेवरील खर्च हा उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करण्यात येईल. ( जर उमेदवाराने नेमकेपणे त्या उमेदवाराचा प्रचार केला असेल)




✸ **पाम्फ्लेट्स/पोस्टर्स यांच्या मुद्रणालयासंदर्भातील नियंत्रण** :- मुद्रणालयांना निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लोक प्रतिनिधित्व अधिनियम १९५० च्या कलम १२७- अ ची जाणीव करून द्यावी व या कलमांचा भंग झाल्यास त्यांच्या मुद्रणालयाचा परवाना रद्द होऊ शकतो याची जाणीव त्यांना करून द्यावी. निवडणुकीशी संबंधित प्रत्येक भित्तीपत्रक/माहितीपत्रक/ पाम्फलेट्सवर मुद्रक व प्रकाशकाचे नाव छापणे अत्यावश्यक आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १२७ अ (२) नुसार मुद्रकाने -३ दिवसांमध्ये प्रकाशकाची प्रतिज्ञाप्रत संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर करावी. तसेच मुंबई मधील मुद्रणालयांनी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे.

✸ **स्टेज /कुंपण आदीसंदर्भात होणाऱ्या खर्चावरील संनियंत्रण**: सुरक्षिततेच्या कारणास्तव शासनाला कुंपण टाकण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास, ज्या उमेदवारासाठी प्रचारसभा झाली असेल त्याच्या लेख्यांमध्ये असा खर्च समाविष्ट केला जाईल.

✸ पक्षाच्या प्रचारासाठी व्हिडीओ व्हॅनचा प्रचार केला तर त्याचा

**निवडणूक प्रचारासाठी वाहनांच्या वापरावरील संनियंत्रण** - प्रत्येक उमेदवाराला निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे वापर करावयाच्या वाहनांसाठी परवानगी मागावी लागेल. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने त्यांना त्याच दिवशी परवानगी देण्याची व्यवस्था करावी लागेल. दुचाकी वाहने, सायकल रिक्षा या वाहनांनाही अशाप्रकारची परवानगी घेणे आवश्यक आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेला परवाना दर्शनी भागामध्ये लावणे आवश्यक आहे. परवानगीशिवाय निवडणूक प्रचाराकरिता वाहने वापरली गेल्यास तो भारतीय दंडसंहिता कलम १७१ 'क'नुसार दंडनीय गुन्हा आहे. जर उमेदवाराने निवडणूक खर्चाचा तपशील तपासणीसाठी उपलब्ध केला नाही तर अशावेळी वाहने वापराचा परवानाही रद्द करण्यात येईल. एका उमेदवारासाठी परवानगी घेऊन दुसऱ्याच उमेदवाराचा प्रचार केला तर असेही वाहन जप्त करण्यात येईल.

खर्च उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करू नये. जर उमेदवाराचे छायाचित्र किंवा पोस्टर्स/बॅनर्स लावले असेल तर मात्र उमेदवाराच्या लेख्यामध्ये तो खर्च समाविष्ट केला जाईल.

**संनियंत्रणाचे अन्य मार्ग :** ✷ स्वयंसेवी संस्थाचे लेखे तपासणी ✷ विवाहप्रसंगी वस्तुंच्या वाटपांवर लक्ष ✷ सामूहिक स्वयंपाक घरांमधील मतदारांसाठी आयोजित केलेले भोजन ✷ शासकीय योजनांच्या कामकाजावरील मेहनतानाच्या वाटपासोबत करण्यात येणारे रकमांचे वाटप ✷ निवडणुकीदरम्यान वाटप करण्यात येणारी दारू

✷ **बँकामधून काढण्यात येणाऱ्या रकमेवरील संनियंत्रण :-**

बँकानी त्यांच्याकडील खात्यांमधून जर संशयास्पद व्यवहार झाल्यास निवडणूक यंत्रणेस सूचना द्याव्यात, असे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी संबधितांना कळवावे. ज्या खात्यामध्ये यापूर्वी कधीही घडले नाही, मात्र अशा बँक खात्यामध्ये १० लाखांपेक्षा जास्त रक्कम जमा केली गेली अथवा काढली गेल्यास त्याचा तपास करणे आवश्यक आहे. उमेदवाराच्या खात्यामधून १ लाखापेक्षा जास्त रक्कम काढली गेली असल्यास त्याची माहिती घेणे आवश्यक आहे.

✷ निवडणुकीच्या कालावधीत एटीएम व्हॅन्समधून पैसे वाहतुकीच्या संदर्भात वित्त विभागातर्फे नियमावली करण्यात आली आहे. त्यानुसार कोठल्याही परिस्थितीत बँकांकडून खाजगी व्यक्ती/संस्थांकडून रोकड वाहतूक करण्यात येऊ नये अशा सूचना देण्यात येतील.

✷ बेकायदेशीर रोख रक्कम, परकीय चलन किंवा खोट्या नोटा आदी बाबी आढळल्यास अशी प्रकरणे आयकर विभागाच्या अन्वेषण शाखेकडे सोपवण्यात येतील.

**उमेदवाराने सादर करावयाचे लेखे**

✷ लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ७७ अन्वये प्रत्येक उमेदवारास ठेवलेले स्वतंत्र व योग्य लेखे कलम ७८ अन्वये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे निकाल लागल्यानंतर ३० दिवसांच्या आत सादर करावे लागतील.

✷ उमेदवारास नामनिर्देशनापूर्वी निवडणूक प्रयोजनार्थ स्वतंत्र बँक खाते उघडावे लागेल व तो खातेक्रमांक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे उपलब्ध करून द्यावा लागेल. निवडणुकीशी संबंधित सर्व खर्च हा त्याच खात्यातून करावा लागेल. अशा खात्याचे बँकेकडून मिळालेले स्टेटमेंट हे एकत्रित खर्च सादर करतेवेळी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर करावे लागेल.

✷ उमेदवारांनी वैयक्तिक किंवा त्यांच्या प्रतिनिधींसोबत संयुक्त / वैयक्तिक खाते उघडावे. मात्र कोणत्याही परिस्थितीत अस्तित्वात असलेल्या बँक खात्याचा निवडणूक प्रकियेकरिता वापर करता येणार नाही.

✷ संपूर्ण निवडणूक काळात रुपये २०,०००/- पेक्षा जास्त रक्कम देय होणार नाही अशाप्रकरणी बँक खात्यामधून ती रक्कम काढून ती रोखीत अदा करता येईल. मात्र सर्व प्रदाने त्या खात्यातील अकाऊंट पेयी धनादेशाने होतील याची काळजी घ्यावी. अशा प्रकारचे खाते उमेदवाराने न उघडल्यास त्याने लेखे विहित पद्धतीने ठेवले नाहीत असे गृहित धरून कार्यवाही करण्यात येईल.

✷ उमेदवाराने निवडणूक खर्चासंदर्भात Annexure-१४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रजिस्टर ठेवावयाचे आहे. रजिस्टरमध्ये ३ भाग असतील. भाग-१ -दैनंदिन लेखे- पांढरी पाने/भाग-२- रोख लेख - गुलाबी पाने /भाग-३ ग बॅक रजिस्टर- पिवळी पाने

उमेदवारांनी हे लेखे खर्चविषयक निरीक्षकांना प्रचारादरम्यान किमान ३ वेळा निरीक्षणासाठी सादर करून द्यावे लागतील. रजिस्टरमधील प्रत्येक पान हे पृष्ठांकित केलेले असेल व एकूण पानासंदर्भात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केली असेल. आवश्यकतेप्रमाणे उमेदवारास पुरवणी रजिस्टरही देण्यात येईल.

✷ **दैनंदिन रजिस्टर :** यामध्ये ९ रकाने असतील व ज्या दिवशी खर्च होणार नाही अशा दिवशी निरंक अशी नोंद ठेवण्यात येईल. एकूण खर्चामध्ये प्रलंबित व दिलेला रकमांच्या नोंदी नोंदवण्यात येईल. कोणत्याही स्रोताकडून प्राप्त झालेली वस्तू व सेवा निवडणूक मोहिमेमध्ये वापरली गेल्यास त्याचा तपशील नोंदवण्यात येईल. राजकीय पक्षाकडून प्राप्त झालेल्या किंवा प्राधिकृत झालेल्या रकमा यांचीदेखील त्यामध्ये नोंद घेण्यात येईल.

✷ **रोख लेखे -** रोख स्वरुपात प्राप्त झालेल्या कोणत्याही रकमा यामध्ये नोंदवण्यात येतील. त्यासंदर्भातील तपशील सविस्तरपणे लिहिण्यात येईल.

✷ **बँक रजिस्टर -** उमेदवाराने संबंधित बँक खात्यामधून केलेला सर्व खर्च या रजिस्टरमध्ये



✷ **निवडणूक खर्च रजिस्टरचे पर्यवेक्षण** - निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने प्रत्येक उमेदवाराच्या संदर्भात रजिस्टरचे निरीक्षण करण्यासंदर्भात वेळापत्रक आखून देणे आवश्यक आहे. या रजिस्टरचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रचारादरम्यान किमान ३ वेळा (दोन निरीक्षणामध्ये ३ दिवसांपेक्षा जास्त कालावधी हवा) निरीक्षण करावयाचे आहे. प्रत्येक निरीक्षणाच्या वेळी दैनंदिन लेखे ठेवलेले रजिस्टर स्कॅन करून राज्य निवडणूक अधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. नोटीसबोर्डवर त्याची छायांकित प्रत प्रसिद्ध केली जाईल. जर उमेदवार किंवा त्याच्या प्रतिनिधींनी रजिस्टर तपासणीसाठी उपलब्ध करून न दिल्यास त्यांनी निवडणूक खर्चविषयक दैनंदिन लेखे ठेवलेले नाहीत असे गृहीत धरून लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ७७ अन्वये त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यात येईल. भारतीय दंड संहिता (IPC) च्या कलम १७१ अन्वये सक्षम न्यायालयात तक्रार नोंदवण्यात येईल. जर उमेदवारांनी या प्रकरणी नोटीस दिल्यानंतर ३ दिवसांत लेखे तपासणीसाठी सादर केले नाहीत तर त्यांना दिलेला वाहन परवाना रद्द करण्यात येईल व या बाबींना व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल.

उमेदवाराने ठेवेलेल्या लेख्याच्या सर्व प्रती जनतेला रुपये १ प्रती पान याप्रमाणे उपलब्ध करून देता येतील.

नोंदवण्यात येईल.

✷ उमेदवार खर्चासंदर्भात बाबींवर काम करण्यासाठी एका अतिरिक्त प्रतिनिधिंची नियुक्ती करणे शक्य आहे. मात्र त्याला अन्य निवडणूक प्रतिनिधीप्रमाणे कोणत्याही प्रकारची संविधानिक जबाबदारी देण्यात येणार नाही.

✷ **जिल्हा संनियंत्रण समिती (District Expenditure Monitoring Committee) (DEMC) :–** या समितीमध्ये खर्च निरीक्षक, जिल्हा निवडणूक अधिकारी, उप जिल्हा निवडणूक अधिकारी/खर्चविषयक बाबींवरील संनियंत्रणासाठी जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

एखाद्या उमेदवाराने किरकोळ खर्च लपविला असल्यास त्या संदर्भात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून नोटीस दिली जाईल. त्यावरील प्राप्त झालेला खुलासा विचारात घेता, त्यासंदर्भात जिल्हा संनियंत्रण समितीचा निर्णय विचारात घेऊन असा खर्च उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करावा किंवा नाही याबाबत निर्णय घेण्यात येईल.

### विविध बैठका

मुख्य निवडणूक अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी राजकीय पक्ष व प्रसारमाध्यमांसोबत घ्यावयाच्या बैठका व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी उमेदवारांसोबत घ्यावयाच्या बैठका.

✷ खर्चविषयक तरतुदींसंदर्भात राजकीय पक्षांची बैठक घ्यावी. ✷ मुख्य निवडणूक अधिकारी यांनी मीडिया तसेच पत्रकारांसाठी राज्यस्तरावर जाहिराती प्रमाणीकरण व पेडन्यूज संदर्भात बैठका घेऊन त्यांना भारत निवडणूक आयोगाकडील सूचनांच्या प्रती उपलब्ध करून द्याव्यात.

✷ जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी मान्यताप्राप्त राज्य व राज्यस्तरीय राजकीय पक्षांसोबत ३ दिवसांमध्ये बैठक घ्यावी व त्यांच्याकडे यासाठीच्या तरतुदी तसेच मत्ता व दायित्व या संदर्भात ॲफिडेव्हीटबद्दल फॉर्म्स व निवडणूक प्रयोजनार्थ खर्च करावयाच्या बाबींसंदर्भात निर्धारित केलेल्या दरांची प्रत द्यावी.

✷ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी चिन्ह वाटपानंतर ताबडतोब उमेदवारांसोबत बैठक घेऊन त्यांना निवडणूक खर्चासंदर्भात सर्व कायदेशीर तरतुदी व त्यांचे पालन न झाल्यास त्याचा होणारा परिणाम यांची जाणीव करून द्यावी. त्याचप्रमाणे यासंदर्भात भारत निवडणूक आयोगाच्या सूचना तसेच जिल्हा स्तरावर निवडणुकीवर होणाऱ्या खर्चासंदर्भात माहिती जनसंपर्क विभागाने उपलब्ध केलेली माहिती राष्ट्रीय तसेच स्थानिक वर्तमानपत्रे व मासिकांचे दर उपलब्ध करून द्यावेत. या बैठकांस सहायक खर्च निरीक्षक किंवा खर्च निरीक्षक हे उपस्थित राहतील.

**उमेदवारास द्यावयाचे प्रशिक्षण –** निवडणूक निर्णय अधिकारी आणि साहाय्यक खर्च निरीक्षक हे उमेदवारांसाठी सविस्तर प्रशिक्षण आयोजित करतील व आयोगाच्या यासंदर्भात **(पान २६ वर)**

**✷ भारत निवडणूक आयोग लेख्याच्या प्रकरणी कोणत्याही स्वरूपाच्या त्रुटीसंदर्भात संबधित उमेदवार ३ वर्षापर्यंत अनर्ह ठरवण्यासंदर्भात आदेश पारित करू शकतो हे विचारात घेता उमेदवाराने लेखे काळजीपूर्वक ठेवणे आवश्यक आहे.**







**जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचा आयोगाला सादर करावयाचा अहवाल –** राजकीय पक्षामार्फत होणारा खर्च हा जर उमेदवाराच्या संदर्भात नसेल तर तो उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट न करता त्यासंदर्भात निरीक्षण करून त्याची नोंद ठेवली जाईल.

जिल्हा निवडणूक अधिकारी उमेदवारनिहाय छाननी अहवाल व सर्व उमेदवारांबाबतचा एकत्रित संक्षिप्त अहवाल Annexure–२१ मध्ये मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे ७ दिवसांत सादर करतील.

✷ जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी सादर केलेला अहवाल खरा व योग्य आहे व त्यामध्ये खर्चाची कोणतीही रक्कम लपविण्यात आलेली नाही याबाबत छाननी करून त्याबाबतचा अहवाल जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी आपल्या अभिप्रायासह सादर करणे अपेक्षित आहे. खर्च विषयक निरीक्षक Annexure–५ मधील चौथा व अंतिम अहवाल त्यांच्या अभिप्रायासह आयोगाकडे सादर करतील.

✷ प्रत्येक उमेदवाराने निवडणूक निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर केलेला लेखा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी स्कॅन करून ३ दिवसांच्या आत संकेतस्थळावर प्रदर्शित केला जाईल. जिल्हा निवडणूक अधिकारी, छाननी अहवाल एएचड सॉफ्टवेअर मध्ये नोंदविला जाईल याची खात्री करतील. निवडणूक घोषित झाल्यापासून ३७ दिवसांच्या आत मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात लेखे आपल्या भाष्यासह सादर करतील.

✷ मुख्य निवडणूक अधिकारी त्यांच्याकडे प्राप्त झालेले जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडील अहवाल २ दिवसांच्या आत भारत निवडणूक आयोगाकडे सादर करतील.

✷ भारत निवडणूक आयोगाने आलेला प्रत्येक अहवाल तपासून त्यावर कोणती कार्यवाही करावयाची यावर निर्णय घ्यावयाचा आहे. जर उमेदवाराने लेखे वेळेत अथवा विशिष्ट पद्धतीने ठेवले नाहीत असा निष्कर्ष निघाल्यास अशा उमेदवारांना लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १०अन्वये अनर्ह का ठरवू नये अशी नोटीस जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत बजावली जाईल. त्यांच्यामार्फत उमेदवाराचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर अशा प्रकरणी अंतिम कार्यवाही करवाई केली जाईल.

संपर्क: (०२२) २२८५६६६७
ईमेल : ceo.maharashtra@eci.gov.in

❖ ❖

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र

# सुरक्षित आणि विश्वसनीय

लोकशाहीत लोकांनी आपला मतदानाचा हक्क अबाधित राखण्याची आणि मतदान प्रक्रियेत मतदारांनी योग्य उमेदवारांना निवडून देण्याची लढाई जुंपलेली असते. लोकसभा किंवा विधानसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असोत, त्यात मतदान हे गोपनीय स्वरूपाचे असते. त्या मतदान प्रक्रियेत महत्त्वाचा टप्पा म्हणजे मतदान केंद्रात जाऊन आपले मतदान करणे हा होय.

पस्तीस वर्षे शासनाची सेवा बजावताना मला लोकसभा आणि विधानसभेच्या सर्व निवडणुकांचे क्षेत्र अधिकारी म्हणून प्रत्यक्ष काम करावे लागले. त्यात पूर्वीच्या निवडणुकांमध्ये मतदानपेट्या व मतपत्रिका जबाबदारीने हाताळाव्या लागत. आता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र निवडणूक प्रणालीत आल्याने क्रांती होऊन निवडणुकीत बरीच सुसूत्रता व सुरक्षितता आल्याचे दिसून येते.

**मतदानात क्रांतिकारक पर्व**

पूर्वी एका मतदान केंद्रासाठी एक किंवा दोन मतदान पेट्या मिळत असत आणि मतदार तर हजारापेक्षा जास्तही असत. त्यांची बंद करण्याची कळ वरून बोट आत घालून बंद करावी लागे. हे फार जिकिरीचे होते. तसेच मतपेटीत मतपत्रिका कोंबून भराव्या लागत. त्या पत्र्याच्या पट्टीने कोंबताना काही फाटूनही जायच्या तर मतपत्रिकेवर मतदारांनी मारलेले शिक्के व्यवस्थित नसल्याने मत कुणाला दिले हा प्रश्न निर्माण व्हायचा. या दोन्हींमुळे बरीचशी मते बाद झाल्याने निवडणूक निकाल लावण्यात समस्या निर्माण व्हायच्या. मतदान प्रतिनिधी व अधिकाऱ्यांमध्ये संघर्ष निर्माण व्हायचा. निवडणूक अधिकाऱ्यांना मतपेट्या वाहून नेण्याचा तसेच मतपत्रिकांचा हिशोब देण्याचा प्रश्न उभा ठाकायचा. या सर्व समस्यांवर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामुळे तोडगा मिळाला.


**शिवाजी गावडे**

प्रथमत: १९८० मध्ये एम. बी. हनीफा यांनी पहिल्या भारतीय इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे संकल्पचित्र (डिझाइन) तयार केले. त्यात अंतर्गत सर्किटचा वापर करण्यात आला होता. त्याचे नाव इलेक्ट्रॉनिक ऑपरेटेड व्होट काऊंटिंग मशीन असे होते. हे मतदान यंत्र मद्रास (चेन्नई), त्रिची, कोईम्बतूर, सालेम, मदुराई व तिरुनवेली येथे प्रदर्शित करण्यात आले. या मतदान यंत्राचा १९८१ मध्ये केरळच्या उत्तर परावूर विधानसभेतील ५० मतदान केंद्रांवर वापर करण्यात आला होता.

**मतदानयंत्राचे तंत्रशास्त्र**

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र दोन भागात असून त्याचे मतदान विभाग (बॅलट युनिट) व नियंत्रण विभाग (कंट्रोल युनिट) असे दोन भाग आहेत. हे दोन्ही भाग स्वतंत्र पेटीत ठेवण्यात येत असल्याने सुरक्षित असतात. त्यांना मतदानाच्यावेळी केबलने जोडले जाते. एका मतदान विभागात १५ उमेदवारांचा समावेश असतो. एकंदरीत ६० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असल्यास चार मतदान विभाग एकमेकास जोडण्यात येतात. नको असलेल्या उमेदवारांची नावे दिसू नयेत म्हणून बटणे झाकून ठेवण्यात येतात. मात्र याकरिता एकच नियंत्रण विभाग वापरला जातो.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात मायक्रो संगणक प्रणाली व लार्जस्केल



**भारतातील सार्वत्रिक व राज्यांच्या काही निवडणुकांमध्ये १९९९ पासून इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रे वापरण्यास सुरुवात झाली. २००४ च्या सर्व निवडणुकांपासून ती वापरली जात आहेत. पूर्वीच्या मतपेट्या आणि मतपत्रिका वापरून मतदान करण्याच्या प्रणालीपेक्षा या मतदान यंत्रामुळे मतदान करणे व मतदानाचा निकाल लावणे या दोहोंमध्ये सुसूत्रता आली. वेळेमध्ये बचत झाली. काही काळ यंत्रातील मतदानाच्या सुरक्षिततेबाबत बऱ्याच राजकीय पक्षांनी शंका उपस्थित केल्या. २००९ च्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर सर्वोच्च न्यायालयाने मतदान यंत्रावर व्होटर व्हेरिफाईड पेपर ऑडिट ट्रायल लावण्याचा विचार करण्याचे आदेश दिले. त्या दृष्टीने निवडणूक आयोग त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत आहे.**

इंटेग्रेटेड चीप वापरली जाते. विशेष काढता येणाऱ्या बॅटरीवर ते चालविले जाते. हे मतदानयंत्र वापरावयास सोपे असून न बिघडणारे तसेच चुका न करणारे आहे. त्यात एकदा भरलेली माहिती त्यातील बॅटरी काढली तरी त्याच्या मेमरीत कायम राहते.

भारत निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोग सार्वजनिक क्षेत्रातील मे. भारत इलेक्ट्रॉनिक लि. बंगलोर व इलेक्ट्रॉनिक कार्पोरेशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने ही मतदान यंत्रे तयार करून घेतात.

बहुविध मतदान व बहुविध जागा असलेल्या निवडणुकांमध्ये अनेक उमेदवारांमधून एक किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवार निवडून देण्याकरिता मतदान घेण्यासाठी, हे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापरले जात असून ते विश्वसनीय आहे.

**मतदानयंत्राची कार्यप्रणाली**

मतदान विभाग (बॅलट युनिट) व नियंत्रण विभाग (कंट्रोल युनिट)



या दोघांसाठी वेगवेगळ्या पेट्या असतात व त्यावर दोघांचे समान क्रमांक लावलेले असतात. त्यांना विशिष्ट खटके असून ते दाबूनच त्या उघडल्या जातात. त्यांना परस्परांना जोडणारी केबल असते.

मतदान विभाग (बॅलट युनिट) हा मतदाराला आपले मत नोंदविण्यासाठी वापरला जातो. तो नियंत्रण विभागाला केबलने जोडल्यावर कार्यान्वित होतो. त्यावर मत देण्यासाठी यंत्र सुरू असल्याचा रेडी दिवा व बाजूला स्वीच पॅनल असते. यावर सोळा, सोळा बटणे असतात. सोळावे बटण मतदानासाठी वापरले जात नाही. यंत्राच्या पारदर्शक काचेखाली उमेदवाराचे नाव व चिन्ह असलेली मतपत्रिका असते. त्यानुसार उमेदवारापुढील बटण दाबून मतदान करता येते. एकापेक्षा जास्त मतदान विभाग वापरावयाचे असल्यास, कोणत्या मतदान विभागात कोणती मतपत्रिका जाईल हे स्पष्ट करून क्रमांक दिले जातात. बहुविध मतदान प्रक्रियेत बहुविध मतपत्रिकेसाठी वेगवेगळ्या मतदानाकरिता वेगवेगळ्या रंगाचे कागद वापरले जातात.

मतदान विभागाच्या वरील डाव्या बाजूस रेडी दिवा असतो. हा दिवा मतदाराला त्याचे मत देण्याकरिता मतदान अधिकारी नियंत्रण विभागावरील बॅलट हे बटण दाबतो तेव्हा हिरवा दिवा पेटतो. मतदाराने आपले मतदान केल्यावर तो बंद होतो. यावरून मतदान झाल्याचे सूचित होते.

नियंत्रण विभाग हा अत्यंत महत्त्वाचा भाग असून त्याचे नियंत्रण निवडणूक अधिकाऱ्याकडे असते. मतदान प्रक्रियेचे नियंत्रण करणाऱ्या या विभागाचे १) दर्शक विभाग, २) उमेदवाराचे नाव लावण्याचा विभाग, ३) निकाल विभाग व ४) मतदान विभाग असे चार विभाग असतात.

दर्शक विभागाचे ऑन आणि बिझी दिवे व डिस्प्ले विंडो पॅनल असे दोन विभाग असतात. उमेदवाराचे नाव लावण्याच्या विभागांतर्गत काढता येणाऱ्या बॅटरीचा कक्ष व उमेदवार लावणे या बटणाचा कक्ष असतो. तसेच या कक्षात काढता येणाऱ्या मेमरीचा भाग लावण्याची तरतूद असते. काढता येणाऱ्या मेमरीचा भाग मतदान यंत्राच्या सर्व भागाच्या कार्यवाहीसाठी असतो.

निकाल विभाग हा महत्त्वाचा भाग असून त्यात क्लोज बटन रिझल्ट -१ व रिझल्ट -२ अशी पिवळी बटणे तसेच क्लिअर हे पांढरे बटण असते. यांच्या वापराने उमेदवारांचे क्रमांक सुयोग्य करणे व मतदानाच्या निकालाच्या दिवशी निकाल दर्शविणे यासाठी उपयोग होतो.

नियंत्रण विभागाच्या मतदान विभागात दोन बटणे असून, करड्या रंगाचे टोटल बटण व मोठ्या करड्या रंगाचे बॅलट बटण असते. त्यातील टोटल बटणाने फक्त एकूण मतदान किती झाले त्याची संख्या वेळोवेळी घेता येते, तर बॅलट बटणाच्या नियंत्रणाने मतदान अधिकारी मतदारांना मतदानाची सूचना देतात. या नियंत्रण यंत्राच्या विभागाखाली मतदान यंत्राला केबल जोडण्याची सोय केलेली असते. तसेच मध्यभागी मतदान यंत्रे चालू बंद करण्याचे ऑन-ऑफ बटण दिलेले असते. या यंत्राच्या पुढील बाजूस ऑन लॅम्प व बिझी लॅम्प असे महत्त्वाचे दिवे असतात. ऑन लॅम्प पॉवर स्वीच ऑन झाल्यावर हिरवा दिवा पेटतो. त्यामुळे मतदान यंत्र वापराकरिता तयार झाल्याचा निर्देश मिळतो तर मतदान अधिकारी जेव्हा बॅलट बटण दाबतो तेव्हा बिझी लॅम्प लाल पेटतो व मतदाराने मतदान विभागातील त्याचे मतदान केल्यावर तो बंद होतो. त्यातून मतदाराने मत दिल्याची प्रक्रिया पूर्ण झाल्याचे दिसून येते.

**मतदानयंत्रावर मतदान :** मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर

## मतदानयंत्राची वैशिष्ट्ये

**विशिष्ट अनुक्रमांक :** प्रत्येक मतदान यंत्राच्या दोन्ही भागांना व पेट्यांना अनुक्रमांक दिले असून ते यंत्राच्या मागे असलेल्या बारकोड व लेसरने दर्शवलेले असतात. असे क्रमांक काढता येणाऱ्या मेमरीवरसुध्दा असतात.

**वास्तव वेळ दर्शविणारे घड्याळ :** प्रत्यक्षातली वेळ व दिनांक दर्शविणारे घड्याळ यात वापरलेले असून पॉवर ऑन आणि टोटल ही बटणे दाबताच ते दिनांक व वेळ दर्शविते. कोणतीही चुकीची क्रिया झाल्यास ते क्लॉक एरर असे दर्शवते.

**वेळेची नोंद व शिक्का :** नवीन मतदानयंत्रात वेळेची नोंद करण्याची व शिक्का उमटविण्याची तरतूद केली आहे. तसेच अल्फा न्यूमरिक डिस्प्ले दर्शवण्याची तरतूद केली आहे.

**प्रभाग व मतदान केंद्र क्रमांक :** मतदानयंत्रात प्रभाग क्रमांक व मतदान केंद्र क्रमांक दर्शवण्याची तरतूद असल्याने यंत्र कोणत्या केंद्राचे व कोणत्या प्रभागासाठी वापरले ते समजण्यास सोपे जाते.

**बिघाड शोधणे :** नवीन मतदानयंत्रात नियंत्रण विभाग व मतदान विभाग यातील झालेले बिघाड शोधून काढण्याची सुविधा आहे.

**प्रिंटेड सर्किट व स्थिरता :** नवीन यंत्राच्या तळाला प्रिंटेड सर्किट बोर्ड लावलेला आहे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने यंत्र जागेवर व्यवस्थित स्थिर राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

**पॉवर दर्शवणे :** बॅटरीची पॉवर किती आहे याची स्थिती दर्शविण्याची सोय यंत्रात असून बॅटरी संपल्यास चेंज बॅटरी असे दाखवले जाते.

**मुद्रण :** आवश्यकता असल्यास मतदानाचा निकाल मुद्रित होण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**ब्रेल लिपी :** अंध व्यक्तींकरिता मतदान विभागावर मतपत्रिका ओळखता यावी म्हणून ब्रेल लिपीची सोय करण्यात आली आहे.

**विश्वासार्हता भंग न करणारी ओळखीची खूणचिठ्ठी :** इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्राचा मतदान विभाग, नियंत्रण विभाग व काढता येणाऱ्या मेमरीवर विश्वासार्हता भंग न करणाऱ्या ओळखीच्या खूणचिठ्ठ्या वेगवेगळ्या ठिकाणी लावल्या जातात. त्या खूणचिठ्ठ्यांमुळे या यंत्राच्या सर्व भागांची विश्वासार्ह माहिती मिळते व त्यांचा यंत्राच्या जुळणीसाठी किंवा तपासासाठी कोणत्याही वेळी कोणत्याही ठिकाणी वापर होऊ शकतो.

**नकारात्मक मतदानाचे बटण :** भारतीय राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नैतिक अधिकाराची जपणूक होण्याकरिता, उमेदवारांबद्दल नाखूश असलेल्या मतदारांना आपले नकाराधिकाराचे मत नोंदवण्याची तरतूद, आता मतदान विभागाच्या शेवटच्या बटणात करण्यात आली आहे.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणण्यापूर्वी त्याची मतदान अधिकाऱ्यांकडून उमेदवाराचे नाव व क्रमांक याची मांडणी केलेली असते. त्याचा मतदान विभाग व नियंत्रण विभाग यांची केबलने जोडणी करून तपासणी केली जाते. त्याची बॅटरी पॉवर चालू करून प्रत्यक्ष मतदानापूर्वी मतदान प्रतिनिधींना अभिरूप मतदान करून मतदानयंत्र योग्यरीत्या चालू असल्याची व योग्य त्या उमेदवाराला मत देत असल्याची खात्री करून घेण्यात येते. पुन्हा ते यंत्र क्लीअर बटण दाबून मोकळे करून मतदानासाठी तयार केले जाते. तेव्हा त्याचे महत्त्वाचे भाग कागदी मोहोरने बंदिस्त केले जाऊन त्यावर विश्वासार्ह खूणचिठ्ठ्या लावल्या जातात.

जेव्हा मतदार मतदानकेंद्रात येतो तेव्हा त्याचे नाव पुकारून मतदारयादीत नोंद करून मतदान चिठ्ठी दिली जाते. ती नियंत्रण विभाग हाताळणाऱ्या मतदान अधिकाऱ्याला दिल्यावर तो त्याला मतदान कक्षात जावयास सांगतो. तत्पूर्वी मतदान अधिकारी नियंत्रण विभागावरील मोठे बॅलट हे बटण दाबतो. तेव्हा त्यावरील बिझी हा लाल दिवा पेटतो, जेणेकरून यंत्र मतदानासाठी तयार आहे. हे समजते. मतदान कक्षात जाऊन मतदार त्याच्या पसंतीनुसार मतदान विभागावरील उमेदवाराचे नाव व चिन्ह पाहून त्यापुढील बटण दाबून आपले मत नोंदवितो. तेव्हा बीप-बीप असा आवाज होऊन मत नोंदविले जाते. त्यावेळी उमेदवारासमोरील लाल दिवा पेटतो आणि हिरवा रेडी दिवा बंद होतो. नियंत्रण विभागावरील लाल दिवा बंद होतो. मतदाराला कोणत्याही उमेदवाराला मत द्यायचे नसल्यास नाकारण्याचा हक्क असल्यामुळे वर दिलेल्या पर्यायांपैकी कोणताही नाही या समोरील शेवटच्या बटणावर मतदान करता येते. अशा प्रकारे मत देण्याची प्रक्रिया पूर्ण होते. प्रत्येक मतदाराच्या वेळी या प्रक्रियेचा अवलंब केला जातो.

मतदानाची सुरुवात व शेवट यादरम्यानच्या काळात वेळोवेळी झालेल्या मतदानाची फक्त एकूण आकडेवारी पाहण्यासाठी, तसेच मुख्य निवडणूक केंद्राकडे पाठवण्यासाठी नियंत्रण विभागातील टोटल हे बटण दाबून आकडेवारी पाहिली जाते.

मतदान समाप्तीनंतर नियंत्रण विभागात रिझल्ट या विभागातील क्लोज बटन बंद केले जाते. नियंत्रण विभागातील बॅटरीचे बटण बंद करून दोन्ही केबलने जोडलेले भाग वेगळे केले जातात. त्यांना सुरक्षिततेच्या व विश्वासार्हतेच्या दृष्टीने आवश्यक खूणचिठ्ठ्या व लाख लावून मोहोरबंद करण्यात येऊन पेट्यांमध्ये बंद केले जाते. त्यांना पुन्हा मोहोरबंद केले जाते आणि मतमोजणीकरिता सुरक्षितस्थळी रवाना केले जाते.

❖ ❖

## खर्च करा, पण नियमाला धरून

(पान २३ वरून)

बदललेल्या सूचनांचा तपशील अवगत करून देतील.

**राजकीय पक्षाची लेख्यांसदर्भातील कर्तव्य**

✷ निवडणूक जाहीर झाल्यानंतर ३ दिवसांच्या आत राजकीय पक्षांना स्टार प्रचारकांची यादी भारत निवडणूक आयोगास व मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयास सादर करावी लागेल.

✷ राजकीय पक्षांनी निवडणुकीसाठी केलेला खर्च लोकसभा निवडणुकांसदर्भात ९० दिवसांच्या आत तर विधानसभा निवडणुकांसदर्भात ७५ दिवसांच्या आत भारत निवडणूक आयोगाकडे सादर करावा लागेल. यासंदर्भात आयोगाच्या दिनांक २१ जानेवारी २०१३ च्या पत्रामध्ये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

✷ **मुख्य निवडणूक अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत Ethical Voting Campaign**

भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ -ब संदर्भात मतदारांमध्ये जागृती आणून मतदारांना प्रलोभनासंदर्भात १ वर्ष कारावासाची शिक्षा होऊ शकते याची जाणीव करून देणे तसेच या संदर्भात समाजातील सर्व थरात जनजागृती करणे, नागरिकांची संकल्पचित्रे भरून घेणे या अनुषंगाने निवडणूक यंत्रणेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहेत.

(संक्षिप्त स्वरूपात व स्वैर रूपाने तरतुदींचा ऊहापोह करण्यात आला आहे. मात्र मराठी भाषांतरणात कोणताही संदेह निर्माण झाल्यास आयोगाच्या मूळ सूचनांनुसार अंतिम अर्थ लावण्यात येईल.)

## मतदारयादीमध्ये नाव नोंदणीसाठी नमुने

लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीसाठी एकच मतदारयादी असते. या यादीमध्ये नाव नोंदणी, दुरुस्ती अथवा आक्षेप घेण्यासाठी नागरीकांनी पुढील विहित नमुन्यांमध्ये अर्ज करणे आवश्यक आहे :- ■ नमुना ६ : मतदार म्हणून नव्याने नाव नोंदवण्यासाठी ■ नमुना ६- अ : अनिवासी भारतीयांना मतदार यादीत नाव नोंदवावयाचे असल्यास ■ नमुना ७ : आपले नाव मतदारयादीतून कमी करावयाचे असल्यास ■ नमुना ८ : आपल्या सध्याच्या ओळखपत्रात काही दुरुस्ती करावयाची असल्यास ■ नमुना ८ अ : विधानसभा मतदार संघांतर्गत आपला पत्ता बदलला असल्यास **टीप :** मतदारयादीतून काही कारणास्तव आपले नाव वगळले गेले असल्यास नमूना क्र. ६ नव्याने भरावा. महाराष्ट्र विधान परिषदेच्या सदस्यत्वासाठी स्थानिक प्राधिकरण, विधानसभा सदस्य, राज्यपाल नामनियुक्त तसेच पदवीधर आणि शिक्षक यांच्या माध्यमातून निवडणूक घेतली जाते. त्यापैकी पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठी होणाऱ्या निवडणुकीकरिता मतदार म्हणून पात्र होण्यासाठी नागरिकांनी पुढील नमुन्यामध्ये अर्ज करणे आवश्यक आहे :- ■ नमुना १८-पदवीधर मतदारयादीमध्ये नाव नोंदवण्यासाठी ■ नमुना १९ - शिक्षक मतदार यादीमध्ये नाव नोंदवण्यासाठी उपरोक्त सर्व नमुने हे मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या https://www.ceo.maharashtra.gov.in किंवा https://www.ceomaharashtra.nic.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत.






**सार्वत्रिक निवडणुका या निर्भयपणे आणि पारदर्शकपणे होण्यासाठी निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहिता घोषित केली आहे. ही आदर्श आचारसंहिता स्वयंस्पष्ट अशी आहे. निवडणूक प्रक्रियेच्या कालावधीत कोणत्या बाबी करू नयेत आणि कोणत्या बाबी कराव्यात याविषयी या आचारसंहितेत विविध मुद्दे समाविष्ट करण्यात आले आहेत. यातील काही महत्त्वाचे मुद्दे या ठिकाणी देण्यात आले आहेत. हे मुद्दे निवडणूक प्रक्रियेत समाविष्ट होणाऱ्या सर्वांसाठीच उपयुक्त आहेत.**




✡ निवडणूक आयोगाद्वारे निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अमलात येऊन आणि निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू राहील.

✡ मंत्री महोदय त्यांच्या शासकीय भेटीची निवडणूक प्रचार कार्याशी सांगड घालू शकत नाही आणि निवडणूक प्रचार कार्यादरम्यान शासकीय यंत्रणेचा किंवा कर्मचारी वर्गाचासुद्धा वापर करू शकत नाही.



✡ कोणताही पक्ष किंवा उमेदवार त्याच्या हितसंबंधाला मदत व्हावी म्हणून सरकारी विमाने, वाहने इत्यादींसह कोणत्याही परिवहनाचा वापर करणार नाही.

✡ निवडणूक घेण्याशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असलेले सर्व अधिकारी/कर्मचारी यांची बदली किंवा नियुक्ती करण्यावर संपूर्णपणे बंदी असेल. जर एखाद्या अधिकाऱ्याची कोणतीही बदली किंवा नियुक्ती करण्याची आवश्यकता असेल तर आयोगाची पूर्वमान्यता मिळवणे आवश्यक असेल.




✡ समजा निवडणूक कामाशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांची शासनाने आचारसंहिता अमलात येण्यापूर्वी बदली केलेली आहे आणि त्याने नवीन ठिकाणी कार्यभार घेतलेला नाही. असा अधिकारी आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर नवीन ठिकाणचा पदभार घेऊ शकत नाही. जैसे थे स्थिती ठेवण्यात येईल.

✡ कोणताही मंत्री मग तो केंद्रीय मंत्री असो किंवा राज्याचा मंत्री असो, शासकीय चर्चेसाठी मतदारसंघाच्या किंवा राज्याच्या कोणत्याही निवडणुकीशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्याला कोठेही बोलावू शकत नाही.




जर केंद्रीय मंत्री निव्वळ कार्यालयीन कामासाठी दिल्लीच्या बाहेर प्रवास करीत असेल व लोकहितास्तव तो टाळू शकत नसेल तर मंत्रालय विभागाच्या संबंधित सचिवांकडून तो या अर्थाचे प्रमाणित करणारे व पत्र संबंधित राज्याच्या मुख्य सचिवांकडे पाठवील व त्याची एक प्रत निवडणूक आयोगाला पाठवील.

✡ मतदारसंघात मंत्र्यांना त्यांच्या खाजगी भेटीत कोणतेही शासकीय अधिकाऱ्याने भेटणे हे संबद्ध सेवा नियमाखालील

## वाहनांचा वापर




✡ मंत्र्यांना केवळ शासकीय कामासाठी त्यांच्या शासकीय निवासस्थानापासून त्यांच्या कार्यालयापर्यंत प्रवास करण्यासाठी शासकीय वाहनाचा वापर करण्याचा हक्क आहे. परंतु अशा प्रवासाची निवडणुकीत प्रचारकार्याशी किंवा कोणत्याही राजकीय कामाशी सांगड घातली जाणार नाही.

✡ मंत्री किंवा कोणत्याही इतर राजकीय कार्याधिकारी निवडणुकीच्या काळामध्ये पायलट कार, कोणताही रंग असलेला संकेतदीप असलेली मोटारगाडी किंवा कोणत्याही प्रकारचा सायरन (Siren) लावलेली मोटारगाडी खाजगी किंवा कार्यालयीन कामकाजासाठी, जरी राज्य प्रशासनाने अशा भेटीसाठी त्याच्यासोबत त्याला सुरक्षेसाठी सुरक्षा पुरवलेली असली तरीही, ती वापरण्याची मुभा नाही. शासनाच्या मालकीचे वाहन असो किंवा खाजगी मालकीचे असो तेथेही ही बंदी लागू आहे.





✡ आचारसंहितेच्या तरतुदींचा ज्यांनी भंग केला आहे, अशा मंत्र्यांकडून शासकीय वाहनांच्या सुविधा मुख्य निवडणूक अधिकारी काढून घेऊ शकतात. आपल्या शासकीय पदाचा गैरवापर करणाऱ्या मंत्र्यांकडून झालेल्या खर्चाची वसुलीदेखील मुख्य निवडणूक अधिकारी करतील.

गैरवर्तनाबद्दल दोषी ठरेल आणि लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५१ च्या कलम १२९ (१) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे असे काही त्या शासकीय अधिकाऱ्याने केले असेल तर त्या कलमाच्या सांविधानिक तरतुदीचादेखील त्याने भंग केला आहे असा अधिकचा विचारदेखील केला जाईल आणि त्याखाली तरतूद केलेल्या शिक्षार्थ कारवाईस देखील पात्र असेल.



✡ सत्ताधारी पक्षाच्या छापील माहितीपत्रकास मदत करण्याच्या दृष्टीने त्यांच्या कामगिरीच्या संबंधात सार्वजनिक राजकोषाच्या खर्चाने जाहिरात देण्यास निर्बंध आहे. छापील आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये, सार्वजनिक राजकोषाच्या खर्चाने, पक्षाच्या कामगिरींच्या संबंधात जाहिरात देण्यास आणि निवडणुकीच्या कालावधीत शासकीय प्रसिद्धी माध्यमाचा गैरवापर करण्यास प्रतिबंध आहे.




✡ सार्वजनिक राजकोषाच्या खर्चाने केंद्र / राज्य शासनातील सत्ताधारी पक्षाची (पक्षांची) कामगिरी, होर्डिंग/जाहिरात इत्यादींवर दाखविता येणार नाही. लावण्यात आलेली अशी सर्व होर्डिंग्ज, जाहिराती इत्यादी, संबंधित प्राधिकाऱ्यांकडून तत्काळ काढून टाकण्यात येतील. याशिवाय, सार्वजनिक राजकोषाच्या खर्चाने वर्तमानपत्रांमध्ये आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांसह इतर माध्यमांमध्ये जाहिराती देण्यात येऊ नयेत.

**योजना/कार्यक्रम यांच्या संबंधात मार्गदर्शकतत्त्वे**

**इंदिरा आवास योजना :** इंदिरा आवास योजनेंतर्गत घरांची योजना मंजूर झालेल्या आणि बांधकाम सुरू झालेल्या लाभार्थींना मानकांनुसार साहाय्य करण्यात येईल. निवडणुका पूर्ण होईपर्यंत, कोणतीही नवीन बांधकामे हाती घेण्यात येणार नाहीत किंवा नवीन लाभार्थींना साहाय्य मंजूर करण्यात येणार नाही.

**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना :** चालू असलेली कामे चालू ठेवता येतील आणि अशा कामांकरिता ठरवून दिलेला निधी देता येईल. कोणत्याही पंचायतीच्या बाबतीत, जेथे सर्व चालू कामे पूर्ण झालेली असतील आणि जेथे नवीन वेतन रोजगाराची कामे हाती घेण्याची आवश्यकता असेल आणि जेथे ग्रामविकास मंत्रालयाने पंचायतींना थेट निधी दिला असेल तेथे, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या पूर्व संमतीने चालू वर्षाकरिता मान्यताप्राप्त वार्षिक कृती योजनेमधून नवीन कामे सुरू करता येतील. इतर निधींमधून कोणतीही नवीन कामे सुरू करण्यात येणार नाहीत.

**स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना :** ज्या बचतगटांना त्यांच्या अर्थसाहाय्याचा/अनुदानाचा भाग मिळाला आहे केवळ त्यांना उर्वरित हप्ते देण्यात येतील. निवडणुका पूर्ण होईपर्यंत, कोणत्याही नवीन वैयक्तिक लाभार्थींना किंवा स्वयंसाहाय्यता बचतगटांना वित्तीय

## निधी/अनुदाने




मंत्री आणि इतर प्राधिकारी निवडणुका घोषित झाल्यापासून स्वेच्छाधीन निधीतून अनुदाने/रकमा मंजूर करणार नाहीत.



निवडणूक घोषित होण्यापूर्वी कार्यादेश देण्यात आला असेल, परंतु त्या क्षेत्रामध्ये प्रत्यक्षपणे काम सुरू करण्यात आलेले नसेल त्या संबंधात, काम सुरू करण्यात येणार नाही. त्या क्षेत्रामध्ये जर काम प्रत्यक्षपणे सुरू झाले असेल तर ते चालू ठेवता येईल.




निधीसंबंधित विभागाच्या वैयक्तिक खातेवही लेखामध्ये ठेवता येईल किंवा निवडणुका पूर्ण होईपर्यंत तो देण्यास स्थगिती देण्यात येईल.

जेथे निवडणूक चालू आहे अशा कोणत्याही क्षेत्रात निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत कोणत्याही योजनेसाठी संसद सदस्य / विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य यांच्या अधीन असलेल्या स्थानिक क्षेत्र विकास निधीमधून कोणताही नवीन निधी देण्यात येणार नाही.



साहाय्य देण्यात येणार नाही.

**राष्ट्रीय कामाच्या मोबदल्यात अन्न कार्यक्रम :** ज्या जिल्ह्यांमध्ये निवडणुका घोषित झालेल्या नाहीत अशा जिल्ह्यांमध्ये चालू असलेली जुनी कामे करण्यास आणि नवीन कामांना मंजुरी देण्यास कोणताही आक्षेप नाही. जेथे निवडणुका घोषित करण्यात आल्या असतील आणि चालू असतील त्या जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्षात यापूर्वीच सुरू झालेली कामेच केवळ हाती घेण्यात येतील. परंतु दिलेल्या वेळेत अशा कामांच्या अंमलबजावणीकरिता देण्यात आलेली शिल्लक आगाऊ रक्कम ही ४५ दिवसांकरिता असलेल्या कामाच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम :** ग्रामविकास मंत्रालय, निवडणुका घोषित झाल्यानंतर ज्या जिल्ह्यांमध्ये त्या घेण्यात येणार आहेत त्या जिल्ह्यांच्या संख्येत वाढ करणार नाही. निवडणुका घोषित झाल्यानंतर, जॉबकार्डधारकांना, त्यांची कामाची मागणी असेल तर, चालू कामामध्ये त्यांना रोजगार पुरवण्यात येईल. चालू कामामध्ये कोणताही रोजगार पुरवता आला नाही, तर त्याबाबतीत सक्षम प्राधिकाऱ्यांस संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना मान्यता दिलेल्या मागे पडलेल्या प्रकल्पांमध्ये आणि त्यांना या वस्तुस्थितीची माहिती देऊन, नवीन काम (कामे) सुरू करता येतील. चालू कामांमध्ये रोजगार देण्यात येऊ शकेपर्यंत, सक्षम प्राधिकाऱ्याकडून कोणतेही नवीन काम सुरू करण्यात येणार नाही. कोणताही मागे पडलेला प्रकल्प उपलब्ध नसेल किंवा मागे पडलेल्या प्रकल्पामधील उपलब्ध असलेली सर्व कामे पूर्णपणे संपविण्यात आली असतील तर, संबंधित सक्षम प्राधिकारी, संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यामार्फत मान्यतेसाठी आयोगाकडे प्रकरण निर्देशित करील. सक्षम प्राधिकारी चालू प्रकल्पामध्ये, जॉबकार्डधारकांना, रोजगार देण्यात येऊ शकला नाही म्हणून, नवीन कामास मंजुरी देण्यात आली अशा अर्थाचे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला एक प्रमाणपत्रदेखील देईल.

✡ कोणताही मंत्री व अन्य कोणताही प्राधिकारी कोणत्याही स्वरूपातील वित्तीय अनुदाने किंवा त्याची वचने देणार नाही, किंवा (नागरी कामांव्यतिरिक्त) कोणत्याही प्रकारच्या प्रकल्पांच्या किंवा




योजनांच्या कोनशिला बसवणार नाही. किंवा रस्त्यांचे बांधकाम, पिण्याच्या पाण्याची सुविधा, इत्यादी पुरविण्याचे किंवा शासन, सार्वजनिक उपक्रम इत्यादीमध्ये कोणत्याही एतदर्थ नियुक्त्या करण्याचे वचन देणार नाही. अशा प्रकरणात वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यास, कोणत्याही राजकीय कार्यकर्त्यांचा अंतर्भाव न करता कोनशिला बसविता येईल.

✡ विशिष्ट योजनेसाठी किंवा यापूर्वी मंजूर करण्यात




आलेल्या योजनेसाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली नाही. निवडणूक कालावधीमध्ये अशा योजनेचे उद्‌घाटन करण्यास /घोषित करण्यात मनाई आहे.

**५ एप्रिल रोजी बाबू जगजीवनराम आणि १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती सोहळा राज्याचा कार्यक्रम म्हणून घेता येऊ शकेल. परंतु त्याचा राजकीय प्रचारासाठी किंवा शासनाची सार्वजनिक कामगिरी ठळकपणे निदर्शनास आणण्यासाठी निमित्त म्हणून वापर करू नये. तसेच त्यात डामडौल असणार नाही आणि अशा बैठकीत कोणताही राजकीय कार्यअधिकारी भाषण करणार नाही. वरील निर्बंध, अशा प्रकारच्या इतर सर्व कार्यक्रमांसाठी तितकाच लागू राहील.**

✡ क्षेत्रात प्रत्यक्षपणे काम चालू झालेले नसेल तर, ज्या कामाकरिता यापूर्वी कार्यादेश देण्यात आलेला असेल असे कोणतेही काम सुरू करण्यात येईल. तथापि, एखादे काम प्रत्यक्षात सुरू झाले असेल तर ते चालू ठेवता येऊ शकेल.

✡ दुष्काळ, पूर, घातक साथ, इतर नैसर्गिक आपत्ती यांची झळ पोचलेल्या व्यक्तींना किंवा ज्येष्ठ नागरिक, विकलांग व्यक्ती




यांच्याकरिता कल्याणकारी उपाययोजना इत्यादींसाठी साहाय्य देणे यासारख्या आणीबाणीचा किंवा अनपेक्षित आपत्तींचा सामना करण्यासाठी शासनास, आयोगाची पूर्वमान्यता मिळवल्यानंतर उपाययोजना करता येईल आणि सर्व दिखाऊ कामे कठोरपणे टाळण्यात येतील अशा कल्याणकारी उपाययोजना किंवा साहाय्य आणि पुनर्वसन कामे ही कोणत्याही अंतस्थ हेतूने सत्तेवर असणाऱ्या शासनाकडून हाती घेण्यात आली आहेत असे कोणतेही मत देण्यात येणार नाही.

✡ महसूल संकल्पनाचा आढावा घेण्यासाठी आणि वार्षिक प्रारूप अंदाजपत्रक इत्यादी तयार करण्यासाठी महानगरपालिकेची, नगरपंचायतीची, नगरक्षेत्र समिती आदींची बैठक बोलविता येऊ शकते. परंतु अशा बैठका दैनंदिन प्रशासनाशी संबंधित असणाऱ्या नित्याच्या स्वरूपाच्या बाबींवरच केवळ घेता येतील. तथापि, त्या बैठका धोरणे व कार्यक्रम याच्याशी संबंधित असणाऱ्या बाबींवर घेता येणार नाहीत.

✡ स्वातंत्र्यदिनाच्या/गणतंत्र दिनाच्या संबंधात कवी संमेलन, मुशायरा किंवा इतर सांस्कृतिक कार्यक्रम



आयोजित करता येऊ शकेल. केंद्रीय मंत्री/मुख्यमंत्री/राज्यांमधील मंत्री व इतर



राजकीय कार्याधिकारी कार्यक्रमाला उपस्थित राहू शकतात. तथापि, याप्रसंगी सत्ताधारी पक्षाची कामगिरी व ठळक वैशिष्ट्ये दर्शवणारी राजकीय भाषणे करण्यात येणार नाहीत. याची खात्री करून घेण्यात येईल.

✡ निवडणूक आयोगाकडून ना –हरकत/मान्यता न घेता, ज्या परिपूर्ण नाहीत अशा बाबींचा निर्देश करणाऱ्या स्पष्टीकरणात्मक यादीवर शासन कार्यवाही व कृती करू शकेल.

✡ परंतु सत्ताधारी पक्षाच्या बाजूने, मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या दृष्टीनेच केवळ ती करण्यात येत आहे, अशी छाप पाडण्यात येणार नाही किंवा प्रभाव निर्माण करण्यात येणार नाही. याशिवाय, जाहिरांतीच्या बाबतीत, मंत्र्याचे/राजकीय कार्याधिकाऱ्याचे छायाचित्र, त्यात समाविष्ट करण्यात येणार नाही.

✡ कोणताही पक्ष किंवा उमेदवार हा निवडणूक प्रचार मोहिमेदरम्यान ज्यामुळे विद्यमान मतभेद अधिक वाढतील किंवा परस्परांमध्ये द्वेष निर्माण होईल किंवा विविध जाती व समाज



✡ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात येण्यासाठी परवानगी देण्यात आलेल्या वाहनांची कमाल मर्यादा ३ इतकी निर्बंधित केलेली आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात प्रवेश करण्यासाठी परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तींची कमाल संख्या ५ इतकी (उमेदवारासह) मर्यादित करण्यात आली आहे.

यांच्यामध्ये धार्मिक किंवा भाषिक तणाव निर्माण होईल अशा कोणत्याही कार्यक्रमात सहभागी होणार नाही. तसेच जेव्हा इतर राजकीय पक्षांवर टीका करण्यात येईल तेव्हा ती टीका त्यांची धोरणे व कार्यक्रम, मागील अभिलेख व काम एवढ्यापर्यंतच मर्यादित असेल, पक्षांनी व उमेदवारांनी इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कार्यक्रमांशी संबंधित नसलेल्या खाजगी जीवनाच्या सर्व बाबतीतील टीकेपासून अलिप्त राहावे. खरे किंवा खोटे यांची शहानिशा न केलेले आरोप किंवा विपर्यास होईल, अशारीतीने इतर पक्षांवर किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांवर टीका करणे टाळावे.

✡ उमेदवार, त्याचा निवडणूक प्रतिनिधी, एक प्रस्तावक आणि इतर कोणत्याही व्यक्तीने नव्हे तर उमेदवाराने यथोचितरीत्या लेखी स्वरूपात प्राधिकृत केलेली एक इतर व्यक्ती (जी वकील असू शकेल) यांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळी उपस्थित राहता येईल. (संदर्भ : लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यांचे कलम ३६ (१)

✡ ज्यांना सुरक्षा दिलेली आहे अशा व्यक्तींच्या संबंधात, विशिष्ट व्यक्तींसाठी, जेथे गुप्तवार्ता प्राधिकाऱ्यासह सुरक्षा अभिकरणास अशा वापरासाठी विहित करण्यात आले आहे, अशा सर्व प्रकरणांमध्ये, राज्याच्या मालकीच्या एका बुलेटप्रूफ वाहनाचा वापर करण्यास परवानगी देण्यात येईल.




सुरक्षा अभिकरणांनी तसे विनिर्देशपूर्वक विहित केले असल्याखेरीज, राखीव असणाऱ्या अनेक मोटारगाड्यांच्या वापरास परवानगी देण्यात येणार नाही. जेथे अशा बुलेटप्रूफ वाहनांचा वापर विनिर्दिष्ट केलेला असेल तेथे अशी बुलेटप्रूफ वाहने चालविण्याचा खर्च त्या विशिष्ट व्यक्तीलाच सोसावा लागेल. पथदर्शक, संरक्षक वाहने इत्यादींचा समावेश असणाऱ्या वाहनांच्या ताफ्यासोबतच्या वाहनांची संख्या ही काटेकोरपणे सुरक्षा प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनांनुसार असेल आणि ती संख्या कोणत्याही परिस्थितीत त्याहून अधिक असणार नाही. अशी सर्व वाहने मग ती शासनाच्या मालकीची असोत किंवा भाड्याने घेतलेली असोत, चालविण्याचा खर्च राज्य शासनाकडून भागविण्यात येईल. हे निर्बंध पंतप्रधानांना लागू नाहीत कारण त्यांच्या सुरक्षाविषयक गरजांचे शासनाच्या ब्ल्यू बुकद्वारे नियमन केले जाते.

✡ उमेदवार निवडणूक प्रचाराच्या प्रयोजनार्थ कितीही वाहने (दुचाकीसह सर्व यंत्रित/मोटारयुक्त वाहने) चालवू शकतो परंतु अशी वाहने चालविण्यासाठी त्याने निवडणूक निर्णय



अधिकाऱ्यांची पूर्वमान्यता घेतली पाहिजे आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेला मूळ परवाना (फोटोकॉपी नव्हे) वाहनाच्या विंडोस्क्रीनवर ठळकपणे लावलाच पाहिजे. परवान्यावर वाहनाचा क्रमांक व ज्या उमेदवाराच्या नावे परवाना दिला आहे अशा उमेदवाराचे नाव असले पाहिजे.

✡ एखाद्या उमेदवाराच्या नावे निवडणूक प्रचारासाठी ज्या वाहनांची परवानगी घेतलेली आहे ते वाहन दुसऱ्या उमेदवारांकडून निवडणूक प्रचारासाठी वापरले जाऊ शकत नाही. दुसऱ्या उमेदवाराने निवडणूक प्रचारासाठी अशा वाहनाचा वापर केल्यास तो दंड भारतीय संहितेच्या कलम १७१ एच अन्वये कारवाईस पात्र असेल.

✡ जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून परवाना मिळाल्याशिवाय निवडणुकीच्या प्रचारकार्याच्या प्रयोजनांसाठी वाहन वापरले जाऊ शकत नाही. उमेदवाराने प्रचारासाठी वापरलेले असे वाहन अनधिकृत असल्याचे मानण्यात येईल. तो भारतीय दंड संहितेच्या प्रकरण नऊ-ए च्या दंडनीय तरतूदीनुसार कारवाईस पात्र असल्याने ते वाहन निवडणुकीच्या प्रचारकार्यातून तात्काळ बाहेर काढण्यात येऊन ते पुढील प्रचारकार्यासाठी वापरण्यात येणार नाही.

✡ स्थानिक कायदा, उपविधी अन्वये खाजगी जागा/मालमत्ता यावरील भितींवर लिहिणे आणि भित्तीपत्रके चिकटविणे प्रचारफलक (होर्डिंग्स), कापडी फलक इत्यादी लावण्यासाठी अनुज्ञेय असेल तर उमेदवाराने मालमत्तेच्या जागांच्या मालकांकडून लेखी पूर्वपरवानगी मिळविणे आवश्यक आहे. अशा परवानगीची छायाप्रत/प्रती निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला किंवा या प्रयोजनासाठी त्याने




**विश्रामगृहे, डाकबंगले किंवा इतर शासकीय जागा सत्ताधारी पक्षाची किंवा त्यांच्या उमेदवारांची मक्तेदारी असणार नाही. अशा जागेचा इतर पक्षांना व उमेदवारांना वापर करता येईल. परंतु कोणत्याही पक्षाला किंवा उमेदवाराला तिचा निवडणूक प्रचार कार्यालय म्हणून वापर करता येणार नाही. तसेच पुढील गोष्टींची सुनिश्चिती करण्यात येईल**

✡ विश्रामभवन/डाकबंगले हे केवळ तात्पुरत्या मुक्कामासाठी (भोजन व निवास) असल्यामुळे कोणत्याही पदाधिकाऱ्यांना मार्गस्थ असताना विश्रामभवनाचा, डाकबंगल्याचा त्यांचे निवडणूक प्रचार कार्यालय म्हणून वापर करता येणार नाही.

✡ राजकीय पक्षाच्या सदस्यांना शासनाच्या मालकीच्या विश्रामगृह इत्यादीमधील जागांमध्ये नैमित्तिक सभादेखील घेता येणार नाहीत आणि त्याचा कोणताही भंग झाल्यास तो आदर्श अचारसंहितेचा भंग झाला आहे, असे समजण्यात येईल.

✡ विश्रामगृहामध्ये निवासासाठी जागा दिलेल्या व्यक्तीची ने-आण करण्यासाठी असलेल्या वाहनालाच केवळ प्रवेशास मुभा असेल आणि अशा व्यक्तींकडून वापरण्यात येणाऱ्या दोनापेक्षा अधिक वाहनांना विश्रामगृहाच्या आवारात प्रवेशास मुभा असणार नाही.

✡ कोणत्याही एका व्यक्तीला ४८ तासापेक्षा अधिक कालावधीसाठी खोल्या उपलब्ध करून देता येणार नाहीत. कोणत्याही विशिष्ट क्षेत्रात मतदान समाप्त होण्यापूर्वी ४८ तास, मतदान किंवा फेरमतदान पूर्ण होईपर्यंत अशा खोल्या उपलब्ध करून देणे बंद असेल.




✡ मंदिर, मशीद, चर्च, गुरुद्वारा यासारखी धार्मिक ठिकाणे किंवा पूजेची इतर ठिकाणे निवडणूक प्रचारासाठी चर्चापीठ म्हणून वापरण्यात येणार नाहीत. तसेच, मते मिळविण्यासाठी जात किंवा समुदायाच्या भावनांना आवाहन करता येणार नाही.

✡ पक्षाने किंवा उमेदवाराने तात्पुरती कार्यालये उभारणे आणि ती चालवणे यासाठी काही शर्ती/मार्गदर्शक तत्त्वे आहेत. अशी कार्यालये, सार्वजनिक किंवा खाजगी मालमत्तेवर/कोणत्याही धार्मिक ठिकाणी किंवा अशा धार्मिक ठिकाणांच्या जागेत/कोणत्याही शैक्षणिक संस्थेला/रुग्णालयाला लागून अथवा विद्यमान मतदान केंद्राच्या २०० मीटरच्या आत, कोणतेही अतिक्रमण करून उघडता येणार नाही. शिवाय अशा कार्यालयांवर पक्षचिन्ह/छायाचित्रे असलेला केवळ एकच पक्षध्वज आणि बॅनर लावता येईल. अशा कार्यालयांमध्ये वापरणात येणाऱ्या बॅनरचा आकार स्थानिक कायद्याद्वारे फलक/ जाहिरात फलक इत्यादींचा याहून लहान आकार विहित केला असेल तर स्थानिक कायद्याद्वारे विहित केलेला लहान आकार लागू असेल. या शर्तींच्या अधीन राहून ४ फूट×८ फूट यापेक्षा तो जास्त असता कामा नये.






✡ निवडणूक प्रचारादरम्यान उमेदवाराची टोपी, मुखवटा स्कार्फ इत्यादीसारखी विशेष साधने परिधान करण्यास मुभा आहे. मात्र संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात त्याचा हिशेब घेण्यात येतो. तथापि, साड्या, शर्ट इत्यादींसारख्या मुख्य वस्त्रांचा पक्षाकडून/ उमेदवाराकडून होणाऱ्या पुरवठ्यास आणि त्यांच्या वाटपास परवानगी दिलेली नाही. कारण ते कृत्य मतदारांना लाच देणे या सदरात मोडते.

✡ मतदान समाप्तीसाठी निश्चित केलेली वेळ संपण्याच्या ४८ तासांच्या कालावधीत निवडणूकविषयक कोणतीही बाब लोकांना चलचित्रक, दूरदर्शनसंच किंवा इतर तत्सम उपकरणाद्वारे उमेदवार दाखवू शकणार नाही. (संदर्भ : लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याचे कलम १२६)






✡ ज्यांवर मुद्रक आणि प्रकाशक यांची दर्शनी नावे आणि पत्ते नसतील असे कोणतेही निवडणूक पत्रक किंवा भित्तिचित्र यांचे मुद्रण उमेदवार करणार नाही किंवा ते प्रकाशित करणार नाही किंवा ते मुद्रित वा प्रकाशित करण्याची व्यवस्था करणार नाही. (संदर्भ : लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ यांचे कलम १२७-क)

✡ उमेदवारास, मोटार वाहन अधिनियम आणि इतर कोणतेही स्थानिक कायदे/ उपविधी यांच्या तरतुदींना अनुसरून मिरवणुकीदरम्यान वाहनावर त्याच्या पक्षाचे किंवा त्यांचे स्वत:चे एक चित्र घोषणाफलक/बॅनर, झेंडा प्रदर्शित करता येईल/लावता येतो/वाहून नेता येईल.






✡ मतदारांना प्रशिक्षित करण्याच्या प्रयोजनासाठी उमेदवारांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची प्रतिरूप मतदान युनिटे तयार करता येऊ शकतात. अशी प्रतिरूप मतदान युनिटे, अधिकृत मतदान युनिटांच्या अर्ध्या आकारमानात, लाकडी प्लास्टिक किंवा प्लायबोर्डाच्या पेट्यामधून तयार करता येतील आणि त्यांना तपकिरी, पिवळा किंवा करडा रंग देता येईल.

✡ राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी, पर्यावरणाच्या रक्षणासाठी भित्तिचित्रे, बॅनर इत्यादी तयार करण्यासाठी प्लास्टिक/पॉलिथिनचा वापर शक्यतो टाळावा.







✡ राजकीय प्रचार मोहिमेसाठी व मेळाव्यांसाठी शैक्षणिक संस्थांचा त्यांच्या मैदानासह (शासन अनुदानित, खाजगी किंवा शासकीय असो) वापर करण्यासाठी मुभा नाही.

✡ उमेदवाराला स्थानिक कायदा व अमलात असलेल्या मनाई आदेशांच्या तरतुदीच्या अधीन राहून सार्वजनिक मालमत्तेवर संबंधित पक्षाचे किंवा उमेदवाराचे भित्तिपत्रक, घोषणाफलक, बॅनर, झेंडे इत्यादी प्रदर्शित करता येईल. तपशीलासाठी आयोगाचा अनुदेश क्र. ३/७/२००८ जेएस/दोन, दिनांक ७/१०/२००८ पाहावेत.






✡ राजकीय पक्षांनी/उमेदवारांनी छापील हस्तपत्रके/ पत्रके हवेतून खाली सोडण्यास कोणतेही निर्बंध नाहीत. परंतु यासंबंधातील सर्व खर्चाची नोंद, ज्याच्या वतीने अशी छापील हस्तपत्रके/ पत्रके हवेतून खाली सोडण्यात आली, त्या उमेदवाराच्या निवडणूक खर्चात केली जाते.

पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याला ३ दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक असेल.

✡ उमेदवारास त्याची प्रतिमा किंवा देव/देवता इत्यादींची प्रतिमा असलेली दैनंदिनी/कॅलेंडर/स्टिकर छापून त्याचे वाटप करता येत नाही. हे कृत्य भारतीय दंड संहितेच्या कलम १७१-ड अन्वये लाच देण्याच्या सदरात जमा होते.

✡ पक्षाचे उमेदवाराचे चिन्ह असलेल्या किंवा नसलेल्या छापील स्टेफनी कव्हर्सचे किंवा इतर साहित्य वाटप केल्याचे सिद्ध झाल्यास उक्त साहित्याच्या वाटपाविरुद्ध, जिल्हा प्रशासनाकडून भारतीय दंड संहितेचे कलम १७१-ख अन्वये क्षेत्र दंडाधिकाऱ्यासमोर तक्रार दाखल करण्यात येईल.

✡ केवळ निवडणुकीच्या कालावधीत राज्याचा प्रभारी असलेल्या पदाधिकाऱ्यांच्या बाबतीत, लोकसभा/राज्य विधानसभा यांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी अशा निर्बंधाचा आग्रह धरला जात नाही. असा पदाधिकारी राज्य मुख्यालयातील आपले राहण्याचे ठिकाण घोषित करील आणि प्रस्तुत कालावधीतील त्याची ये-जा ही सामान्यपणे त्याचे पक्ष कार्यालय आणि त्याचे राहण्याचे ठिकाण यापुरतीच मर्यादित राहील. वरील निर्बंध सर्व निवडणुकीमधील इतर सर्व पदाधिकाऱ्यांना लागू होतील.

✡ पांढऱ्या कागदावरील अनौपचारिक ओळख चिठ्ठीत केवळ मतदाराचा तपशील म्हणजेच मतदाराचे नाव त्याचा अनुक्रमांक मतदारयादीतील भाग क्रमांक, मतदान केंद्राचा अनुक्रमांक व नांव आणि मतदानाचा दिनांक अंतर्भूत असेल. त्यात उमेदवाराचे नाव, त्याचे छायाचित्र आणि चिन्ह अंतर्भूत करता कामा नये.

✡ उमेदवारास सुरक्षा पुरवलेला मंत्री/ खासदार/ विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य किंवा इतर कोणतीही व्यक्ती यांची निवडणूक प्रतिनिधी/मतदान प्रतिनिधी/मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करता येत नाही. कारण अशा नियुक्तीमुळे त्याची वैयक्तिक सुरक्षा धोक्यात येईल. त्यामुळे, त्यांच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत मतदान केंद्राचा परिसर असे वर्णन केलेल्या मतदार केंद्राच्या १०० मीटर परिघाच्या क्षेत्रात आणि मतदान केंद्रात आणि मतमोजणी केंद्राच्या परिसरात आणि मतमोजणी केंद्राच्या आत त्याच्यासोबत येऊ दिले जाणार नाही. अशा दिलेल्या कोणत्याही व्यक्तीस एखाद्या उमेदवाराचा असा प्रतिनिधी म्हणून कार्य करण्यासाठी त्याची सुरक्षा सोडण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

✡ उमेदवाराने मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केलेली व्यक्ती सामान्यपणे संबंधित मतदान केंद्राच्या भागातील रहिवासी आणि संबंधित मतदान केंद्रक्षेत्रातील मतदार असली पाहिजे, आणि संबंधित मतदान केंद्राच्या क्षेत्राबाहेरील असता कामा नये. अशा व्यक्तींकडे निवडणूक छायाचित्र ओळखपत्रही असले पाहिजे. तथापि, केवळ महिला मतदान कर्मचारी असलेल्या मतदान केंद्राच्या बाबतीत, त्याच मतदान क्षेत्रातील रहिवाशांबद्दल निर्बंध लागू केले जाणार नाहीत.

✡ राजकीय पक्षाच्या अभिनेता-प्रचारकर्त्यांना (नेत्यांना) रस्त्याने प्रवास करण्याच्या वाहनाचा लाभ घ्यावयाचा असल्यास केंद्रातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांद्वारे परवाने देण्यात येतील. संपूर्ण राज्यभरात निवडणूक प्रचाराकरिता कोणत्याही नेत्याला हेच वाहन वापरण्यासाठी परवाना देण्याबद्दल, अशा पक्षाने अर्ज केल्यास, केंद्रातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना हाच परवाना देता येईल आणि तो संबंधित नेत्याने (नेत्यानी) वापरावयाच्या अशा वाहनाच्या (वाहनांच्या) समोरच्या काचेवर/ठळकपणे लावलेला असेल. अशा पक्षनेत्यांना निरनिराळ्या क्षेत्रात निरनिराळी वाहने वापरावयाची असल्यास, वाहन अशा नेत्याद्वारे वापरण्यात येणार आहे, त्या वाहनाच्या समोरच्या काचेवर ठळकपणे दर्शवील, अशा संबंधित व्यक्तीच्या नावाने परवाना देता येईल.

✡ मतदान केंद्रापासून २०० मीटर अंतरापलीकडे, निवडणूक मंडप उभारता येईल. तो दोन व्यक्तींचे संरक्षण करण्यासाठी छत्रीचा किंवा ताडपत्रीचा अथवा कापडाच्या तुकड्याचा बनविलेला असेल व त्यात केवळ एक टेबल (मेज) व २ खुर्च्या असतील. मंडपामध्ये उमेदवाराचे पक्षाचे नाव / निवडणूक चिन्ह दर्शविणारा केवळ एक बॅनर तीन बाय दीड फुटाचा लावता येईल. तथापि, एकाच इमारतीमध्ये दोन मतदान केंद्रे उभारण्यात आली



✡ कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी सभा घेण्याकरिता आणि मिरवणुका काढण्याकरिता संबंधित पोलीस प्राधिकाऱ्याकडून लेखी पूर्वपरवानगी घ्यावी.

✡ ध्वनिक्षेपकांच्या वापरासाठी संबंधित पोलीस प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी घ्यावी.



✡ रात्री १०.०० ते सकाळी ६.०० या कालावधीत ध्वनिक्षेपकाचा वापर करता येत नाही.

✡ रात्री १०.०० नंतर आणि सकाळी ६.०० च्या आधी कोणतीही जाहीर सभा घेता येणार नाही. शिवाय उमेदवारास मतदान समाप्तीसाठी निश्चित केलेली वेळ संपण्याच्या ४८ तासांच्या कालावधीत कोणत्याही जाहीर सभा आणि मिरवणुका आयोजित करता येत नाहीत. समजा १५ जुलै हा मतदानाचा दिवस असेल आणि मतदानाची वेळी सकाळी ८.०० वाजेपासून ते संध्याकाही ५.०० पर्यंत असेल तेव्हा जाहीर सभा व मिरवणुका घेणे १३ जुलै रोजी संध्याकाळी ५.०० बंद करण्यात येतील. (संदर्भ : लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १२६)




(मतदान बंद होण्याच्या ४८ तास अगोदर सुरू होणारा) प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर, मतदारसंघाबाहेरून आलेले आणि त्या मतदारासंघाचे मतदार नसलेले राजकीय नेते इत्यादींनी त्या मतदारसंघात उपस्थित राहू नये. अशा नेत्यांनी प्रचाराचा कालावधी समाप्त होताच तो मतदारसंघ सोडावा. त्या मतदारसंघाचे मतदान नसले तरीसुद्धा उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी यांना ही बाब लागू होणार नाही.







मतदारांची ने-आण करण्यासाठी वापरलेल्या कोणत्याही प्रकारच्या वाहनाद्वारे, मतदान केंद्राकडे व मतदान केंद्रापासून मतदारांची ने-आण करण्याची कोणतीही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष व्यवस्था करणे हा फौजदारी अपराध आहे. (लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १३३)

असल्यास दोन मतदान मंडपही उभारता येतील.

✡ निवडणूक मंडप (बूथ) उभारण्यापूर्वी संबंधित शासकीय प्राधिकाऱ्याची किंवा स्थानिक प्राधिकाऱ्याची लेखी परवानगी मिळविणे आवश्यक आहे. संबंधित पोलीस/निवडणूक प्राधिकाऱ्यांनी मागणी केल्यावर त्यांच्यासमोर मंडप सादर करण्यासाठी उभारण्याच्या कामासाठी लावलेल्या व्यक्तीकडे लेखी परवानगी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

✡ मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रापासून शंभर मीटर परिघाच्या आत मतांसाठी प्रचार करण्यास प्रतिबंध आहे. (लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १३० पहा )

✡ १०० मीटर परिघाच्या आत मतदान केंद्र परिसर म्हणून वर्णन केलेल्या मतदान केंद्राच्या परिसरात आणि मतदान मंडपामध्ये भ्रमणध्वनी, तार विरहित दूरध्वनी आणि विनतारी संदेश संच इत्यादी बाळगण्यास किंवा वापरण्यास कोणत्याही व्यक्तीला मुभा नाही. केवळ निरीक्षक/सूक्ष्म निरीक्षक, मतदान केंद्राध्यक्ष व सुरक्षा कर्मचारी वर्ग यांनाच भ्रमणध्वनी बाळगण्यास मुभा आहे. परंतु त्यांचे भ्रमणध्वनी नि:शब्द (सायलेंट मोडवर) ठेवतील.

✡ मतदानाच्या दिवशी उमेदवार मतदारसंघात उपस्थित नसला तरी इतर कोणत्याही व्यक्तीला उमेदवाराच्या वापरासाठी वाटप केलेले वाहन वापरण्याची मुभा नाही.



✡ मतदानाच्या दिवशी कोणत्याही प्रकारचे हक्काचे वाहन वापरता येऊ शकत नाही. उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी किंवा पक्ष कार्यकर्ते किंवा कार्यकर्ते यांना केवळ चार/तीन/दोन चाकी वाहने म्हणजेच मोटारी (सर्व प्रकारच्या) टॅक्सी, ऑटो रिक्षा, रिक्षा आणि दुचाकी वाहने वापरण्याची अनुमती असेल. मतदानाच्या दिवशी, या वाहनांमधून चालकासह पाचपेक्षा जास्त व्यक्तींनी ने-आण करता येणार नाही.

✡ बस, मिनीबस यासारखी शासकीय वाहने वापरण्यास मुभा आहे परंतु ती मतदारांकडून येण्याजाण्यासाठी चोरून वापरली जात नाहीत, याची खातरजमा करून घ्यावी. याशिवाय मतदान मंडपाव्यतिरिक्त रुग्णालये, विमानतळ, रेल्वे स्थानके, बस स्थानके, मित्र किंवा नातेवाईक यांची घरे, क्लब आणि रेस्टॉरंट यासारख्या ठिकाणाहून रस्त्याने प्रवाशांची ने-आण करणाऱ्या खाजगी कार टॅक्सी यांना चालविण्यास मुभा देण्यात येईल परंतु मतदारांची ने-आण करण्यासाठी त्यांना मतदान केंद्राजवळ वाहने चोरटेपणाने आणण्यास मुभा देता येणार नाही.

✡ (एक) लोकसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवार पुढीलप्रमाणे हक्कदार असेल :-

(क) संपूर्ण मतदारसंघासाठी उमेदवाराच्या स्वत:च्या वापरासाठी एक वाहन. संपूर्ण मतदारसंघासाठी उमेदवाराच्या निवडणूक प्रतिनिधीच्या वापरासाठी एक वाहन

(ख) याशिवाय लोकसभा (पार्लमेंटरी) मतदारसंघात समाविष्ट असलेले प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी उमेदवाराचे कार्यकर्ते किंवा पक्ष कार्यकर्ते यांच्या वापरासाठी एक वाहन.

(दोन) राज्य विधानसभेच्या निवडणुकीकरिता एखादा उमेदवार :- पुढीलप्रमाणे हक्कदार असेल.

- उमेदवाराच्या स्वत:च्या वापरासाठी एक वाहन, उमेदवाराच्या निवडणूक प्रतिनिधीच्या वापरासाठी एक वाहन, याशिवाय, उमेदवारांचे कार्यकर्ते किंवा पक्ष कार्यकर्ते यांच्या वापरासाठी एक वाहन.

✡ एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्याला मतदानाच्या व मतमोजणीच्या दिवशी, मतदानाचे व मतमोजणी प्रक्रियेचे पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्याच्या प्रयोजनाकरिता खाजगी फिक्सड-विंग विमानाचा व हेलिकॉप्टरचा वापर करण्यास मुभा असणार नाही.



✡ कोणत्याही व्यक्तीला, शस्त्र अधिनियम १९५९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या शस्त्रांनी सुसज्ज होऊन मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या जवळपास जाण्यास मुभा नाही. (लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ ख)



✡ घेण्यात आलेल्या जनमत चाचणीचा किंवा मतदानोत्तर चाचणीचा निकाल कोणत्याही वेळी मुद्रित इलेक्ट्रॉनिक किंवा कोणत्याही इतर माध्यमातून कोणत्याही प्रकारे

(क) एकाच टप्प्यात घेतलेल्या एखाद्या निवडणुकीतील मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या तासासह ४८ तासाच्या कालावधीदरम्यान, आणि (ख) अनेक टप्प्यातील निवडणुकीमध्ये आणि वेगवेगळया राज्यातील निवडणुका एकाच वेळी घोषित केल्या असल्यास कोणत्याही वेळी निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या तासापूर्वीच्या ४८ तासापासून सुरू होऊन सगळ्या राज्यातील सगळ्या टप्प्यातील मतदान जोपर्यंत संपत नाही तोपर्यंतच्या कालावधी दरम्यान कोणत्याही वेळी प्रकाशित, प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाही.



✡ निवडणुकीदरम्यान लघुसंदेश सेवेमार्फत आक्षेपार्ह संदेश पाठविण्यास बंदी आहे. कायद्याचा किंवा भारताच्या निवडणूक आयोगाने याबाबत दिलेल्या सूचनांचा भंग करणारे आक्षेपार्ह लघुसंदेशाच्या संबंधात पोलीस प्राधिकारी, काही विवक्षित भ्रमणध्वनी क्रमांक जाहीर करतील. असा लघुसेवा संदेश प्राप्त करणारी व्यक्ती, उक्त संदेश तो पाठविणाऱ्या व्यक्तींच्या भ्रमणध्वनी क्रमांकासह त्या क्रमांकापुढे पाठवू शकेल. पोलीस अधिकारी कायद्यान्वये त्यावर कारवाई करील.






# लोकसभा निवडणूक : एक दृष्टिक्षेप

**अभ्यासक, पत्रकार, वाचक, राजकीय पक्ष, निवडणुकीतील उमेदवार यांना तत्काळ संदर्भासाठी २००९ च्या लोकसभा निवडणुकीतील सर्व मतदारसंघाची पुढील माहिती उपयुक्त ठरेल. यामध्ये २००९ च्या निवडणुकीतील एकूण मतदार, एकूण झालेले मतदान व प्रमुख पक्षांचे उमेदवार व त्यांना मिळालेल्या मतांचा समावेश आहे. त्याचबरोबर २०१४ मधील मतदार नोंदणीची आकडेवारीही देण्यात आली आहे. तथापि अचूक माहितीसाठी भारत निवडणूक आयोगाचे http://eci.nic.in आणि राज्य निवडणूक अधिकारी यांचे ceo.maharashtra.gov.in संकेतस्थळ बघावे, अशी विनंती आहे.**

## १-नंदूरबार (अनुसूचित जमाती)




**विधानसभा क्षेत्रे**
१ अक्कलकुआ
२ शहादा
३ नंदूरबार
४ नवापूर
५ साक्री
६ शिरपूर

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १३६१३७०
पुरुष – ६९३७३२
महिला –६६७०४८
सैन्यातील मतदार– ५९०

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १४५५५४३) (एकूण झालेले मतदान ७६६२४०)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | माणिकराव होडल्या गावीत | भा.रा.कॉं. | २७५९३६ |
| २ | शरद कृष्णराव गावीत | समाजवादी पार्टी | २३५०९३ |
| ३ | सुहास जयंत नटावदकर | भा.ज.पा. | १९५९८७ |

## २-धुळे




**विधानसभा क्षेत्रे**
६-धुळे ग्रामीण
७ –धुळे शहरी
८-सिंदखेडा
११४- मालेगाव (मध्य)
११५ – मालेगाव (बाह्य)
११६-बागलाण (अनु. जमाती)

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १६४६१७६
पुरुष – ८६२५६८
महिला –७८११६२
सैन्यातील मतदार– २४४६

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १५७५२२५) (एकूण झालेले मतदान ६६९९०६)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | प्रताप नारायणराव सोनवणे | भा.ज.पा. | २,६३,२६० |
| २ | अमरिशभाई रसिकलाल पटेल | भा.रा.कॉं. | २,४३,८४१ |
| ३ | निहाल अहमद मोलवी मोहमद उस्मान | जनता दल (सेक्युलर) | ७२,७३८ |

## ३- जळगाव




**विधानसभा क्षेत्रे**
१३ जळगाव शहर
१४ – जळगाव ग्रामीण
१५ – अमळनेर
१६ –एरंडोल
१७ –चाळीसगाव
१८ – पाचोरा

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १६६४२२८
पुरुष – ८८४३३१
महिला –७७५६३७
सैन्यातील मतदार– ४२६०

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १५४९३९१) (एकूण झालेले मतदान ६५६५६७)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | ऐ.टी.नाना पाटील | भाजपा | ३४३६४७ |
| २ | ॲड. वसंतराव जिवनराव मोरे | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | २४७६२७ |
| ३ | सुधाकर आत्माराम वाघ | अपक्ष | ११२०६ |

## ४-रावेर




**विधानसभा क्षेत्रे**
१० चोपडा (अनुसूचित जमाती)
११ रावेर
१२ भुसावळ (अनुसूचित जाती)
१९ जामनेर
२० मुक्ताईनगर
२१ मलकापूर

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १५६३३९४
पुरुष – ८२७३०७
महिला –७३४४५०
सैन्यातील मतदार– १६३७

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १४१८६९१) (एकूण झालेले मतदान ७२०००६)

| अ. क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | हरिभाऊ माधव जावळे | भा.ज.पा. | ३२८,८४३ |
| २ | ॲड. रवींद्र प्रल्हादराव पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | ३००,६२५ |
| ३ | सुरेश चिंधू पाटील | बहुजन समाज पार्टी | ३३,६४१ |

## ५-बुलढाणा




**विधानसभा क्षेत्रे**
२२ –बुलढाणा
२३ –चिखली
२४ –सिंदखेड
२५ – मेहकर (अनु. जाती)
२६ –खामगाव
२७ – जळगाव (जामोद)

**२०१४ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी १५७१६५५
पुरुष – ८३११४१
महिला –७३७४५३
सैन्यातील मतदार– ३०६१

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १३८२७३६) (एकूण झालेले मतदान ८५३१३३)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | प्रतापराव गणपत जाधव | शिवसेना | ३५३६७१ |
| २ | डॉ.राजेंद्र भास्कर शिंगणे | राष्ट्रवादी कॉंग्रेस | ३२५५९३ |
| ३ | रवींद्र तुळशीराम ढोकणे | भारीप बहुजन महासंघ | ३१०३४ |

## ६- अकोला




**विधानसभा क्षेत्रे**
२८ – अकोट
२९ – बालापूर
३० – अकोला पश्चिम
३१ – अकोला पूर्व
३२ –मुर्तिझापूर (अनु. जाती)
३३– रिसोड

**२०१४ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – १६४२६४२
पुरुष –८६६५८४
महिला –७७३७२०
सैन्यातील मतदार–२३३८

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १४८०६०६) (एकूण झालेले मतदान ७३८९५५)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | संजय शामराव धोत्रे | भा.ज.पा. | २८७५२६ |
| २ | प्रकाश यशवंत आंबेडकर | भारीप बहुजन महासंघ | २२२६७८ |
| ३ | बाबासाहेब धाबेकर | भा.रा.कॉं. | १८२७७६ |

## ७-अमरावती




**विधानसभा क्षेत्रे**
३७ -बडनेरा
३८ -अमरावती
३९ -तिवसा
४० - दर्यापूर (अनु. जाती)
४१ -मेळघाट (अनु. जमाती)
४२ - अचलपूर

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १५७८०५२
पुरुष – ८३०४३१
महिला – ७४५६६८
सैन्यातील मतदार– १९५३

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १४२३८५५) (एकूण झालेले मतदान ७३२४९२)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | आनंदराव विठोबा अडसूळ | शिवसेना | ३१४२८६ |
| २ | डॉ. राजेंद्र रामकृष्ण गवई | आर.पी.आय. | २५२५७० |
| ३ | डॉ. राजीव गुलाबराव जामठे | अपक्ष | ६४४३८ |

## १० – नागपूर



**विधानसभा क्षेत्रे**
५२ – नागपूर दक्षिण पश्चिम
५३ – नागपूर दक्षिण,
५४ -नागपूर पूर्व
५५ – नागपूर मध्य
५६ – नागपूर पश्चिम
५७-नागपूर उत्तर (अनु. जाती)

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १८४२१४५
पुरुष – ९५६३९६
महिला –८९४५४१
सैन्यातील मतदार– १२०८

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १७३८९२०) (एकूण झालेले मतदान ७५५३६९ )

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | विलासराव बाबुरावजी मुत्तेमवार | भा.रा.काँ. | ३१५११८ |
| २ | बनवारीलाल भगवानदास पुरोहित | भा.ज.पा. | २९०७४९ |
| ३ | माणिकराव वैद्य | ब.स.पा. | ११८७४१ |

## ८-वर्धा




**विधानसभा क्षेत्रे**
३६ -धामणगाव रेल्वे
४३ -मोर्शी
४४ -आर्वी
४५ -देवळी
४६ – हिंगणघाट
४७ – वर्धा

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १५४२८९२
पुरुष – ८०६५२८
महिला –७३४७३३
सैन्यातील मतदार– १६३१

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १४०८७८१) (एकूण झालेले मतदान ७६९१३२)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | दत्ता राघोबा मेघे | भा.रा.काँ. | ३५२८५३ |
| २ | सुरेश गणपत वाघमारे | भा.ज.पा. | २५६९३५ |
| ३ | विपीन बाबासाहेब कंगाले | ब.स.पा. | १३१६४३ |

## ११- भंडारा-गोंदिया



**विधानसभा क्षेत्रे**
६० – तुमसर
६१ – भंडारा (अनु. जाती)
६२ -साकोली
६३ -अर्जुनी मोरगाव (अनु. जाती)
६४ -तिरोडा
६५ – गोंदिया

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १६३३००७
पुरुष – ८२८८१२
महिला –८०१३२६
सैन्यातील मतदार– २८६८

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १४५०४७७) (एकूण झालेले मतदान १०३०७५०)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | प्रफुल्ल मनोहरभाई पटेल | राष्ट्रवादी काँग्रेस | ४८९८१४ |
| २ | नानाभाऊ फाल्गुण पटोले | अपक्ष | २३७८९९ |
| ३ | शिशुपाल नत्थुजी पटले | भा.ज.पा. | १५८९३८ |

## ९-रामटेक अनुसूचित जाती



**विधानसभा क्षेत्रे**
४८ – काटोल
४९ -सावनेर
५० -हिंगणा
५१ -उमरेड (अनु. जाती)
५८ -कामठी
५९ – रामटेक

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १६४४६६२
पुरुष – ८६९६१३
महिला –७७३५८४
सैन्यातील मतदार– १४६५

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १५०२९००) (एकूण झालेले मतदान ७६४७१२)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | मुकूल बाळकृष्ण वासनिक | भा.रा.काँ. | ३११६१४ |
| २ | कृपाल बालाजी तुमाने | शिवसेना | २९४९१३ |
| ३ | प्रकाश किसन टेंभूर्णे | ब.स.पा. | ६२२३८ |

## १२-गडचिरोली-चिमूर (अनु. जमाती)



**विधानसभा क्षेत्रे**
६६ – आमगाव (अनु. जमाती)
६७ – आरमोरी (अनु. जमाती)
६८ – गडचिरोली (अनु. जमाती)
६९ – अहेरी (अनु. जमाती)
७३ – ब्रम्हपुरी
७४ – चिमूर

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १४५१२६१
पुरुष – ७४५०३३
महिला –७०५७१५
सैन्यातील मतदार– ५१३

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १२८५३८७) (एकूण झालेले मतदान ८३८२४७)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | मारोतराव सैनुजी कोवासे | भा.रा.काँ. | ३२१७५६ |
| २ | अशोक महादेव नेते | भा.ज.पा. | २९३१७६ |
| ३ | राजे सत्यवान आत्राम | ब.स.पा. | १३५७५६ |

## १३- चंद्रपूर

**विधानसभा क्षेत्रे**
७० -राजुरा
७१ – चंद्रपूर (अनु. जाती)
७२ -बल्लारपूर
७५ -वरोरा
७६ -वनी
८० -आर्णि (अनु. जमाती)

२०१४ मतदार यादी:
**एकूण मतदार नोंदणी – १७१५०७८**
पुरुष – ९०२०३४
महिला –८१२१५२
सैन्यातील मतदार– ८९२



**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १५३६३५२) (एकूण झालेले मतदान ८९९५१५)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | हंसराज गंगाराम अहिर | भा.ज.पा. | ३०१४६७ |
| २ | नरेश चुन्नीलाल पुगलिया | भा.रा.काँ. | २६८९७२ |
| ३ | वामन सदाशिवराव चटप | स्वतंत्र भारत पक्ष | १६९११२ |

## १४ – यवतमाळ-वाशिम




**विधानसभा क्षेत्र**
३४ – वाशीम (अनु. जाती)
३५ – कारंजा
७७ – राळेगाव (अनु.जमाती)
७८ – यवतमाळ
७९ – दिग्रस
८१ – पुसद

**२०१४ मतदार यादी :**
एकूण मतदार नोंदणी – १७१५५९२
पुरुष – ९०२६०९
महिला –८१२०५९
सैन्यातील मतदार– ९२४

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १५५४०४२) (एकूण झालेले मतदान ८४००६४)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | भावना गवळी (पाटील) | शिवसेना | ३८४४४३ |
| २ | हरिसिंग राठोड | भा.रा.कॉं. | ३२७४९२ |
| ३ | दिलीप लक्ष्मण ऐडतकर | ब.स.पा. | ६२७८१ |

## १७ – परभणी




**विधानसभा क्षेत्र**
९५ –जिंतूर
९६ – परभणी
९७ –गंगाखेड
९८ –पाथरी
९९ –परतूर
१०० –गणसावंगी

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १७६६६३२
पुरुष – ९३०८०४
महिला –८३४९८७
सैन्यातील मतदार– ८४१

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १६१००८८ ) (एकूण झालेले मतदान ८७०७२६)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | ॲड. गणेशराव नागोराव दुधगावकर | शिवसेना | ३८५३८७ |
| २ | सुरेश अंबादासराव वरपुडकर | भा. रा. कॉं. | ३१९९६९ |
| ३ | राजश्री बाबासाहेब जामगे | ब.स.पा. | ६४६११ |

## १५ – हिंगोली



**विधानसभा क्षेत्र**
८२ – उमरखेड (अनु. जमाती)
८३ – किनवट,
८४ – हदगाव,
९२–वसमत,
९३–कळमनुरी,
९४ – हिंगोली

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १५६५३६१
पुरुष – ८२९५४९
महिला –७३५११७
सैन्यातील मतदार– ६९४

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १३६९७७४) (एकूण झालेले मतदान ८१७४६७)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | सुभाष बापूराव वानखेडे | शिवसेना | ३४०१४८ |
| २ | सुर्यकांता जयवंतराव पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस | २६६५१४ |
| ३ | डॉ. बी.डी. चव्हाण | ब.स.पा. | १११३५७ |

## १८ – जालना




**विधानसभा क्षेत्र**
१०१ –जालना
१०२ –बदनापूर (अनु. जाती)
१०३ –भोकरदन
१०४ – सिल्लोड
१०६ –फुलंब्री
११० – पैठण

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १५८३३३८
पुरुष – ८५००५१
महिला –७३०८८२
सैन्यातील मतदार– २४०५

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १४२६२५५) (एकूण झालेले मतदान ७९७१२७)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | रावसाहेब दादाराव दानवे | भा.ज.पा. | ३५०७१० |
| २ | डॉ. कल्याण वैजनाथराव काळे | भा.रा.कॉं. | ३४२२२८ |
| ३ | राजपालसिंग गब्बरसिंग राठोड | ब.स.पा. | ३५९७६ |

## १६ – नांदेड




**विधानसभा क्षेत्र**
८५ – भोकर,
८६ – नांदेड उत्तर,
८७ – नांदेड दक्षिण
८९ – नायगाव
९० – देगलूर (अनु. जाती)
९१ – मुखेड

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १६६१८८४
पुरुष – ८६६३६९
महिला –७९४९६१
सैन्यातील मतदार– ५५४

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १४३९०१५) (एकूण झालेले मतदान ७७४५९०)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | भास्करराव बापुराव खतगावकर पाटील | भा.रा.कॉं. | ३४६४०० |
| २ | संभाजी पवार | भा.ज.पा. | २७१७८६ |
| ३ | म. मकबूल सलीम हाजी म. ख्वाजा | ब.स.पा. | ८४७४३ |

## १९ – औरंगाबाद



**विधानसभा क्षेत्र**
१०५ – कन्नड
१०७ –औरंगाबाद (मध्य)
१०८ – औरंगाबाद प. (अनु. जाती)
१०९ – औरंगाबाद (पूर्व)
१११ –गंगापूर
११२ –वैजापूर

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १५३२६१२
पुरुष – ८१५३९४
महिला –७१४९१३
सैन्यातील मतदार– २३०५

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १४१७९६४) (एकूण झालेले मतदान ७३११४७)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | चंद्रकांत खैरे | शिवसेना | २५५८९६ |
| २ | उत्तमसिंग पवार | भा.रा.कॉं. | २२२८८२ |
| ३ | शांती गिरीजी मौनगिरीजी महाराज | अपक्ष | १४८०२६ |

## २० – दिंडोरी (अ. ज.)

**विधानसभा क्षेत्र**
११३ –नांदगाव
११७ –कळवण (अनु. जमाती)
११८ – चांदवड
११९ – येवला
१२१ –निफाड
१२२ – दिंडोरी (अनु. जमाती)


**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १५०४१११
पुरुष – ७९२०९५
महिला –७०९९४०
सैन्यातील मतदार – २७६७



**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १४३२९३८) (एकूण झालेले मतदान ६८१६२३)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | हरिश्चंद्र देवराम चव्हाण | भा.ज.पा. | २८१२५४ |
| २ | नरहरी सिताराम झिरवाळ | राष्ट्रवादी कॉंग्रेस | २४३९०७ |
| ३ | जीवा पांडू गावीत | भा. क. प. | १०५३५२ |

## २१ – नाशिक




**विधानसभा क्षेत्रे**
१२० – सिन्नर
१२३ – नाशिक पूर्व
१२४ – नाशिक (मध्य)
१२५ – नाशिक पश्चिम
१२६ – देवळाली (अनु. जाती)
१२७ – इगतपुरी (अनु. जमाती)

**२०१४ मतदार यादी :**
एकूण मतदार नोंदणी – १५४८१६३
पुरुष – ८२५४९६३
महिला –७२०६०१
सैन्यातील मतदार – २५९९

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १४४८४१४) (एकूण झालेले मतदान ६५५६७१)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | समीर भुजबळ | राष्ट्रवादी काँग्रेस | २३८७०६ |
| २ | हेंमत तुकाराम गोडसे | म.न.से. | २१६६७४ |
| ३ | दत्ता नामदेव गायकवाड | शिवसेना | १५८२५१ |

## २४ – कल्याण




**विधानसभा क्षेत्रे**
१४० –अंबरनाथ (अनु. जाती)
१४१ – उल्हासनगर
१४२ – कल्याण पूर्व
१४३ – डोंबिवली
१४४ – कल्याण ग्रामीण
१४९ – मुंब्रा–कळवा

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १८८०४५१
पुरुष – १०२२८९२
महिला –८५७७७१
सैन्यातील मतदार– ३८१

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १५८८५०७) (एकूण झालेले मतदान ५४४८२८)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | आनंद प्रकाश परांजपे | शिवसेना | २१२४७६ |
| २ | वसंत शंकरराव डावखरे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | १८८२७४ |
| ३ | वैशाली संभाजीराव दरेकर–राणे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १०२०६३ |

## २२ – पालघर (अनुसूचित जमाती)




**विधानसभा क्षेत्रे**
१२८–डहाणू (अनु. जमाती)
१२९–विक्रमगड (अनु. जमाती)
१३० – पालघर (अनु. जमाती)
१३१ – बोईसर(अनु.जमाती)
१३२ – नालासोपारा
१३३ – वसई

**२०१४ मतदार यादी :**
एकूण मतदार नोंदणी – १५४८००३
पुरुष – ८१४९०४
महिला –७३२९०४
सैन्यातील मतदार– १९५

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १५२३०६१) (एकूण झालेले मतदान ७३२५८७)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | बळीराम सुकूर जाधव | बहुजन विकास आघाडी | २२३२३४ |
| २ | ॲड चिंतामण वनगा | भा.ज.पा. | २१०८७४ |
| ३ | दामोदर बारकू शिंगडा | भा.रा.काँ. | १६०५७० |

## २५ – ठाणे



**विधानसभा क्षेत्रे**
१४५ – मीरा भायंदर
१४६ – ओवळा माजीवाडा
१४७– कोपरी–पाचपाखाडी
१४८– ठाणे
१५० –ऐरोली
१५१ – बेलापूर

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १९९२२४२
पुरुष – १०९९०३५
महिला –८९२६५४
सैन्यातील मतदार– ५५३

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १८०६८०३) (एकूण झालेले मतदान ७४९८७३)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | डॉ.संजीव गणेश नाईक | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | ३०१००० |
| २ | विजय लक्ष्मण चौगुले | शिवसेना | २५१९८० |
| ३ | राजन राजे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १३४८४० |

## २३ – भिवंडी




**विधानसभा क्षेत्रे**
१३४ – भिवंडी ग्रामीण (अनु. जमाती)
१३५ – शहापूर (अनु.जमाती)
१३६ – भिवंडी पश्चिम
१३७ – भिवंडी पूर्व
१३८ – कल्याण पश्चिम
१३९ – मुरबाड

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १५०१७००
पुरुष – ७७४३३८
महिला –७२७०७८
सैन्यातील मतदार– २८४

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १४८३१७६) (एकूण झालेले मतदान ५८४२६३)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | तावरे सुरेश काशिनाथ | भा.रा.काँ. | १८२७८९ |
| २ | पाटील जगन्नाथ शिवराम | भा.ज.पा. | १४१४२५ |
| ३ | देवराज किसन म्हात्रे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १०७०९० |

## २६ – मुंबई उत्तर



**विधानसभा क्षेत्रे**
१५२ – बोरिवली
१५३ – दहिसर
१५४ – मागाठाणे
१६०– कांदिवली पूर्व
१६१ – चारकोप
१६२ – मालाड पश्चिम

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १७२५३८५
पुरुष – ९४२२८८७
महिला –७८२८८५
सैन्यातील मतदार– २१४


**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १६०८९२४) (एकूण झालेले मतदान ६८५०२२)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | संजय निरुपम | भा. रा. काँ. | २५५१५७ |
| २ | राम नाईक | भाजपा | २४९३७८ |
| १ | शिरीश लक्ष्मण पारकर | एमएनएस | १४७५०२ |

## २७– मुंबई उत्तर पश्चिम

**विधानसभा क्षेत्रे**
१५८ – जोगेश्वरी पूर्व
१५९ – दिंडोशी
१६३ – गोरेगाव
१६४ – वर्सोवा
१६५ – अंधेरी पश्चिम
१६६ – अंधेरी पूर्व


**२०१४ मतदार यादी :**
एकूण मतदार नोंदणी – १७२५३१८
पुरुष – ९६१०९२
महिला –७६४०२५
सैन्यातील मतदार– २०१



**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १६०४९९२) (एकूण झालेले मतदान ७०७१३४)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | ॲड. गुरुदास वसंत कामत | भा.रा.काँ. | २५३९२० |
| २ | गजानन कीर्तिकर | शिवसेना | २१५५३३ |
| ३ | शालिनी जितेंद्र ठाकरे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १२४००० |

## २८ – मुंबई उत्तर पूर्व




**विधानसभा क्षेत्रे**
१५५ – मुलुंड
१५६ – विक्रोळी
१५७ – भांडूप पश्चिम
१६९ – घाटकोपर पश्चिम
१७० – घाटकोपर पूर्व
१७१ –मानखुर्द शिवाजीनगर

**२०१४ मतदार यादी :**
एकूण मतदार नोंदणी – १६२९५२६
पुरुष – ९०२८६५
महिला –७२६१९४
सैन्यातील मतदार– ३९८

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १५७२८९०) (एकूण झालेले मतदान ६६७९०४)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | संजय दिना पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | २१३५०५ |
| २ | किरिट सोमैय्या | भा.ज.पा. | २१०५७२ |
| ३ | शिशीर शिंदे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १९५१४८ |

## २९ – मुंबई उत्तर मध्य




**विधानसभा क्षेत्रे**
१६७ – विलेपार्ले
१६८ – चांदिवली
१७४ – कुर्ला (अनु. जाती)
१७५ – कालिना
१७६ – वांद्रे पूर्व
१७७ – वांद्रे पश्चिम

२०१४ मतदार यादी:
**एकूण मतदार नोंदणी –** १६९६४८६
पुरुष – ९४५८८२
महिला –७५०३७५
सैन्यातील मतदार– २२५

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १६८११९८५) (एकूण झालेले मतदान ६६४६४७)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | दत्त प्रिया सुनील | भा.रा.काँ. | ३१९३५२ |
| २ | महेश राम जेठमलानी | भा.ज.पा. | १४४७९७ |
| ३ | शिल्पा अतुल सरपोतदार | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १३२५४६ |

## ३० – मुंबई दक्षिण मध्य




**विधानसभा क्षेत्रे**
१७२ –अणुशक्तीनगर
१७३ – चेंबूर
१७८ – धारावी (अनु. जाती)
१७९ – सायन कोळीवाडा
१८० – वडाळा
१८१ – माहीम

**२०१४ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – १४०८२५९
पुरुष – ७७३६४७
महिला –६३४३५८
सैन्यातील मतदार– २५४

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १५१५८९९) (एकूण झालेले मतदान ५९८८४५)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | एकनाथ एम.गायकवाड | भा.रा.काँ. | २५७५२३ |
| २ | सुरेश अनंत गंभीर | शिवसेना | १८१८१७ |
| ३ | श्वेता विवेक परुळकर | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १०८३४१ |

## ३१ – मुंबई दक्षिण



**विधानसभा क्षेत्रे**
१८२ – वरळी
१८३ –शिवडी
१८४ – भायखळा
१८५ – मलबार हिल
१८६ –मुंबादेवी
१८७ – कुलाबा

**२०१४ मतदार यादी :**
एकूण मतदार नोंदणी – १४३७७००
पुरुष – ८०४०३१
महिला –६३३१७०
सैन्यातील मतदार– ४८४

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १५८९८११) (एकूण झालेले मतदान ६४१५७१)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | मिलिंद मुरली देवरा | भा.रा.काँ. | २७२४११ |
| २ | बाळा नांदगावकर | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १५९७२९ |
| ३ | मोहन रावले | शिवसेना | १४६११८ |

## ३२ – रायगड



**विधानसभा क्षेत्रे**
१९१ – पेन
१९२ – अलिबाग
१९३ – श्रीवर्धन
१९४ – महाड
२६३ – दापोली
२६४ – गुहागर

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १५१६३२६
पुरुष – ७४३०६५
महिला –७७०५४३
सैन्यातील मतदार– १७१७

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १३५९८३०) (एकूण झालेले मतदान ७६७६०६)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | अनंत गिते | शिवसेना | ४१३५४६ |
| २ | अब्दुल रहमान अंतुले | भा. रा. काँ. | २६७०२५ |
| ३ | प्रवीण ठाकूर | अपक्ष | ३९,१५९ |

## ३३ – मावळ



**विधानसभा क्षेत्रे**
१८८ – पनवेल
१८९ – कर्जत
१९० – उरण
२०४ – मावळ
२०५ – चिंचवड
२०६ – पिंपरी (अनु. जाती)

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १८९०६७८
पुरुष – १००२०१७
महिला –८८७३१२
सैन्यातील मतदार– १३४९


**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १६०४८८६) (एकूण झालेले मतदान ७१७६१६)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | गजानन बाबर | शिवसेना | ३६४८५७ |
| २ | आझमभाई पानसरे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | २८४२३८ |
| ३ | उमाकांत मिश्रा | ब.स.पा. | २०,४५५ |

## ३४ – पुणे

**विधानसभा क्षेत्रे**
२०८ – वडगाव शेरी
२०९ – शिवाजीनगर
२१० – कोथरूड
२१२ – पर्वती
२१४ – पुणे लष्करी छावणी (अनु. जाती)
२१५ – कसबा पेठ


**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १७७३२८७
पुरुष – १०१७०८७
महिला –८५४३५३
सैन्यातील मतदार– १८४७



(एकूण मतदार १८०६९५३) (एकूण झालेले मतदान ७३४६४१)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | सुरेश कलमाडी | भा. रा. काँ. | २७९९७३ |
| २ | अनिल शिरोळे | भा.ज.पा. | २५४२७२ |
| ३ | रणजित श्रीकांत शिरोळे | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ७५९३० |

## ३५ – बारामती




**विधानसभा क्षेत्रे**
१९९ –दौंड
२०० –इंदापूर
२०१ – बारामती
२०२ – पुरंदर
२०३ – भोर
२११ – खडकवासला

**२०१४ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – १७६१०७८
पुरुष – ९३१८०९
महिला –८२६४२२
सैन्यातील मतदार– २८४७

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १५९३४६०) (एकूण झालेले मतदान ७३४०४८)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | सुप्रिया सुळे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | ४८७८२७ |
| २ | कांता जयसिंग नलावडे | भा.ज.पा. | १५०९९६ |
| ३ | विवेक अनंत कुदळे | ब.स.पा. | २९८६४ |

## ३८ – शिर्डी




**विधानसभा क्षेत्रे**
२१६ – अकोले (अनु. जमाती)
२१७ – संगमनेर
२१८ – शिर्डी
२१९ –कोपरगाव
२२० – श्रीरामपूर (अनु.जाती)
२२१ – नेवासा

**२०१४ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – १४४९७९८
पुरुष – ७६१०१०
महिला –६८६३३९
सैन्यातील मतदार– २३६९

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १३१७८९०) (एकूण झालेले मतदान ६६३८८१)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | भाऊसाहेब राजाराम वाकचौरे | शिवसेना | ३५९९२१ |
| २ | रामदास बंडू आठवले | रिपाई (ए) | २२७१७० |
| ३ | प्रेमानंद दामोदर रुपवते | अपक्ष | २२७८७ |

## ३६– शिरुर




**विधानसभा क्षेत्रे**
१९५ – जुन्नर
१९६ – आंबेगाव
१९७ – खेड आळंदी
१९८ – शिरुर
२०७ – भोसरी
२१३ – हडपसर

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १७६५११९८
पुरुष – ९४०३९८
महिला –८२१६०९
सैन्यातील मतदार– ३११७

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १६३०४६६) (एकूण झालेले मतदान ८३८७२८)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | शिवाजीराव आढळराव–पाटील | शिवसेना | ४८२५६३ |
| २ | विलास विठोबा लांडे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | ३०३९५२ |
| ३ | यशवंत सिताराम झगडे | बहुजन समाज पार्टी | १७४३९ |

## ३९ – बीड




**विधानसभा क्षेत्रे**
२२८ – गेवरा
२२९ – माजलगाव
२३० – बीड
२३१ – आष्टी
२३२ केज
२३३ –परळी

२०१४ मतदार यादी:
**एकूण मतदार नोंदणी –** १७७४६२२
पुरुष – ९५११८१
महिला –८१८६४०
सैन्यातील मतदार– ४७९३

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १६३७२३९) (एकूण झालेले मतदान १०७३९८३)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | गोपीनाथ मुंडे | भाजपा | ५५३९९४ |
| २ | रमेश बाबुराव कोकाटे (आडसकर) | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | ४१३०४२ |
| ३ | मच्छिंद्र बाबुराव मस्के | ब.स.पा. | २५२८४ |

## ३७ – अहमदनगर



**विधानसभा क्षेत्रे**
२२२ – शेवगाव
२२३ – राहुरी
२२४ – पारनेर
२२५ – अहमदनगर शहर
२२६ – श्रीगोंडा
२२७ – कर्जत जामखेड

**२०१४ मतदार यादी :**
एकूण मतदार नोंदणी – १६८०२२०
पुरुष – ८८५८१३
महिला –७८६४५८
सैन्यातील मतदार– ७९४९

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १५१७९५१) (एकूण झालेले मतदान ७८६९८०)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | दिलीपकुमार मनसुखलाल गांधी | भा.ज.पा. | ३१२०४७ |
| २ | शिवाजी भानुदास कर्डिले | कॅम्युनिष्ट पार्टी ऑफ इंडिया | २६५३१६ |
| ३ | राजाळे राजीव अप्पासाहेब | अपक्ष | १५२७९५ |

## ४० – उस्मानाबाद



**विधानसभा क्षेत्रे**
२३९ –औसा
२४० –उमरगा (अनु. जाती)
२४१ – तुळजापूर
२४२ – उस्मानाबाद
२४३ –परांडा
२४६ – बार्शी

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १७१३३९३
पुरुष – ९१७६६९
महिला –७८९९८२
सैन्यातील मतदार–५७४२

**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १६०८८५२) (एकूण झालेले मतदान ९२४५४७)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | पद्मसिंह बाजीराव पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | ४०८८४० |
| २ | रविंद्र विश्वनाथ गायकवाड | शिवसेना | ४०२०५३ |
| ३ | दिवाकर यशवंत नाकाडे | ब.स.पा. | २८०४५ |

## ४१ – लातूर (अ. जा.)

**विधानसभा क्षेत्रे**
८८ – लोहा
२३४ – लातूर ग्रामीण
२३५ – लातूर शहर
२३६ – अहमदपूर,
२३७ – उदगीर (अनु. जाती)
२३८ –निलंगा


**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १६६६९९५
पुरुष – ८८८९८८
महिला –७७४२९८
सैन्यातील मतदार– ३७०९



**२००९ निवडणूक**
(एकूण मतदार १५०९९८७ ) (एकूण झालेले मतदान ८२९३९३)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | जयवंत गंगाराम आवळे | भा.रा.काँ. | ३७२८९० |
| २ | सुनील बळीराम गायकवाड | भा.ज.पा. | ३६४९१५ |
| ३ | ॲड. बाबासाहेब सदाशिवराव गायकवाड | ब.स.पा. | ३४०३३ |

## ४२- सोलापूर (अनुसूचित जाती)



**विधानसभा क्षेत्र**
२४७ – मोहोळ (अनु. जाती)
२४८ – सोलापूर शहर उत्तर
२४९ – सोलापूर शहर मध्य
२५० –अक्कलकोट
२५१ – सोलापूर दक्षिण
२५२ – पंढरपूर

**२०१४ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – १६६७१३३
पुरुष – ८७४४३५
महिला –७९०४३८
सैन्यातील मतदार– २२६०

**२००९ निवडणूक**

(एकूण मतदार १५९४१३८) (एकूण झालेले मतदान ७४३२२२)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | सुशीलकुमार संभाजीराव शिंदे | भा.रा.काँ. | ३८७५९१ |
| २ | ॲड. शरद मारुती बनसोडे | भा.ज.पा. | २८७९५९ |
| ३ | प्रमोद रामचंद्र गायकवाड | ब.स.पा. | ३०४५७ |

## ४५ – सातारा



**विधानसभा क्षेत्र**
२५६ – वाई
२५७ –कोरेगाव
२५९ – कराड उत्तर
२६० – कराड दक्षिण
२६१ – पाटण
२६२ – सातारा


**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १७०१८०८
पुरुष – ८६७७११
महिला –८२५२७६
सैन्यातील मतदार– ८८२१

**२००९ निवडणूक**

(एकूण मतदार १५४६१४६) (एकूण झालेले मतदान ८१६६४६)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | छ. उदयनराजे प्रतापसिंहमहाराज भोसले | राष्ट्रवादी काँग्रेस | ५३२५८३ |
| २ | पुरुषोत्तम बाजीराव जाधव | शिवसेना | २३५०६८ |
| ३ | प्रशांत वसंत चव्हाण | ब.स.पा. | २५,११२ |

## ४३ – माढा



**विधानसभा क्षेत्र**
२४४ –करमाळा
२४५ –माढा
२५३ –सांगोला
२५४ –माळशिरस (अनु. जाती)
२५५ – फलटण (अनु. जाती)
२५८ – मान

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १६९८१४४
पुरुष – ८९५२२३
महिला –७९७००३
सैन्यातील मतदार– ५९१८

**२००९ निवडणूक**

(एकूण मतदार १५५८४४२) (एकूण झालेले मतदान ९१९३७१)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | शरदचंद्र गोविंदराव पवार | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | ५३०५९६ |
| २ | सुभाष सुरेशचंद्र देशमुख | भा.ज.पा. | २१६१३७ |
| ३ | महादेव जगन्नाथ जानकर | राष्ट्रीय समाज पक्ष | ९८९४६ |

## ४६ – रत्नागिरी-सिंधुदुर्ग



**विधानसभा क्षेत्र**
२६५ – चिपळूण
२६६ – रत्नागिरी
२६७ –राजापूर
२६८ – कणकवली
२६९ – कुडाळ
२७० – सावंतवाडी


**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १३५०९५०
पुरुष – ६५५९२८
महिला –६९१९३७
सैन्यातील मतदार– ३०८५

**२००९ निवडणूक**

(एकूण मतदार १२५२२२५) (एकूण झालेले मतदान ७१८७२१)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | डॉ. निलेश नारायण राणे | भा. रा. काँ. | ३५३९१५ |
| २ | सुरेश प्रभाकर प्रभू | शिवसेना | ३०७१६५ |
| ३ | सुरेंद्र बोरकर | अपक्ष | १८,८५८ |

## ४४ – सांगली



**विधानसभा क्षेत्र**
२८१ – मिरज (अनु. जाती)
२८२ – सांगली
२८५ – पलूस-कडेगाव
२८६ – खानपूर
२८७ – तासगांव-कवठेमहांकाळ
२८८ – जत

**२०१४ मतदार यादी**
एकूण मतदार नोंदणी – १६१५७९३
पुरुष – ८३७४७६
महिला –७६९३६६
सैन्यातील मतदार– ८९११

(एकूण मतदार १४९०५७१) (एकूण झालेले मतदान ७७६८३०)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | प्रतिक प्रकाशबापू पाटील | भा.रा.काँ. | ३७८६२० |
| २ | अजितराव शंकरराव घोरपडे | अपक्ष | ३३८८३७ |
| ३ | पटेल एम. जावेद एम. युसुफ | ब.स.पा. | ११७९३ |

## ४७ – कोल्हापूर



**विधानसभा क्षेत्र**
२७१ – चंदगड
२७२ – राधानगरी
२७३ –कागल
२७४ – कोल्हापूर दक्षिण
२७५ –करवीर
२७६ – कोल्हापूर उत्तर
२०१४ मतदार यादी:
**एकूण मतदार नोंदणी – १७३१८३०**
पुरुष – ८८९३९
महिला –८३२९२४
सैन्यातील मतदार– ८९६७

**२००९ निवडणूक**


(एकूण मतदार १५८३०३०) (एकूण झालेले मतदान १०२७८०२)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | सदाशिवराव दादोबा मंडलिक | अपक्ष | ४२८०८२ |
| २ | छत्रपती संभाजीराजे शाहू | राष्ट्रवादी कॉंग्रेस | ३८३२८२ |
| ३ | विजय शामराव देवणे | शिवसेना | १७२८२२ |

## ४८ – हातकणंगले

**विधानसभा क्षेत्र**
२७७ –शाहूवाडी
२७८ –हातकणंगले (अनु. जाती)
२७९ – इचलकरंजी
२८० – शिरोळ
२८३ –इस्लामपूर
२८४ –शिराळा

**२०१४ मतदार यादी:**
एकूण मतदार नोंदणी – १६१४३३६
पुरुष – ८३९४४०
महिला –७७०४४९
सैन्यातील मतदार– ४४१३



**२००९ निवडणूक**

(एकूण मतदार १४५८५६०) (एकूण झालेले मतदान ९७८२०२)

| अ.क्र. | उमेदवार | पक्ष | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| १ | राजू ऊर्फ देवाप्पा अण्णा शेट्टी | स्वाभिमानी पक्ष | ४८१०२५ |
| २ | निवेदिता संभाजीराव माने | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | ३८५९६५ |
| ३ | रघुनाथ रामचंद्र पाटील | शिवसेना | ५५०५० |

## भारतीय निवडणूक पद्धतीचा उदय

# संसदीय लोकशाहीचा प्रवास

**अनिल वळवी**
(उपमुख्य निवडणूक अधिकारी)

**संसद हे सर्वोच्च सभागृह असून राष्ट्रपती, लोकसभा व राज्यसभा मिळून भारतीय संसद बनलेली आहे. दोन्ही सदनाचे निवडून आलेले सदस्य आणि राज्य विधानसभेचे निवडून आलेले सदस्य राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत मतदार असतात. संसदेच्या दोन सदनांपैकी राज्यसभा हे स्थायी सभागृह आहे. राज्यसभेची स्थापना ३ एप्रिल, १९५२ रोजी झाली. पहिली बैठक १३ मे, १९५२ रोजी झाली. पहिले सभापती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी २३ ऑगस्ट, १९५४ रोजी या सभागृहाचे कौन्सिल ऑफ स्टेट (राज्यसभा) असे नामांतर करण्याची घोषणा केली. राज्यघटनेतील अनुच्छेद ८० अन्वये राज्यसभेत जास्तीत जास्त सदस्य संख्या २५० निश्चित करण्यात आली आहे. राज्यसभेची सदस्य संख्या २४५ असून त्यापैकी २३३ सदस्य विविध राज्यातील विधानसभा सदस्यांद्वारे प्रमाणित मतदान पद्धतीने निवडले जातात. राष्ट्रपती १२ सदस्य नामनियुक्त करतात. लोकसभेत विविध राज्यातून ५४५ सदस्य नागरी मतदारांमधून सरळ मतदान पद्धतीने निवडून येतात. भारतीय संसदेच्या निवडणुकांची पार्श्वभूमी ही या सदनाच्या स्थापनेशी निगडित असल्याने या सदनाच्या स्थापनेचा इतिहास माहीत असणे आवश्यक आहे.**

१८५७ च्या उठावानंतर ब्रिटिश शासनाने भारतातील राज्य कारभार ईस्ट इंडिया कंपनीकडून काढून गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १८५८ अन्वये स्वत:च्या ताब्यात घेतला. त्यापूर्वी १७५७ च्या प्लासीच्या लढाईत व १७६४ च्या बक्सारच्या लढाईनंतर बंगाल व बिहार प्रांतातील महसूल गोळा करण्याचे हक्क ईस्ट इंडिया कंपनीला प्राप्त झाले होते. या कंपनीवर ब्रिटिश सरकारचा हस्तक्षेप असावा म्हणून ब्रिटिश पार्लमेंटने रेग्युलेटींग ॲक्ट १७७३ पारित केला. या कायद्यान्वये गव्हर्नर जनरल यांना साहाय्य करण्यासाठी चार सदस्यांच्या परिषदेची (कौन्सिल) तरतूद करण्यात आली. इंग्रजांच्या ताब्यातील मद्रास व मुंबई प्रांत बंगलाच्या गव्हर्नर जनरल यांच्या आधिपत्याखाली आणण्यात आले. याला गव्हर्नर जनरल कौन्सिल किंवा कलकत्ता कौन्सिल म्हणून संबोधण्यात येते. फोर्टविल्यम, कलकत्ता येथे सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. ही कार्यपद्धत १७८४ पर्यंत अमलात होती. १७८४ मध्ये पिटस् ऑफ इंडिया ॲक्ट पारित करण्यात आला. १७८४ च्या कायद्यान्वये कौन्सिलची सदस्य संख्या ६ पर्यंत वाढवण्यात आली. यामध्ये १८५३ पर्यंत जास्त बदल झाले नाहीत. १८५३ च्या कायद्यान्वये सदस्यसंख्या १२ पर्यंत वाढवण्यात आली. भारतात नागरी सेवेसाठी दरवर्षी स्पर्धात्मक परीक्षाद्वारे नियुक्ती करण्यासाठी भारतीय नागरी सेवा परीक्षा सुरू करण्यात आली. मात्र यात भारतीयांना स्थान नव्हते. १८५७ च्या उठावानंतर ब्रिटिश पार्लमेंटने गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १८५८ पारित केला.

### ब्रिटिश शासनाची सत्ता स्थापन

१८५८ च्या कायद्यान्वये भारतावर ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता संपून ब्रिटिश शासनाची सत्ता स्थापन करण्यात आली. गव्हर्नर जनरलची नियुक्ती करण्याचे अधिकार प्राप्त झाले. या कायद्यान्वये भारतासाठी सेक्रेटरी ऑफ स्टेट हे पद निर्माण करण्यात आले. या सेक्रेटरी ऑफ स्टेटला साहाय्य करण्यासाठी सेक्रेटरीची कौन्सिल तयार करण्यात आली. बंगालच्या गव्हर्नर जनरलला व्हाइसरॉय संबोधण्यात आले. लेजिस्लेटिव्ह कौन्सिल कलकत्याला सर्व भारतासाठी कायदे करण्याची शक्ती देण्यात आली. मुंबई व मद्रास प्रांतांच्या कौन्सिलना शासन चालवण्यासाठी त्यांच्या प्रांतांसाठी कायदे करण्याची शक्ती प्रदान करण्यात आली. तसेच गव्हर्नर जनरलला विधान कार्यासाठी नवीन प्रांत निर्माण करण्याची शक्ती प्रदान करण्यात आली. मात्र या विधानमंडळांना फक्त सल्ला देण्याची मर्यादित शक्ती प्रदान करण्यात आली. आर्थिक बाबींवर चर्चा करण्याची परवानगी देण्यात आली नाही. भारतीय नागरी सेवा परीक्षेसाठी भारतीयांना परवानगी देण्यात आली.

१८५८ च्या कायद्यानुसार इंडियन कौन्सिल ॲक्ट १८६१ पारित करण्यात आला. हा ॲक्ट भारतीय संसदेच्या स्थापनेतील महत्त्वाचा टप्पा आहे. यानुसार लेजिस्लेटिव्ह कौन्सिल स्थापन करण्यात आले. या कायद्यान्वये गव्हर्नर जनरलला १२ पर्यंत सदस्य नामनियुक्त करण्याची शक्ती प्राप्त झाली. या कायद्यानुसार १८६२ ते १९९२ पर्यंत एकूण ४५ भारतीय सदस्य नामनिर्देशित झाले. त्यापैकी २५ जमीनदार, ७ संस्थानिक होते. इतरांमध्ये वकील, न्यायाधीश, पत्रकार व व्यापारी होते. मात्र त्यांचा कौन्सिल बैठकींमध्ये सहभाग नगण्य होता.

### भारतीय संसदीय पद्धतीची सुरुवात

त्यानंतर इंडियन कौन्सिल ॲक्ट १८९२ पारित करण्यात आला. ही भारतीय संसदीय पद्धतीची खरी सुरुवात होती. यापूर्वी १८८५ व १८८९ मधील अधिवेशनात इंडियन नॅशनल काँग्रेसने याविषयीचे ठराव पारित केले होते. या कायद्याद्वारे सदस्यसंख्या वाढविण्यात आली. कलकत्ता, मद्रास, मुंबई व उत्तर – पश्चिम प्रांतांना प्रत्येकी एक प्रतिनिधी इंडियन कौन्सिलमध्ये पाठवण्याची तरतूद होती. या कायद्याच्या तरतुदी १९०९ पर्यंत अस्तित्वात होत्या. या कायद्यान्वये



१८९३ ते १९०९ पर्यंत एकूण ३३ सदस्य भारतीय सदस्य कौन्सिल सदस्य म्हणून नामनियुक्त करण्यात आले. त्यात फिरोजशहा मेहता (१८९३ ते १९०१), आगाखान (१९०३), गोपाळकृष्ण गोखले (१९०३–१९०९) यांचा समावेश होतो.


फिरोजशहा मेहता


गोपाळकृष्ण गोखले

१९०९ मध्ये मोर्ले–मिंटो सुधारणांच्या धर्तीवर इंडियन कौन्सिल ॲक्ट १९०९ पारित करण्यात आला. यानुसार भारतीय विधान परिषदेत सदस्यसंख्या ६० पर्यंत वाढवण्यात आली. त्यापैकी २७ सदस्य नव्याने निवडून आले. या सदनात खालीलप्रमाणे सदस्य नियुक्तीचे अधिकार प्राप्त झाले.

व्हाइसरॉयची कौन्सिल ९ सदस्य नामनिर्देशनाने, नामर्देशित कार्यकारी (नॉमिनेटेड ऑफिशिअल) (२९), अकार्यकारी नामनिर्देशित (५) त्यापैकी भारतीय वाणिज्य संघ (१), पंजाबी मुसलमान (१), पंजाबी जमीनदार (१) आणि इतर (२) व प्रांतीय विधान मंडळाद्वारे निवडणुकीने नेमावयाच्या सदस्यांचा तपशिल पुढील प्रमाणे –

१) सर्वसामान्य (१३) मुंबई (२) मद्रास (२) बंगाल (२) युनायटेड प्रांत (२), मध्यप्रांत, आसाम, बिहार व ओरिसा, पंजाब प्रत्येकी एक

२) ६ जमीनदार (सर्व प्रांतातील)

३) मुसलमान (६), बंगाल प्रांत व मुंबई, मद्रास, युनायटेड, बिहार व ओरिसा प्रत्येकी एक

४) व्यापारी (२) बंगाल चेंबर ऑफ कॉमर्स (१) व मुंबई चेंबर ऑफ कॉमर्स (१)

मोर्ले–मिंटो सुधारणांच्या धर्तीवर इंडिया कौन्सिल ॲक्ट १९०९ पारित करण्यात आला. १९०९ च्या कायद्यान्वये मुसलमानांसाठी स्वतंत्र प्रतिनिधित्व देण्यात आले म्हणजेच धार्मिक प्रतिनिधित्व देण्यात आले. १९१९ पर्यंत भारतीय विधान परिषद या एकाच सदनाद्वारे भारतीय संसदेचे कामकाज चालत होते.

**भारतीय संसदेचा पाया**

होमरुल चळवळीच्या धर्तीवर मॉन्टेग्यू चेम्सफोर्ड कमिशन स्थापन करण्यात आले. या कमिशनने १९१८ मध्ये दिलेल्या अहवालाच्या आधारे गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९१९ पारित करण्यात आला. या कायद्यान्वये सध्या अस्तित्वात असलेल्या भारतीय संसदेचा पाया घातला गेला. या कायद्यान्वये संसदेचे दोन सभागृह (१) कौन्सिल ऑफ स्टेट किंवा वरिष्ठ सभागृह व (२) केंद्रीय विधानसभा कनिष्ठ सभागृहाला मान्यता देण्यात आली. कौन्सिल ऑफ स्टेटची सदस्य संख्या ६० ठरविण्यात आली. त्यापैकी गव्हर्नल जनरलच्या नामनिर्देशनाद्वारे (२६) व निवडणुकीद्वारे (३४) सदस्य अशी विभागणी करण्यात आली. निवडणून येणाऱ्या ३४ सदस्यांपैकी सर्वसाधारण (२०) मुस्लीम (१०) उद्योजक (३) व शिख (१) अशी विभागणी होती व प्रांत निहाय विभागणी पुढीलप्रमाणे होती. सर्वसाधारण सदस्य मद्रास (४), मुंबई (३), युनायटेड (३) पंजाब (१) बिहार व ओरिसा (३) मध्यप्रांत (१) व ओरिसा (१) तसेच मुंबई, बंगाल व बर्मा चेंबर ऑफ कॉमर्सचे तीन सदस्य. कौन्सिल ऑफ स्टेट स्थायी स्वरूपाचे असून यातील सदस्यांची मुदत एक वर्षाची ठरवण्यात आली.

कौन्सिल ऑफ स्टेटसाठी जी व्यक्ती वार्षिक रू.१०,०००/– पेक्षा कमी नाही इतक्या उत्पन्नावर आयकर भरते किंवा रू.७५०/– पेक्षा जास्त शेतसारा भरते किंवा जी व्यक्ती विद्यापिठाच्या सिनेटची सदस्य होऊ शकते ती व्यक्ती मतदार म्हणून पात्र ठरविण्यात आली. त्यामुळे एकूण २४ कोटी लोकसंख्येपैकी १७,३६४ एवढ्या व्यक्ती कौन्सिल ऑफ स्टेटच्या मतदार म्हणून पात्र ठरल्या. स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्यात आलेला नव्हता.

केंद्रीय विधानसभेत १४५ सदस्य निश्चित **(पान ३३ वरून)** करण्यात आले. त्यापैकी ४१ सदस्य नामनिर्देशनाने व १०४ सदस्य निवडणुकीद्वारे नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आली. निवडून येणाऱ्या सदस्यांसाठी मतदार संघ निर्माण करण्यात आले ते प्रांत निहाय पुढील प्रमाणे–आसाम (४), बंगाल (१६), बिहार व ओरिसा (१२), मुंबई (१६), बर्मा (४), मध्य प्रांत (५), मद्रास (१६), पंजाब (१२), युनायटेड (१६) व मुंबई व बंगाल चेंबर ऑफ कॉमर्सचे दोन सदस्य. केंद्रीय विधानसभेचा कालावधी तीन वर्षांचा होता .

**भारत दौऱ्यावर असलेले ब्रिटनचे राजपुत्र ड्युक ऑफ कनॉट ऑफ स्टेर्थन यांच्या हस्ते ९ फेब्रुवारी, १९२१ रोजी मेटकॉफ हाऊस, दिल्ली येथे अधिवेशनाची सुरुवात करण्यात आली. १२ फेब्रुवारी, १९२१ रोजी संसद भवनाच्या नवीन इमारतीची पायाभरणी करण्यात आली. १८ जानेवारी, १९२७ रोजी व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरलच्या नवीन इमारतीचा शुभारंभ करण्यात आला. ही इमारत म्हणजे सध्याचे संसद भवन आहे.**

या कायद्याने निवडून येणाऱ्या १०३ सदस्यांपैकी ५१ सर्वसाधारण, ३० मुस्लीम मतदार संघातून, २ शिख, ९ युरोपियन, ७ जमीनदार, ४ उद्योजकांतून नंतर दिल्ली, अजमेर, मेवाड, नॉर्थवेस्ट फ्रन्टीयरकरिता प्रत्येकी एक अशी सदस्यसंख्या ठरवण्यात आली.

केंद्रीय विधानसभेसाठी जी व्यक्ती रू.१८०/– इतके भाडे असू शकणाऱ्या स्वत:च्या किंवा भाड्याच्या घरात राहते अथवा रू.१५/– इतका वार्षिक महापालिका कर भरते किंवा रू.२०००/– इतका वार्षिक आयकर भरते अथवा रू.५०/– इतका वार्षिक शेतसारा भरते ती व्यक्ती मतदार म्हणून पात्र ठरवण्यात आली. यानुसार १९२० च्या निवडणुकीसाठी ९,०९,८७४ इतके मतदार होते.

**सर्वसाधारण निवडणूक १९२०**

१९२० च्या कायद्यानुसार निर्माण करण्यात आलेल्या राज्यसभेच्या व केंद्रीय विधानसभेच्या निवडणुका नोव्हेंबर, १९२० मध्ये घेण्यात आल्या. त्यावेळी भारतात असहकार चळवळ चालू होती. त्यामुळे इंडियन नॅशनल कॉंग्रेसने या निवडणुकीवर बहिष्कार टाकल्याने भाग घेतला नाही.

केंद्रीय विधानसभेत १०४ जागांपैकी ६६ आणि ८ युरोपियन जागांवर निवडणुका झाल्या. तसेच राज्यसभेत कौन्सिल ऑफ स्टेट करिता ३४ पैकी २४ जागा लढवल्या गेल्या. तसेच प्रांतिक सभेच्या निवडणुकांमध्ये ६३७ जागांपैकी ४४० जागा लढवण्यात आल्या. १८८ जागांवर एकच उमेदवार असल्याने या निवडणुका बिनविरोध झाल्या. ६ जागांकरिता एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही.

केंद्रीय विधानसभेत निवडून आलेल्या सदस्यांचे पक्षीय बलाबल पुढीलप्रमाणे होते. डेमोक्रेटिक पक्ष–४८, इतर पक्ष व अपक्ष–४७, युरोपियन–९, एकूण–१०४ डेमोक्रेटिक पक्षाचे नेते हरिसिंग गौर होते.

**(पान ४४ वर)**

# अशा निवडणुका, असे मतदार

शुभा बोरकर

भारताचा निवडणूक आयोग हा राष्ट्रपतींनी नेमलेल्या मुख्य निवडणूक आयुक्त व दोन निवडणूक आयुक्त असा बनलेला आहे. सध्या व्ही. एस. संपत हे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून काम पाहत आहेत. भारत निवडणूक आयोग ही भारत सरकारच्या अखत्यारीतील एक स्वायत्त घटनात्मक संस्था आहे. निवडणूक आयोगाला भारतीय संविधानाच्या चार स्तंभापैकी एक मानले जाते. भारतातील निवडणुकांसाठी निवडणूक आयोग सर्वस्वी जबाबदार आहे. आयोगाची स्थापना दिनांक २५ जानेवारी, १९५० रोजी करण्यात आली. हाच दिनांक भारत निवडणूक आयोगाकडून राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. १९५० पासून भारतात निवडणुका घेतल्या जातात

भारत निवडणूक आयोगाच्या अंतर्गत प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र मुख्य निवडणूक अधिकारी निवडणूकविषयक कामकाज पार पाडीत असतात. प्रत्येक राज्यात मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचे कार्यालय कार्यरत असते. ते भारत निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी म्हणून राज्यात काम करते. आयोगाच्या नियंत्रणाखाली काम करणारे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी हे राज्य शासनाकडे प्रतिनियुक्तीवर काम करीत असल्याचे मानले जाते. महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी, यांचे कार्यालय मंत्रालयात असून सध्या नितीन गद्रे (प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन ), हे मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून कामकाज पाहत आहेत.

**लोकसभा व विधानसभा निवडणुकांव्यतिरिक्त आपल्या देशात आणखी विविध निवडणुका होतात. त्यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या निवडणुका तसेच राज्यसभा व विधानपरिषद या निवडणुकांचा समावेश आहे. या निवडणुकांचे संपूर्ण कामकाज राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयांकडून पार पाडले जाते. या निवडणुकांसाठी सर्वसामान्य जनता मतदान करीत नाहीत. निवडून आलेले खासदार/आमदार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी या निवडणुकांमध्ये मतदान करतात.**

महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागांसाठी तसेच या वर्षअखेरीस विधानसभेच्या २८८ जागांसाठी निवडणूक होणार आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकांव्यतिरिक्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या निवडणुका तसेच राज्यसभा व विधानपरिषद यांचे निवडणूकविषयक कामकाज या कार्यालयाकडून पार पाडले जाते. या निवडणुकांसाठी सर्वसामान्य जनता मतदान करीत नसते. आपण निवडून दिलेले खासदार/आमदार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी मतदान करीत असतात.



**आपल्या देशातील विविध निवडणुका पुढीलप्रमाणे आहेत–**

**राष्ट्रपती / उपराष्ट्रपती निवडणूक** : राष्ट्रपती / उपराष्ट्रपतींची निवडणूक ही राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुका अधिनियम, १९५२ अन्वये घेतली जाते. ही निवडणूक नवी दिल्ली येथील संसद भवनात तसेच सर्व राज्यांत निवडणुकीसाठी नेमून दिलेल्या ठिकाणी घेतली जाते. राष्ट्रपती निवडणुकीसाठी प्रत्येक राज्यातील लोकसभा, राज्यसभा व राज्यातील विधानसभा सदस्य मतदान करतात. उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी फक्त लोकसभा व राज्यसभा सदस्य मतदान करतात. प्रत्येक राज्यातील मुख्य निवडणूक अधिकारी तसेच विधानमंडळाचे प्रधान सचिव/सचिव हे या निवडणुकांसाठी साहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडतात. राष्ट्रपती हे देशातील सर्वोच्च पद असल्याने या निवडणुकीचे महत्त्व फार मोठे आहे.

**राज्यसभा निवडणूक :** भारतीय संविधानानुसार राज्यसभेवर २३८ सदस्य संघराज्यातून निवडणूक पद्धतीने निवडून येतात. १२ सदस्यांची नेमणूक राज्यपालांद्वारा नामनिर्देशनाने केली जाते. महाराष्ट्रातून राज्यसभेवर १९ सदस्य निवडून दिले जातात. या निवडणुकीसाठी विधानसभा सदस्य (Elected Members) मतदान करतात. राज्यसभेवर निवडून दिलेल्या सदस्यांचा कार्यकाल ६ वर्षे इतका असून दर दोन वर्षांनी १/३ सदस्य निवृत्त होतात. त्यांच्या जागी नवीन सदस्य निवडून दिले जातात. ही निवडणूक ओपन बेल्ट पद्धतीने घेतली जाते व पसंतीक्रम मत (preferential Voting) पद्धतीन्वये मतमोजणी केली जाते.

### स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुका

स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी त्या त्या मतदारसंघक्षेत्रातील नगरपालिका, छावणी बोर्ड व जिल्हा परिषद यांचे सदस्य मतदान करतात. यासाठी स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी वरील सदस्यांची स्वतंत्र मतदार यादी तयार केली जाते. राज्यात खाली नमूद केलेल्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुका घेतल्या जातात: – ■ मुंबई स्थानिक प्राधिकारी–२ ■ धुळे तथा नंदूरबार स्थानिक प्राधिकारी–१ ■ जळगांव स्थानिक प्राधिकारी– १ ■ नाशिक स्थानिक प्राधिकारी–१ ■ अहमदनगर स्थानिक प्राधिकारी–१ ■ ठाणे स्थानिक प्राधिकारी–१ ■ रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी–१ ■ पुणे स्थानिक प्राधिकारी–१ ■ कोल्हापूर स्थानिक प्राधिकारी–१ ■ सांगली तथा सातारा स्थानिक प्राधिकारी–१ ■ सोलापूर स्थानिक प्राधिकारी –१ ■ उस्मानाबाद तथा लातूर तथा बीड स्थानिक प्राधिकारी– १ ■ औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी –१ ■ परभणी स्थानिक प्राधिकारी –१ ■ नांदेड स्थानिक प्राधिकारी– १ ■ अकोला तथा वाशिम तथा बुलडाणा



## विधान परिषद निवडणूक

महाराष्ट्र विधान परिषदेची सदस्य संख्या ७८ इतकी आहे. यापैकी ६६ सदस्य निवडणुकीद्वारे निवडून येतात तर १२ सदस्य राज्यपालांद्वारा नामनिर्देशित केले जातात. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५०, कलम १० व तिसऱ्या अनुसूचीनुसार विधान परिषदेवर निवडणुकीद्वारे निवडून येणारे ६६ सदस्य खालीलप्रमाणे निवडून येतात. - ■ विधानसभा सदस्यांद्वारे ३० ■ स्थानिक स्वराज्य संस्थाद्वारे २२ ■ पदवीधर मतदारसंघाद्वारे ७ ■ शिक्षक मतदारसंघाद्वारे ७. यापैकी विधानसभा सदस्यांद्वारे निवडून येणाऱ्या विधानपरिषदेच्या ३० सदस्यांची निवडणूक ही राज्यात सर्वसाधारणपणे विधानभवनात घेण्यात येते. या निवडणुकीसाठी अन्य काही प्रशासकीय कारण न उद्‌भवल्यास प्रधान सचिव/सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहतात. उपसचिव/अवर सचिव दर्जाचे अधिकारी साहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहतात. या निवडणुकीची मतमोजणी पसंतीक्रम मत (Preferential Vote) पद्धतीनुसार केली जाते.

स्थानिक प्राधिकारी-१■ अमरावती स्थानिक प्राधिकारी-१ ■ यवतमाळ स्थानिक प्राधिकारी-१ ■ नागपूर स्थानिक प्राधिकारी- १ ■ भंडारा स्थानिक प्राधिकारी - १ ■ वर्धा तथा चंद्रपूर तथा गडचिरोली स्थानिक प्राधिकारी -१

**पदवीधर मतदासंघ निवडणुका**

पदवीधर मतदासंघ निवडणुकीसाठी, ज्या व्यक्ती त्या मतदारसंघक्षेत्रातील सर्वसाधारण रहिवासी व भारताच्या राज्यक्षेत्रातील कोणत्याही विद्यापीठाची पदवी धारण केल्यानंतर तीन वर्षाचा कालावधी झालेला असेल अशा व्यक्ती मतदान करू शकतात. यासाठी पदवीधर मतदारसंघासाठी स्वतंत्र मतदार यादी तयार केली जाते. महाराष्ट्र राज्यात खाली नमूद केलेल्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुका घेतल्या जातात- ■ मुंबई पदवीधर -१ ■ कोकण विभाग पदवीधर -१ ■ पुणे विभाग पदवीधर -१ ■ नाशिक विभाग पदवीधर - १ ■ औरंगाबाद विभाग पदवीधर -१ ■ अमरावती विभाग पदवीधर -१ ■ नागपूर विभाग पदवीधर -१

**शिक्षक मतदारसंघ निवडणुका**

शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी, ज्या व्यक्ती त्या मतदारसंघक्षेत्रातील सर्वसाधारण रहिवासी आहेत व ज्यांनी मागील ६ वर्षात किमान एकूण ३ वर्षाच्या कालावधीत शासनाच्या अधिनस्त शैक्षणिक संस्थामध्ये शिकवण्याचे काम केले आहे अशा व्यक्ती मतदान करू शकतात. यासाठी शिक्षक मतदारसंघासाठी स्वतंत्र मतदार यादी तयार केली जाते. राज्यात खाली नमूद केलेल्या शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुका घेतल्या जातात:- ■ मुंबई शिक्षक - १ ■ कोकण विभाग शिक्षक -१ ■ पुणे विभाग शिक्षक-१ ■ नाशिक विभाग शिक्षक -१ ■ औरंगाबाद विभाग शिक्षक-१ ■ अमरावती विभाग शिक्षक-१ ■ नागपूर विभाग शिक्षक-१

राज्यपाल नामनियुक्त १२ सदस्य भारतीय संविधानाच्या कलम १७१ (३) ई) व कलम १७१ (५) अन्वये राज्यपाल नामनियुक्त सदस्य (Governor Nominated Candidates) म्हणून अधिसूचित केले जातात.

साहित्य, कला, विज्ञान, सहकार चळवळ, समाजसेवा या क्षेत्रातील विशेष ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव असलेल्या व्यक्तींचे उपरोक्त पदांसाठी नामनिर्देशन केले जाते. सर्वसाधारणपणे मुख्यमंत्री अशा पदांवरील योग्य व्यक्तींची राज्यपालांकडे शिफारस करतात. ह्या शिफारशींचा अभ्यास होऊन त्यातील १२ व्यक्तींच्या नावाची शिफारस राज्यपालांकडून स्वीकृत केली जाते. त्यानंतर या १२ व्यक्तींच्या नावाची राज्यपाल नामनियुक्त सदस्य म्हणून अधिसूचना निर्गमित केली जाते.

❖ ❖

---

## संसदीय लोकशाहीचा प्रवास

**(पान ४२ वरून)**

**प्रांतिक विधानसभांच्या निवडणुका**

यानंतर गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५ पारित करण्यात आला. या कायद्यान्वये प्रांतिक विधानसभांच्या निवडणुका घेण्यात आल्या. मात्र केंद्रीय विधानसभेची निवडणूक घेण्यात आली नाही. दुसरे महायुध्द समाप्त झाल्यानंतर १९ सप्टेंबर, १९४५ रोजी लॉर्ड वेव्हेल यांनी केंद्रीय व प्रांतिक विधानमंडळाच्या निवडणुकांची घोषणा केली. या निवडणुकांनंतर राज्यघटना बनवण्यासाठी कार्यकारी समिती स्थापन करण्याचे घोषित करण्यात आले. ही निवडणूक १९३५ च्या कायद्यानुसार ऑल इंडिया फेडरेशनची निवडणूक म्हणून ३७५ सदस्यांकरिता प्रस्तावित केले होते. मात्र स्थानिक संस्थानानी विरोध दर्शवल्यामुळे ही निवडणूक १९१९ च्या कायद्यानुसार १०२ जागांकरिता घेण्यात आली. या निवडणुकीमध्ये इंडियन नॅशनल काँग्रेसला सर्वात जास्त ५९ जागा मिळाल्या. या निवडणुकीचे पक्षीय बलाबल खालीलप्रमाणे इंडियन नॅशनल काँग्रेस - ५९ (नेते सरत चंद्र बोस), मुस्लिम लिग - ३० (नेते महमद अली जिना), अकाली दल - २, अपक्ष - ३, युरोपियन - ८ (नेते पी.जे. ग्रिफीथ्स). स्थानिक संस्थानिकांनी या निवडणुकीत भाग न घेतल्यामुळे राज्यघटना तयार करण्यासाठी कार्यकारी समिती नियुक्त करण्यासाठी नव्याने निवडणुका घेणे आवश्यक असल्याने ही निवडणूक अल्पजीवी ठरली.

**कौन्सिल ऑफ स्टेट स्थायी सभागृह होते. केंद्रीय विधानसभेची मुदत तीन वर्षाची असल्यामुळे १९२३, १९२६, १९३० व १९३४ यावर्षी यासाठी सर्वसाधारण निवडणुका झाल्या. यामध्ये १९१९ च्या कायद्यानुसार जास्त बदल झाले नव्हते. मात्र १९३४ च्या निवडणुकीमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. त्यामुळे १९३४ चा सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी १४,१५,८९२ एकूण मतदार होते. त्यापैकी निवडणुका लढवल्या गेलेल्या मतदार संघाची मतदार संख्या ११,३५,८९९ होती. त्यापैकी ६,०८,१९८ मतदारांनी मतदान केले. यामध्ये एकूण ८१,६०२ महिला मतदारांपैकी निवडणूक लढवल्या गेलेल्या मतदार संघातील महिला मतदारांची संख्या ६२,७५७ होती, त्यापैकी १४,५०५ महिलांना मतदान केले.**

❖ ❖

# प्रत्येक घटक महत्त्वाचा

**मतदान प्रक्रियेत मतदारांचा सहभाग हा अविभाज्य असून यशस्वी लोकशाही निवडणूक प्रक्रियेसाठी अत्यंत आवश्यक आहे. म्हणून तो निवडणूक व्यवस्थापनाचा महत्त्वाचा घटक ठरतो. समाजातील सर्व स्तरातील मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी त्यांच्यात जागृती करणे आवश्यक आहे. विशेषत: नवीन तरुण, अशिक्षित, दुर्गम भागातील रहिवासी, समाजातील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित समूहांचा यात समावेश होणे आवश्यक ठरते.**

भारत निवडणूक आयोगाने मतदारांच्या सहभागासाठी, शास्त्रीय कृती आराखडा स्वीकारला आहे. त्याद्वारे अधिकाधिक मतदारांचा सहभाग वाढण्यास साहाय्य होत आहे.

मतदारांचे मोठे समूह जे शिक्षण पद्धतीमध्ये समाविष्ट नाहीत किंवा जे निरुत्साही आहेत किंवा जे समाजातील मुख्य प्रवाहापासून प्रत्यक्ष दूर आहेत अशांना, मतदारांच्या जाणीव जागृतीच्या कार्यकक्षेत आणण्यात येत आहे. अशा वंचित समूहांपर्यंत सामाजिक संस्था, स्वयं साहाय्यकांमार्फत व समाजातील दुर्बल व वंचित गटांसाठी काम करणाऱ्या शासकीय विभागामार्फत पोहचले जात आहे.

**उद्दिष्टे आणि लक्ष्य**

सामाजिकदृष्ट्या वंचित व दुर्बल व दुर्लक्षित घटकांपैकी विडी कामगार, ऊसतोड कामगार, तृतीयपंथी लोक यांना स्वीप कार्यक्रमाच्या कक्षेत आणले जात आहेत.

**विडी कामगार :** सोलापूर जिल्हयातील पारंपरिक वस्त्यांमध्ये राहणाऱ्या विडी कामगारांना मतदार नोंदणी करण्यासाठी प्रवृत्त करण्यात येत आहे.

**ऊसतोड कामगार :** बीड जिल्हा हा प्रामुख्याने अवर्षणप्रवण क्षेत्राचा आहे. या जिल्ह्यातील वंजारी समाजातील ऊसतोड कामगार व मजूर दरवर्षीच्या फेब्रुवारी महिन्यापासून विविध कारखान्यांकडे स्थलांतरित होतात. स्वीप कार्यक्रमांतर्गत या ऊसतोड कामगारांची नोंदणी केली जाते.

एप्रिल २००९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीतील मतदानाच्या टक्केवारीवरून असे निदर्शनास आले की, ऊसतोड कामगारांच्या स्थलांतरणामुळे, जिल्हयातील मतदानाची टक्केवारी कमी होती.

त्यामुळे या ऊसतोड कामगारांची नोंदणी करून त्यांच्या नावांचा मतदारयादीत समावेश करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. ज्यांना मतदार छायाचित्र ओळखपत्रे मिळतील त्यांना मतदान करताना उपयोग होईल.सध्याच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेत बीड जिल्ह्यात नाव नोंदणीसाठी एकूण ९५३२० अर्ज प्राप्त झाले आहेत.




**तृतीयपंथी :** तृतीयपंथी संवर्गातील व्यक्तींच्या मतदानाचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी व त्यांना सामाजिक मान्यता मिळवून देण्यासाठी मुंबई व ठाणे जिल्ह्यातील तृतीयपंथी संवर्गातील नोंदणी सामाजिक संस्थांच्या साहाय्याने करण्यात येत आहे.



मुंबई उपनगर जिल्हयातील १५७ भांडूप (प.) विधानसभा मतदारसंघात तृतीयपंथी व वेश्या व्यवसाय करणारे दोन गट शोधण्यात आले. या गटांसाठी काम करणाऱ्या प्रेमकिरण संस्थेच्या प्रतिनिधींची १५७ - भांडूप (प.) मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी यांनी बैठक घेवून संबंधित गटातील व्यक्तींना नावनोंदणी करण्यासाठी आवाहन केले. १८ तृतीयपंथी लोकांनी चालू पुनरीक्षण मोहिमेत नाव नोंदणीसाठी अर्ज भरुन दिले आहेत.

**लोकशाही पद्धतीमध्ये स्वीप कार्यक्रमाची भूमिका**

भारत निवडणूक आयोगाने तयार केलेल्या मतदार शिक्षण व सहभागाच्या कार्यक्रमाची जास्तीत जास्त अंमलबजावणी करण्याबाबत प्रयत्न केले जात आहेत. स्वीप कार्यक्रम हा मतदार जागृतीचा महत्त्वाचा भाग आहे. निवडणूक प्रक्रियेमध्ये त्यास अत्यंत महत्त्व आहे. त्यामुळे हा कार्यक्रम निवडणुकीचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. या कार्यक्रमामुळे तरुणांचा मतदार नोंदणीमधील सहभाग वाढला असून, लोकशाही सबळीकरणाचा तो एक महत्त्वाचा दुवा समजला जात आहे.

स्वीपच्या माध्यमातून शाळा-महाविद्यालयातील तरुणांमध्ये मतदानाच्या महत्त्वाविषयी मोठ्या प्रमाणावर जाणीव जागृत झाली आहे. त्यामुळे त्यांचा प्रत्यक्ष मतदानातील सहभाग वाढण्याची शक्यता आहे. हेच लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अभिप्रेत आहे. भारत निवडणूक आयोगाला या लोकशाहीमध्ये ज्या निरनिराळ्या निवडणुका पार पाडाव्या लागतात त्यामध्ये निवडणुका या नि:पक्षपाती व शांततेत पार पाडणे अत्यंत महत्त्वाचे असते. स्वीप कार्यक्रमामुळे प्रत्यक्ष निवडणुकीतील मतदारांचा सहभाग वाढून निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक यशस्वी होऊ शकते. त्यामुळेच निवडणूक प्रक्रियेतील स्वीप हा महत्त्वाचा घटक मानला जात आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून, १८ वर्षे पूर्ण होत आहेत. अशा नवमतदारांची नांव नोंदणी करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मतदार ओळखपत्र हे या तरुणांच्या ओळखीचा महत्त्वाचा पुरावा निर्माण झाला आहे. आपल्याला प्राप्त झालेल्या मतदान अधिकाराचा यथायोग्य उपयोग करून घेण्याची त्यांच्यामध्ये निर्णयशक्ती निर्माण होत आहे.

# मागे वळून पाहताना...

वसंत वासुदेव देशपांडे

२६ जानेवारी, १९५० रोजी भारतीय सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताकाची घटना अमलात आली. या घटनेनुसार प्रौढ मतदानावर आधारित पहिल्या सार्वत्रिक निवडणूक १९५१-५२ मध्ये झाली. १९५१-५२ मधील पहिल्या निवडणुकीपासून १९५७, १९६२ आणि १९६७ मध्ये लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका एकाचवेळी झाल्या. मात्र १९७१ मध्ये तत्कालीन पंतप्रधानांनी लोकसभेच्या मदतपूर्व निवडणुकांचा निर्णय घेतला. त्यामुळे तेव्हापासून देशभर लोकसभा व राज्यांच्या विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्याचे वेळापत्रक बदलून गेले. १९९९ मध्ये महाराष्ट्रात लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकाबरोबरच राज्यात विधानसभेच्या निवडणुका घेण्यासाठी विधानसभा काही महिने आधी विसर्जित करण्यात आली. त्यामुळे त्या वर्षी महाराष्ट्रात ५ आणि ९ सप्टेंबर रोजी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचे एकत्रित मतदान झाले.




**प्रौढ मतदानावर आधारित पहिल्या सार्वत्रिक निवडणुका १९५१-५२ मध्ये झाल्या. या पहिल्या निवडणुकांपासून १९५७, १९६२ आणि १९६७ मध्ये लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी झाल्या. मात्र १९७१ मध्ये लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुका झाल्या. त्यामुळे तेव्हापासून देशभर लोकसभा व राज्यांच्या विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्याचे वेळापत्रक बदलून गेले. लोकसभा निवडणुकींचे मतदान महाराष्ट्रात साधारणतः दोन किंवा तीन टप्प्यात होत असते.**

### लोकसभा निवडणुकींचे मतदान दोन किंवा तीन टप्प्यात

लोकसभा निवडणुकींचे मतदान महाराष्ट्रात साधारणत: दोन किंवा तीन टप्प्यात होत असते. १९५१-५२ आणि १९५७ मधील पहिल्या दोन निवडणुकांच्या वेळी देशभर निवडणूक आयोगाने प्रत्येक उमेदवारास स्वतंत्र मतपेटी देऊन, मतदाराने आपल्या पसंतीच्या उमेदवाराच्या मतपेटीत मतदान पत्रिका टाकण्याची पद्धती अवलंबली होती. उमेदवाराचे निवडणूक चिन्ह त्याच्या मतपेटीवर चिकटविलेले असे. मतमोजणीच्या वेळी त्या त्या उमेदवाराच्या मतपेटीतील मतपत्रिका मोजल्या की निकालाचे काम सोपे होत असे. मात्र १९६२ च्या निवडणूकीपासून निवडणूक आयोगाने या पद्धतीत बदल करून मतपत्रिकेवर उमेदवारांची नावे छापण्याची आणि मतदाराने आपल्या पसंतीच्या उमेदवाराच्या नावापुढील निवडणूक चिन्हावर शिक्का मारून मतदान करण्याची पद्धती सुरू केली. १९९८ पासून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याची पद्धत अवलंबण्यात आली. आता तीच पद्धत चालू आहे.

### दुसऱ्या किंवा तिसऱ्या टप्प्यातील मतदानावर निकालांचा परिणाम

आता निवडणूक प्रक्रियेत मतदानाचे सर्व टप्पे पार पडल्यांनतरच मतमोजणी सुरू होते. परंतु पहिल्या दोन निवडणुकांच्या वेळी मतदानाचा पहिला टप्पा संपला की, त्या मतदारसंघात मतमोजणी होऊन निकाल जाहीर होई. त्यामुळे दुसऱ्या किंवा तिसऱ्या टप्प्यातील मतदानावर या निवडणूक निकालांचा परिणाम होई. १९५७ च्या निवडणुकीत महाराष्ट्रात या परिणामाची प्रकर्षाने प्रचिती आली.

### स्वतंत्र मतपेटी

१९५७ च्या निवडणुकीत प्रत्येक उमेदवारासाठी स्वतंत्र मतपेटी होती. त्यावेळी आचार्य अत्रे मुंबईतील गिरगाव मतदार संघातून विधानसभेची निवडणूक लढवत होते मतदान समाप्त झाल्यांनतर आचार्य अत्रे यांच्या काही मतपेट्या पळवण्यात आल्याच्या अफवेने खळबळ उडाली होती. समितीच्या अनेक स्वयंसेवकांनी मतदान केंद्राकडे धाव घेतली. तेव्हा असा काही प्रकार झाला नसल्याचे स्पष्ट झाले. महाराष्ट्रात १९६७ निवडणुकांपर्यंत लोकसभा व विधानसभा निवडणुका एकाचवेळी होत होत्या या निवडणुकांमध्ये राज्यातील मतदारांची विशाल दृष्टी दिसून आली.

१९६७ च्या निवडणुकांपर्यंत लोकसभा व विधानसभा निवडणुका एकाचवेळी होत असल्याने लोकसभा निणवडणुकीतील दिग्गज उमेदवाराच्या एकूण प्रचाराचा लाभ काही प्रमाणात विधानसभा निवडणुकीतील त्या पक्षाच्या उमेदवारास होत असे. १९७१ पासून लोकसभेच्या निवडणुका अलगपणे होऊ लागल्यामुळे हे समीकरण रद्द झाले. १९७१ च्या लोकसभेच्या निवडणुका १९७६ मध्ये होणे अपेक्षित होते. पण त्या तेव्हा न होता मार्च १९७७ मध्ये झाल्या. या निवडणुकांनी इतिहास घडवला असे म्हणता येईल. उत्तरेकडील अनेक राज्यात सत्ताधारी पक्षाचा पराभव झाला.

१९६२ मध्ये महाराष्ट्रात लोकसभेच्या ४४ जागा होत्या. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर १९६७ मध्ये त्या ४५ आणि १९७७ मध्ये ४८ झाल्या. त्यापूर्वी मतदारसंघ पुनर्रचनेत ४८ जागाच राहतील, त्यात वाढ होणार नाही असा निर्णय झाल्याने सन २००९ मध्ये झालेल्या निवडणुकीतही ४८ जागाच कायम राहिल्या आहेत.

महाराष्ट्रामध्ये १९५१-५२ पासून लोकसभेच्या प्रत्येक निवडणुकीत काही निकाल वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहेत. अनेक दिग्गजांना वेळोवेळी अपयशाचा सामना करावा लागला. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कॉम्रेड डांगे, अशोक मेहता, व्ही. के. कृष्णमेनन आदींचा उल्लेख करावा लागेल.

❖❖

# तज्ज्ञांचे मार्गदर्शन

आपल्या देशात निवडणुका घेण्याचे काम भारत निवडणूक आयोग यांच्याकडून पार पाडले जाते. आयोगाकडे स्वत:चे कर्मचारी फार कमी आहेत. हा आयोग प्रशासनातील विविध खात्यांमध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्या साहाय्याने निवडणुका पार पाडतो. विविध खात्यांमधील अधिकारी आणि कर्मचारी निवडणुकीसाठी उसनवारी तत्वावर घेतले जातात. निवडणुका खुल्या वातावरणात व योग्यरीतीने पार पाडण्यासाठी या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे असते. त्यांच्या साहाय्याने निवडणुका निर्विघ्नपणे पार पाडल्या जातात.

या प्रशिक्षणासाठी भारत निवडणूक आयोगांतर्गत नवी दिल्ली येथे इंडिया इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रॅसी अ‍ॅण्ड इलेक्शन मॅनेजमेंट (IIIDEM) ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेत निवडणुकीशी संबंधित सर्व विषयांवर प्रशिक्षण दिले जाते.

**निवडणुका खुल्या वातावरणात व योग्यरीतीने पार पाडण्यासाठी या सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे गरजेचे असते. या प्रशिक्षणासाठी नवी दिल्ली येथील इंडिया इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रॅसी अ‍ॅण्ड इलेक्शन मॅनेजमेंट या संस्थेत निवडणुकीशी संबंधीत सर्व विषयांवर प्रशिक्षण दिले जाते.**

प्रसाद वि. कुलकर्णी

### त्रिस्तरीय प्रशिक्षण

**पहिला स्तर :** या स्तरावर राज्यात निवडणुकीचे कामकाज हाताळणारे जिल्हास्तरीय प्रमुख अधिकारी उदा. उप जिल्हा निवडणूक अधिकारी यांना IIIDEM, येथे संपूर्ण प्रशिक्षण दिले जाते. या अधिकाऱ्यांना प्रशिक्षित केल्यावर त्यांना स्टेट लेव्हल मास्टर ट्रेनर (State Level Master Trainer-SLMT) असे संबोधले जाते.

**दुसरा स्तर :** या स्तरावर IIIDEM, येथे प्रशिक्षित झालेल्या स्टेट लेव्हल मास्टर ट्रेनर यांनी त्यांच्या जिल्ह्यातील विधानसभा स्तरावर निवडणुकीचे कामकाज हाताळणाऱ्या अधिकाऱ्यांना उदा. ERO, AERO यांना प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. या स्तरावर प्रशिक्षित केलेल्या अधिकाऱ्यांना असेम्बली लेव्हल मास्टर ट्रेनर (Assembly Level Master Trainer– ALMT) असे संबोधले जाते.

**तिसरा स्तर :** या स्तरावर असेम्बली लेव्हल मास्टर ट्रेनर तालुका स्तरावरील तसेच गाव स्तरावरील अधिकारी आणि कर्मचारी उदा. मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना प्रशिक्षित करणे अपेक्षित आहे.

या प्रशिक्षणाव्यतिरिक्त राज्यातील आयकर विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग, पोलीस विभाग इत्यादी विभागातील अधिकाऱ्यांना त्यांच्या विभागाशी संबंधीत बाबींची निवडणुकीशी संबंधित बाबींशी सांगड घालून निवडणूक प्रक्रिया निवडणूक कायद्यातील तरतुदींच्या अधीन राहून पार पाडण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण दिले जाते.

प्रशिक्षणाच्या प्रत्येक सत्रात विषयाची इत्यंभूत माहिती देण्यात येते. तसेच प्रत्येकाच्या शंकेचे समाधान केले जाते. अधिकारी आणि कर्मचारी यांना निवडणुकीच्या वेळेस कोणतीही अडचण भासू नये याची काळजी या प्रशिक्षणात घेतली जाते. प्रशिक्षणानंतर त्यांची परीक्षा घेऊन निवडणूक प्रक्रिया किती प्रमाणात समजली आहे याची खात्री केली जाते. प्रशिक्षण, प्रशिक्षक आणि प्रशिक्षण देण्याच्या पद्धतीबाबत मते व सूचना प्रशिक्षणार्थींकडून विचारल्या जातात. ही मते आणि सूचनांच्या आधारे प्रशिक्षणाच्या संदर्भात योग्य त्या सुधारणा केल्या जातात.

देशातील निवडणुका निर्भय व नि:पक्षपाती होण्यासाठी तसेच निवडणूक कायद्यातील तरतुदींच्या अधीन राहून होण्यासाठी निवडणूक प्रक्रियेची अंमलबजावणी करण्यासाठी अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे किती महत्वाचे आहे हे स्पष्ट होते. यासाठी IIIDEM, या संस्थेकडून वर्षाचे प्रशिक्षण कॅलेंडर तयार केले जाते. त्यानुसार विविध गटांत विविध विषयांवर प्रशिक्षण आयोजित केले जातात. यामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी यापूर्वी प्रशिक्षण घेतले आहे त्यांना त्यांच्या निवडणुकीशी संबंधीत ज्ञानाची उजळणी होण्यासाठी व अधिकचे ज्ञान प्राप्तीसाठी उजळणी पाठ्यक्रमसुद्धा उपलब्ध करून दिले आहेत.

### प्रशिक्षण साहित्य

या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण साहित्य भारत निवडणूक आयोगाकडून उपलब्ध करून दिले जाते. या साहित्यांच्या आधारे तसेच राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन त्या त्या पातळीवर प्रशिक्षण साहित्य तयार केले जाते व या सर्वांचा प्रशिक्षणासाठी उपयोग केला जातो. या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थ्यांना सुलभ रीतीने समजण्यासाठी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनचा वापर केला जातो.

आयोगाकडून प्रशिक्षणासाठी आवश्यक त्या सोयी– सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असल्या तरीही राज्यातील निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना योग्य ते प्रशिक्षण देण्याची जबाबदारी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य या कार्यालयावर आहे. त्यामुळे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय राज्यातील अधिकाऱ्यांना IIIDEM, येथे प्रशिक्षणासाठी पाठवित असते. तसेच त्या ठिकाणी प्रशिक्षित झालेल्या अधिकाऱ्यांमार्फत जिल्हा, तालुका, गाव पातळीवरील विविध अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करते. यासाठी विविध ठिकाणी विविध विषयांवर प्रशिक्षण आयोजित केली जातात. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आवश्यकता भासल्यास भारत निवडणूक आयोगातील विषयतज्ज्ञांना राज्यात आमंत्रित करून राज्यातील अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रशिक्षण देते. अशा प्रकारे निवडणुका योग्यरीतीने पार पाडण्यासाठी राज्यातील जास्तीत जास्त अधिकारी आणि कर्मचारी यांना मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षणासाठी प्रोत्साहन देणे, प्रशिक्षणाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय पार पाडते. ❖❖

# प्रत्येक टप्पा महत्त्वाचा

**भारत हे एक संघराज्य आहे. राष्ट्रीय स्तरावर शासनाचे प्रमुख पंतप्रधान असून त्यांची निवड लोकसभेमधील निवडून आलेल्या सदस्यांकडून केली जाते. लोकसभा हे भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे. राष्ट्रपती यांनी नामनिर्देशित केलेले दोन सदस्य सोडून लोकसभेच्या इतर सर्व सदस्यांची निवड सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पौढ मताधिकाराद्वारे ५ वर्षासाठी केली जाते. राज्यसभा हे संसदेचे वरिष्ठ सभागृह असून त्यामधील सदस्यांची निवड राज्यातील विधानसभेमधील सदस्य व केंद्रशासित प्रदेशातील निर्वाचन क्षेत्रातून केली जाते.**

भारतीय संसद संघराज्याची प्रमुख असून त्यामध्ये विधानपालिकेची दोन सभागृह आहेत. भारताच्या राष्ट्रपतींची निवड ५ वर्षासाठी संसदेतील दोन्ही सभागृहाचे सदस्य व राज्यातील विधानसभेचे निर्वाचित सदस्य यांच्याकडून होते. भारतीय राज्यघटनेनुसार सध्या लोकसभेमध्ये ५४५ सदस्य असून त्यापैकी ५४३ सदस्य हे निवडणुकीद्वारे ५ वर्षासाठी व २ सदस्य अँग्लो इंडियन समाजाचे प्रतिनिधित्व करतात. सर्व सदस्य बहुमताने निवडून येतात. राज्यसभेमध्ये सध्या २४५ सदस्य असून त्यापैकी २३३ सदस्य ६ वर्षाच्या कालावधीसाठी असून त्यापैकी १/३ सदस्य दर दोन वर्षानी निवृत्त होतात. राज्यसभेतील सदस्य अप्रत्यक्षपणे राज्यातील निर्वाचित सदस्य व केंद्रशासित प्रदेशातील निर्वाचित सदस्यांकडून निवडून येतात. निर्वाचित सदस्यांची निवड एकमताधिकाराद्वारे केली जाते. उर्वरित नामनिर्देशित १२ सदस्यांची निवड विज्ञान, साहित्य, कला, वाणिज्य, क्रीडा, पत्रकार अशा क्षेत्रातील नामवंत व्यक्तींमधून केली जाते.

**निवडणुकीनंतर**

निवडणुकीच्या दिवसानंतर सर्व ईव्हिएम यंत्रे पक्क्या खोलीमध्ये अतिसुरक्षेत ठेवली जातात. निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यातील निवडणुकीनंतर सर्व लोकसभा मतदारसंघाची एकाच दिवशी मतमोजणी केली जाते. ज्या उमेदवारास जास्त मते पडतात, त्यास त्या निर्वाचन क्षेत्राचा प्रतिनिधी म्हणून घोषित केले जाते. कोणत्याही एका राजकीय पक्षाला बहुमत मिळाले असल्यास त्यांना नवीन सरकार स्थापन करण्यासाठी राष्ट्रपती आमंत्रित करतात. त्या राजकीय पक्षाला लोकसभेमध्ये त्याचे बहुमत गुप्त मतदानाद्वारे (५०%) सिद्ध करावे लागते.

**निवडणूक प्रक्रिया**

भारतात राज्य विधानसभा निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता १ महिन्याचा कालावधी लागतो. भारतामध्ये निवडणूक घेण्याकरिता निवडणूकीपूर्वी मतदारयाद्यांची प्रसिद्धी करणे अत्यंत आवश्यक आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक मतदारास मतदान करण्याची पात्रता ठरवून दिलेली आहे. भारताचा रहिवासी असलेला व १८ वर्षे पूर्ण झालेली व्यक्ती ही मतदारयादीमध्ये नावनोंदणी करण्यास पात्र आहे व नोंदणी करणे ही त्याची जबाबदारीसुद्धा आहे.

**निवडणूकपूर्व प्रक्रिया**

निवडणूक प्रकियेमध्ये नामनिर्देशन, मतदान व मतमोजणी केली जाते. आदर्श आचारसंहिता जाहीर केलेल्या तारखेपासून अस्तित्वात येते. आचारसंहितेमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाला प्रचारसभा घेता येत नाही. प्रचार हा निवडणुकीच्या दिवसाच्या ४८ तासापूर्वी थांबविला जातो.

**निवडणुकीचा दिवस**

निवडणुकीच्या दिवशी सर्व शासकीय शाळा व महाविद्यालयांची मतदान केंद्र म्हणून निवड केली जाते. प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे मतदानाचे प्रभारी अधिकारी असतात. मतदान केंद्रावर शासकीय कर्मचाऱ्यांची निवड केली जाते. मतपत्रिकेऐवजी ईव्हिएम यंत्राचा वापर केल्याने मतदान केंद्रावर कब्जा किंवा फसवणूक होत नाही. मतदान करणाऱ्या मतदाराच्या डाव्या हाताच्या बोटाला मतदान केल्याची निशाणी म्हणून पक्या शाईची खूण केली जाते व बोगस मतदान होऊ नये म्हणून ही पद्धत १९६२ पासून अमलात आणण्यात आली आहे.

( पान ५२ वर )

## निवडणुकीचा इतिहास

लोकसभा ही पौढ मताधिकाराने प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून आलेले जनप्रतिनिधी मिळून तयार झाली आहे. लोकसभेतील कमाल सदस्य संख्या ५५२ असून त्यापैकी ५३० सदस्य राज्याचे प्रतिनिधित्व करतात. २० सदस्य केंद्रशासित प्रदेशातून प्रतिनिधित्व करतात.

| | |
|---|---|
| पहिली लोकसभा | – १९५१-५२ |
| दुसरी लोकसभा | – १९५७ |
| तिसरी लोकसभा | – १९६२ |
| चौथी लोकसभा | – १९६७ |
| पाचवी लोकसभा | – १९७१ |
| सहावी लोकसभा | – १९७७ |
| सातवी लोकसभा | – १९८० |
| आठवी लोकसभा | – १९८४-८५ |
| नववी लोकसभा | – १९८९ |
| दहावी लोकसभा | – १९९१ |
| अकरावी लोकसभा | – १९९६ |
| बारावी लोकसभा | – १९९८ |
| तेरावी लोकसभा | – १९९९ |
| चौदावी लोकसभा | – २००४ |
| पंधरावी लोकसभा | – २००९ |



# अशी झाली पहिली निवडणूक

भारताला जरी १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले असले तरी खऱ्या अर्थाने स्वतंत्र भारतात लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या सरकारची स्थापना व्हायला चार वर्षे लागली.

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशाच्या संसदेला इंपिरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिल हाऊस असे म्हटले जात असे आणि त्याची दोन सभागृहे म्हणजे कौन्सिल ऑफ स्टेट्स अप्पर हाऊस, जे आजची राज्यसभा आहे आणि दुसऱ्या सभागृहाला सेंट्रल लेजिस्लेटिव्ह कौन्सिल (लोअर हाऊस), जी आजची लोकसभा आहे, असे संबोधले जायचे.

देशातील पहिली सार्वत्रिक निवडणूक १९२० साली सेंट्रल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलकरिता  घेण्यात आली , पण ही निवडणूक ब्रिटिश राजवटीत झाली. प्राचीन भारतात लोकशाही अस्तित्वात होती याचे अनेक ऐतिहासिक संदर्भ आहेत .

देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आपली राज्यघटना तयार नव्हती आणि आपण संसदीय पद्धतीचे सरकार स्वीकारणार की अध्यक्षीय हे ठरले नव्हते. स्वातंत्र्य मिळाल्यावर पंडित जवाहरलाल नेहरू अंतरिम सरकारचे पंतप्रधान झाले. संविधान सभेत नोव्हेंबर २६, १९४९ रोजी घटनेचा स्वीकार करण्यात आला. जानेवारी २६,१९५० पासून संविधान अंमलात आल्याने स्वतंत्र भारताची पहिली सार्वत्रिक निवडणूक  घेण्याचा मार्ग मोकळा झाला.

**निवडणूक आयोगाची स्थापना**

फक्त पहिलीच सार्वत्रिक  निवडणूक  नव्हे तर सर्वच निवडणुका सरकार प्रभावाविना पार पडाव्यात हे मोठे आव्हान होते. मात्र संविधान रचेत्यांनी याची काळजी घेतली होती. निवडणूक आयोग ही वैधानिक संस्था स्थापन करण्यात आली. या आयोगावर मुक्तपणे निवडणुका घेण्याची जबाबदारी टाकण्यात आली.

निवडणूक आयोगाची स्थापना जानेवारी २५, १९५० रोजी झाली.  मुख्य निवडणूक आयुक्तांनी मार्च २१, १९५० रोजी पदभार स्वीकारला. निवडणुका १९५० मध्ये घेतल्या जातील असे गृहीत धरण्यात आले होते. पण विविध कारणांमुळे ते शक्य झाले नाही. एक तर निवडणूक कायदा पारित झाला नव्हता तसेच घटनात्मक तरतुदींनुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे राखीव मतदारसंघांची रचना राष्ट्रपतींच्या आदेशानुसार बनवणे बाकी होते. मतदारसंघांची रचना तसेच मतदारांच्या याद्या तयार झाल्या नव्हत्या.

एप्रिल १९, १९५० रोजी संसदेत निवेदन करताना पंतप्रधान नेहरू यांनी आशा व्यक्त केली की, १९५१ मध्ये निवडणुका घेतल्या जातील.

**सार्वत्रिक  निवडणुका**

सार्वत्रिक  निवडणुका लोककप्रतिनिधी कायदा, (१९५१) च्या अंतर्गत घेण्यात आल्या. या कायद्याचे मूळ १९५० सालच्या लोक प्रतिनिधी कायद्यात होते. लोककप्रतिनिधी कायदा, (१९५१) च्या कलम १४च्या अनुसार  विद्यमान सभागृहाचा कालावधी पूर्ण होताच किंवा सभागृह बरखास्त करण्यात आल्यावर लोकप्रतिनिधींच्या नवीन सभागृहाचे गठन करण्यासाठी सार्वत्रिक निवडणुका घेण्यात याव्यात मात्र या वेळी, जुने सभागृह बरखास्त करून प्रथमच लोकसभेचे गठन व्हायचे होते.



जगभरात अनेकांना भारतात लोकशाही यशस्वी होईल का याबद्दल शंका होती. बीबीसी (ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनने) भारतातील प्रथम सार्वत्रिक निवडणुकांच्या बातमीत  म्हटले होते की भारतात फक्त १५ टक्के लोक साक्षर आहेत. या पार्श्वभूमीवर निवडणूक व्यवस्थित होणे आणि लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या सरकारची स्थापना होणे देशासाठी फार महत्त्वाचे होते.

**देशातील पहिली सार्वत्रिक निवडणूक १९२० साली सेंट्रल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलकरिता  घेण्यात आली. पण ही निवडणूक ब्रिटिश राजवटीत झाली. प्राचीन भारतात लोकशाही अस्तित्वात होती याचे अनेक ऐतिहासिक संदर्भ आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आपली राज्यघटना तयार नव्हती आणि आपण संसदीय पद्धतीचे सरकार स्वीकारणार की अध्यक्षीय हे ठरले नव्हते. स्वातंत्र्य मिळाल्यावर पंडित जवाहरलाल नेहरू अंतरिम सरकारचे पंतप्रधान झाले. संविधान सभेत नोव्हेंबर २६, १९४९ रोजी घटनेचा स्वीकार करण्यात आला. जानेवारी २६,१९५० पासून संविधान अंमलात आल्याने स्वतंत्र भारताची पहिली सार्वत्रिक निवडणूक  घेण्याचा मार्ग मोकळा झाला. निवडणूक आयोग ही वैधानिक संस्था २५ जानेवारी १९५० रोजी स्थापन करण्यात आली. या आयोगावर मुक्तपणे निवडणुका घेण्याची जबाबदारी टाकण्यात आली.**

**प्रांतीय विधिमंडळांसाठी निवडणुका**

या अगोदर प्रांतीय विधिमंडळांकरिता निवडणुका घेण्यात आल्या होत्या. पण या निवडणुका सर्व प्रौढांना मताचा अधिकार देणाऱ्या नव्हत्या. या निवडणुकांमध्ये मतदानाचा अधिकार करदाते, साक्षरता, जात, धर्म आणि मालमत्ता यावर आधारित होता. याला एक अपवाद होता तो त्रावणकोरचा. जेथे१९४८ मध्ये सार्वत्रिक प्रौढ मतदानाचा अधिकार देण्यात आला होता. देशातील काही मंडळी सरसकट, प्रौढांना मतदानाचा अधिकार देण्यास विरोध करत होती. तरीदेखील असा अधिकार देण्याची भूमिका मांडणाऱ्यांची संख्या कमी नव्हती. अखेर, दोन्ही बाजूंच्या भूमिकांचा विचार लक्षात घेऊन १९२८ मध्ये नेहरू समितीने सार्वत्रिक प्रौढ मतदानाची शिफारस केली. नेहरू समिती ही भारतीय संविधानाची मूलतत्त्वे निश्चित करण्यासाठी रचण्यात आलेली सर्वपक्षीय समिती होती.

**सार्वत्रिक प्रौढ मतदानाची शिफारस**

हे तत्त्व स्वीकारल्यावरही काही मंडळींची मागणी होती की याचा

समावेश संविधानाच्या मूलभूत हक्कांमध्ये व्हावा. भारतीय जनतेवर विश्वास ठेवून संविधानाच्या रचेत्यांनी सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या अधिकाराचा स्वीकार करून, त्याचा संविधानाच्या अनुच्छेद ३२६ मध्ये समावेश केला. संविधानाच्या अनुच्छेद ३२६ अनुसार लोकसभा आणि विधाननसभेच्या निवडणुका प्रौढ मतदान अधिकारानुसार घेतल्या जातील.

बहुतांश मतदार निरक्षर असल्याने त्यांना मतपत्रिकेवरील उमेदवार आणि राजकीय पक्षांची नावे वाचता येणार नाहीत. आणि त्यामुळे मतदान करताना त्यांना कुणाची तरी मदत घ्यावी लागेल आणि अशाप्रकारे मतदानाची गुप्तता राहणार नाही अशी रास्त भीती व्यक्त करण्यात आली. तसेच निरक्षरांना मतदानाचा अधिकार देणे चुकीचे आहे अशी टीकादेखील करण्यात आली. पण यातून मार्ग काढण्यात आला. राजकीय पक्ष तसेच अपक्ष उमेदवारांना चिन्हे देण्यात यावी, असे ठरले.

### निवडणूक चिन्हांचे वाटप

निवडणूक चिन्हांच्या वाटपासंबंधी चर्चा करण्यासाठी निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या बैठकीचे नवी दिल्ली येथे आयोजन केले. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, अखिल भारतीय फॉरवर्ड ब्लॉक (रूईकर गट), अखिल भारतीय फॉरवर्ड ब्लॉक (मार्क्सवादी गट), अखिल भारतीय हिंदुमहासभा, किसान मजदूर प्रजा पार्टी, अखिल भारतीय रामराज्य परिषद आणि सोशलिस्ट पार्टी चे प्रतिनिधी उपस्थित होते. हजर असलेल्या पक्ष प्रतिनिधींनी आपल्या पक्षाचे कोणत्या चिन्हाला प्राधान्य आहे ते सांगितले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने आपली पसंती आयोगाकडे लेखी पाठवली.

निवडणूक आयोगाने ऑगस्ट २ आणि १७, १९५१ रोजी दोन टप्प्यांत पक्षवार चिन्हांची घोषणा केली. ऐतिहासिकदृष्ट्या पाहिले तर चिन्ह पसंतीबद्दल एक मनोरंजक घटना आहे. अखिल भारतीय फॉरवर्ड ब्लॉक (रूईकर गट)ने आपली पहिली पसंती ज्या चिन्हाला दिली होती आणि जे चिन्ह त्या पक्षाला मिळाले, ते चिन्ह आज भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे आहे आणि ते म्हणजे (मानवी ) हात.

निवडणुका जर १९४९ साली घेण्यात आल्या असत्या तर त्याकरिता मतदारांच्यायाद्या तयार होत्या. मात्र, इतका काळ लोटल्यानंतर नवीन मतदारांचा समावेश करण्यासाठी नवीन मतदारयाद्या बनवणे महत्त्वाचे होते. तसेच १९४९ साली तयार असलेल्या मतदारयाद्यांमध्ये मतदाराचा धर्म तसेच तो अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीचा सदस्य असल्यास तसा उल्लेख नमूद करण्यात आला होता. कारण त्यावेळी धर्म आणि जातीच्या जोरावर मतदानाचा अधिकार मिळत असे. पण नवीन संविधानात २१ वर्षावरील प्रौढांना जात अथवा धर्माचा विचार न करता मतदानाचा अधिकार देण्यात आला होता. तसेच धर्माच्या आधारे अस्तित्वात असलेल्या राखीव मतदारसंघांना वगळण्यात आले होते. फक्त अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींकरिता काही मतदार संघ राखीव ठेवण्यात आले होते. या मतदार संघातून निवडणूक लढवण्याकरिता त्या जाती किंवा जमातीचा सदस्य असणे आवश्यक होते आणि नवीन मतदार याद्यांमधून अनावश्यक माहिती वगळणे गरजेचे होते.

### नवीन मतदारयाद्या तयार करण्यात अडचण

नवीन मतदारयाद्या तयार करण्यात एक मोठी अडचण होती. ती म्हणजे मतदार होण्याकरिता भारताचे नागरिक असणे महत्त्वाचे होते. पण संविधान सभेने भारतीय नागरिकत्वाची व्याख्या ठरवली नव्हती. नुकत्याच निर्माण झालेल्या पाकिस्तानातून परत आलेल्यांचे, नागरिकत्व ठरवणे गरजेचे होते.

संविधान सभेने यावर तोडगा काढला. संविधान सभेत असे ठरले की, पाकिस्तानातून आलेल्या व्यक्तींना मतदार होण्यासाठी ते देशात कुठे राहणार हे एका घोषणापत्रात लिहून द्यायचे होते. या मुळे मतदारयाद्यांमध्ये मोठा बदल झाला. तसेच, मतदार म्हणून पात्र होण्यासाठी वयाच्या अटीकरिता संदर्भ तारीख नव्याने ठरवण्यात आली. मतदार विशिष्ट मतदार संघाचा रहिवासी असल्याचे सिद्ध करण्यासाठी नकाशात बदल झाल्यामुळे मतदाररसंख्येत लक्षणीय वाढ झाली.

प्रत्येक जिल्ह्यात एक मतदारयादी आणि प्रत्येक तहसील, पंचायत कार्यालय, पोलीस स्टेशन इत्यादी ठिकाणी मतदारयादीचा संबंधित भाग उपलब्ध असावा, हे ठरल्यामुळे मतदारयाद्यांच्या छपाईचे काम वाढले.

पाश्चात्य देशांत राजकीय पक्ष नागरिकांची मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी पुढाकार घेतात पण पहिल्या निवडणुकीच्या वेळी आपल्या देशात अशी परिस्थिति नव्हती. निवडणूक आयोगालाच मतदार नोंदणीसाठी पुढाकार घ्यावा लागला. परिणामी मतदारांच्या संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ झाली.

मतदारयाद्यांच्या छपाईसाठी ३,८४,२१५ रिम कागद लागला याची नोंद निवडणूक आयोगाने केली आहे.



**निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता, जम्मू आणि काश्मीर वगळून, १७,३२,१३,६३५ मतदारांची नोंद करण्यात आली होती आणि यापैकी सुमारे ४५ टक्के मतदार महिला होत्या. त्यावेळी१९५१ च्या जनगणनेनुसार जम्मू आणि काश्मीर वगळता भारताची एकूण लोकसंख्या, ३५,६६,९१,७६० म्हणजे लोकसंख्येच्या ४९ टक्के मतदार होते. या आकडेवारीवरून असे लक्षात येते की, जनगणनेत नोंद झालेल्या जवळजवळ सर्वच २१ वर्षांवरील व्यक्तींनी मतदार म्हणून आपले नाव नोंदवले होते.**

## मतदार नोंदणीचे काम

**महिलांच्या मतदार नोंदणीबाबत एक विचित्र परिस्थिती निर्माण झाली होती. मतदारयाद्या तयार करताना असे लक्षात आले की, अनेक स्त्रियांनी आपले नाव न देता स्वतःचा उल्लेख अमूकची आई/मुलगी/पत्नी असा कुटुंबातील मुख्य पुरुषाच्या आपल्या नात्याशी जोडून केला होता. यामागचे कारण म्हणजे अनेक स्त्रिया पुरुषांना आपले नाव सांगत नसत. हे लक्षात येताच निवडणूक आयोगाने नोंदणी अधिकऱ्यांना सूचना दिल्या की, संपूर्ण नाव दिल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीची मतदारयादीत नोंद करायची नाही. महिलांना योग्यरीत्या आपल्या नावाची नोंद करता यावी यासाठी आयोगाने बिहार आणि राजस्थान या दोन राज्यांमध्ये एका महिन्याची मुदतवाढ दिली. या मुदतवाढीचा परिणाम बिहारमध्ये खूप चांगला झाला. पण राजस्थानमधील महिलांनी या मुदतवाढीचा लाभ घेतला नसल्याचे आढळून आले. तरीही परिस्थिती वाईट होती, असे म्हणता येणार नाही. कारण आधीच्या यादीतील ८० दशलक्ष स्त्रियांपैकी ७१ दशलक्ष स्त्रियांची नावे पडताळणीनंतर यादीत ठेवण्यात आली. ज्या स्त्रियांची नावे बाद करण्यात आली त्या बहुतांश स्त्रिया बिहार, उत्तर प्रदेश, मध्य भारत, राजस्थान आणि विंध्य प्रदेशातल्या होत्या.**




देशातील विविध पुरवठादारांकडून निवडणूक आयोगाने २४,७३,८५० स्टीलच्या मतपेट्या खरेदी केल्या आणि या मतपेट्या तयार करण्यासाठी ८,१६५.४५ टन स्टीलचा वापर करण्यात आला. तत्कालीन मद्रास राज्यातील एक पुरवठादार मतपेट्या देऊ शकला नाही म्हणून आयोगाने त्या विभागाकरिता १,११,०९५ लाकडी मतपेट्या विकत घेतल्या. सर्व मतपेट्यांचा एकूण खर्च १,२२,८७,३४९ रुपये झाला. प्रथम सार्वत्रिक निवडणुकीत निवडणूक आयोगाला सर्व प्रक्रियेचा खर्च प्रत्येक मतदारामागे ४.८ आणे आला. प्रथम लोकसभेत जाण्यास अनेक इच्छुक होते आणि एकूण २,८३३ जणांनी आपला उमेदवारी अर्ज भरला. यापैकी ८२६ उमेदवारांनी आपला अर्ज मागे घेतला, तर १३३ अर्ज बाद करण्यात आले. त्यामुळे १,८७४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत ५३ राजकीय पक्षांनी भाग घेतला. यात १४ राष्ट्रीय पक्ष होते.

मतदार संघांची आखणी करणे हे एक महत्त्वाचे काम आयोगाकडे होते. पहिल्या लोकसभेत ४९७ खासदार निवडून यायचे होते आणि दोन अँग्लो-इंडियन व्यक्तींची नेमणूक, संविधानाच्या अनुच्छेद ३३१ अंतर्गत राष्ट्रपतींमार्फत होऊन सभागृहाची सदस्य संख्या ४९९ होती. पहिल्या निवडणुकीपासून १९६० पर्यंत एका मतदार संघातून एकापेक्षा अधिक प्रतिनिधी पाठवण्याची तरतूद असलेले काही मतदार संघ देशात होते.

**निवडणूक योग्यरीत्या पार पाडावी तसेच निवडणुकीसंबंधी सर्व प्रक्रियेचा निवडणूक कर्मचाऱ्यांना सराव व्हावा या उद्देशाने आयोगाने ऑगस्ट ५, १९५१ रोजी उदयपूर, येथे निवडणुकीची रंगीत तालीम घेतली. देशातील पहिली सार्वत्रिक निवडणूक अनेक महिने चालली. निवडणूक प्रक्रियेला सप्टेंबर १०,१९५१ रोजी सुरुवात झाली तर मतदानाचा शेवटचा दिवस जून ४, १९५२ होता. हिमाचल प्रदेशातील चिनी आणि पांगी या दोन विधानसभा मतदार संघात पहिले मतदान झाले. ती तारीख होती ऑक्टोबर २५,१९५१. ज्या लोकसभा मतदारसंघाचा भाग या दोन गावात येतो त्या मतदारसंघाकरिता देखील येथे मतदान झाले. या भागात हिमवृष्टी होते म्हणून हिवाळा सुरू होण्याआगोदर येथे निवडणूक घेणे आवश्यक होते.**


निवडणूक प्रक्रिया दीर्घकाळ चालल्यामुळे उमेदवारांना लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला. अनेक उमेदवार स्वातंत्र्यचळवळ, सामाजिक आणि राजकीय क्षेत्र किंवा संविधान सभेचे सदस्य असल्याने लोकांना त्यांचे कार्य ज्ञात होते. इतर उमेदवारांना आणि पक्षांना लोकांपर्यंत पोहोचण्यास परिश्रम घ्यावे लागले.

स्वातंत्र्यचळवळीत प्रभातफेऱ्यांचा झालेला वापर निवडणूक प्रचाराकरिता करण्यात आला. उमेदवारांनी लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी सायकल आणि बैलगाडीचा वापर केला. राजकीय पक्षांनी मतदारांना निवडणूक प्रक्रिया समजावली. त्याचा लाभ आयोगालाही झाला.

निवडणुका जवळ आल्यावर आज जशी नवीन नियतकालिके प्रकाशित होऊ लागतात तशीच पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी नवीन नियतकालिके बाजारात आली. देशात ३९७ नवीन वर्तमानपत्रे त्या काळात सुरू झाल्याची नोंद निवडणूक आयोगाच्या एका अहवालात सापडली. यापैकी अनेक वृत्तपत्रे निवडणुकीनंतर बंद पडली.

वृत्तपत्रांनीदेखील लोकांना साक्षर करण्यास मोठा हातभार लावला. यामुळे आयोगाचे काम सोपे झाले. वृत्तपत्रांनी निवडणुकीसंदर्भात वाचकांच्या प्रश्नांची उत्तरे छापली. केंद्र व राज्य सरकारांनी निवडणुकीवर माहितीपट बनवून त्याचा प्रचार केला. मात्र निवडणूक आयोगाने याच महितीपटात राजकीय पक्षांची बाजू मांडली जात नाही याची खात्री करून घेतली.

राज्य आणि केंद्र सरकारांनी निवडणूक प्रक्रियेवर महितीपट बनवले. राजकीय प्रचारापासून हे महितीपट मुक्त आहेत याची खात्री मुख्य निवडणूक आयोगाने करून घेतली. मुख्य निवडणूक आयुक्ताने



आकाशवाणीवरून निवडणूक प्रक्रियेबाबत अनेक भाषणे केली.

राजकीय पक्षांना आपला प्रचार करण्यासाठी आकाशवाणीवर वेळ द्यावा, असा विचार मांडण्यात आला होता. पक्षांची संख्या जास्त असल्याने तसेच अनेक पक्षांच्या भूमिकेबद्दलची खात्रीलायक माहिती नसल्याने निवडणूक आयोगाने केंद्र सरकारला असा निर्णय न घेण्याचा सल्ला दिला.

या निवडणुकीत सुमारे ५१.१५ टक्के मतदान झाले आणि जारी करण्यात आलेल्या २,९६,८२८ टपाल मतपत्रांपैकी १,०७,००० वर मतदान झाले.

मतमोजणी फार मोठे कार्य होते आणि उत्तर प्रदेशात दोन जागा असलेल्या एका मतदार संघात तब्बल २० दिवस मतमोजणी चालू होती!

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने लढविलेल्या ४७९ जागांपैकी ३६४ जागा जिंकल्या. दुसऱ्या क्रमांकावर १६ जागा जिंकून भारतीय कम्युनिस्ट पक्षाने आपली जागा निश्चित केली. सोशालिस्ट पार्टीचे १२ उमेदवार निवडून आले. प्रथम लोकसभेचे पहिले अध्यक्ष म्हणून जी. व्ही. मावळणकर यांनी एप्रिल १७, १९५२ रोजी पदभार सांभाळला.

प्रथम लोकसभेत अनेक ख्यातनाम सदस्य होते. ज्यात स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, व्ही. एन. गाडगीळ, मौलाना अबूल कलाम आझाद, डॉ. सी. डी. देशमुख, डॉ. पंजाबराव देशमुख, बाबू जगजीवनराम, गुलझारीलाल नंदा, एस. निजलिंगप्पा, आर वेंकटरमन, हरींद्रनाथ चट्टोपाध्याय, डॉ. करणसिंग आणि डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी.

नामवंत महिला सदस्यांमध्ये राजकुमारी अमृत कौर, अनुसयाबाई बोरकर, सुभद्रा जोशी, सुचेता कृपलानी, विजयालक्ष्मी पंडित आणि तारकेश्वरी सिन्हा यांचा समावेश होता.

**– अभय मोकाशी**

❖ ❖

## प्रबोधनाचे नवे रूप

**(पान १६ वरून)**

अविभाज्य भाग बनला आहे. यामध्ये नवमतदारांना नोंदणीसाठी व शुद्ध मतदानास प्रोत्साहित करण्यासाठी जाणीव जागृत केली जात आहे.

ग्रामीण महाराष्ट्रात गावोगावी वारी, दिंडी, कीर्तनकार आणि भजनीमंडळ कार्यरत आहेत. आषाढी एकादशीला आळंदी येथून प्रस्थान होऊन पंढरपूरला जाणारी लाखो लोकांची दिंडी हा मोठा सोहळा झाला आहे. गावोगाव हरिभक्त परायण महाराजांची कीर्तने चालू असतात. या माध्यमातून मतदार जागृतीचे अभियान उत्तम प्रकारे राबवण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. त्यांच्यामार्फतही अनेक प्रकारची विकास कामे व जनजागृतीचे काम सुरू करण्यात आले आहे. जिल्हा, तालुका स्तरावरील खाजगी शिकवणी वर्गांमध्ये मतदार जागृती अभियान आणि शुद्ध मतदानासाठी जनजागृती केली जात आहे.

प्रत्येक महाविद्यालयीन स्तरावर पथनाट्याद्वारे रक्तदान, नेत्रदान, किडनीदान अशा वेगवेगळ्या प्रकारच्या दानाचे महत्त्व पटवून दिले जात आहे. त्याचबरोबर मतदानाचे महत्त्वही पटवून दिले जात आहे.




त्याचा चांगला परिणाम जाणवत आहे.

राष्ट्रीय मतदार दिवस हा जिल्हास्तरीय व तालुकास्तरावरील प्रत्येक शासकीय कार्यालय, सर्व मतदान केंद्रांच्या ठिकाणी व महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करण्यात येत आहे. या अभियान कालावधीमध्ये जमा झालेले नमुना नं.६ चे प्रमाण पाहता अभियान यशस्वी झाल्याचे दिसून येते. त्यामुळे यंदाच्या लोकसभा/ विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढलेली दिसून येईल.

महिला सक्षमीकरण, स्त्रीभृणहत्या यासारख्या समस्यांबद्दल आता जागरूकता निर्माण होत आहे. त्यामुळे शुद्ध मतदान मोहिमेमुळे महिलांमध्येसुद्धा मतदानाबद्दल जागृती निर्माण होत आहे. ❖ ❖

## प्रत्येक टप्पा महत्त्वाचा

**(पान ४६ वरून)**

**नकारार्थी मतदान**

भारतामध्ये नकारार्थी मतदानाची पद्धत अमलात आणल्याने मतदारास निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांपैकी कोणीही उमेदवार पसंत नसल्यास तो नकारार्थी मत देऊ शकतो. भारत निवडणूक आयोगाने २००९ मध्ये सर्वोच्च न्यायालयापुढे स्पष्ट केले की, आगामी निवडणुकीमध्ये मतदारास ईव्हिएम यंत्रामध्ये नकारार्थी मत देण्याच्या पद्धतीचा समावेश करण्यात येईल. २७ सप्टेंबर २०१३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने सर्व भारतीय नागरिकांस निवडणुकीत ईव्हिएम यंत्रामध्ये नकारार्थी मत देण्यास व पोचपावती देण्याचे निर्देश दिले आहेत. निवडणूक आयोग या पद्धतीचा वापर ५ राज्यात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये करील. मात्र निवडणुकीत नकारार्थी मते जास्त पडली असली तरी निवडणूक प्रक्रिया रद्द न करता ज्या उमेदवारास सर्वाधिक पसंतीची जास्त मते पडली असतील त्या उमेदवारास विजयी म्हणून घोषित केले जाईल. ❖ ❖

# मतदानाच्या विविध तऱ्हा

**अभय मोकाशी**

लवकरच आपल्या देशात सार्वत्रिक जगभरात निवडणुका होऊन नवीन सरकार स्थापन होणार आहे. पण जगभरात सरकार स्थापण्याच्या अनेक पद्धती आहेत, त्यापैकी एक म्हणजे लोकशाही. जगातील बहुसंख्य देशात लोकशाही आहे, मात्र विविध देशातील लोकशाहीमध्ये फरक आहे. त्याचप्रमाणे लोकशाहीमध्ये लोकांना उमेदवार निवडण्याचा आधिकार जरी असला तरी उमेदवार निवडण्याचे, तसेच सरकार बनवण्याचे अनेक प्रकार लोकशाहीत आहेत. प्रत्येक मतदानाच्या प्रकारात फायदे तसेच नुकसानही आहे.

लोकशाहीचे प्रमुख प्रकार म्हणजे अध्यक्षीय पद्धत, संसदीय पद्धत, संसदीय राजेशाही  आणि संघराजीय संसदीय पद्धत. भारतात संसदीय लोकशाही आहे, तर अमेरिकेत अध्यक्षीय पद्धत, ग्रेट ब्रिटनमध्ये संसदीय राजेशाही आणि जर्मनीमध्ये संघराजीय संसदीय पद्धत आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष देशाचे तसेच सरकारचे प्रमुख असतात. आपल्या देशात पंतप्रधान सरकारचे/च्या, तर राष्ट्रपति देशाचे/च्या प्रमुख असतात. ब्रिटनमध्ये राजा/राणी देशाचे मुख्य आणि पंतप्रधान सरकारचे प्रमुख असतात. जर्मनीत अध्यक्ष देशाचे तर चॅन्सलर सरकारचे प्रमुख असतात.

### अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची निवड

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची निवड चार वर्षांकरिता होते.

अमेरिकेच्या सरकार स्थापनेबद्दल आणि राष्ट्राध्यक्षांच्या निवडणुकीबद्दल अनेक गैरसमज आहेत. अमेरिकेत टू-पार्टी म्हणजेच द्विपक्षीय पद्धत आहे असे मानले जाते. अमेरिकेत दोन प्रमुख पक्ष आहेत हे जरी खरे असले तरी अमेरिकेच्या राज्यघटनेत द्विपक्षीय पद्धतीचा उल्लेख नाही. तसेच इतर अनेक पक्ष आहेत आणि त्या पक्षांचे उमेदवार स्थानिक पातळीवर निवडून आले आहेत. काही पक्षांनी अध्यक्षीय निवडणुकीतदेखील आपले उमेदवार उभे केले होते.



दुसरा गैरसमज म्हणजे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची निवड थेट जनतेकडून होते. अमेरिकेत तीन प्रमुख पक्ष आहेत. डेमोक्रॅटिक, रिपब्लिकन आणि लिबर्टेरियन पार्टी. या पैकी डेमोक्रॅटिक आणि रिपब्लिकन पक्ष अग्रेसर असल्यामुळे अमेरिकेत द्विपक्षीय राजकारण आहे असे म्हटले जाते.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होण्यासाठी आपापल्या पक्षाकडून उमेदवारी निश्चित करणे आवश्यक झाले आहे. ही पद्धत अमेरिकेच्या राज्यघटनेत नव्हती. पण काळाने ती प्रचलित झाली. पक्षाचे सदस्य आपल्या पक्षाच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाच्या उमेदवाराची निवड करतात. या निवडणुकीला प्रायमरी म्हणजेच प्राथमिक असे म्हणतात. अशा प्रकारे निश्चित झालेले उमेदवार निवडणुकीला उभे राहतात.

अमेरिकेतील मतदारांनी एकाच पक्षाच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाच्या उमेदवाराला मत देणे आवश्यक असते. म्हणजे एका पक्षाचा अध्यक्षीय उमेदवार आणि दुसऱ्या पक्षाचा उपाध्यक्ष पदाचा उमेदवार अशी पसंती करणे शक्य नसते.

नोव्हेंबरच्या २ आणि ८ तारखेच्यामध्ये येणाऱ्या मंगळवारी अमेरिकेत निवडणूक घेतली जाते. या दोन उमेदवारांबद्दल मतदार आपली पसंती व्यक्त करतो आणि अध्यक्ष तसेच उपाध्यक्ष निवडण्याचा अधिकार आपल्या प्रतिनिधीला देतो. जो मतदारांच्या पसंतीप्रमाणे अध्यक्ष तसेच उपाध्यक्ष निवडण्याकरिता वचनबद्ध असतो. हे प्रतिनिधी डिसेंबरच्या दुसऱ्या बुधवार नंतरच्या पहिल्या सोमवारी अमेरिकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची मतदानाने निवड करतात. या प्रतिनिधींवर एकाच पक्षाच्या दोन्ही उमेदवारांना मतदान करण्याचे बंधन घटनेत नाही. पण ते आपल्या मतदारांच्या विश्वासाला वचनबद्ध असतात. मात्र एखाद्या प्रतिनिधीने मतदारांचा विश्वासघात करून दुसऱ्या उमेदवारांना मतदान केले तर त्याला शिक्षा करण्याची कायदेशीर तरतूद अमेरिकेच्या २४ राज्यांमध्ये आहे. अशाप्रकारे निवडून आलेले राष्ट्राध्यक्ष निवडणुकीच्या पुढील वर्षाच्या जानेवारीच्या २० तारखेला आपला पदभार स्वीकारतात.

**मतदानाचे अनेक प्रकार विविध देशांत प्रचलित असले तरी निवडणुकीचा सर्वात जास्त देशात पाळला जाणारा प्रकार म्हाणजे अनेकत्व मतदान पद्धत. भारत, कॅनडा, इंग्लंड आणि अमेरिकेत अमलात असलेल्या पद्धतीला साधी अनेकत्व मतदान पद्धत असे म्हणतात. या निवडणूक पद्धतीत जिंकणाऱ्या उमेदवाराला एकूण झालेल्या मतदानाच्या ५० टक्के मते मिळणे आवश्यक नसते. सर्वात जास्त मते मिळणे एवढीच अट असते. हरलेल्या सर्व उमेदवारांच्या एकूण मतांपेक्षा जरी कमी मते पडली, तरी तो उमेदवार विजयी ठरविला जातो. याचा अर्थ विजयी उमेदवार बहुमताने नव्हे, तर बहुसंख्येने निवडून आलेला असतो. निवडणूक पद्धतीचा दुसरा प्रकार म्हणजे टू बॅलेट (दोनदा मतदान) पद्धती. याचा अर्थ उमेदवार विजयी ठरेपर्यंत घेतली जाणारी निवडणूक. फ्रान्समध्ये आणि अमेरीकेच्या ल्युसियाना आणि जॉर्जिया राज्यात या पद्धतीचा वापर केला जातो. जगातील काही विचारवंतांच्या मते अनेकत्व मतदान पद्धतीत छोट्या पक्षांचे नुकसान होते. म्हणून त्या देशांत द्विपक्षीय पद्धत जन्माला येते. हे इंग्लड आणि अमेरिकेत झाले आहे. मात्र भारतात याविरूद्ध परिस्थिती असून, दिवसेंदिवस नवनवीन पक्ष जन्माला येत आहेत.**

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना आपले मंत्रिमंडळ बनविताना संसद सदस्यांची गरज नसते. याचा अर्थ विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना बरोबर घेऊन ते आपले मंत्रिमंडळ बनवतात. म्हणजेच सामान्य लोक आपले मंत्री कसे असावे हे ठरवू शकत नाहीत आणि मंत्रिमंडळात येऊ इच्छिणाऱ्यांचा घोडेबाजार होत नाही.

भारतात आणि ब्रिटनमध्ये मतदार खासदारांना निवडून देतात आणि सर्वात अधिक खासदार असलेल्या पक्षाचे किंवा गटाचे खासदार पंतप्रधांची निवड करतात.

जर्मनीतही जवळजवळ अशी पद्धत आहे, मात्र तेथे पंतप्रधानांना हटवता येत नाही. त्यांना आपला पंतप्रधानपदाचा संपूर्ण काळ पूर्ण करता येतो.

**सोव्हियत युनियनमध्ये निवडणूक**

सोव्हियत युनियनमध्ये निवडणुकीचा प्रकार वेगळाच असायचा. निवडणुका म्हणजे सरकारला आणि सरकारच्या नीतीला ९९ टक्के जनतेचा पाठिंबा आहे हे जगाला दाखविणे हा उद्देश असे. मार्क्सवादी विचाराप्रमाणे कम्युनिस्ट पक्ष हा कामगारांच्या भवितव्याचा विचार करणारा पक्ष म्हणून ओळखला जाई. निवडणुका त्या पक्षाच्या सत्तेला कायम करण्याचा एक प्रयत्न समजला जायचा.

अमेरिकेसारख्या काही देशांत द्विपक्षीय लोकशाही असली तरी सोव्हियत युनियनमध्ये खऱ्या अर्थाने एकपक्षीय लोकशाही होती. कम्युनिस्ट पक्षाव्यतिरिक्त सोव्हियत युनियनच्या अनेक संघराज्यात लहानसहान पक्ष होते. पण तेदेखील कम्युनिस्ट पक्षाच्या छत्रछायेतच असल्यामुळे त्या पक्षांचा कम्युनिस्ट पक्षाला विरोध असण्याचा प्रश्नच नव्हता.

सोव्हियत युनियनमधील निवडणुका म्हणजे प्रचारकांच्या आणि प्रसार माध्यमातून पक्षाच्या धोरणांचा प्रचार करण्याकरिता एक संधी समजली जात असे. त्याद्वारे पक्षाच्या नव्या निर्णयांबद्दल आणि नव्या प्रगतीबद्दल लोकांना माहिती दिली जायची. निवडणुका घोषित होण्याआगोदरच्या काळात जनता छोट्याछोट्या अराजकीय समस्या अधिकाऱ्यांकडे घेऊन जात असे. अधिकारी त्यावर तोडगा काढत. साधारणत: या समस्या म्हणजे अनियमित पाणीपुरवठा, दूरध्वनीचा अभाव, गळणारे छत आणि थंडीच्या काळात ऊब पुरवणारी अयोग्य कार्यप्रणाली (हिटिंग सिस्टीम) या संदर्भात असायच्या.

**अनेकत्व मतदान पद्धत**

मतदानाचे अनेक प्रकार विविध देशांत प्रचलित असले तरी निवडणुकीचा सर्वात जास्त देशात पाळला जाणारा प्रकार म्हाणजे प्ल्युरॅलिटी व्होटिंग सिस्टीम (अनेकत्व मतदान पद्धत). भारत, कॅनडा, इंग्लंड आणि अमेरिकेत अमलात असलेल्या पद्धतीला सिम्पल प्ल्युरॅलिटी व्होटिंग सिस्टीम (साधी अनेकत्व मतदान पद्धत) असे म्हणतात. याला इंग्रजीत फर्स्ट पास्ट द पोस्ट (खांबाच्या पुढे जाणारा पहिला) असेही म्हटले जाते. याचा संदर्भ घोड्यांच्या शर्यतीतून आला आहे. जेथे शर्यत संपते तेथील खांबाच्या पुढे जो घोडा सर्वप्रथम जाईल तो विजयी ठरतो. त्या जिंकणाऱ्या घोड्याचा वेग महत्त्वाचा नसतो पण त्याने जिंकण्याकरिता पहिले येणे आवश्यक असते. तसेच या निवडणुकीच्या पद्धतीत ज्या उमेदवाराला सर्वात जास्त मते पडतात त्याला विजयी घोषित केले जाते. या निवडणूक पद्धतीत जिंकणाऱ्या उमेदवाराला एकूण झालेल्या मतदानाच्या ५० टक्के मते मिळणे आवश्यक नसते. सर्वात जास्त मते मिळणे एवढीच अट असते. हरलेल्या सर्व उमदवारांच्या एकूण मतांपेक्षा जरी कमी मते पडली, तरी तो उमेदवार विजयी ठरविला जातो. याचा अर्थ विजयी उमेदवार बहुमताने नव्हे, तर बहुसंख्येने निवडून आलेला असतो. याचा अर्थ असा होतो की, निवडून येणारे उमेदवार किंवा नवीन स्थापन होणारे सरकार बहुमताचे नसते. त्यात भर असते ती कमी मतदानाची. यामुळे सरकारला अर्ध्याधिक जनतेचा पाठिंबा नसतो. एकूण नोंदीत मतदारांच्या संख्येच्या फक्त २५ ते ३० टक्के मते मिळूनदेखील सरकार स्थापन झाल्याचे दाखले आहेत. असे सरकार लोकमान्य नसते. अशा निवडणूक पद्धतीत हा मोठा धोका असतो, पण त्याचे इतर फायदे बघता आपल्या घटनाकारांनी याच निवडणूक पद्धतीचा वापर करायचे ठरवले.

**दोनदा मतदान पद्धती**

याच निवडणूक पद्धतीचा दुसरा प्रकार म्हणजे टू बॅलेट (दोनदा मतदान) किंवा रनऑफ इलेक्शन प्ल्युरॅलिटी व्होटिंग सिस्टीम, म्हणजे उमेदवार विजयी ठरेपर्यंत घेतली जाणारी निवडणूक. फ्रान्समध्ये आणि अमेरिकेच्या ल्युसियाना आणि जॉर्जिया राज्यात या पद्धतीचा वापर केला जातो. मात्र या सर्व प्रांतात टू बॅलेट पद्धत वापरली जाते.

पहिल्या फेरीतील मतदानात मतपत्रिकेवर निवडणुकीत उभे असलेल्या सर्वच उमेदवारांची नावे असतात. जर त्या फेरीत एखाद्या उमेदवाराला ५० टक्क्यांपेक्षा जास्त मते पडली तर त्या उमेदवाराला विजयी घोषित केले जाते. तसे न झाल्यास, सर्वात जास्त मते मिळविणाऱ्या दोन उमेदवारांना पुढच्या फेरीत पाठवले जाते. रनऑफ इलेक्शन प्ल्युरॅलिटी व्होटिंग सिस्टीममध्ये एका उमेदवाराला ५० टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळेपर्यंत प्रत्येक फेरीत सर्वात कमी मते पडलेल्या एका-एका उमेदवाराला बाद केले जाते आणि शेवटच्या फेरीत फक्त दोन उमेदवारांमध्ये निवडणूक घेतली जाते.

भारतासह ४३ देशांत अमलात असलेल्या प्ल्युरॅलिटी व्होटिंग सिस्टीम (अनेकत्व मतदान पद्धत)चे प्रामुख्याने दोन प्रकार आहेत. एका पद्धतीत मतपत्रिकेवर उमेदवारांचे नाव नसते. ती कोरी असते आणि मतदारांनी त्यावर आपल्या पसंतीच्या उमेदवाराचे नाव



लिहायचे असते. अर्थातच, भारतासारख्या देशात, जेथे निरक्षरांचे प्रमाण जास्त आहे, तेथे ही पद्धत उपयोगी नाही कारण अशा मतदारांना आपले मत मतपत्रिकेवर मांडता येणार नाही. एकाच नावाचे दोन उमेदवार असले, तर सगळ्यांचीच पंचाईत होईल.

ग्रीसच्या लोकशाहीत प्रत्येक उमेदवाराच्या नावाची बरणी ठेवलेली असायची. प्रत्येकाला एक रंग दिलेला असायचा. मतदारांनी आपल्या उमेदवाराच्या बरणीत त्याला नेमून दिलेल्या रंगाचा मणी त्याच्या बरणीत टाकयचा असे. ज्याला जास्त मणी मिळायचे तो उमेदवार निवडणूक जिंकायचा.

**मतदार आणि उमेदवारांकरिता भौगोलिक क्षेत्र राखीव**

आपल्याकडे अस्तित्वात असलेल्या अनेकत्व मतदान पद्धतीमध्ये मतदार आणि उमेदवारांकरिता काही भौगोलिक क्षेत्र राखीव असते, ज्याला मतदारसंघ म्हणतात. एका मतदारसंघाचे प्रतिनिधित्व एकच उमेदवार करू शकतो. एका मतदाराला एकच मत देता येते. उमेदवार मात्र दोन मतदारसंघातून निवडणूक लढवू शकतो. जर एखादा उमेदवार दोन मतदारसंघातून निवडून आला, तर त्याला एक मतदारसंघ सोडून एकाचेच प्रतिनिधित्व करता येते.

आपल्या या निवडणूक पद्धतीत आणि संसदीय लोकशाहीत एका व्यक्तीला संसदीय संस्थेच्या फक्त एकाच सभागृहाचे सदस्य एका वेळी राहता येते. त्यामुळे एकचा सभासद असताना, जर दुसऱ्या सभागृहाकरिता मतदारांकडून निवड झाली तर किंवा एकाच वेळी जर दोन सभागृहांच्या निवडणुका जिंकल्या (उदा: विधानसभा आणि लोकसभा) तर एका जागेचा राजीनामा द्यावा लागतो.

जगातील काही नामवंत विचारवंतांच्या मते अनेकत्व मतदान पद्धतीत छोट्या पक्षांचे नुकसान होते आणि म्हणून त्या देशांत द्विपक्षीय पद्धत जन्माला येते. हे इंग्लड आणि अमेरिकेत झाले आहे. मात्र भारतात याविरुद्ध परिस्थिती आहे. दिवसेंदिवस नवनवीन पक्ष जन्माला येत आहेत.

**उमेदवारांची मते फोडण्यासाठी**

आपल्याकडे आजही उमेदवाराची जात, भाषा आणि प्रांत याचा विचार करून मोठ्या प्रमाणात मतदान केले जाते म्हणूनच समोरच्या उमेदवाराची मते फोडण्यासाठी जात, भाषा आणि प्रांत याचा विचार करून उमेदवार उभे केले जातात. याचा परिणाम असा होतो की, समजा खरी लढत 'अ' आणि 'ब' उमेदवारात आहे आणि 'अ'चे पारडे जड आहे. 'ब' उमेदवार किंवा त्याचा/तिचा पक्ष 'अ' उमेदवाराची जात, भाषा आणि प्रांताच विचार करून आणि त्याप्रमाणे नकली उमेदवार उभे करतात. या उमेदवारांनी 'अ'ची काही टक्के मते खाल्ली तर 'ब' विजयी ठरू शकतो.

पराभव झालेल्या सर्व उमेदवारांची मते जिंकणाऱ्या उमेदवाराच्या विरोधातली असतात म्हणून ती मतगणनेत दुसऱ्या क्रमांकावर आलेल्या उमेदवाराची असतात असा युक्तिवाद अनेकदा केला जातो. ती मते जर दुसऱ्या क्रमांकावरच्या उमेदवाराला मिळाली तर त्याचा विजय निश्चित असतो. याचे एक चांगले उदाहरण म्हणजे अमेरिकेच्या २००० सालच्या अध्यक्षीय निवडणुकीत अल गोर यांचा पराभव. अल गोर अल्पमतांनी जॉर्ज बुश यांच्या समोर हरले. गोर यांच्या डेमोक्रॅटिक पक्षाचा असा दावा होता की, ग्रीन पक्षाचे राल्फ नादर यांना पडलेली मते जर ते निवडणुकीच्या रिंगणात नसते तर गोर यांना पडून त्यांचा विजय झाला असता. त्यावेळच्या एका निवडणूक सर्वेक्षणात असे आढळले की नादर यांच्या ४५ टक्के मतदारांनी म्हटले की, जर नादर निवडणूक लढवत नसते तर त्यांनी गोर यांच्या बाजूने मतदान केले असते तर २७ टक्के मतदार बुश यांच्या बाजूने उभे राहिले असते. उरलेल्या मतदांचे म्हणणे होते कि त्यांनी मतदानच केले नसते. अशाप्रकारे गोर निवडून आले असते.

भारतात लोकसभा, विधानसभा आणि स्थानिय स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वापरात असलेली सिम्पल प्ल्युरॅलिटी व्होटिंग सिस्टीम (साधी अनेकत्व मतदान पद्धत) गमतीदार ठरू शकतात. अनेकदा मतदारांचा एखाद्या पक्षावर राग नसतो. त्या पक्षाच्या एका किंवा अनेक नेत्यांवर राग असू शकतो. अशा वेळी मतदार त्या नेत्यांचा पराभव करून त्या पक्षाच्या हातात सत्ता देऊ शकतात, अशी परिस्थिती प्रमाणबद्ध




## वैयक्तिक संबंधांवर उमेदवाराला मते

अनेकत्व मतदान पद्धतीत अनेकदा पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या योग्यतेपेक्षा उमेदवाराबरोबर असलेल्या वैयक्तिक संबंधांवर त्याला मते पडतात असे काही राजकीय अभ्यासकांचे मत आहे. अशा प्रकारचा युक्तिवाद करणे योग्य नाही कारण भारतासह इतर देशांतही पक्षाला मतदान होत असल्याचे दिसून येते. किंबहुना पक्षाबद्दलच्या आस्थेमुळे मतदार गुन्हेगारी प्रवृत्तीच्या उमेदवाराला मते देतात हे आपण भारतात अनेकदा पाहिले आहे.

एका मतदारसंघातून एकच उमेदवार निवडायचा असल्यामुळे आणि ज्याला जास्त मते पडतील तो जिंकत असल्यामुळे अनेकदा खऱ्या अर्थाने निवडणूक होत नाही. टू बॅलेट (दोनदा मतदान) किंवा रनऑफ इलेक्शन प्ल्युरॅलिटी व्होटिंग सिस्टीममध्ये निवड होईपर्यंत एकेका उमेदवाराला बाद करायचे असते म्हणून मतदार विचारपूर्वक मतदान करतात. मात्र आपल्या पद्धतीत मतदारांचा एक समज असतो की, उमेदवार हरला म्हणजे त्यांचे मत फुकट गेले म्हणून जो उमेदवार जिंकेल असे वाटते त्यालाच मत देतात. मतदारांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की त्यांच्या मताच्या ताकदीवरच उमेदवार जिंकू शकतो.

भारतात वापरण्यात येत असलेल्या निवडणूक या पद्धतीत अनेकदा चांगल्या उमेदवाराला हार पत्करावी लागते. आपल्या समोरचा उमेदवार जर आपल्याला डोईजड होणार असेल तर अनेकदा निवडून येणारे इच्छुक आपल्यासह इतर उमेदवारांना उभे करतात. या प्रकारे डोईजड होणाऱ्या उमेदवारांची मते कापली जातात.

तगड्या उमेदवाराच्या नावाच्या किंवा नावात साम्य असलेल्या व्यक्तींना त्याच मतदारसंघातून उभे करून मतदारांच्या मनात गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्नही केला जातो. काही मतदार या खेळीला बळी पडतात.

निवडणुकीत निर्माण होऊ शकत नाही.

**गुणात्मक फायदा**

साध्या अनेकत्व मतदान पद्धतीचा गुणात्मक फायदा हा आहे की, अकार्यक्षम लोकप्रतिनिधींना धडा शिकवणे या पद्धतीत सोपे जाते. या भीतीपोटी लोकप्रतिनिधी आपल्या मतदारसंघांकडे जास्त लक्ष देतात. पक्षांच्या तसेच उमेदवारांच्या कार्याचा आणि लोकप्रियतेचा थेट परिणाम निवडणुकीवर होत असतो. पण सत्ताधारी पक्षाची मते अंशत: कमी झाली तरी त्या पक्षाला निवडणुकीत सत्ता गमावू लागू शकते. तसेच अल्पशा प्रमाणात एखाद्या पक्षाची लोकप्रियता वाढली तर तो पक्ष या पद्धतीने सत्तेवर येऊ शकते.

**पर्यायी निवडणूक पद्धतींचा विचार**

काही देशांत पर्यायी निवडणूक पद्धतींचा विचार केला गेला. यात प्रचलित असलेल्या विविध निवडणूक पद्धतीत प्रामुख्याने वापरण्यात येणाऱ्या पद्धती म्हणजे: जॉन केमेनी आणि पायटन यंग यांनी विकसित केलेली केमेनीयंग पद्धत, निकोलस टाराइडमन पद्धत, मार्क शुल्झ पद्धत, एडवर्ड नेलसन पद्धत, जोसेफ बॉल्डवीन पद्धत अशा अनेक पद्धती आहेत.

वेगवेगळ्या देशांत गरजेप्रमाणे आणि सोईप्रमाणे या निवडणूक पद्धतीचा उपयोग केला जातो.

**कॅनडामधील निवडणूक पद्धती**

कॅनडाने आपल्या रनऑफ इलेक्शन प्ल्युरॅलिटी व्होटिंग सिस्टीम मध्ये थोडा बदल केला आहे. जर पहिल्या फेरीत कोणत्याही उमेदवाराला एकंदर मतदानाच्या ५० टक्के मते पडली नाहीत तर सर्वात कमी मते पडलेला उमेदवार बाद होतोच. पण कमी मते मिळालेले उमेदवार त्या कारणास्तव किंवा दुसऱ्या उमेदवाराच्या मदतीकरिता आपली उमेदवारी मागे घेऊ शकतात.

फ्रांसमध्ये १२.५ टक्क्यांपेक्षा कमी मते पडलेल्या उमेदवाराला दुसऱ्या फेरीतून माघार घ्यावी लागते.

या प्रकारच्या निवडणुकीत गमतीदार निकाल येऊ शकतात. उदाहरणार्थ समजा अ, ब, क आणि ड असे चार उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत आणि पहिल्या फेरीत त्यांना पडलेल्या मतांची टक्केवारी जर अशा प्रकारे असेल– अ ४० टक्के ब ३० टक्के, क ३२ टक्के आणि ड चार टक्के तर ब आणि ड दुसऱ्या फेरीतून बाद होतील. पुढच्या फेरीत जर 'ब'च्या समर्थकांनी विविध कारणांमुळे 'क'च्या बाजूने मतदान करायचे ठरवले आणि 'ड'ची मते 'अ'ला पडली. तसेच अ आणि क च्या समर्थकांमध्ये संख्यात्मक फरक पडला नाही तर ब उमेदवाराला ६२ टक्के मते मिळून तो विजयी ठरू शकतो.

या पद्धतीचा फायदा उठवण्याकरिता पक्षाद्वारे योजनाबद्ध निवडणूक लढवली जाऊ शकते. ज्या इच्छुकांना जिंकून येण्याची खात्री नसते ते त्यांच्या दृष्टीने एखाद्या चांगल्या उमेदवाराला मदत व्हावी म्हणून निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेऊ शकतात. पर्यायी भक्कम उमेदवाराला हरवण्याकरिता दुबळे उमेदवार उभे करून याही पद्धतीत मते फोडली जाऊ शकतात. अर्थात असे दुबळे उमेदवार पहिल्या फेरीत बाद होतात. तरीसुद्धा पुढच्या फेरीच्या मतदानावर पहिल्या फेरीच्या मतदानाचा परिणाम होऊ शकतो.

भारताच्या साध्या अनेकत्व मतदान पद्धतीत जरी सर्वाधिक मते मिळवणारा उमेदवार निवडून येत असला तरी निवडणूक आणि निकाल एकाच फेरीवर आधारित असल्याने इतरांना पराभव पत्करावा लागतो. पण रनऑफ इलेक्शन प्ल्युरॅलिटी व्होटिंग सिस्टीममध्ये अशापैकी एखाद्या उमेदवाराचा पुढच्या फेरीत विजय होऊ शकतो.

**अनेकत्व मतदान पद्धतीत साधारणतः पक्षापेक्षा उमेदवाराला महत्त्व मिळते. कारण संपूर्ण निवडणुकीत झालेल्या एकंदर मतदानात पक्षाला जास्त मते पडली तरी त्या पक्षाचे अधिक प्रमाणात उमेदवार निवडून येतीलच असे नाही. एखाद्या पक्षाकडून अयोग्य आणि अकार्यक्षम उमेदवाराला तिकीट देण्यात आले तर पक्षाबद्दल आस्था आणि निष्ठा असली तरीदेखील मतदार अशा उमेदवाराला पाडू शकतात. दिग्गज समजले जाणारे नेते आणि मंत्री यांनाही अशा निवडणूक प्रक्रियेत हार पत्करावी लागल्याची आपल्या देशात अनेक उदाहरणे आहेत. सध्याच्या निवडणूक पद्धतीत प्रत्येक पक्षाला आपल्याला पडलेल्या मतांच्या तुलनेत उमेदवार संसदीय संस्थांमध्ये पाठवता येत नाहीत. कमी टक्के मते पडलेल्या पक्षांचे मोठ्या संख्येने उमेदवार निवडून येऊ शकतात तर जास्त टक्के मते पडलेल्या पक्षांचे कमी उमेदवार निवडून येतात. कॅनेडात २००५ साली झालेल्या निवडणुकीत ब्लॉक क्युबेकोइसला ५१ जागा मिळाल्या. म्हणजे एकूण जागांच्या १७ टक्के पण एकूण मतदानाच्या फक्त १० टक्के मते पडली. या उलट डेमॉक्रॅटिक पक्षाला १७ टक्के मते पडली तरी सुद्धा फक्त २९ जागा (नऊ टक्के) मिळाल्या.**

रनऑफ इलेक्शन प्ल्युरॅलिटी व्होटिंग सिस्टीमद्वारे उमेदवारांना पुढच्या फेरीत आपल्या विरोधात मतदान केलेल्या पहिल्या फेरीतील मतदारांची मते मिळवणे शक्य असते. कारण पक्की मते असलेले मतदारदेखील अशा निवडणूक पद्धतीत आपला उमेदवार हरल्यावर पर्यायी उमेदवाराचा किंवा पक्षाचा विचार करत असतात. प्रत्येक निवडणुकीत पर्यायी उमेदवार आणि पक्ष मनात ठेवणारे अनेक मतदार असतात. त्यांनी ज्या मतदाराला मत दिलेले असते तो उमेदवार हरला तर अनेकदा त्यांच्या मनात हळहळ निर्माण होते की, जर त्यांनी दुसऱ्या उमेदवाराला मत दिले असते तर निवडून आलेल्या उमेदवाराला कदाचित पराभव पत्करावा लागला नसता.

**पसंती व्यक्त करणारी मतदान पद्धत**

अशा मतदारांचा विचार करून प्रेन्फ्रेन्शियल व्होटिंग सिस्टीम ही पसंती व्यक्त करणारी मतदान पद्धत मतदारांना निवडणुकीत मतदान करताना एकापेक्षा जास्त उमेदवाराच्या बाजूने आपला कल देण्याकरिता प्रेफ्रेन्शियल व्होटिंग सिस्टीम (पसंती व्यक्त करणारी पद्धत) सोइस्कर ठरते.

अशा निवडणूक पद्धतीत जितके उमेदवार असतात तितक्यांबद्दल मतदार आपली पसंती व्यक्त करू शकतात. मतमोजणीच्या वेळी जर पहिल्या फेरीत एखाद्या उमेदवाराला ५० टक्के अधिक मते पडली नाही तर सर्वात कमी प्रथम पसंतीची मते पडणाऱ्या उमेदवाराला दुसऱ्या फेरीच्या मतमोजणीतून बाद केले जाते. रनऑफ इलेक्शन प्ल्युरॅलिटी व्होटिंग सिस्टीम आणि

प्रेफ्रेन्शियल व्होटिंग सिस्टीम यामधील फरक असा की रनऑफ इलेक्शन प्ल्युरॅलिटी व्होटींग सिस्टीममध्ये मतदानाच्या फेऱ्या स्पष्ट निकाल लागेपर्यंत वाढतात तर प्रेफ्रेन्शियल व्होटिंग सिस्टीममध्ये मतदान एकदाच होते पण स्पष्ट निकाल लागेपर्यंत मतमोजणी होते.

**ऑस्ट्रेलियातील प्रेफ्रेन्शियल व्होटिंग**

ऑस्ट्रेलियातील प्रेफ्रेन्शीयल व्होटींग सिस्टीममध्ये मतदान आणि मतमोजणी कशी होते हे पाहण्यासारखे आहे. समजा, एखाद्या निवडणुकीत चार उमेदवार आहेत आणि एकंदर ३०,००० मतदारांनी मतदान केले आहे. निवडून येण्याकरिता एका उमेदवाराला किमान १५,००१ मते मिळणे आवश्यक आहे. मतदानात पहिल्या पसंतीची मते पुढीलप्रमाणे पडली आहेत असे गृहीत धरून 'अ' उमेदवाराला ३,००० मते, 'ब' उमेदवाराला ५,००० मते, 'क' ला १०,००० आणि 'ड' ला १२,००० तर 'अ' उमेदवार मतमोजणीच्या पहिल्या फेरीत बाद होईल.

मतमोजणीच्या दुसऱ्या फेरीत 'अ'च्या मतपत्रीकेवरील दुसऱ्या पसंतीची मते मोजली जातात. ती मते त्या उमेदवाराच्या पहिल्या पसंतीच्या मतांच्या संख्येत जोडली जातात. समजा दुसऱ्या पसंतीची मते पुढीलप्रमाणे पडली –'ब'ला ६००, 'क' ला २,३०० आणि 'ड'ला १००. तर तिन्ही उमेदवारांच्या प्रत्येकी एकूण मतांची संख्या अशी राहील – 'ब' ५,६००, 'क' १२,३०० आणि 'ड' १२,१००. अशाप्रकारे या फेरीत 'ब' बाद होईल. तिसऱ्या फेरितून 'ब' बाद झाल्याने 'ब'च्या मतपत्रिकेवरील तिसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी केली जाते. ती मते अशी आहेत असे गृहीत धरू – 'क'ला ४२०० आणि 'ड'ला १,४०० मते पडली. आता 'क'ला एकूण मिळालेल्या मतांची संख्या १६,५०० तर 'ड'च्या एकूण मतांची संख्या १३,५०० अशी होऊन 'क' विजयी ठरेल.

या मतदान पद्धतीच्या समर्थकांच्या मते याचे फायदे असे की, मतदाराला एकापेक्षा जास्त उमेदवाराला आपली पसंती दर्शवता येते. निवडून आलेला उमेदवार विविध विचारांच्या पसंतीचा असतो. मतदारांची खरी पसंती त्यावरून दिसते. लहान पक्षांना तसेच कमजोर उमेदवारालादेखील निवडून येण्याची संधी मिळू शकते आणि पक्षाच्या विरोधकांची मतेदेखील एखादा उमेदवार मिळवू शकतो. हे आपल्याकडे विधान परिषदेच्या निवडणुकीत दिसून येते.

या पद्धतीचा तोटा म्हणजे दुसऱ्या क्रमांकाच्या पसंतीपासून सर्व पसंत्यांना पहिल्या पसंतीच्या मताप्रमाणे महत्त्व मिळते. तसेच मतदान किचकट असून निकाल घोषित व्हायला फार वेळ लागतो.

भारतातील अनेक निवडणुकीत असे दिसून येते की, पक्षांना मिळालेल्या जागा, त्यांना पडलेल्या मतांच्या तुलनेत नसतात. जास्त टक्के मते मिळून सुद्धा कमी जागा मिळतात. अशी अनेक उदाहरणे जगाच्या लोकशाहीच्या इतिहासात आहे. जसे कॅनेडामध्ये २००५ साली झालेल्या निवडणुकीत ब्लॉक क्युबेकोइसला ५१ जागा मिळाल्या, म्हणजे एकूण जागांच्या १७ टक्के, पण एकूण मतदानाच्या फक्त १० टक्के मते पडली. याउलट डेमोक्रॅटिक पक्षाला १७ टक्के मते पडली तरी सुद्धा फक्त २९ जागा (नऊ टक्के) मिळाल्या.

हा एक प्रकारे अशा पक्षांवर अन्याय म्हटला पाहिजे. पडलेल्या मतांच्या तुलनेत पक्षाला किंवा गटाला जागा कां मिळू नयेत असा प्रश्न अनेकांच्या मनात आला आणि लवकरच एका नवीन निवडणूक पद्धतीची सुरुवात झाली. ती पद्धत म्हणजे प्रमाणबद्ध निवडणूक पद्धत.

सिम्पल प्ल्युरॅलिटी व्होटिंग सिस्टीम, ज्यामध्ये सर्वात जास्त मते मिळवणारा उमेदवार विजयी ठरतो. ते मतदानाच्या बहुमतांवर अवलंबून असते. या पद्धतीत काही पक्ष, विचार किंवा गटांना संसदीय संस्थांमध्ये प्रतिनिधित्व मिळत नाही. तसेच एखाद्या पक्षाची किंवा विचारांची जर लाट आली, तर त्या पक्षाला किंवा त्या विचारांच्या उमेदवारांना मोठ्या संख्येत जागा मिळून त्यांचे जास्त वर्चस्व राहू शकते. अशा परिस्थितीत सत्तेचा गैरवापर होऊन, लोकशाहीची एक प्रकारे पायमल्ली होऊ शकते.

**प्रमाणबद्ध निवडणूक पद्धती**

प्रमाणबद्ध निवडणूक पद्धतीत लहाननमोठ्या सर्वच पक्षांना प्रतिनिधित्व मिळू शकते. त्यामुळे एखाद्या पक्षाला फार जास्त किंवा फार कमी जागा न मिळता, प्रत्येक पक्षाला पडलेल्या मतांच्या तुलनेत जागा मिळतात. प्रमाणबद्ध निवडणूक पद्धतीचेही अनेक प्रकार आहेत. कोणताही प्रकार दोषविरहित आहे असे म्हणता येणार नाही.

प्रमाणबद्ध निवडणूक पद्धतीचा पहिला प्रकार म्हणजे, पक्षनिहाय उमेदवारांच्या यादीवर आधारित निवडणूक. या निवडणूक पद्धतीत प्रत्येक पक्षाने आपल्या उमेदवारांची यादी जाहीर करायची असते. एका पक्षाला एकापेक्षा जास्त याद्या जाहीर करण्याची मुभा असते. निवडणुकीच्या दिवशी मतदार, पक्षाच्या यादीला मतदान करतात. एका मतदारसंघातून एकापेक्षा अधिक उमेदवार प्रतिनिधित्व करू शकतात. उदाहरणार्थ, जर अशी पद्धत आपल्याकडे आली तर मुंबईचा एक मतदार संघ बनवून तिथून लोकसभेकरिता सहा उमेदवार निवडून येऊ शकतात.




मतमोजणीनंतर प्रत्येक पक्षाला पडलेल्या मतांच्या तुलनेत त्या पक्षाला जागा दिल्या जातात. मिळालेल्या मतांच्या प्रमाणात पक्ष जाहीर केलेल्या यादीतील उमेदवार विजयी घोषित करतो.

या पद्धतीत पक्षाने जाहीर केलेल्या यादीचे तीन प्रकार असतात. एक म्हणजे खुली यादी, दुसरी काही प्रमणात खुली आणि तिसरा प्रकार म्हणजे बंद यादी.

बंद यादी पद्धतीत

## युरोपियन युनियनच्या खासदारांची निवडणूक

युरोपियन पार्लामेन्टची, म्हणजेच युरोपियन युनियनच्या संसदेच्या खासदारांची निवडणूक, प्रमाणबद्ध निवडणूक पद्धतीने केली जाते. युरोपातील अनेक देशात ही पद्धत अमलात आहे. ब्रिटनमध्ये भारताप्रमाणे निवडणुका सिम्पल प्ल्युरॅलिटी व्होटिंग सिस्टीम (साधी अनेकत्व मतदान पद्धत)ने घेतल्या जातात. मात्र त्या देशातून युरोपियन पार्लामेन्टकरिता होणारी निवडणूक, प्रमाणबद्ध निवडणूक पद्धतीने घेतली जाते, याची नोंद घेण्याजोगी आहे. याचे कारण असे की, ती निवडणूक युरोपियन पार्लामेन्टची असल्यामुळे युरोपियन युनियनचे नियम त्या निवडणुकीला लागू होतात.

प्रमाणबद्ध निवडणूक पद्धत आता विविध देशांत रूढ होत चालली आहे. कॅनेडाचे पाच प्रांत, ब्रिटिश कोलंबिया, ऑंटेरियो, क्युबेक, प्रिन्स एडवर्ड आयलंड आणि न्यू बृन्सविक या प्रांतात सध्याची चालू असलेली फर्स्ट पास्ट द पोस्ट ही पद्धत बाद करून, प्रमाणबद्ध निवडणूक पद्धत अंमलात आणावी का, यावर चर्चा चालू आहे.

अमेरिकेत ही पद्धत प्रचलित नसली तरी याचा उपयोग झाल्याची काही उदाहरणे आहेत. डेमोक्रॅटिक पक्षाची मक्तेदारी संपुष्टात आणण्यासाठी त्याचा वापर न्यूयॉर्क शहराच्या परिषदेच्या निवडणुकीत झाल्याचा उल्लेख आहे. रिपब्लिकन पक्षाला धक्का देण्याकरिता या पद्धतीचा वापर १९२५ साली ओहायोच्या सिन्सीनाटी शहरात करण्यात आला. पण अखेरीस १९५७ साली रिपब्लिकन पक्षाने ती निवडणूक पद्धत मोडीत काढली. अमेरीकेच्या इलियॉनीस राज्याने, राज्याच्या हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटीव्हजच्या निवडणुकीत १८७० ते १९८० सालापर्यंत या पद्धतीचा वापर केला. त्यामुळे या राज्याच्या प्रत्येक जिल्हयातून डेमॉक्रॅट आणि रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार निवडून येत असत.

या पद्धतीचा दुसरा प्रकार म्हणजे, मिक्स मेंबर प्रपोर्शनल फॉर्म्युला, ज्यात मतदारांना दोन मते देता येतात. एकामताने मतदार जिल्हास्तरीय उमेदवाराला थेट मत देऊन निवडून आणू शकतात. तर दुसरे मत पक्षांनी जाहीर केलेल्या यादीतील उमेदवाराला देता येते. या पद्धतीचा उगम न्यूझिलँडमध्ये सर्वप्रथम झाला. तेथेच याला मिक्सड मेंबर प्रपोर्शनल फॉर्म्युला असे नाव पडले.

मतदारांना अखंड यादीला मतदान करावे लागते आणि यादीतील विशिष्ट उमेदवाराबद्दलच्या पसंती-नापसंतीला स्थान नसते. अशा प्रकारे पक्षाने जाहीर केलेल्या यादीतील क्रमाने उमेदवार निवडून येतात. ही पद्धत कोस्टारिका, इस्रायल आणि स्पेनमध्ये वापरली जाते. फिनलँडमध्ये खुली यादी असल्यामुळे मतांच्या संख्येप्रमाणे उमेदवारांची निवड होते. बेल्जियममध्ये मतदार आपली आवड मताद्वारे दर्शवू शकतात. पण शक्यतो पक्षाच्या यादीतील क्रमाप्रमाणेच निवड होते.

विविध पक्षांना आणि गटांना त्यांना मिळालेल्या मतांच्या तुलनेत जागा मिळाव्या ह्या दृष्टिकोनातून प्रमाणबद्ध निवडणूक पद्धतीची निर्मिती झाली असे म्हणायला हरकत नाही.

### पक्षनिहाय उमेदवारांच्या यादीवर आधारित निवडणूक

या पद्धतीचा एक प्रकार म्हणजे, पक्षनिहाय उमेदवारांच्या यादीवर आधारित निवडणूक. याची सुरुवात १८४० मध्ये ऑस्ट्रेलियातील ॲडिलेड शहरात झाली. रोलँड हिल यांनी या निवडणूक पद्धतिचा वापर ॲडिलेड नगर परिषदेत सर्वप्रथम केला. त्यांचे वडील थॉमस राईट हिल, जे शाळा मास्तर होते, यांनी १८२१ साली आपल्या शाळेतील निवडणुकीत सिंगल ट्रान्सफरेबल व्होट म्हणजेच एक प्रकारच्या प्रेफ्रेन्शीयल व्होटिंग सिस्टीम या पद्धतीचा वापर सर्वप्रथम केला.

पक्षनिहाय उमेदवारांच्या यादीवर आधारित प्रमाणबद्ध निवडणूक पद्धत बेल्जियमच्या व्हिक्टर डीहॉन्डट यांनी १८७८ साली विकसित केली. त्याला आज डी हॉन्डट पद्धत म्हणतात. बेल्जियममध्ये १९०० सालापासून पक्षनिहाय उमेदवारांच्या यादीवर आधारित निवडणूक घेण्यात येत आहे.

### सिंगल ट्रान्सफरेबल व्होट

प्रमाणबद्ध निवडणूक पद्धतीचा आणखी एक प्रकार म्हणजे सिंगल ट्रान्सफरेबल व्होट. आपल्याकडे राज्यसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणुका अशा पद्धतीने घेतल्या जातात.

पक्षनिहाय उमेदवारांच्या यादीवर आधारित निवडणूक तसेच मिक्सड मेंबर प्रपोर्शनल फॉर्म्युला या दोन प्रमाणबद्ध निवडणूक पद्धतींपेक्षा वेगळ्या असलेल्या सिंगल ट्रान्सफरेबल व्होटमध्ये मतदार पक्षाला नव्हे, तर उमेदवाराला मते देतात. या पद्धतीत मतपत्रिकेवर उमेदवारांची नावे असतात. मतदारांनी आपल्या पसंतीप्रमाणे उमेदवाराला क्रमांक द्यायचे असतात. यामध्ये विजयी उमेदवार ठरवण्याची पद्धत किचकट असते.

उमेदवाराला निवडून येण्याकरिता विशिष्ट संख्येत मते मिळवायची असतात. विजयी उमेदवार ठरवण्याचे दोन प्रकार असतात. पहिल्या पद्धतीनुसार विजयी होण्याकरिता लागणाऱ्या मतांचा आकडा भरला की, जास्त असलेली मते पुढच्या, सर्वात जास्त पसंती असलेल्या, उमेदवाराच्या खात्यात टाकली जातात. दुसऱ्या पद्धतीत सर्वात कमी मते मिळालेल्या उमेदवाराला बाद केले जाते. त्याच्या किंवा तिच्या मतपत्रिकेवरील इतर उमेदवारांना पडलेली मते त्या उमेदवाराच्या खात्यात टाकली जातात. अशा प्रकारे जेवढ्या जागांकरिता निवडणूक घेतली जात असते, तेवढया जागा भरेपर्यंत ही प्रक्रिया सुरू ठेवली जाते. अनेकदा या पद्धतीत असे होते की, काही फेऱ्यानंतर उमेदवार बाद झाल्याने आवश्यक त्या संख्येपेक्षा कमी मते पडली तरी उमेदवार निवडून येतो कारण उमेदवार बाद झाल्यावर रिंगणात उमेदवारच नसतात.

या पद्धतीत जिंकण्याकरिता लागणाऱ्या मतांची संख्या ठरविण्याकरिता जे गणित वापरले जाते ते असे-एकंदर झालेल्या मतदानाच्या संख्येला एकूण उमेदवार अधिक एक या आकड्याने भागले जाते. उदाहरणार्थ जर २४० मतदारांनी मतदान केले आणि निवडणुकीला नऊ उमेदवार असतील, तर जिंकण्याकरिता २४ मतांची गरज राहील. यात समजा एका उमेदवाराला ३२

मते पडली तर त्याच्या मतपत्रिकेवर असलेल्या दुसऱ्या पसंतीच्या उमेदवाराला त्याची जास्त असलेली आठ मते मिळतील. ही पद्धत किचकट असली तरी प्रत्येक मतदाराच्या पसंतीचा एक तरी उमेदवार निवडून येण्याची शक्यता असते.

मतदारसंघाची ताकद त्या मतदारसंघात असलेल्या जागांवर ठरते. ज्या देशात एका मतदारसंघातून एकापेक्षा जास्त जागा असतात तेथे हे लागू होते. जेवढ्या जास्त जागा मतदारसंघात असतील, तेवढे जास्त प्रमाणबद्ध प्रतिनिधित्व पक्षांना आणि गटांना मिळणे शक्य होते. यात पक्षांचे महत्त्व आणि बळ वाढते. पण छोट्या पक्षांचे त्यात नुकसान होऊ शकते. उदाहरणार्थ जर तीन जागांचा एक मतदारसंघ असेल आणि निवडणूक 'अ' आणि 'ब' पक्षात आहे, तर त्या मतदारसंघात ताकदवर असलेला 'ब' पक्ष तिन्ही जागा जिंकू शकतो. मात्र जर तो मतदार संघ फोडून प्रत्येकी एक जागेचा एक, असे तीन मतदार संघ केले तर कदाचीत 'अ' पक्ष एका तरी जागेवर मतांच्या टक्केवारीच्या जोरावर आपला उमेदवार निवडून आणू शकतो.

**मतदान करण्याबाबतची उदासीनता**

मतदान करण्याबाबतची उदासीनता फक्त भारतातच नाही, जगातील अनेक देशांत दिसून येते.

या प्रकारची उदासीनता १९२४ पर्यंत ऑस्ट्रेलियात दिसत असे. १९२४ साली झालेल्या मतदानात ऑस्ट्रेलियात फक्त ४७ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. पण अलीकडच्या काळात सरासरी ९४ त ९६ टक्के मतदानाची नोंद ऑस्ट्रेलियात होते. त्या देशातील नागरिक लोकशाहीबद्दल फार जागरूक आहेत असा गैरसमज होणे स्वाभाविक आहे. थोड्याफार प्रमाणात ते खरेही असले तरी ऑस्ट्रेलियात मतदान सक्तीचे असल्यामुळे मतदानाचे प्रमाण चांगले असते.


योग्य कारणाशिवाय मतदान न करणाऱ्या व्यक्तीला २० ऑस्ट्रेलियन डॉलर दंड होतो. जर ते प्रकरण न्यायालयात गेले तर अशा नागरिकाला ५० ऑस्ट्रेलियन डॉलर दंड होऊ शकतो.

ऑस्ट्रेलियात सक्तीच्या मतदानाचा कायदा १९२४ साली आला. तो कायदा आजही अस्तित्वात आहे. दक्षिण ऑस्ट्रेलियात मतदानाकरिता नाव नोंदवणे सक्तीचे नाही मात्र इतर सवलतींच्या बाबतीत असलेल्या अर्जांबरोबर मतदान नोंदणी अर्ज जोडल्यामुळे मतदाराचे नाव मतदान यादीत आपोआप जोडले जाते. चिलीत मतदार यादीत नाव नोंदविणे सक्तीचे नाही मात्र नाव असल्यास मतदान करणे सक्तीचे आहे.

पाचव्या शतकात ग्रीसमध्ये लोकशाहीचा पाया मजबूत झाला होता. शहराच्या कारभाराबद्दलच्या निर्णय प्रक्रियेत भाग घेणे सक्तीचे नसले तरी गरजेचे समजले जायचे. ग्रीक साहित्यात सक्तीने शहराच्या सभेत नागरिकांना नेल्याचे आणि अशा लोकांना दंड झाल्याची नोंद आहे.

अमेरिकेच्या जॉर्जिया राज्यात १७७७ साली मतदान सक्तीचे करण्यात आले. मतदानाला न जाणाऱ्या आणि मतदान न करणाऱ्या नागरिकाला पाच पाऊंड दंड केला जात असे. आज तो कायदा अस्तित्वात नाही.

ऑस्ट्रियामध्ये १९२९ साली राष्ट्राध्यक्षांच्या




पप्पा, मतदानाच्या दिवशी सुटी असली तरी पहिल्यांदा मत देऊन यायचं अन् मगच पिकनिकला जायचं!

- नेदरलँडसमध्ये १९१७ साली जेव्हा सर्व प्रौढांना मतदानाचा अधिकार देण्यात आला तेव्हा मतदान सक्तीचे करण्यात आले. नेदरलँडने १९७० साली हा कायदा रद्द केला.
- सक्तीच्या मतदानाचा कायदा १९०७ ते १९२३ सालापर्यंत स्पेनमध्ये अस्तित्वात होता, मात्र त्या कायद्याची अंमलबजावणी कधीच केली गेली नाही. व्हेनेझुअेलाने देशात हा कायदा पूर्वी आणला होता पण त्याचा वापर कधीच केला गेला नाही.
- लॅटिन अमेरिकेतील अर्जेंटिना, ब्राझिल आणि पेरू या देशांत १८ ते ७० या वयोगटातील नागरिकांना मतदान करणे सक्तीचे आहे.
- इक्वेडोर मध्ये ६५ वरील वयाच्या नागरिकांना मतदान सक्तीचे नाही.
- पॅरागुआँमध्ये १८ ते ७५ वयोगटातील नागरिकांना मतदान सक्तीचे करणारा कायदा आहे. पण या कायद्याची अंमलबजावणी केली जात नाही.
- डोमिनिकन रिपब्लिक आणि ग्वॉटेमाला या देशांमध्ये पोलीस तसेच लष्करातील शिपाई व अधिकाऱ्यांना मतदानाचा अधिकार नाही.
- बेल्जियम, सायप्रस, काँगो, फिजी, सिंगापूर, तुर्कस्तान, उरुग्वे यासहित जगातील ३२ देशांमध्ये मतदानाची सक्ती आहे.
- स्वित्झरलँडमध्ये फक्त शॉहॉसेन या राज्यात अशी सक्ती आहे. ज्या देशांत मतदान सक्तीचे आहे त्या देशांतील नागरिकांना मतदान न केल्यास त्याबद्दलचे योग्य कारण द्यावे लागते. तसे न केल्यास त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाते.

निवडणुकीत मतदान सक्तीचे करण्यात आले. १९४९ साली हा कायदा संसदीय निवडणुकांनादेखील लागू करण्यात आला. मात्र १९८२ त २००४ या काळात तो कायदा टप्प्याटप्प्याने मागे घेण्यात आला.

**पेरूमध्ये मतदान केल्याची नोंद नागरिकांच्या निवडणूक ओळखपत्रावर केली जाते. नागरिकांना हे ओळखपत्र किमान चार महिन्याकरिता आपल्या बरोबर बाळगावे लागते. ज्यामुळे त्यांना शिधावाटप दुकानातील माल तसेच इतर सुविधा उपलब्ध होतात. पेरूपेक्षाही कडक कायदा बोलिव्हियामध्ये आहे. त्या देशात मतदान केल्याचा पुरावा देणारे निवडणूक ओळखपत्र तीन महिन्यापर्यंत नागरिकांना बाळगावे लागते. असा पुरावा न दिल्यास बँकेतून पगाराचे पैसेही काढता येत नाहीत. बोलिव्हियातील ज्या नागरिकांना सरकारी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील नोकरी हवी असते त्यांना मतदान करणे गरजेचे आहे. कारण मतदान न करणाऱ्या व्यक्तीचा नोकऱ्यांकरिता विचार केला जात नाही. ग्रीसमध्ये मतदान न करणाऱ्यांनी वाहन चालवण्याचे स्वप्न पाहू नये कारण त्यांना वाहन चालवण्याचा परवाना दिला जात नाही.**

**मतदान न केल्यास दंड**

मतदान न करणाऱ्या लोकांना वेगवेगळ्या देशात वेगवेगळी शिक्षा केली जाते. बहुतेक देशांमध्ये मतदानापासून दूर राहणाऱ्यांना दंड भरावा लागतो. अनेकदा हा दंड अल्प असतो. पण दंड झालेल्या लोकांकरिता अशी घटना लज्जास्पद असते.



स्वित्झरलँडमध्ये मतदान न करणाऱ्या व्यक्तीला तीन स्वीझ फ्रँक दंड केला जातो. मतदान न करणाऱ्या सायप्रसच्या नागरिकांना फार मोठा, म्हणजे २०० सायप्रस पाऊन्ड दंड भरावा लागतो. अर्जेंटीनामध्ये अशा गुन्हेगारांना १० ते २० अर्जंटीनेयन पेसो भरावे लागतात. पेरूमध्ये २० पेरूवियन न्युवो सोल भरून या गुन्ह्यातून सुटका होते. ऑस्ट्रियामध्ये अशा गुन्ह्याकरिता ३०० ते ३००० ए टी एस दंड होता. मतदान न केल्यामुळे कोणत्याही देशात कोणालाही कारावास झाल्याचे उदाहरण नाही. मात्र वेळोवेळी आठवण करूनदेखील दंड न भरल्यास ऑस्ट्रियामध्ये कैद होऊ शकते. अशा प्रकारे जर कैद झाली तर ती मतदान न केल्याच्या गुन्ह्याकरिता नसून दंड न भरल्याकरिता असते.

अर्जेंटिना, ब्राझिल, सायप्रस, चिली, इक्वेडोर, इजिप्त आणि फिजी यासारख्या अनेक देशांमध्ये या गुन्ह्यांकरिता दंडाची तरतूद आहे. पंधरा वर्षाच्या कालावधीत चार निवडणुकांमध्ये मतदान न केल्यास त्या नागरिकांचे नाव मतदारयादीतून काढून टाकण्यात येते. सिंगापूरमध्येदेखील अशा व्यक्तींचे नाव मतदारयादीतून काढून टाकण्यात येते. मतदान न करण्याकरिता योग्य कारण दिल्यावरच पुन्हा यादीत नाव नोंदवून मतदानाचा अधिकार दिला जातो.

❖ ❖

---

# प्रभाव जाहिरातींचा

**(पान १५ वरून)**

चर्चा करण्यात आली. स्पर्धेद्वारे जाहिरातीचा मजकूर प्राप्त करण्यात आला. स्थानिक बोलीभाषेतील, स्थानिक लोकांचे छायाचित्र आणि आवाज वापरून सहजपणे पटेल, रुचेल अशा पद्धतीने जाहिराती तयार करण्यात आल्या. त्याचा अतिशय प्रभाव पडल्याचे दिसून आले.

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना योजनेतील विद्यार्थ्यांची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेतून जाणीवजागृतीसाठी प्रशिक्षक तयार केले गेले. त्यांनी ग्रामीण व शहरी भागातील झोपडपट्टी क्षेत्रात जाऊन चांगली व प्रभावी घोषवाक्ये वापरून मतदार नोंदणीचा प्रचार केला.




**घोषणा :**

✷ मजबूत लोकशाहीसाठी मतदान करा. ✷ मतदार नोंदणी व मतदान हा हक्क नसून राष्ट्रीय कर्तव्य आहे. ✷ आपल्या आईवडिलांनी मतदार म्हणून नोंदणी केली का ? ✷ महिला सरपंच केव्हा होता येते ? जेव्हा तुम्ही मतदार असता ? ✷ मतदान हे सुद्धा श्रेष्ठ दान आहे. ते प्रत्येकांनी बजावले पाहिजे. ✷ नाव नोंदणी करून घ्या, दक्ष नागरिक व्हा !!!

या मोहिमेमुळे ज्या तरुण मतदारांनी नावे नोंदवली त्यांना अतिशय वेगळ्या प्रकारचा आनंद झाल्याचे दिसून आले. अमूक मतदारसंघातील अमूक मतदान केंद्र (यादीचा भाग) अमूक अनुक्रमांकावर माझे नाव आहे, असे अभिमानाने सांगणारे ग्रामीण मतदार, भटक्या जमातीतील प्रथमच नाव नोंदविलेले मतदार, महिला मतदार आढळून आले. शहरी भागातील युवा मतदारांनी सक्रिय सहभाग घेतला. जाहिरातीचा मजकूर वाचून नाव नोंदणीस तयार झाल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

काही युवकांनी संकेतस्थळावरून अर्ज क्रमांक ६ डाऊनलोड केला. तर काहींनी हा अर्ज ऑनलाइन भरून पाठवले हेसुद्धा या मोहिमेचे यश म्हणावे लागेल.

**– संगीता चौगुले**
उप जिल्हा निवडणूक अधिकारी, कोल्हापूर

❖ ❖

# स्थानिक निवडणुकांचा सजग प्रहरी

केंद्रीय निवडणूक आयोगातर्फे लोकसभेच्या आणि राज्यातील विधानसभा/विधानपरिषदेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी घेण्यात येतात. भारतातील प्रत्येक राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात आहेत. नागरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे महानगरपालिका, नगरपालिका व नगर परिषदा या होत तर ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती अशा आहेत. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही दर पाच वर्षांनी घेण्यात येतात. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या धर्तीवर विहित मुदतीनंतर ठराविक दिवशी या निवडणुका घेतल्या जात नाहीत. कारण प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेचा विहित कालावधी संपण्याची तारीख वेगवेगळी असते. महाराष्ट्रामध्ये २८,५३९ स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. एवढ्या प्रचंड स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भयमुक्त वातावरणात व न्याय्य पद्धतीने सुखरूप पार पाडण्यासाठी १९९४ साली राज्याने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए या तरतुदीनुसार २३ एप्रिल, १९९४ पासून महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना केली.

**भारतातील प्रत्येक राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात आहेत. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दर पाच वर्षांनी घेण्यात येतात. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या धर्तीवर विहित मुदतीनंतर ठराविक दिवशी या निवडणुका घेतल्या जात नाहीत. कारण प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेचा विहित कालावधी संपण्याची तारीख वेगवेगळी असते. महाराष्ट्रामध्ये २८,५३९ स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. एवढ्या प्रचंड स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भयमुक्त वातावरणात व न्याय्य पद्धतीने पार पाडण्यासाठी १९९४ साली राज्याने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. राज्य निवडणूक आयोग शासनाच्या अखत्यारीत कामकाज करीत नाही. आयोगाच्या प्रशासकीय बाबी सामान्य प्रशासन विभागातर्फे हाताळण्यात येतात. आयुक्तांच्या बाबतीतील प्रशासकीय बाबींना राज्यपालांकडून मंजुरी घेणे आवश्यक आहे.**

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या नियुक्तीसाठी राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) अधिनियम, १९९४ (९४ चा महा. २२) यामध्ये तरतूद करण्यात आली आहे. याच अधिनियमाच्या अंतर्गत कलम १० मध्ये राज्य निवडणूक आयुक्तांच्या अन्य सेवा व शर्ती नमूद करण्यात आल्या आहेत.


राज्य निवडणूक आयुक्त हे पद घटनात्मक असल्यामुळे आयोगाचे कामकाज स्वतंत्रीत्या चालते. राज्य निवडणूक आयोग शासनाच्या अखत्यारीत आपले कामकाज करीत नाही. आयोगाच्या प्रशासकीय बाबी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातर्फे हाताळण्यात येतात. आयुक्तांच्या बाबतीतील प्रशासकीय बाबींना राज्यपालांकडून मंजुरी घेणे आवश्यक आहे.

**कार्यपूर्तीचे वेळापत्रक**

स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत संपण्यापूर्वी सार्वत्रिक निवडणूक घेऊन नवीन स्थानिक स्वराज्य संस्था वेळेत कार्यरत व्हावी यासाठी राज्य निवडणूक आयोग कार्यपूर्तीचे वेळापत्रक आखून देते. प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत संपण्यापूर्वी तेथील सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे घटनात्मक बंधन आयोगावर आहे. याखेरीज या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडून आलेली पदे उमेदवाराच्या निधनामुळे, राजीनाम्यामुळे किंवा अन्य कारणांमुळे रिक्त होतील त्या पदांच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रमही आयोगातर्फे देण्यात येतो.

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदारयाद्या**

भारत निवडणूक आयोगाकडून लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधील तरतुदीनुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधान सभेच्या मतदारयादीच्या आधारे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदारयाद्या तयार केल्या जातात. अशा प्रकारे मतदारयाद्या तयार करण्यासाठी, राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास, अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदारयादी विचारात घेण्यात येते. ही यादी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संबंधित प्रभागांमध्ये विभागून निवडणुकीकरिता मतदार




## राजकीय पक्षांची नोंदणी

राज्य निवडणूक आयोगाने राजकीय पक्षाची नोंदणी करण्यास नोव्हेंबर-२००४ पासून सुरुवात केली. आतापर्यंत आयोगाकडे एकूण ३३५ राजकीय पक्षांनी नोंदणी केली आहे. यामध्ये राष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त पक्ष, राज्यस्तरावरील मान्यताप्राप्त पक्ष तसेच नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षांचा समावेश आहे. यापैकी मान्यताप्राप्त पक्षाच्या वतीने निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना भारत निवडणूक आयोगाने आरक्षित केलेल्या निवडणूक चिन्हांचे वाटप केले जाते. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षाच्या उमेदवारांना चिन्ह वाटप करताना अपक्ष उमेदवारांना प्राधान्य दिले जाते. आयोगाने पक्ष नोंदणीसंदर्भात दिनांक ३१ मार्च २००९ रोजी सुधारित आदेश निर्गमित केले आहेत.




मतदारांबरोबरच राजकीय पक्षांना व उमेदवारांना मार्गदर्शक म्हणून आयोगातर्फे आचारसंहिता जारी करण्यात येते. निवडणुकीपूर्वी साधारण ४० ते ४५ दिवस म्हणजेच निवडणुका घोषित झाल्यावर ही आचारसंहिता सुरू होते. ज्या दिवशी निवडणुकीची घोषणा होते त्या दिवसाच्या मध्यरात्रीपासून आचारसंहिता अमलात येते. निवडणुका पार पाडून मतदान पूर्ण झाले व उमेदवार विजयी घोषित झाले की, त्यानंतर आचारसंहिता संपुष्टात येते.

यादी तयार करण्यात येते. भारत निवडणूक आयोगाने तयार केलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास नाहीत. मात्र मतदारयादीमध्ये मृत, दुबार अथवा स्थानांतरित मतदारांचा समावेश असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास त्या मतदारांच्या नावावर खोटे मतदान होऊ नये याकरिता त्या मतदारांच्या नावासमोर विशिष्ट खूण करण्यात येते. जेणेकरून अशा मतदारांच्या नावावर मतदान करण्यास आलेल्या व्यक्तीच्या ओळखीचे पुरावे काटेकोरपणे तपासणे शक्य होते.

**निवडणूक खर्चाचा हिशोब**

राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकार कक्षेत आणखी एक महत्त्वाचा विषय समाविष्ट केलेला आहे, तो म्हणजे निवडणुका पूर्ण झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत प्रत्येक उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रमुखांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना सादर करावयाचा असतो. विजयी झालेल्या उमेदवारांबरोबर पराभूत झालेल्या उमेदवारांचाही त्यात समावेश असतो. जे उमेदवार विहित मुदतीत आपले निवडणूक खर्चाचे हिशोब प्राधिकृत अधिकाऱ्यांना वेळेत सादर करीत नाहीत, त्यांना अनर्ह अथवा अपात्र ठरविण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत. महानगरपालिका निवडणुकीसंदर्भातील हे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना व उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भातील हे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ही




**इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामधील सुधारणा**

नव्या सुधारणेनुसार मतदान यंत्रावर आता मतदान यंत्र आणि त्यातील मेमरीचे अनुक्रमांक दिसतील. त्याचबरोबर प्रभाग क्रमांक, मतदान केंद्र क्रमांक इत्यादीबाबत माहिती मिळेल. त्यामुळे मेमरी बदलल्यास त्याबाबतचा संकेत मिळेल. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या संवेदनशील भागावर 'नॉन क्लोनेबल टॅग' लावण्यात आले आहेत. त्यामुळे मतदान यंत्रात फेरफार करता येणार नाही. तसे केल्यास ती आपोआप बंद होण्याची व्यवस्था केली आहे. मतदानयंत्रात सांकेतिक भाषेऐवजी विस्तृत माहिती दर्शविण्याची सोय करण्यात आली आहे. त्यामुळे प्रभाग आणि मतदान यंत्रांचे क्रमांक, तसेच यंत्रामध्ये वेळोवेळी होणाऱ्या घटनांची वेळ आणि बॅटरीची क्षमता दर्शविली जाते. त्याचप्रमाणे अंध मतदारांचा विचार करून मतदानयंत्रावर ब्रेल लिपीचीसुद्धा सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अपात्रता तीन वर्षांपर्यंत असते आणि ग्रामीण संस्थांसाठी पाच वर्षांपर्यंत असते. राज्य निवडणूक आयोगास लेखी करणे नोंदवून अशी अनर्हता दूर करण्याचे किंवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याचे अधिकार आहेत. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भातील हे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत.

**काळानुरूप सुधारणा**

१९९४ साली राज्य निवडणूक आयोगाची स्थापना झाल्यापासून या अनुषंगाने जे कायदे व नियम अस्तित्वात आहेत त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात येत होत्या. परंतु यात काळानुरूप सुधारणा करून मतदाराला केंद्रबिंदू मानून अनेक सुधारणा राज्य निवडणूक आयोगातर्फे करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये मतदान केंद्रातील व्यवस्था, मतदारयाद्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे, प्रभाग रचना व मतदान केंद्रांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे, मतदार यंत्रामध्ये अनेक सुधारणा करून ही यंत्रे मतदारांना सोईची करून देणे, इत्यादी गोष्टींचा समावेश आहे.

अधिकाधिक मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा आणि मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी आयोग प्रयत्नशील आहे. विशेषत: ज्येष्ठ नागरिक, वृध्द, गरोदर स्त्रिया व अपंग व्यक्ती यांची विशेष काळजी घेण्यात आली. त्यांच्यासाठी रॅम्पची व्यवस्था करण्यात येऊन मतदान केंद्र तळमजल्यावरच ठेवण्यात येते. मतदान केंद्रांच्या निकषांमध्ये नमूद केल्याप्रमाणे मतदारांच्या सोयीसाठी मतदान केंद्र दोन किलोमीटरच्या आत आणि मध्यवर्ती ठिकाणी राहील, तसेच मतदान केंद्रे मुख्यत: शासकीय, निमशासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारतीत पुरेसा प्रकाश असलेल्या हवेशीर जागेवर असतील. मतदारांना पावसाचा आणि उन्हाचा त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात येते. मतदान केंद्रात पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात.

मतदान केंद्रावर लांब रांगा लागू नयेत आणि मतदारांना सुलभरीत्या मतदान करता यावे यासाठी मतदान केंद्रांची कमाल मतदार संख्या कमी करण्यात येऊन मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रत्येक मतदान केंद्रावर कमाल १,००० तर उर्वरित महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकांकरिता प्रत्येक मतदान केंद्रावर कमाल ८०० इतकी मतदारांची संख्या असेल तर नगर परिषदेकरिता ही संख्या ६०० इतकी राहील.

**राज्य निवडणूक आयोगाची उपयुक्तता**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून लोकशाही रुजवण्याचेही काम त्यांच्या निवडणुकांद्वारे होते. त्यामुळे या निवडणुका यशस्वीपणे पार पाडणाऱ्या राज्य निवडणूक आयोगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.


❖ ❖

# शिस्त आणि पारदर्शकतेसाठी...

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता संबंधित संस्थेच्या क्षेत्रापुरतीच मर्यादित असते. परंतु या संस्थांच्या कार्यक्षेत्रात मतदारांवर प्रभाव टाकणारा निर्णय किंवा कृती इतरत्र जवळपास घडली तरी आचारसंहितेचा भंग होऊ शकतो. यामुळे अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होते, व उमेदवार आणि राजकीय पक्षांनाही बदनामीला सामोरे जावे लागते. ते टाळण्यासाठी आचारसंहितेची माहिती करून घेतल्यास सगळ्यांचीच अडचण दूर होऊ शकते. राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने आचारसंहितेच्या संदर्भातील नियम व आदेशांचे संकलन असलेली पुस्तिका प्रकाशित केलेली आहे. आचारसंहितेच्या संदर्भात नियमित विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांनाही त्यात उत्तरे दिलेली आहेत. तसेच 'काय करावे' व 'काय करू नये' याचा परामर्शही घेतला आहे. ही माहिती पुस्तिका आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी, राजकीय पक्ष आणि उमेदवारांना मार्गदर्शिका म्हणून उपयुक्त ठरेल.

**आचारसंहितेमध्ये प्रत्येक प्रश्नाचे स्पष्ट उत्तर**

अनेकदा शासकीय अधिकारी आचारसंहितेचा बागुलबुवा करून, राज्य निवडणूक आयोगाचे स्पष्ट लिखित आदेश असूनही आचारसंहितेच्या काळात अनेक प्रकरणे निवडणूक आयोगाकडे पाठवतात. वास्तविक पाहता आचारसंहितेमध्ये निवडणुकीदरम्यान होणाऱ्या घटनांबद्दल टिप्पणी असून, प्रत्येक प्रश्नाचे उत्तर त्यात स्पष्टपणे दिले आहे. उदा. दुष्काळ, पाणीटंचाई, गंभीररीत्या आजारी असलेल्यांना मदत तसेच सुरू असलेल्या योजना पुढे चालू ठेवण्याबाबत, इत्यादीबाबतची कार्यवाही निवडणूक काळातही करण्यास कुठलीच बंदी नसते. फक्त अशा उपक्रमांची अथवा योजनांची प्रसिद्धी अथवा राजकीय व्यक्तींची भाषणे वा मुलाखती या दरम्यान दूरदर्शनच्या माध्यमातून दाखवल्या जाऊ नयेत एवढीच अपेक्षा असते.




आचारसंहितेच्या काळात जाहीर प्रचाराचा कालावधीही प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी नमूद केला आहे. उद्घाटन समारंभ, शासकीय दौरे, विश्रामगृहाचा वापर, वाहनांचा वापर, मतदान केंद्रातील प्रवेश, व्हिडिओ चित्रीकरण, ध्वनीक्षेपकाचा वापर, या सर्व गोष्टींची शहानिशा आचारसंहितेमध्ये नमूद केली आहे. निवडणुकीच्या दरम्यान ही आचारसंहिता राजकीय पक्ष, उमेदवार, शासकीय अधिकारी तसेच सामान्य जनता या सर्वांनाच उपयोगी पडणारी आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मोकळ्या, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडल्या जाव्यात या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने डिसेंबर-२०११ मध्ये आचारसंहितेबाबत एकत्रित आदेश निर्गमित केले. निवडणुका जाहीर झालेल्या क्षेत्रातील मतदारांवर प्रभाव पडतील, असे निर्णय निवडणुकीच्या तोंडावर घेतले जाऊ नयेत, असा यामागील उद्देश आहे.**

**आचारसंहिता नियमांचा भंग**

आचारसंहिता नियमांचा भंग झाल्यास राज्य निवडणूक आयोगाकडून संबंधित उमेदवाराला अथवा पक्षाला कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात येते. त्या नोटिशीचे उत्तर उमेदवाराने अथवा राजकीय पक्षाने समाधानकारकरीत्या दिले तर त्या व्यक्तीला किंवा पक्षाला केवळ समज देण्याचा प्रघात आहे. छोट्या छोट्या आचारसंहिता भंगाबाबत मोठी शिक्षा देण्याची तरतूद आचारसंहितेमध्ये केलेली नाही. उमेदवार किंवा राजकीय पक्षाकडून मोठा गुन्हा घडल्यास त्या गुन्ह्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांतर्फे स्थानिक पोलिसात गुन्हा नोंदवण्यात येतो. नंतर न्यायालयात याचा खटला चालतो. एखाद्या मंत्र्याने किंवा उमेदवाराने आचारसंहितेच्या काळात आचारसंहितेचा भंग केला तर त्याला नोटीस देऊन समज देणे म्हणजेच निवडणुकीदरम्यान त्याच्या वागणुकीवर अंकुश ठेवण्याचे काम राज्य निवडणूक आयोग करीत असते.

**खाजगी संस्थांकडून आचारसंहितेबाबत अनाठायी विचारणा**

अनेकदा खाजगी संस्था अथवा मंडळे आम्हालाही आचारसंहिता लागू आहे का अशी विचारणा अनाठायी करीत राहतात. राज्य निवडणूक आयोगातर्फे जारी केलेली आचारसंहिता केवळ शासन, राजकीय पक्ष व उमेदवारांपुरतीच असते. निवडणुका संपून निकाल जाहीर झाले की, ही आचारसंहिता संपुष्टात येते. ज्या क्षेत्रात निवडणूक आहे त्या क्षेत्रापुरतीच आचारसंहिता लागू असते. निवडणुकीपूर्वी साधारण ४० ते ४५ दिवस अगोदर आचारसंहिता सुरू होते. पूर्वी ही आचारसंहिता निवडणुका जाहीर झाल्याच्या क्षणापासून सुरू होत असे. त्यामध्ये आता बदल करून ज्या दिवशी निवडणुका घोषित होतात त्या दिवसाच्या मध्यरात्रीपासून आचारसंहिता लागू होईल असे आयोगाने जाहीर केले आहे. याचा हेतू एवढाच आहे की अचानक निवडणुका घोषित झाल्या आणि त्याच दिवशी संध्याकाळी राजकीय व्यक्तींचे काही **(पान ६६ वर)**


# नवा प्रभावी पर्याय

डॉ. दिलीप साधले

'नोटा'चा पर्याय उपलब्ध झाल्यामुळे ज्या मतदारांना कोणत्याही उमेदवाराला मतदान करण्याची इच्छा नसेल ते मतदार आपला मतदानाचा हक्क कोणत्याही उमेदवाराला मतदान न करता गोपनीयरीत्या बजावू शकतील. मतपत्रिकेवर अथवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर सर्व उमेदवार आणि त्यांच्या चिन्हांखाली यापैकी एकही नाही असा पर्याय असेल. नकाराधिकार वापरणारा मतदार या पर्यायासमोरील बटण दाबून आपला मतदानाचा हक्क बजावेल.

**मतदानाचा अधिकार**

आपल्या राज्य घटनेने प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला आहे. लोकांचे, लोकांनी निवडून दिलेले आणि लोकांसाठी असलेले शासन म्हणजे लोकशाही. लोकशाहीमध्ये प्रत्येकाचे मत महत्त्वाचे असते. कारण या मताद्वारेच आपण लोकप्रतिनिधी आणि लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून शासनाची निवड करत असतो. आपल्या पसंतीचा किंवा आपल्याला योग्य वाटणारा उमेदवार नसेल तर मतदाराला मतदान करावेसे वाटत नाही. परंतु आता असे वाटत असेल तरीसुद्धा त्याला मतदान करता येऊ शकते. मतपत्रिकेवरील एकही उमेदवार योग्य वाटत नसेल तरीही आपण मतदान करू शकतो. यासाठी वरीलपैकी एकही नाही (None of the above) म्हणजेच नोटा (NOTA) हा पर्याय आता मतदारांसाठी उपलब्ध झाला आहे.





**सर्वोच्च न्यायालयाच्या २७ सप्टेंबर, २०१३ च्या आदेशान्वये सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील सर्व नागरिकांना नकाराधिकाराचा, 'नोटा' हा पर्याय उपलब्ध झाला. सर्वोच्च न्यायालयाने नकारात्मक मतदान करण्याचा नागरिकांचा अधिकार मान्य केला. त्यामुळे मतदान प्रक्रियेत सर्वच उमेदवारांना नकार देण्याचा पर्याय समाविष्ट करण्यात आला. जनप्रतिनिधित्व कायद्यात अशी तरतूद आहे. परंतु त्यासाठी मतदाराला अर्ज करावा लागतो. आता या निर्णयामुळे अर्ज करण्याची गरज भासणार नाही. राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदारांसाठी 'नोटा' हा पर्याय उपलब्ध करून दिला. इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रावर तशी सुधारणा करण्यात आली. १ डिसेंबर, २०१३ पासून झालेल्या राज्यातील महानगरपालिका, जिल्हापरिषदा/पंचायत समित्या, नगरपरिषदा/नगरपंचायती आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदारांसाठी ही सुविधा उपलब्ध करून देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.**

**नकारात्मक मतदानाच्या अधिकाराचा वापर**

अलीकडेच झालेल्या ५ राज्यांच्या विधानसभा तसेच महाराष्ट्रातील महानगरपालिका, जिल्हापरिषदा/पंचायत समित्या, नगरपरिषदा/नगरपंचायती व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये नकारात्मक मतदानाचा अधिकार (नोटा) मोठ्या प्रमाणावर वापरण्यात आला. मतदारांना नकाराधिकाराची सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर प्रथमच झालेल्या धुळे व अहमदनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत २.२१ टक्के, धुळे, नंदूरबार, अकोला व वाशिम जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीत सरासरी ५.०३ टक्के, कर्जत (जि. रायगड), श्रीगोंदा (जि. अहमदनगर), सिल्लोड (जि. औरंगाबाद), रिसोड (जि.वाशिम), ब्रम्हपुरी (जि. चंद्रपूर) आणि मौदा (जि. नागपूर) या नगर परिषदा व महादुला (जि. नागपूर) या नगर पंचायतीच्या निवडणुकीत सरासरी ६.०७ टक्के तर ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत सरासरी सुमारे २ टक्के मतदारांनी नकाराधिकाराचा वापर केला.

'नोटा'चा पर्याय उपलब्ध झाल्यामुळे ज्या मतदारांना कोणत्याही उमेदवाराला मतदान करण्याची इच्छा नसेल तर ते मतदार आपला मतदानाचा हक्क कोणत्याही उमेदवाराला मतदान न करता गोपनीयरीत्या बजावू शकतील. मतपत्रिकेवर अथवा इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रावर सर्व उमेदवार आणि त्यांच्या चिन्हांखाली यापैकी एकही नाही असा पर्याय असेल. नकाराधिकार वापरणारा मतदार या पर्यायासमोरील बटण दाबून आपला मतदानाचा हक्क बजावेल.

निकाल जाहीर करताना नोटाच्या पर्यायासमोर नोंदवलेल्या मतांची संख्या विचारात न घेता ज्या उमेदवाराला सर्वाधिक मते मिळाली असतील त्याला विजयी उमेदवार म्हणून घोषित करण्यात येईल. म्हणजेच नोटा या पर्यायासमोर नोंदवलेल्या मतांची संख्या सर्वाधिक मते मिळविलेल्या उमेदवारास मिळालेल्या मतांच्या संख्येपेक्षा जास्त असली तरी त्या उमेदवाराला विजयी घोषित करण्यास



प्रतिबंध राहणार नाही.

### इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर 'नोटा'चा पर्याय

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर 'नोटा' या पर्यायाची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे या पर्यायाचा वापर करणाऱ्या मतदारांची संख्या लगेच कळू शकेल. विजयी उमेदवारांपेक्षा नकाराधिकाराची अर्थात नोटाची मते जास्त असली तरीही जास्त मते मिळविणारा उमेदवारच विजयी ठरतो हा लोकशाहीचा अपमान आहे असे काहीजणांना वाटते. परंतु आता ही एक नवीन सुरुवात आहे. नकाराधिकाराचा वापर करणाऱ्यांची संख्या आता आपल्याला कळू लागली आहे. पुढील काळात कदाचित निकाल जाहीर करताना नोटाच्या मतांचा विचार केला जाईलही.

### लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल

निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयाने लोकशाहीचा पाया मजबूत करण्याच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. ज्याला मत द्यावे, असा पात्र उमेदवार कोणीही नाही असे मतदाराला वाटले तर तो नकारात्मक मतदानाचा हक्क बजावू शकतो. त्यामुळे राजकीय पक्षांना आपल्या उमेदवाराच्या निवडीबाबत अधिक सतर्क राहावे लागेल आणि मतदारही मतदान टाळण्यासाठी काही युक्तिवाद करू शकणार नाही. नोटा लागू केल्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढणार आहे. शिवाय नकारात्मक मतदानाचा लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी कितपत उपयोग होतो हेही आपल्याला पाहता येईल. ❖ ❖

# शिस्त आणि पारदर्शकतेसाठी...

(पान ६४ वरून)


कार्यक्रम असले तर ते कार्यक्रम रद्द करण्यासाठी फार यातायात पडते. काही वेळेला असे कार्यक्रम रद्द करणे शक्यही नसते.

राज्य शासनातर्फे काही कार्यक्रम पूर्वनियोजित तारखांना ठरविले जातात. त्यासाठी पाहुणे मंडळी अथवा पुरस्कार विजेते दूरवरुन अशा समारंभासाठी येतात. अशावेळी ज्या विभागातर्फे हा कार्यक्रम ठरवलेला असतो त्या विभागाला आयोगाची पूर्वपरवानगी घेऊन आपला कार्यक्रम पूर्णत्वाला नेण्यास कुठलीच अडचण नसते. मात्र अशाप्रसंगी राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य आहे.

### आचारसंहिता शिस्त लावण्यापुरतीच मर्यादित

आचारसंहिता ही निवडणूक काळात राजकीय पक्ष, राज्य शासन, उमेदवार आणि मतदार यांना शिस्त लावण्यापुरतीच मर्यादित असते. शक्यतो कोणीही आचारसंहितेचा भंग करू नये अशी राज्य निवडणूक आयोगाची अपेक्षा असते. परंतु, गेल्या काही वर्षात प्रसार माध्यमे कुठल्याच प्रकारची आचारसंहिता मानीत नाहीत असे निदर्शनास आले आहे. निवडणुकीपूर्वी ४८ तास अगोदर निवडणूक प्रचार संपतो. असे असतानाही दूरदर्शन वाहिन्यांवरुन राजकीय पक्षातील नेत्यांच्या अथवा महत्वाच्या व्यक्तींच्या मुलाखती दिवसरात्र दाखविल्या जातात. चर्चासत्रही दाखवले जाते. त्यामुळे आचारसंहितेचा भंग होतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

उमेदवारांनी लावलेले पोस्टर्स, बॅनर्स अथवा कुठल्याही प्रकारची प्रसिद्धीपत्रके निवडणुकीपूर्वी ४८ तास अगोदर काढली जावीत यावर आयोगाचा कटाक्ष असतो. त्याचे अनुपालन प्रामाणिकपणे करण्यात यावे यावर न्यायालयाचेही निर्देश असल्यामुळे याबाबत आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे. ❖ ❖




नको, तुमची गाडी नको... माझ्या देशासाठी मतदान केंद्रापर्यंत चालत जाणे मला अवघड नाही!

**लोकराज्य या प्रकाशनाची मालकी व अन्य माहिती, यासाठी द्यावे लागणारे निवेदन तक्ता – ४ नियम ८ वा**

| | |
|---|---|
| १) प्रकाशन ठिकाण | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ |
| २) प्रकाशन काल | : मासिक |
| ३) मुद्रकाचे नाव | : प्रल्हाद जाधव |
| भारताचे नागरिक आहेत का? : होय | |
| ४) प्रकाशकाचे नाव | : प्रल्हाद जाधव |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ |
| ५) संपादकाचे नाव | : प्रल्हाद जाधव |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ |

मी प्रल्हाद जाधव असे जाहीर करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

**प्रल्हाद जाधव**
**मुद्रक व प्रकाशक**

# विक्रमी मतदानाच्या दिशेने...

महाराष्ट्रात दि. १०, १७ आणि २४ एप्रिल रोजी १६ व्या लोकसभा निवडणुकीसाठी मतदान होत आहे. त्या निमित्ताने हा निवडणूक विशेषांक आपल्या हाती देताना आनंद होत आहे.

निवडणूक म्हटली की, सर्वप्रथम एक गोष्ट मनात येते ती म्हणजे सर्व मतदारांच्या नावांची नोंदणी. त्यादृष्टीने खेड्यापाड्यात, वाडी-वस्त्यांवर राहणाऱ्या मतदारांचे प्रबोधन घडवून त्यांची नावनोंदणी करणे हे एक मोठे आव्हान होते. पण एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, या निर्धाराने भारत निवडणूक आयोगाने 'स्वीप' या मोहिमेद्वारे लोकजागराचे - नावनोंदणीचे काम अखंडितपणे सुरू ठेवले. विविध लोककला, पारंपरिक माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना यांचे मोठ्या प्रमाणावर सहकार्य मिळवून नवीन युवा मतदारांची भरघोस नोंदणी करण्यात यश मिळविले.

प्रत्यक्ष मतदान आणि मतमोजणीच्या पार्श्वभूमीवरही शासकीय यंत्रणेला फार मोठी कामगिरी पार पाडावी लागते. मतदान केंद्राची निर्मिती, मतदान यंत्रे केंद्रांवर पाठवणे, कर्मचारी-अधिकारी यांना प्रशिक्षण देणे, मतदारांना निर्भय आणि सुरक्षित वातावरणात मतदान करता येणे शक्य व्हावे म्हणून व्यवस्था करणे, निवडणुकीतील पक्ष आणि उमेदवार यांच्याकडून आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी सजग राहणे, इलेक्ट्रॉनिक, मुद्रित आणि सामाजिक माध्यमांमधील उमेदवार आणि पक्षांच्या प्रचाराबाबतचे संदर्भ ठेवणे अशा अनेक बाबी चिकाटीने पार पाडाव्या लागतात.

निवडणुकांची घोषणा ते निकाल हा संपूर्ण काळ शासन यंत्रणेसाठी अत्यंत आव्हानात्मक असतो. पण हे आव्हान महाराष्ट्राने यापूर्वी प्रत्येकवेळी यशस्वीपणे पेलून दाखवले आहे. या उज्ज्वल परंपरेची या वेळीही पुनरावृत्ती होईल, असा सार्थ विश्वास मा. मुख्य सचिवांनी मनोगतामध्ये व्यक्त केला आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या मा. आयुक्त श्रीमती नीला सत्यनारायण यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांतील निवडणुकांमध्ये राबविलेल्या प्रयोगांची माहिती या अंकात जाणीवपूर्वक प्रसिद्ध करण्यात आली आहे. महिलांची आत्मप्रतिष्ठा वाढावी आणि त्यांना खऱ्या अर्थाने पुरुषांच्या बरोबरीने काम करता यावे यासाठी त्यांनी दिलेले योगदान मोलाचे असून, त्याचे दर्शन संबंधित लेखांमधून होईल. मा. आयुक्त आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यादृष्टीने केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार.


या अंकाची तयारी सुरू असताना मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर यांच्याकडे शासनाने वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाचा तसेच माहिती व जनसंपर्क विभागाचा कार्यभार सोपवला. लोकराज्यला संजीवनी देण्याचे जे अभूतपूर्व काम श्रीमती म्हैसकर मॅडम यांनी केले आहे त्याची जाणीव संपूर्ण महाराष्ट्राला आहे. महासंचालनालयाच्या परिवारात त्यांचे पुन्हा सहर्ष स्वागत आहे. दरम्यानच्या काळात श्री. प्रमोद त्र्यं. नलावडे यांनी सामान्य प्रशासन विभागात, सचिवपदाचा कार्यभार स्वीकारला. विद्यमान अंकाची संकल्पना त्यांचीच आहे. लोकराज्यचे मुख्य संपादक म्हणून आपल्या कारकिर्दीत त्यांनी जे स्पृहणीय काम केले त्याचे स्मरण लोकराज्य परिवाराला कायम राहील.

या अंकाच्या निर्मितीसाठी महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी व प्रधान सचिव श्री. नितीन गद्रे, उप मुख्य निवडणूक अधिकारी श्री. शिरीष मोहोड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले आहे. मतदारांनी विक्रमी संख्येने मतदान करावे, असा ध्यास घेऊन त्यांची सारी यंत्रणा अहोरात्र काम करीत आहे. महाराष्ट्रातील मतदार त्यांचे हे स्वप्न मतदानास प्रचंड प्रतिसाद देऊन साकारतील, अशी खात्री आहे.

या अंकात समाविष्ट केलेली 'लोकसभा निवडणूक : एक दृष्टिक्षेप' या लेखातील माहिती हे या अंकाचे वैशिष्ट्य ठरले आहे. अभ्यासकांबरोबरच सर्वसामान्य वाचकालाही ती माहिती उपयोगी पडेल यात शंका नाही. या माहितीसोबत प्रसिद्ध केलेले मतदारसंघांचे नकाशे महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्राचे मुंबई प्रमुख श्री. विवेकानंद घारे यांनी आपल्या यंत्रणेमार्फत खास तयार करून दिले आहेत, त्यांचे विशेष आभार.

१६ व्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, विक्रमी मतदानाच्या दिशेने झेप घेण्यासाठी महाराष्ट्र कसा सज्ज झाला आहे याचे दर्शन हा अंक घडवील तसेच एक संग्राह्य संदर्भ म्हणून आपले स्थान निर्माण करील, असा विश्वास आहे.

**प्रल्हाद जाधव**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
dg@dgipr.maharashtra.gov.in



# असे होईल मतदान

## १० एप्रिल २०१४

५ बुलडाणा
६ अकोला
७ अमरावती
८ वर्धा
९ रामटेक
१० नागपूर
११ भंडारा-गोंदिया,
१२ गडचिरोली-चिमूर
१३ चंद्रपूर
१४ यवतमाळ-वाशिम
रामटेक, ६ नागपूर,

## १७ एप्रिल २०१४

१५ हिंगोली
१६ नांदेड
१७ परभणी
३३ मावळ
३४ पुणे
३५ बारामती
३६ शिरुर
३७ अहमदनगर
३८ शिर्डी
३९ बीड
४० उस्मानाबाद
४१ लातूर
४२ सोलापूर
४३ माढा
४४ सांगली
४५ सातारा
४६ सिंधुदुर्ग-रत्नागिरी
४७ कोल्हापूर
४८ हातकणंगले

## २४ एप्रिल २०१४

१ नंदुरबार
२ धुळे
३ जळगाव
४ रावेर
१८ जालना
१९ औरंगाबाद
२० दिंडोरी
२१ नाशिक
२२ पालघर
२३ भिवंडी
२४ कल्याण
२५ ठाणे
२६ मुंबई उत्तर
२७ मुंबई उत्तर पश्चिम
२८ मुंबई उत्तर पूर्व
२९ मुंबई उत्तर मध्य
३० मुंबई दक्षिण मध्य
३१ मुंबई दक्षिण
३२ रायगड

# आपल्याला हे माहीत हवे

| | |
|---|---|
| राज्याचे एकूण क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | ३०७७१३ |
| सागरीकिनारा (किमी) | ७२० |
| महसूल विभाग | ६ |
| जिल्हे | ३५ |
| तालुके | ३५८ |
| गावे | ४३७११ |
| महानगरपालिका | २६ |
| नगरपरिषदा | २२० |
| नगरपंचायती | १२ |
| जिल्हा परिषदा | ३३ |
| पंचायत समित्या | ३५१ |
| ग्रामपंचायती | २७८७३ |
| कटक मंडळे | ७ |
| लोकसभा मतदारसंघ | ४८ |
| राज्यसभा सदस्य | २० |
| विधानसभा मतदारसंघ | २८८ |
| विधानपरिषद सदस्य | ७८ |
| मतदान केंद्रांची संख्या | ८९४७९ |

| | |
|---|---|
| नोंदणीकृत मतदार (१.१.२०१४ या अर्हता दिनांकावर आधारित) | ७८९६६६४२ |
| पुरुष मतदार | ४१८४१९३४ |
| महिला मतदार | ३७१२४४३८ |
| इतर मतदार ( तृतीय पंथी) | २७० |
| १८ वर्षे व त्याहून अधिक वयाच्या लोकसंख्येत मतदारांचे प्रमाण | ९८.३४ |
| दर हजार पुरुष मतदारांमागे महिलांचे प्रमाण | ८८७ |
| एकूण लोकसंख्येच्या तुलनेत १८ ते १९ या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण (%) | ३.३१ |
| १८ ते १९ च्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत त्या वयोगटातील मतदारांचे प्रमाण (%) | १.३५ |
| छायाचित्र मतदार ओळखपत्राचे प्रमाण | ९१.४२ % |
| मतदारयादीतील छायाचित्र | ९०.३२ % |

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From18th to 25th March 2014
Date of Publication : 10th of every Month

वाचा आणि
समृद्ध व्हा

अवघ्या
दहा रुपयांत

वार्षिक वर्गणी
१०० रुपये

# भविष्य घडवू महाराष्ट्राचे
# ठाम निर्धार मनाचा
# निर्भय होऊन बजावू
# हक्क मतदानाचा !

# लोकराज्य



O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ साहाय्यक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रल्हाद जाधव, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई – ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रल्हाद जाधव